
महाराष्ट्राचे
शिल्पकार
लोकहितवादी
RAJA BADSAL
डॉ. निर्मलकुमार फडकुले
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

द्रष्टा समाजसुधारक

# लोकहितवादी

(गोपाळ हरी देशमुख)

**डॉ. निर्मलकुमार फडकुले**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : जानेवारी २००४
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २०

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : श्री. राजा बडसल

किंमत : ४० रु.

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | मनोगत | ५ |
| १. | व्यक्तित्वाची घडण | ७ |
| २. | शतपत्रां तील समाजचिंतन | २३ |
| ३. | आर्थिक आणि राजकीय विचार | ५३ |
| ४. | इतिहास कशासाठी ? | ६० |
| ५. | धर्माचा हेतू आत्मविकास | ६५ |
| ६. | आणखी काही वैशिष्ट्यपूर्ण पुस्तके | ६८ |
| ७. | लोकहितवादींचे टीकाकार | ७७ |
| ८. | आजच्या संदर्भात लोकहितवादी | ८१ |
| ९. | लोकहितवादींचे प्रकाशित साहित्य | ८४ |

# मनोगत

महाराष्ट्राचे सुंदर आणि सुदृढ शिल्प अनेक संतांनी, वीरांनी आणि क्रांतिकारकांनी प्रयत्नपूर्वक घडवले. त्यांच्यामुळेच महाराष्ट्राला 'महाराष्ट्र' ही संज्ञा सार्थ वाटते. देशातला एक प्रगत विचारांचा प्रांत म्हणून महाराष्ट्राचा लौकिक आहे. या भूमीत नवविचारांची रचना करणारे विचारवंत सुधारक उदयाला आले. समाजमनाला आकार देण्यासाठी जुने आचारविचार आणि रूढींची बंधने प्रयत्नपूर्वक बाजूला सारावी लागली. ज्या चाकोरीतून कित्येक शतके समाज चालत होता ती जुनी चाकोरी सोडून नव्या दृष्टिकोनातून नव्या वाटांचा शोध अनेक विचारवंतांनी केला. आधुनिक काळात ही प्रक्रिया इंग्रजी राज्य आल्यानंतर सुरू झाली. बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेमहाराज यांच्यापर्यंत हे काम येऊन पोहोचले. समाजसुधारकांची एक ताज्या दमाची उत्साही परंपरा या दीडशे वर्षांच्या अवधीत निर्माण झाली. महाराष्ट्राच्या सामाजिक विचाराला गती आणि शक्ती देण्याचे कार्य अनेकांनी केले. त्यांत लोकहितवादी, म. फुले, न्या. रानडे, आगरकर, राजर्षी शाहूमहाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, स्वा. सावकर, कर्मवीर भाऊराव पाटील अशा कित्येक थोर ध्येयवाद्यांचा उल्लेख करता येईल. आज महाराष्ट्र सामाजिकदृष्ट्या प्रगत झालेला दिसतो, याचे श्रेय या समाजपुरुषांना आहे. ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई ही विशेषनामेही वरील नामावलीत समाविष्ट केली पाहिजेत.

राजकीय स्वातंत्र्यासाठी लढा देणारे वीर जितके त्यागी आणि विचारवंत होते तितकेच सामाजिक क्रांतीसाठी संघर्ष करणारे हे वीरही महनीय आहेत. आपले कार्य करीत असताना त्यांना रात्रंदिन स्वतःशी आणि जगाशी झगडत राहावे लागले. उपेक्षा आणि अपमान, विरोध आणि छळ यांचे काटेकुटे त्यांच्या पदरात पडले. पण आपल्या उद्दिष्टांपासून ते विचलित झाले नाहीत. सामाजिक प्रगतीची विचारधारा घेऊन ते चालत राहिले. त्यांनी केलेल्या नवरचनात्मक कार्याची योग्य ओळख व्हावी म्हणून 'महाराष्ट्राचे शिल्पकार' ही योजना हाती घेऊन महाराष्ट्राला विविध क्षेत्रांत ज्यांनी उंची प्राप्त करून दिली त्यांची चरित्रे साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशित करीत आहे. या योजनेच्या अंतर्गत 'लोकहितवादी' हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. साहित्य संस्कृती मंडळाने व मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. रं. बोराडे यांनी हे पुस्तक लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली. लोकहितवादींच्या क्रांतिकारक विचारांची आणि कार्याची ओळख व चिकित्सा या पुस्तकातून मी संक्षेपाने केली आहे. अव्वल इंग्रजीच्या कालखंडात नव्या विचारांचे प्रवर्तन करणारे लोकहितवादी हे महाराष्ट्रातल्या आद्य सुधारकांपैकी एक आहेत. म. फुले आणि रानडे यांच्याबरोबर त्यांनी राहून प्रबोधनाच्या चळवळीत मौलिक भर टाकली. नवजीवनाचे आंदोलन (Renaissance) महाराष्ट्रात सुरू करून ते रुजवण्यात लोकहितवादींचा वाटा महत्त्वाचा आहे. त्यांचे चित्र आणि चरित्र रेखाटण्याचा प्रयत्न या पुस्तकातून मी केला आहे. आधुनिक काळाचा अन्वयार्थ लावून पुरोगामी विचाराकडे महाराष्ट्राला वळवण्याचा प्रयास करणाऱ्या या विचारवंताच्या विचारांची मी ओळख करू दिली आहे. माझ्यावर ही जबाबदारी टाकणाऱ्या महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा मी आभारी आहे. पृष्ठसंख्येच्या मर्यादेत लोकहितवादींचे समग्र साहित्य बसत नसल्यामुळे काही ठळक साहित्याचाच संक्षिप्त परामर्श घेतला आहे. तरीही विवेचनात उणीव राहू नये याची दक्षता घेतली आहे. हे लेखन सौ. मन्दाकिनी फडकुले यांच्या सहकार्यामुळे होऊ शकले. त्यांचे आभार मानण्याचा उपचार अनावश्यक आहे.

**- निर्मलकुमार फडकुले**

अनुक्रमणिका

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती महाराष्ट्राचे शिल्पकार या योजनेअंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील लोकहितवादी हा विसावा चरित्रग्रंथ आहे.

लोकहितवादींच्या व्यक्तिगत जीवनाविषयी व त्यांच्या कार्यकतृत्वाविषयी डॉ. निर्मलकुमार फडकुलेसरांना नितांत आदर आहे, जिव्हाळा आहे. याच जिव्हाळ्यापोटी त्यांनी लोकहितवादींवर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी केलेल्या टीकेचा परखड शब्दांत समाचार घेतलेला आहे. लोकहितवादी हे बंडखोर होते हे मान्य करीत असतानाच महात्मा फुले यांच्याप्रमाणेच कृतीच्या पातळीवर उतरून सामाजिक स्वरूपाचे लढे त्यांना उभारता आले नाहीत हे ते मान्य करतात, हे खरे; पण कदाचित आपल्या सरकारी नोकरीमुळे त्यांना अशा प्रकारच्या चळवळी बांधणे शक्य झाले नसेल; असे त्याचे कारणही ते नमूद करतात. अर्थात केवळ कृतीच्या पातळीवरच नव्हे तर उक्तीच्या पातळीवरही लोकहितवादी महात्मा फुलेंची बरोबरी करू शकत नाहीत हे निर्विवाद सत्य आहे.

अर्थात डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटल्याप्रमाणे समाजजागृतीसाठी आपल्या लेखणीचा आणि वाणीचा सतत उपयोग करणारा लोकहितवादींसारखा लोकाभिमुख साहित्यिक आणि विचारवंत त्यांच्या कालखंडात तरी प्रामुख्याने लोकहितवादी हेच आहेत. महात्मा फुले, आगरकर, रानडे इत्यादी विचारवंत त्यांच्यानंतर सार्वजनिक जीवनात आले आहेत. म्हणूनच लोकहितवादी महाराष्ट्राचे आद्य प्रबोधनकार असल्याचे मान्य करावेच लागते.

डॉ. निर्मलकुमार फडकुलेसर हे शैलीदार वक्ते आहेत. सोप्या पण नेमक्या उदाहरणातून आपले म्हणणे श्रोत्यांच्या मनावर बिंबविण्याचा जो शैलीदार वक्त्याचा गुण असतो तो त्यांच्या या लेखनात उतरला आहे. लोकहितवादींचे व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले हे सांगताना त्यांनी झाडाचे उदाहरण देऊन ‘माणूस समाजातच घडतो. घराच्या चार भिंतीत त्याची वाढ होत नाही. झाड उघड्यावरच वाढते. मोकळी हवा आणि सूर्यप्रकाश मिळत गेला की झाड पोसले जाते. नाहीतर ते खुरटून जाते. माणसाचेही असेच असते. घर, कुटुंब, समाज, नाना प्रकारच्या विचारांनी फुललेले वातावरण यांच्यामधून मनुष्याच्या मनाला आणि व्यक्तिमत्त्वाला बळ येते. माणूसदेखील या सगळ्या घटकांतून संस्कार घेण्याइतका उत्सुक मनाचा असावा लागतो. असा अनेक घटकांचा मिळून झालेला एक परिणाम म्हणजे माणसाचे व्यक्तिमत्त्व ’, असे त्यांनी नेमकेपणाने अभिव्यक्त केले आहे.

डॉ. निर्मलकुमार फडकुलेसरांनी लिहिलेला हा ग्रंथ मराठी वाचकांना निश्चितच आवडेल, असा मला विश्वास आहे.

मुंबई
दिनांक : १४ जानेवारी २००४

रा. रं. बोराडे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# १. व्यक्तित्वाची घडण

'लोकहितवादी' हे एका समाजसुधारक लेखकाने घेतलेले टोपणनाव आहे. या नावातूनच त्या लेखकाच्या जीवनोद्देशाचा परिचय होऊ शकतो. गोपाळ हरी देशमुख हे त्यांचे संपूर्ण नाव. देशमुखांचे मूळ नाव 'सिद्धये' असे होते. देशमुखी वतनावरून देशमुख हे नाव रूढ झाले. गोपाळरावांचा जन्म पुण्याला १८ फेब्रवारी १८२३ रोजी झाला. यावेळी पेशवाईचा अस्त होऊन पाच वर्षे झाली होती. पेशवाईतल्या अराजकाच्या अनेक खुणा त्यावेळच्या पुण्यात स्पष्टपणे दिसत होत्या. पेशव्यांच्या हातून मराठी राज्याची सत्तासूत्रे जावीत आणि इंग्रजी राज्य यावे असे त्यावेळच्या लोकांना वाटत होते. याचा अर्थ राज्यकर्तृत्वाला आणि प्रजापालनाला आवश्यक असलेले गुण दुसऱ्या बाजीरावात मुळातच नव्हते. अन्याय आणि भ्रष्ट आचारविचार यांनी पोखरलेली पेशवाई राजवट खरे तर आपल्याच दुर्बलतेमुळे कोसळून पडली. धूर्त इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावाकडून राज्यसूत्रे सहजपणे काढून घेतली. वैयक्तिक भोगविलासात बुडून गेलेला हा पेशवा पुढे इंग्रजांनी दिलेल्या तनख्यावर निष्क्रियपणे जगत राहिला, असा इतिहास आहे. ही पेशवाई विसर्जित झाल्यानंतर पाच वर्षांनी गोपाळरावांचा जन्म झालेला आहे हे लक्षात घेतले म्हणजे पेशवाईबद्दल आणि विशेषतः दुसऱ्या बाजीरावाबद्दल त्यांनी प्रतिकूल टीका का केली, याचा बोध होतो. ते पेशवाईचे द्वेष्टे नव्हते. पण अंतर्बाह्य सडलेल्या 'बाजीरावी' कारभाराबद्दल या स्वातंत्र्यवादी लेखकाला घृणा वाटत होती. आजूबाजूच्या वातावरणातून त्यांना मावळलेल्या राजवटीतली दुर्गंधी जाणवत होती. आपल्या स्पष्ट आणि सडेतोड भाषेत लोकहितवादींनी दुसऱ्या बाजीरावाच्या बेजबाबदार वर्तनावर आणि चारित्र्यावर व पराक्रमशून्यतेवर जे प्रहार केले आहेत ते यथोचितच आहेत.

गोपाळराव देशमुखांचे वडील हरिपंत हे दुसऱ्या बाजीरावांचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते. बाजीराव पेशवा बऱ्हाणपुराकडे पळून गेल्यावर एल्फिन्स्टन साहेबाने एक जाहीरनामा काढला. त्यात म्हटले होते, 'बाजीराव याजकडे जे चाकरीस असतील त्यांनी चाकरी सोडून आजपासून दोन महिन्यांत आपले घरी यावे. जे कोणी न येतील त्यांची वतने जप्त होऊन खराबी झाल्याशिवाय राहणार नाही.' हरिपंत हे स्वामीनिष्ठ होते. ठरलेल्या मुदतीत ते इंग्रजांना भेटले नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे असलेला सरंजाम जप्त करण्यात आला. पेशवेपदावर बाजीरावाचा अधिकार उरलेला नव्हता. पण तरीही त्याच्या आग्रहाने हरिपंत पुण्याला परतले आणि त्यांचे वकील म्हणून राहिले. पेशव्यांनी रदबदली करून इ. स. १८४२ मध्ये म्हणजे गोपाळराव एक वर्षाचे असताना सर्व सरंजाम परत मिळाला. हरिपंत पेशवाईचे निष्ठावान भक्त होते. पेशव्यांचे राज्य एल्फिन्स्टनने बुडवले म्हणून त्यांच्या त्याच्यावर अखेरपर्यंत राग होता. इंग्रजी राज्य झाल्यामुळे हरिपंत देशमुखांच्या उत्पन्नाच्या अनेक वाटा बंद पडल्या होत्या. त्यामुळेच त्यांच्या भावना तीव्र विरोधाच्या होत्या. एलफिन्स्टनची स्वारी पुण्याहून कधी कधी फिरावयाला निघे. त्यावेळी या साहेबाचे तोंडही पाहणे नको असे म्हणून हरिपंत खिडकीकडे पाठ करून बसत असत, असा उल्लेख लोकहितवादींच्या चरित्रात आढळतो. पुढे बाजीराव ब्रह्मावर्ताला निघून गेल्यावर पेशव्यांच्या पुण्यातील हितसंबंधांची जपणूक करण्याची कामगिरी त्यांच्यावर आली आणि ती त्यांनी निष्ठेने सांभाळली. पण गोपाळराव तेरा वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचा हरिपंताचा मृत्यू झाला. देशमुख घराण्यावर त्यांच्या निधनामुळे मोठे आर्थिक संकट आले. कारण ब्रिटिश सरकारने हरिपंतांना दिलेला सरंजाम केवळ तहहयात म्हणजे ते जिवंत असेपर्यंतच होता. तो वंशपरंपरागत नाही असा ब्रिटिश शासनाने निर्णय घेऊन तो खालसा केला. गोपळरावांच्या वडील बंधूंनी-चिंतामणरावांनी-या बाबतीत पुष्कळ प्रयत्न करून पाहिले पण ते व्यर्थ झाले. त्यांच्या मातोश्रींना वार्षिक सहाशे रुपये पेन्शन मिळाले आणि तिघा भावांना सरकारी नोकरी नसेल तर दोनशे रुपये देण्याचा ठराव झाला. पेशवाई बुडाल्याबरोबर देशमुख घराण्याची आर्थिक

सुस्थिती नाहीशी झाली. इंग्रजांनी त्यांचा सरंजाम काढून घेतला. पण असे असूनही गोपाळरावांच्या-लोकहितवादींच्या-पुढील लेखनात या घटनेमुळे कसलीही कटुता व्यक्त झालेली दिसत नाही. वस्तुतः इंग्रजी राज्याच्या आगमनामुळे देशमुख घराण्याचे आर्थिकबाबतीत कायमचे नुकसान झाले. हे लक्षात ठेवून एखाद्याने इंग्रजी राज्याला कडवा विरोध केला असता. पण गोपाळरावांनी मात्र या राज्यसंक्रमणाविषयी आणि आजूबाजूच्या सर्व घटनांची योग्य त्या संदर्भात दखल घेऊन चिकित्सा केली होती.

लोकहितवादींचे चरित्रकार कृ. ना. आठल्ये म्हणतात, 'गोपळरावांचा पिंड लहानपणापासून बळकट. शरीरकाठी उंच. रूप, बांधा सर्वच गोष्टी सरस होत्या. कपाळ विस्तीर्ण, पाणीदार डोळे, गोरा वर्ण, छाती, गाल, पिंढऱ्या, हनुवटी वगैरे भरदार ही त्यांची ठेवण अगदी लहानपणापासून ते बहुतेक शेवटपर्यंत कायमच होती. ह्यामुळे त्यांच्याकडे पाहिले म्हणेज कोणाचेही मन सुप्रसन्न होत असे.'

पुण्यात त्या काळी बुधवारच्या वाड्यात मुलांची एक मराठी शाळा होती. या सरकारी शाळेत गोपळरावांचे मराठी शिक्षण झाले. पुढे इंग्रजी शिक्षणाशिवाय गत्यंतर नाही असे त्यांना वाटले. म्हणून खाजगी रीतीने त्यांनी इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू केला. कोर्टात काही दिवस नोकरीही केली. पुढे आठ फेब्रुवारी १८४१ पासून पुण्यातील सरकारी इंग्रजी शाळेत ते जाऊ लागले. यावेळी त्यांचे वय अठरा वर्षांचे होते. या शाळेचे मुख्याध्यापक डी. ए. इस्डेल् हे होते. या शाळेत तीन वर्षे त्यांनी इंग्रजीचे अध्ययन केले. शाळा सोडताना म्हणजे ९ मे १८४४ रोजी मुख्याध्यापकांनी त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन इंग्रजी व इतिहास या विषयांत उत्तम प्रावीण्य मिळविल्याबद्दल त्यांचा गौरव केला आहे. या शाळेतच त्यांच्या मनःपिंडावर जे संस्कार झाले ते त्यांना पुढील कार्यात उपयोगी पडले असावेत. त्यांची इतिहासविषयक अभिरुची या शाळेतच आकार घेऊ लागली. इंग्रजी विद्येकडे ते तेथेच अधिकांशांने आकृष्ट झाले. याचे श्रेय मुख्याध्यापक श्री. इस्डेल् यांना काही अंशी दिले पाहिजे.

मराठी शाळेत येण्यापूर्वी म्हणजे त्यांच्या वयाच्या सहाव्या वर्षी त्यांच्या वडिलांनी त्यांचा व्रतबंध पारंपरिक पद्धतीने थाटामाटात केला. गायत्री मंत्राचा जप, संध्या, पूजा, नैवेद्य, वैश्वदेव, रुद्र, सौर आणि पवमानाच्या संथा देण्यास त्यांच्या उपाध्यायांनी सुरुवात केली. गोपाळरावांची स्मरणशक्ती तीव्र होती. शब्दोच्चार स्पष्ट आणि स्वच्छ होते. पाठांतरही चांगले होते. त्यांनी गायत्री मंत्राचा अर्थ उपाध्यायाला विचारला आणि अर्थ समजल्याशिवाय आपण संध्या करणार नाही असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. अर्थशून्य पाठांतराच्या क्रियेला त्यांनी लहानपणातच विरोध केला याचे आश्चर्य वाटते. 'अर्थशून्य पाठांतर' या विषयावर त्यांनी पुढे एक लेख लिहिला आहे. त्याचे मूळ बालपणीच त्यांच्या मनात रुजलेले दिसते. 'प्राणामय करताना नाक कशासाठी धरायचे? 'अस्त्राय फट्' म्हणून टाळी का वाजवायची ?' असले निरुत्तर करणारे प्रश्न त्यांनी बालवयातच विचारले. याचा अर्थ असा की गोपाळराव जिज्ञासू होते. कार्यकारणभाव शोधण्याची त्यांची वृत्ती होती. त्यांचे गुरुजी हे पारंपरिक पठडीतले कर्मठ ब्राह्मण होते. असले प्रश्न त्यांना कधीच पडले नव्हते. ते केवळ रूढीप्रमाणे नाक धरीत होते, टाळी वाजवीत होते. पण गोपाळराव समाधान न झाल्यामुळे पुन्हा पुन्हा प्रश्न विचारीत राहिले. अखेर शिष्याचे अध्ययन पुरेसे झाले आहे असे सांगून गुरुजींनी रजा घेतली. अर्थ समजल्याशिवाय पाठांतर करण्यात काय स्वारस्य आहे हा प्रश्न ज्या प्रेरणेतून त्यांच्या मनात उद्‌भवला त्याच प्रेरणेने त्यांच्या पुढील आयुष्याला आकार दिला असे म्हटले पाहिजे. अशा बुद्धिवादी शंका मुलांच्या मनात उत्पन्न होत असतात. पण त्यांचे निरसन मात्र पुष्कळ वेळा पालक आणि अध्यापक करू शकत नाहीत. बुद्धीच्या विकासासाठी चिकित्सक वृत्तीची आवश्यकता असते. बालकांच्या मनातली चिकित्सा, जाणून घेण्याची इच्छा वडील माणसांनी जोपासली पाहिजे. पण बहुसंख्य ठिकाणी

अनुक्रमणिका

‘प्रश्न विचारायचे नाहीत. मी सांगतो त्याप्रमाणे करा. ठरलेल्या चाकोरीतून विद्यार्थ्यांनी चालावे. शंकाकुशंका घेऊ नयेत. वाडवडिलांनी आखून दिलेल्या रस्त्याने निमूटपणे चालावे’ अशीच उत्तरे मिळतात. खरे तर प्रश्न विचारण्याच्या मागे शोधनाची प्रवृत्ती असते. प्रश्न ही ज्ञानसंपादनाची पहिली पायरी आहे. कुणाच्या तरी आदेशासमोर निःशंकपणे मान झुकवायची ही प्रवृत्ती ज्ञानाला मारक ठरते. गोपाळरावांच्या ठायी असलेली जिज्ञासा वृत्ती हळूहळू वाढत गेली. मराठी आणि इंग्रजी शाळेत तर्कबुद्धीची वाढ व्हावी असे वातावरण मिळाले.

## ब्राह्मणांचे राज्य का गेले?

शालेय विद्यार्थी असताना शाळा सुटली की गोपाळराव दूरवर फिरायला जात असत. दररोज वेगवेगळ्या दिशेला ते जायचे. सरदार घराण्याचा संस्कार आणि शिस्त अंगी बाणवल्यामुळे शालेय वयातही त्यांना बंदूक चालवण्याचे शिक्षण मिळाले होते. एकदा पहाटे संगमावर फिरायला गेले असताना तेथे काही सैनिक बंदूक चालवण्याचा सराव करताना आढळले. अधिकारी शिकवीत होता व सैनिक निशाण मारीत होते. मधोमध पाण्याने भरलेली एक घागर ठेवलेली होती. तिच्यावर निशाण लागावे असा प्रयत्न होता. पण कोणत्याही सैनिकाचा नेम लागला नाही. अखेर त्यांना शिकविणाऱ्या अधिकाऱ्याने नेम धरून गोळी झाडली पण त्याचाही प्रयत्न फसला. गोपाळरांवाना हे पाहून हसू आले. ते अधिकाऱ्याजवळ जाऊन म्हणाले, ‘एवढे मोठे घागरीचे निशाण मारता येत नाही मग लहान निशाणावर कसा नेम धराल?’

त्यांचा तो प्रश्न ऐकून अधिकारी ओशाळला. पण त्याने गोपाळरावांना म्हटले की, ‘तुला ब्राह्मणाच्या पोराला याचे काय ? बोलणे सोपे असते.’ गोपाळरावांनी त्याच्या हातातून भरलेली बंदूक काढून घेतली आणि व्यवस्थित नेम धरून गोळी उडवली. घागरीचे मधोमध दोन तुकडे झाले. एका शाळकरी पोराचा हा चमत्कार पाहून अधिकारी आणि सैनिक आश्चर्यचकित झाले. ही गोष्ट जनरल साहेबांच्या कानावर गेली. तेव्हा ते फारच खूष झाले व म्हणाले, ‘ब्राह्मण लोक निशाण मारण्यात जर इतके हुशार होते तर त्यांनी आपले राज्य कसे गमावले?’

कोणताही शालेय विद्यार्थी या प्रश्नामुळे गोंधळला असता. पण गोपाळरावांनी उत्तर दिले, ‘ब्राह्मणांचे राज्य ते बंदूक मारण्यात कसबी नव्हते म्हणून गेले नाही. त्यांच्यात ऐक्य नव्हते म्हणून त्यांचे राज्य गेले.’ विद्यार्थी अवस्थेतच स्वातंत्र्यनाशाची त्यांनी केलेली कारणमीमांसा अचूक होती. भोवतालच्या परिस्थितीचे ते निरीक्षण करीत होते. काही निष्कर्ष त्यातून त्यांनी काढले होते. नुकतीच पेशवाई संपुष्टात आल्यामुळे अजूनही पेशवाईतले वातावरण सभोवताली होते. पेशवाईतल्या एका पूर्व सरदाराच्या घरातच ते वाढत होते. त्यामुळे समाज आणि परिस्थिती यांचे संस्कार ते ग्रहण करीत होते. चौकस स्वभावामुळे विचार करण्याची सवय त्यांना लागली होती. जनरलने विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी तात्काळ जे उत्तर दिले ते तर्कशुद्ध होते. ऐतिहासिकदृष्ट्या ते उत्तर तंतोतंत खरे होते. पुढेही स्वातंत्र्यनाशाची आपल्या लेखनातून त्यांनी अशीच इतिहाससिध्द चिकित्सा केली आहे.

## साहित्याचा संस्कार

गोपाळरावांचे शालेय शिक्षण इ.स. १८४४ मध्ये संपले. या पूर्वीच्या म्हणजे वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी त्यांचा विवाह झाला होता. त्यांची पत्नी त्यावेळी केवळ चार वर्षांची होती. बालविवाहाच्या या पद्धतीवर

त्यांनी पुढे आपल्या लेखन-भाषणातून कठोर टीका केली. त्याच्या मुळाशी हा स्वानुभवही असावा असे वाटते. लहानपणीच मुलामुलींचा विवाह करण्याची चमत्कारिक रूढी त्या काळात लोकांच्या अंगवळणी पडली होती. ही एकोणिसाव्या शतकातली गोष्ट. पण आता एकविसाव्या शतकातही राजस्थानात आणि देशाच्या इतरही काही भागांत बालविवाहाची प्रथा आहे. कायदे करून ही रूढी नष्ट होत नाही. म्हणूनच कायद्यापेक्षाही लोकप्रबोधनाची अधिक आवश्यकता असते. शाळेतला अभ्यास करीत असतानाच गोपाळरावांनी जुन्या मराठी साहित्याचा उत्तम परिचय करून घेतल्याची माहिती त्यांच्या चरित्रात आढळते. ज्ञानेश्वरी, तुकारामांचे अभंग, एकनाथी भागवत व दासबोध यांचे वाचन त्यांनी केले होते. शाळेतल्या वयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार येत जातो. साहित्यवाचनामुळे गोपाळरावांची वाङ्मयाभिरुची चांगलीच प्रगल्भ होत गेली. त्यांच्या धर्मविषयक विचारांचीही काही अंशी घडण होण्यास हे वाचन कारणीभूत झाले. संतकाव्याने त्यांच्या वृत्तीवर मानवतावादाचे दृढ संस्कार झाले. पुढे प्रौढ वयात संत साहित्याने आणि धर्मशास्त्राच्या अध्ययनाने गोपाळरावांच्या विचारात उदारता आणि व्यापकता आली. पण विद्यार्थी असतानाच संतांचे वाङ्मय त्यांनी अभ्यासले हे विशेष आहे. संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांच्या हाती उत्तम साहित्य पडले तर त्याच्या बुद्धीला आणि भावनेला योग्य दिशा मिळते हे गोपाळरावांच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. सर्वसाधारण विद्यार्थ्यापेक्षा गोपाळरावांचे वाचन आणि मनन पुष्कळच अधिक होते. त्यातून त्यांच्या बुद्धीला धार येत गेली. आपल्या सभोवतलाच्या समाजाचा आणि त्याच्या अज्ञानाचा विचार त्यांच्या मनात घोळत असायचा. इंग्रजी शाळेतून घरी परतल्यावर त्यांना स्नान करावे लागत असे. घरातले वातावरण सनातनी होते. स्पर्शास्पर्शाच्या कल्पना त्या काळात तीव्र होत्या. अनेक जाती-जमातींची मुले शाळेत येतात म्हणून कर्मठ विचारांचे पालक मुलगा घरी परतला की त्याला आंघोळ करायला लावीत असत. इंग्रजीचा अभ्यास करू नये कारण ती म्लेंच्छांची भाषा आहे. ब्राह्मणाने ती शिकू नये असेच बहुतेकांचे मत होते. इंग्रजी भाषा शिकणारा माणूस धर्मभ्रष्ट होतो अशी समजूत होती. इंग्रजीचा अभ्यास दिवाणखान्यात बसून करता येत नव्हता. गोपाळरावांना याची जाणीव होती. आपल्याच वाड्यातील एका विहिरीच्या कोनाड्यात बसून ते अभ्यास करीत असत. हे सारे धार्मिक आणि सामाजिक वातावरण इंग्रजी शिक्षणाला व नव्या विचाराला विरोध करणारेच होते. तो काळ जुन्या विचारांचा होता. नवीन येणारी प्रत्येक गोष्ट आपल्या धर्मश्रद्धा डळमळीत करणारी आहे असेच लोकांना वाटत होते. गोपाळराव मात्र या वातावरणाचाही बारकाईने अभ्यास करीत होते. जुन्या-पुराण्या कल्पना व्यर्थ आहेत हे त्यांना कळत होते. इंग्रजी शिक्षणातून त्यांच्या विचारांना नवे वळण मिळत होते. त्यामुळेच जुनाट झालेले विचार नवीन काळात आणि परिस्थितीत उपयोगी पडणार नाहीत. हा विचार त्यांच्या मनात बळकट होत गेला. इ.स. १८४४ मध्ये बोर्ड ऑफ एज्युकेशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात पुण्याचा इंग्रजी शाळेसंबंधी लिहिताना गोपाळरावांचा मुद्दाम गौरवाने उल्लेख करण्यात आला. इंग्रजीचा एक अभ्यासू बुद्धिमान विद्यार्थी असा खास उल्लेख करून त्यांच्या योग्यतेसंबंधी विश्वास प्रकट करण्यात आला. शैक्षणिक अहवालात एखाद्या विद्यार्थ्याचा खास नामनिर्देश होतो आणि त्याच्याविषयी प्रशंसेचे शब्द लिहिले जातात. ही घटना अभिमानाची आहे. गोपाळरावांच्या बौद्धिक प्रगतीवर प्रकाश टाकणारी आहे. त्याच वर्षी म्हणजे १६.१०.१८४४ रोजी पुणे येथे 'दि एजंट फॉर सरदार्स् इन दि डेक्कन' यांच्या कार्यालयात गोपाळरावांना दरमहा ७७ रुपयांची ट्रान्सलेटरची नोकरी मिळाली. हे काम त्यांनी समर्थपणे केले.

आपल्या कचेरीतले काम सांभाळून याच वेळी गोपाळराव शैक्षणिक चळवळीत सार्वजनिक कार्यात शक्य तितका भाग घेऊ लागले. पुण्यात एक सार्वजनिक वाचनालय स्थापन करण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले. ट्रान्सलेटरची नोकरी करीत करीत ते आपल्या कर्तबगारीने वर चढत गेले. जॉइंट जज्ज आणि

अनुक्रमणिका

सेशन्स जज्ञ या हुद्द्यापर्यंत ते गेले. त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल आणि बुद्धिमत्तेबद्दल त्यावेळच्या ज्युडीशियल कमिशनने काढलेले प्रशंसेचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. ते उद्‌गार, मराठीत देत आहे.

## वन्हि तो चेतवावा रे!

'गोपाळरावांच्या बौद्धिक क्षमतेबद्दल माझं अत्यंत चांगलं मत आहे. उच्च प्रकारची बुद्धिमत्ता आणि संशयातीत शुद्ध चारित्र्य यामुळं आपलं कर्तव्य ते अत्यंत निष्ठेनं पार पाडतात.' याचा अर्थ पुण्यातील उच्च अधिकारीवर्ग त्यांच्या काम करण्याच्या कौशल्यावर मनापासून संतुष्ट होता. उच्च श्रेणीवर काम करणारे इंग्रज अधिकारी गोपाळरावांची योग्यता ओळखून होते. सतत अभ्यासातून, समाजाच्या निरीक्षणातून, सर्व प्रकारच्या लोकांत मिसळून जाण्याच्या वृत्तीतून गोपाळरावांचे व्यक्तित्व घडत गेले. माणूस समाजातच घडतो. घराच्या चार भिंतीत त्याची वाढ होत नाही. झाड उघड्यावरच वाढते. मोकळी हवा आणि सूर्यप्रकाश मिळत गेला की झाड पोसले जाते. नाहीतर ते खुरटून जाते. माणसाचेही असेच असते. घर, कुटुंब, समाज नाना प्रकारच्या विचारांनी फुललेले वातावरण यांच्यामधून मनुष्याच्या मनाला आणि व्यक्तित्वाला बळ येते. माणूसदेखील या सगळ्या घटकांतून संस्कार घेण्या इतका उत्सुक मनाचा असावा लागतो. असा अनेक घटकांचा मिळून झालेला एक परिणाम म्हणजे माणसाचे व्यक्तिमत्त्व. गोपाळराव देशमुख ऊर्फ लोकहितवादी, न्या. रानडे, म. फुले वगैरे सारी मोठी माणसे अशीच काळ आणि परिस्थिती यांच्या प्रभावातून घडत गेली. पण केवळ काळ आणि परिस्थिती यांच्यामुळेच माणसाचे कर्तृत्व घडते असे मात्र म्हणता येणार नाही. बीजातदेखील उगवण्याची आणि फुलण्याची स्वतःची इच्छा असावी लागते. इतर सर्व घटक आहेत पण मूळ माणसाचीच इच्छाशक्ती दुबळी असेल तर तो माणूस कर्तबगार होणे शक्य नाही. आडात थोडेतरी पाणी असल्याशिवाय पोहऱ्यात येऊ शकत नाही. ठिणगी असेल तर तिच्यातून ज्वाला निर्माण करता येते. ठिणगीच नाही तर नुसती फुंकर मारण्यात काय अर्थ आहे? लोकहितवादी गोपाळराव यांच्या मनात काहीतरी नवे घडवण्याची जबरदस्त इच्छा होती. शिक्षणातून, इंग्रजी विद्येच्या संस्कारातून या इच्छेला अधिक स्पष्ट रूप येत गेले. अज्ञान नाहीसे करून लोकांना ज्ञानमार्गाकडे वळवलेच पाहिजे. हा आग्रह त्यांच्यात उचंबळून आला. संत वाङ्मय त्यांनी वाचले होते.

'असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास, तुका म्हणे', 'निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेचि फळ', 'वन्हि तो चेतवावा रे, चेतविताचि चेततो', 'यत्न तो देव जाणावा' यांसारखी वचने त्यांच्या मनात मुरली होती. सामर्थ्य नसल्यामुळे, अज्ञानामुळे आणि फुटीरपणामुळे मराठी राज्य बुडून गेले. आणि नव्या ज्ञानविज्ञातून समर्थ बनत चाललेल्या इंग्रजांनी संपूर्ण भारत काबीज केला. हे दृश्य त्यांच्या डोळ्यांसमोर होते. जुनी विद्या, जुन्या चालीरीती, जुने समाज यांच्या भोवऱ्यात सापडल्यामुळे आपले स्वातंत्र्य आपण हरवून बसलो ही समजूत त्यांच्या चित्तात ठसली होती. म्हणूनच जुनेपणाची कात टाकून नवीन विद्येची कास धरण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले पाहिजे, हा त्यांच्या मनाचा निश्चय झाला. म. जोतीबा फुले यांनीदेखील विद्येची प्रशंसा करून केवळ अविद्येमुळे शूद्र खचले, देश दुबळा झाला असेच निदान केले आहे. लोकहितवादी गोपाळराव आणि म. फुले यांच्या वयात केवळ चार वर्षांचे अंतर होते. या दोन्ही समाजसुधारकांनी ज्ञानप्रसारावर भर दिला हे लक्षात घेण्यासारखे आहे. दोघांनीही लोक ज्ञानी झाले पाहिजेत म्हणून आयुष्यभर प्रयत्न केले. ज्ञानरूप अग्नीत जे जे अशुद्ध आणि अज्ञानी असेल ते जळून जाते यावर प्रत्येक समाजसुधारकाचा पूर्ण विश्वास होता.

## रंजल्यागांजल्यांना आधार

गोपाळरावांनी नोकरीच्या निमित्ताने बराच प्रवास केला. अनेक शहरांत त्यांना रहावे लागले. वाई, पुणे, सातारा, मुंबई, अहमदाबाद, सुरत, अहमदनगर, ठाणे आणि नाशिक इत्यादी मोठ्या गावांत ते राहिले. अहमदाबादला तर जवळ जवळ दहा वर्षे ते स्मॉल कॉज कोर्टाचे मुख्य न्यायाधीश होते. गुजरातच्या त्या भागात सार्वजनिक जीवनाशी ते समरस झाले. शाळा आणि वाचनालये त्यांनी उभी केली. कोणत्याही गावी गेले तरी गावात वाचनालय आहे की नाही, चांगली शाळा आहे की नाही याची ते चौकशी करीत असत. नसेल तर गावातल्या प्रमुख लोकांना एकत्र करून ते शाळा आणि वाचनालय स्थापन करण्यासाठी त्यांना उपदेश करीत असत. या कार्यात शक्य ती मदत ते करायचे. लोकशिक्षणाची ही चळवळ त्यांनी आमरण चालवली. गुजरातेत दहा वर्षे ते राहिले. पण त्या अवधीत ते गुजराती भाषा शिकले. त्या भाषेतूनच तेथे त्यांची व्याख्याने होत असत. गुजरातीतून त्यांनी अनेक लेख लिहिले. त्यांची दोन पुस्तके गुजरातीतच लिहिली गेली आहेत. ही गोष्ट गोपाळरावांच्या 'लोकसन्मुख' स्वभावाची उत्तम साक्ष देते. बहुधा मोठे अधिकारी लोकांत फारसे मिसळत नसत. आजही ही स्थिती थोड्याफार प्रमाणात आहे. पण लोकहितवादी या नावातच लोकहिताला अग्रस्थान आहे. आपण घेतलेल्या या नावाप्रमाणेच त्यांनी जन्मभर वर्तन केले. लोकांपासून फटकून राहणारे पुष्कळ पंडित असतात. पण त्यांच्या पांडित्याला काय अर्थ असतो? लोकांकडे पाठ फिरवणारे पांडित्य म्हणजे मूर्तिमंत अज्ञानच नव्हे काय? ज्या ज्ञानी माणसाचा समाजाशी संबंध नसतो तो कितीही विद्वान असला तरी त्याचे पांडित्य कवडीमोल समजावे. आपण मिळविलेले ज्ञान हे वैयक्तिक फायद्यासाठीच केवळ राबवणारे लोक समाजावर अन्याय करतात. ज्ञान ही संपत्ती आहे. ती समाजात लोकहितबुद्धीने वाटली पाहिजे. मिळवलेल्या ज्ञानाच्या भांडवलावर सारा जन्म आपल्याच स्वार्थात रममाण होण्यात ज्यांनी घालवला असे लोकविन्मुख ज्ञानवंत काहीच नवरचना करू शकत नाहीत. यांच्यापेक्षा कितीतरी कमी शिकलेले किंवा मुळीच न शिकलेले समाजप्रेमी संत किंवा सेवक श्रेष्ठ म्हटले पाहिजेत. लोकांकडे ढुंकूनही न पाहाणाऱ्या आणि आपल्या एअरकंडिशन्ड बंगल्यात बसून राहिलेल्या एखाद्या अधिकाऱ्यापेक्षा हातात खराटा घेऊन गावात स्वच्छता ठेवणारे आणि कीर्तनातून लोकांची मने स्वच्छ करणारे अशिक्षित गाडगेबाबा शतपटीने पंडित होते. गोपाळराव यांच्यावरही संत साहित्यातून मानवतावादी विचारांचे संस्कार झालेले होते. समाजसेवा हा त्यांनी आपला धर्म मानला होता. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात आपल्याला शक्य असेल त्या माध्यमातून सेवा करण्याची त्यांची वृत्ती होती. समाजजागृतीसाठी आपल्या लेखणीचा आणि वाणीचा सतत उपयोग करणारा त्यांच्यासारखा लोकाभिमुख साहित्यिक आणि विचारवंत त्यांच्या कालखंडात तरी प्रामुख्यानं गोपाळराव हेच होते. फुले, आगरकर, रानडे इत्यादी विचारवंत त्यांच्यानंतर सार्वजनिक जीवनात आले. म्हणूनच लोकहितवादींना-गोपाळरावांना-महाराष्ट्राचा 'आद्य प्रबोधनकार' असे म्हटले जाते. कृ. ना. आठल्ये यांनी लोकहितवादी यांचे चरित्र लिहिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे,

'गोपाळराव कोठेही बाहेर पडले की त्यांच्याबरोबर त्यांचा नोकर असायचा. त्यांच्या खांद्यावर डाळ-चुरमुऱ्याचे एक पोते व खारकांचे एक गाठोडे, मलमाचा एक मोठा डबा व थोड्याशा मलमपट्ट्या इतके सामान असे. कोठेही रस्त्यात आंधळा-पांगळा दृष्टीस पडला की त्यास थोडेसे चुरमुरे व एखाद-दुसरी खारीक द्यावयाची व पाहून पाहून पैसाही त्यापुढे टाकावयाचा. पण सर्वांपेक्षा दुखणेकरी पाहिला की स्वारी उभी राहिलीच. मग त्याला काय होते त्याची चौकशी करून औषध जवळ असल्यास द्यावयाचे, नाहीतर बरोबर छापील कार्ड्स असत, त्यापैकी एक त्याच्यापाशी देऊन 'घराकडे ये' म्हणून सांगावयाचे. महारोगी पाहिला की रावबहादूर थांबलेच. त्यांना रोग्याची किळस म्हणून कधी येत नसे. ते त्याच्या पट्ट्या

अनुक्रमणिका

त्याजकडून काढवून जखमा पाहत व त्यावर मलम लावावयास देऊन लगेच पट्ट्या बांधीत व अन्न वगैरे नेण्यासाठी 'घरी ये' म्हणून सांगत. हा नित्यक्रम असे.'

गोपाळरावांनी अशा असंख्य रोगपीडित लोकांवर उपचार केले. रंजल्यागांजल्यांना आपल्या पोटाशी धरणारा माणूस तुकोबांच्या शब्दात सांगायचे तर 'साधु तोचि ओळखावा.' माणुसकीचा हा आविष्कार त्यांच्या वर्तनातून होत असे. महारोग्याच्या जखमांवर उपचार करून पट्ट्या बांधणे ही कृती खरोखरच उदार करुणाभावाची आहे. समाजाच्या अज्ञानावर कठोर शब्दांनी प्रहार करणाऱ्या या समाजसेवकाला दुःखित जनतेशी आत्मीयतेने वागताना अनेकांनी पाहिले आणि आश्चर्य व्यक्त केले. गोपाळरावांचे मन दुःखीकष्टी मनुष्य पाहिला की अति हळुवार होत असे. त्याला आवश्यक ती मदत करताना त्यांनी कधीच हात आखडता घेतला नाही. न्यायाधीशाच्या प्रतिष्ठित पदावर असलेले रावबहादूर गोपाळराव देशमुख रस्त्यात थांबून एखाद्या रोगी माणसाला औषधपाणी देत आहेत, हे दृश्य सुंदर आणि उदात्त होते. 'लोकहितवादी' हे नाव या अर्थानेही अनुरूप ठरले. त्यांचे चरित्र काही टीकाकारांना एका इंग्रजधार्जिण्या रावबहादुराचे चरित्र वाटते. पण गोपाळरावांच्या चरित्रातला माणुसकीचा झुळझुळणारा शीतल झरा त्या टीकाकारांना दिसला नाही. टीकेची आणि निंदेची वावटळ गोपाळरावांनी आयुष्यात अनेकवेळा अनुभवली. निंदा-नालस्ती पचवली. समाजाला आपले हितकर्ते ओळखता येत नाहीत. नव्या वाटेने समाजाला घेऊन जाणाऱ्या सुधारणावादी नेत्यांचा नेहमीच छळ चाललेला आहे. हा लोकांच्या अज्ञानाचा भाग असतो. लोक विरोध करतात म्हणून जे लोकहितवादी असतात ते आपला मार्ग कधीच सोडत नाहीत. गोपाळराव पुराणमतवादी नव्हते. त्यांनी विधवाविवाहाचा पुरस्कार करून विधवाविवाहमंडळे काढली. गुजरातमध्येही पुनर्विवाहमंडळ स्थापन केले. ते जेथे जेथे गेले तेथे तेथे छापखाना, दवाखाना, वाचनालय, वक्तृत्वसभा, मुलींची शाळा अशा संस्था काढायला उत्तेजन देत. शक्य ती मदतही करीत. जुन्या आचारविचारांवर ते कडवट टीका करीत. यामुळे त्यांच्या सुधारकी वृत्तीबद्दल सनातनी लोकांनी त्यांच्याविरुद्ध सतत टीकेची मोहीम उघडली होती. पुण्यातले प्रसिद्ध वृत्तपत्र 'ज्ञानप्रकाश' आणि मुंबईचे 'इन्दुप्रकाश' या पत्रांच्या स्थापनेला त्यांचीच प्रेरणा होती. अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले आणि जिज्ञासू लोकांना ते फुकट वाटले. ग्रंथांचे दान हा त्यांच्या जीवनातला एक महत्त्वाचा घटक होता. त्यांनी म्हटले आहे,

### देऊळ नको ! नवी पुस्तके छापा !

'जे पुस्तके लिहितील व लोकांस शहाणे करण्यास मेहनत करतील, जे वर्तमानपत्रे व ग्रंथ इत्यादी उपयोगी वस्तू छापून प्रकट करतील, त्यांस तुम्ही मोठे विद्वान व लोकांचे हितकर्ते समजून त्यांस सत्पात्र जाणून धर्म करा. त्यांचे ग्रंथ घेऊन लोकांमध्ये वाटा व हीच वायने समजा, तीच संक्रांतीची तीळपात्रे, श्रावणीची दीपदाने, माघस्नानाची संपूर्णे, चातुर्मासाची संपूर्णे व तुळशी आणि लाखोल्या त्याच समजा. ज्ञानवृध्दीत पुण्य आहे असे माना... मरतेसमयी देऊळ बांधावयास सांगू नका. पण नवे छापखाने व नवी पुस्तके करण्यास सांगा. देवळे पुष्कळ आहेत तितकी पुरेत.' (शतपत्रे, पत्र क्र. ९१)

देवळे बांधण्यापेक्षा छापखाने काढावेत आणि नवी पुस्तके करावीत या विचारात बंडखोरी आहे. ज्ञानाची तहान आहे. 'आहेत तितकी देवळे पुरेत' हे म्हणताना नव्या समाजाची रचना करण्यासाठी देवळांचा उपयोग होणार नाही ही विचारसरणी आहे. याप्रकारचे विचार एकोणिसाव्या शतकात लोकहितवादी म्हणजेच गोपाळराव अभिनिवेशाने मांडत होते. 'देऊळ नको' हा विचार श्रद्धेपेक्षा ज्ञान

अधिक उपयुक्त असते हे ठासून सांगणारा आहे. मंदिरांत पूजाअर्चा वगैरे नित्याची कर्मकांडे होतात. छापखान्यातून निर्माण होणारी नवी पुस्तके ज्ञानप्रसाराचे कार्य करतात. गोपाळराव आस्तिक होते. पण ते कधीही अंधश्रद्धाळू नव्हते. दीडशे वर्षांपूर्वी त्यांनी देवभोळेपणावर आणि कर्मकांडावर प्रहार केले. यात त्यांचे बंडखोर धैर्य दिसून येते. समाजाच्या मनाला ताजे टवटवीत, प्रगतिकारक विचार विद्वानांनी दिले पाहिजेत. लेखकाने आणि विचारवंताने निरर्थक रूढी आणि भाकड श्रद्धा यांच्यावर विचारपूर्वक आघात केले पाहिजेत. घडवणाऱ्याला काही जुने मोडावे लागते. गोपाळराव हे म्हणूनच प्रबोधनयुगाचे एक रचनाकार ठरतात.

गोपाळरावांचे संपूर्ण जीवन ज्ञानप्रसारासाठी वाहिलेले होते. पाश्चात्त्य विद्या आणि आधुनिक विचारसरणी यांच्याकडे महाराष्ट्राचे तोंड वळवणारा हा पहिला प्रबोधनकार आहे. त्यांनी 'लोकहितवादी' या नावाने एक मासिक इ.स. १८८२ पासून सुरू केले. वयाच्या साठाव्या वर्षी ताज्या उत्साहाने हे नियतकालिक त्यांनी सुरू करावे याचा अर्थ नव्या विचारांच्या प्रसारप्रचारात त्यांना अधिक रस होता. या मासिकाच्या पहिल्याच अंकात त्यांनी आपला हेतू स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, 'आजपर्यंत आम्ही अनेक लेख प्रकट केले. लोकहिताकरिता होईल तितका लोकविस्तार करण्यास आमचे कलम पूर्ववत् चालू ठेवण्याचा आमचा मानस आहे. उपयुक्त ज्ञान चोहोकडे प्रसिद्ध करण्याकरिता जी राष्ट्रे आज पुढे आहेत त्यांच्या तोडीचे ग्रंथ आपल्या लोकांत प्रसृत झाले पाहिजेत.' म्हातारपणातही विद्याग्रहणाचे आणि विद्याप्रसारणाचे त्यांचे व्यसन सुटले नाही. त्या काळाचा विचार केल्यास बहुतेक रावसाहेब आणि रावबहादुर आपली पगडी आणि प्रतिष्ठा व पैसा सांभाळण्यातच स्वतःला धन्य समजत असत. पण हे रावबहादूर वेगळे होते. त्यामुळेच जुन्या मतांचे लोक त्यांना अखेरपर्यंत विरोध करीत राहिले. यात विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारखे लेखक आघाडीवर होते. त्यांनी गोपाळरावांवर आपल्या लेखणीने अन्याय केला. त्याबद्दल इतकेच म्हणता येईल की लोकहितवादींचे प्रगतिवादी विचार समजून घेण्याची कुवत चिपळूणकरांत नव्हती. १८८५ पर्यंत 'लोकहितवादी' नियतकालिक व्यवस्थित चालू होते. पण प्रकृती साथ देत नव्हती. रतलाम संस्थानच्या दिवाणपदाचा पुढे त्यांनी स्वीकार केल्यानंतर या नियतकालिकाचे प्रकाशन थांबलेले दिसते. मराठी साहित्य संमेलनाची प्रथा आता महाराष्ट्रात पूर्णपणे रुजली आहे. पण साहित्य संमेलनाची योजना ज्यांनी तयार केली त्यात गोपाळराव देशमुख आणि न्या. माधवराव रानडे हे होते. १८८५ मध्ये पुण्यात पहिले मराठी साहित्य संमेलन साजरे झाले असे मानले जाते. परंतु १८७८ मध्ये गोपाळराव आणि न्या. रानडे यांनी पुढाकार घेऊन मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन पार पाडले. (महाराष्ट्र साहित्य परिषदेचा इतिहास, १९४३)

सारांश, गोपाळराव देशमुख तथा लोकहितवादी हे एक विलक्षण चिंतनशील आणि क्रियाशील व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केले आहे. १९व्या शतकातल्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक चळवळीत त्यांचा सहभाग होता. आधुनिक सुधारणांचा पुरस्कार करणारा हा पहिला समाजसुधारक. राजा राममोहन रॉय या सुधारणावाद्याला 'The first modern man in India' असे म्हणण्यात येते. हीच संज्ञा लोकहितवादींना देताना 'महाराष्ट्रातला पहिला आधुनिक माणूस' असा बदल करता येईल. राममोहन रॉय यांनी ज्या सुधारणांना हात घातला होता त्या सर्व सुधारणा समाजात व्हाव्यात म्हणून गोपाळरावांनी संघर्ष केला. संघर्ष तर सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्या सर्वच व्यक्तींना करावा लागतो. जुनी मूल्ये आणि नवी मूल्ये यांच्यात द्वंद्व झाल्याशिवाय नवविचार प्रस्थापित होत नाहीत. गोपाळरावांना कोणकोणत्या विरोधाला तोंड द्यावे लागले याचीही हकीकत रोमहर्षक आहे. त्यांची मते त्यांच्या काळात परंपरावादी लोकांना 'भयंकर' वाटली. पेशवाईत ब्राह्मणांना दक्षिणा देण्याची

अनुक्रमणिका

प्रथा होती. दक्षिणेसाठी हजारो ब्राह्मण एकत्र येत असत. अव्वल इंग्रजी राजवटीत ही प्रथा चालू ठेवावी की नाही याविषयी विचार होऊ लागला. गोपाळरावांनी या दक्षिणेला विरोध केला. सरकारकडे केलेल्या अर्जात त्यांनी म्हटले होते की दक्षिणा मिळत असलेल्यांपैकी फारच थोडे ब्राह्मण खऱ्या अर्थाने वैदिक आणि शास्त्री आहेत. योग्य विद्वानालाच दक्षिणा मिळावी. शास्त्री, पुराणिक भट वगैरे लोकांना दक्षिणा देऊन पैसे खर्च करू नयेत. देशी भाषेतून उपयुक्त पुस्तके या रकमेतून लिहवून घ्यावीत. पुराणिकांची विद्या आता निरुपयोगी झाल्यामुळे त्यात द्रव्याचा अपव्यय होऊ नये. गोपाळरावांच्या या मतामुळे भट-भिक्षुंकात फारच तीव्र प्रतिक्रिया उमटली. पुण्याच्या तुळशीबागेत पाच हजार ब्राह्मणांनी मिळून त्यांचा निषेध केला आणि दुसऱ्या एका अर्जावर जबरदस्तीने त्यांची सही घेतली. जमलेल्या ब्राह्मण समुदायाने त्यांच्या धिक्काराच्या घोषणा दिल्या. शिव्याशाप दिले. एका ब्राह्मणानेच ब्राह्मणांच्या पोटावर लाथ मारावी या घटनेने खवळलेले ते लोक एकमुखाने गोपाळरावांना विरोध करीत होते. ‘माझा पहिला अर्जच खरा आहे आणि त्यात मी मांडलेली मते संपूर्णपणे मला मान्य आहेत. तेव्हा पहिला अर्जच गृहीत धरावा’ अशा आशयाचा तिसरा अर्ज त्यांनी गव्हर्नराकडे पाठवला. अखेर शासनाने गोपाळरावांची भूमिका मान्य केली आणि ‘दक्षिणाफंडाचा विनियोग देशी भाषांतून पुस्तके लिहवून घेण्यासाठी करावा’ असा निर्णय झाला. सनातनी लोक यामुळे फारच चिडले आणि त्यांनी पुन्हा गोपाळरावांच्या निषेधाच्या सभा भरवल्या. अहमदाबादच्या वास्तव्यातही तेथील सनातनी लोकांनी त्यांच्यावर दोन वेळा बहिष्कार टाकला होता. पुढे एका पुनर्विवाहाच्या प्रसंगी ते उपस्थित राहू शकले नाहीत म्हणून काही सुधारणावादी लोकांनीही त्यांच्यावर कडक टीका केली होती. ‘नेटिव्ह ओपिनियन’, ‘इन्दुप्रकाश’, ‘विविधज्ञानविस्तार’ वगैरे नियतकालिकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली.

सुधारणावाद्यांनी केलेली टीका अंशतः बरोबर होती. पण गोपाळरावांची भूमिका टीकाकारांनी नीट समजून घेतली नाही. आपण पुनर्विवाहाचे समर्थन करीत आहोत आणि या विधवाविवाहात पुढाकार घेत आहोत म्हणून आपल्या विवाहित मुलीचा सासरी छळ केला जात आहे आणि ते दुराग्रही लोक आपल्या मुलीला माहेरी पाठवून देणार आहेत, ही शक्यता दिसल्यावर गोपाळराव विवाहप्रसंगी हजर राहिले नाहीत. यात काही अंशी ते तत्त्वापासून दूर गेले असे म्हणता येईल. पण आपल्या मतासाठी आपल्या मुलीला सासरच्या लोकांनी छळू नये इतकीच त्यांची अपेक्षा होती. स्वतःच्या छळणुकीबद्दल त्यांची तक्रार नव्हती. गोपाळरावांचे चिरंजीव कृष्णराव देशमुख हे बी.ए. झाल्यावर सरकारी शिष्यवृत्ती घेऊन विलायतेला गेले. तेथे तीन वर्षे राहून शिक्षण घेऊन बॅरिस्टर झाले आणि परतले. कोकणस्थ ब्राह्मण जातीतील हे पहिले बॅरिस्टर होत. धर्माज्ञेप्रमाणे समुद्रपर्यटन करू नये या नियमाचे कृष्णरावांनी उल्लंघन केले. परदेशात राहिल्यामुळे त्यांना परधर्मीयांचा संसर्गदोष घडला, असा आक्षेप घेऊन कृष्णरावांवर बहिष्कार टाकण्यात आला. गोपाळरावांना हे प्रकरण हास्यास्पद वाटत होते. हिंदू लोकांनी समुद्रप्रवास करून परदेशात जाऊन व्यापारउद्योग करावा, नवे तंत्रज्ञान घ्यावे, देशाचे वैभव वाढवावे अशा आशयाची मते त्यांनी जन्मभर मांडली. पण सनातन्यांनी बॅरिस्टर होऊन आलेल्या मुलाला वाळीत टाकावे आणि त्याला त्रास द्यावा याचा संताप आला. दुःखही झाले. अखेर काशीच्या ब्राह्मणांकडून कृष्णरावासाठी शुद्धिपत्र काढले आणि हे बहिष्काराचे प्रकरण संपले. याच्याच पुढील वर्षी हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीची चौकशी करण्यासाठी जी पार्लमेंटरी समिती नेमण्यात आली होती, तिच्यापुढे साक्ष देण्यासाठी गोपाळरावांना इंग्लंडला बोलावले होते. पण ग्रामण्य, बहिष्कार, प्रायश्चित्त, शुद्धिपत्र, लोकनिंदा या प्रकारच्या त्रासाला ते वैतागले होते. प्रकृतीचेही कारण असू शकेल. ते विलायतेला गेले नाहीत. त्यामुळेही सुधारणावाद्यांनी त्यांच्यावर टीका केली. खरे तर सर्व प्रकारच्या कर्मकांडावर गोपाळराव आपल्या लेखनातून आणि व्याख्यानांतून तुटून पडले आहेत. पण तरीही ते इंग्लंडला गेले नाहीत. मुलावर पडलेल्या

बहिष्कारामुळे त्यांनी काशीहून शुद्धिपत्र आणविले. या घटना त्यांच्या सुधारणावादी विचारसरणीला कमकुवतपणा आणतात असे वाटते. पण संघर्षपूर्ण जीवनात प्रत्येक ध्येयवादी योद्धा शंभर टक्के दृढनिश्चयाने पाय रोवून उभा राहीलच असे म्हणता येत नाही. नको असलेली तडजोड करण्याचा प्रसंग ज्याप्रमाणे राजकारणात येतो त्याप्रमाणेच सामाजिक आणि धार्मिक चळवळीतही येतो. आपल्या विशिष्ट मतांबद्दल आपल्या मुलामुलींची पावलोपावली अडवणूक होत आहे हे पाहिल्यावर गोपाळरावांनी माघार घेण्याचा निर्णय केला असावा. याचा अर्थ आपली वैचारिक भूमिका त्यांनी सोडून दिली असे मात्र नव्हे. सामाजिक दडपणे आणि लोकमताची बंधने काही वेळा इतकी तीव्र होतात की ती अंशतः मान्य करूनच पुढे पाऊल टाकावे लागते. गोपाळराव केवळ बोलके सुधारकच होते अशी त्यांच्यावर झालेली टीका मात्र मुळीच योग्य नाही. याबाबतीत गोपाळराव हे महात्मा जोतीबा फुले आणि आगरकर यांच्याइतके खंबीर नव्हते, असा निष्कर्ष काढता येतो. फुले-आगरकरांनी आपल्या विचारसरणीशी कधी तिळमात्रही तडजोड केली नाही. म. फुल्यांच्या पत्नीचाही छळ जुन्या विचारांच्या लोकांनी भरपूर केला. पण फुले पती-पत्नी त्या छळासमोर ताठ मानेने उभे राहिले. आगरकरही कणखर विचारांचे होते. लोकहितवादी आणि न्या. रानडे हे मात्र फुले-आगरकरांइतके निर्भय राहिले नाहीत असे दिसते. पण म्हणून त्यांच्या विचारातली पुरोगामी रग कधीही कमी झाली नाही. समाजमनातली त्यांची प्रतिमा सर्वांगीण सुधारणावादी अशीच आहे. टीकाकारांनी ही टीका करताना योग्य ते तारतम्य ठेवले पाहिजे. समाजसुधारक हादेखील हाडामांसाचा माणूसच असतो. उलटसुलट वावटळीत एखाद्या वेळेस त्याची पावले लटपटली की तो ताबडतोब तत्त्वभ्रष्ट किंवा दांभिक झाला अशी अतिरेकी टोकाची विधाने करणे चुकीचे आहे. गोपाळराव देशमुख म्हातारपणी कर्मकांड करीत होते. मूर्तिपूजेत गुंतून पडले होते म्हणून ते बुद्धिवादी नव्हते अशीही टीका करण्यात येते. पण मूर्तीला ते महत्त्व देत होते असे दिसत नाही. त्यांच्यासंबंधी कृ. ना. आठल्ये यांनी एक उदाहरण दिले आहे. ते गमतीदार आहे.

‘एकदा गोपाळराव सरकारी कामाकरिता नदियाड येथे गेले होते. तेथे ज्या गृहस्थाच्या घरी उतरले होते तेथे स्वतः देवपूजा करीत बसले होते. इतक्यात तूप विकणारा एक माणूस तेथे आला आणि तूप तोलताना तपेलीचे वजन करण्याकरिता दगड शोधू लागला. तो त्यास जवळपास मिळेना! म्हणून गोपाळरावांनी आपल्या पूजेतील शाळिग्राम त्याच्यापुढे केला!’

या घटनेचा अन्वयार्थ लावताना गोपाळराव हे कर्मकांडी होते असे म्हणता येणार नाही. ते कर्मठ असते तर तूप विकणाऱ्याच्या तराजूत त्यांनी देवमूर्ती टाकली असती काय? मूर्तिपूजेला त्यांनी तसे महत्त्व दिले नाही.

### चारित्र्यावर आक्षेप

सरकारी नोकर या नात्याने गोपाळराव आपले कर्तव्य न्यायनिष्ठुरतेने करीत असत. पण प्रामाणिक माणसाबद्दलही प्रवाद निर्माण करून त्याच्यावर प्रतिकूल टीका करणे हा काही लोकांचा स्वभाव असतो. इ.स. १८५५ मध्ये पुणे येथे उत्तरविभागाचे ‘सब असिस्टंट इनाम कमिशनर’ म्हणून गोपाळरावांची नियुक्ती झाली. समोर आलेल्या पुराव्याची ते सर्व बाजूंनी बारकाईने छाननी करीत असत आणि न्यायाच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घेत असत. हे काम त्यांनी कुणाचाही मुलाहिजा न ठेवता कणखरपणे केले. त्यामुळेच गोपाळराव टीकेला पात्र झाले. पेशव्यांच्या राज्यात शेवटी शेवटी ज्या इनामाच्या सनदा दिल्या गेल्या त्या तोंडी होत्या. लेखी स्वरूपात नव्हत्या. काही इनामदारांच्या सनदा बनावटही होत्या. अधिकार नसताना

गोंधळाचा फायदा घेऊन कित्येकांनी अनेक वर्षे इनामे भोगली होती. या प्रकाराला योग्य शिस्त लावण्यासाठी कमिशनची नियुक्ती करण्यात आली. ज्यांच्याकडे सनदा नव्हत्या, पेशवे दप्तरात ज्यांचा उल्लेख नव्हता आणि ज्यांच्या सनदा बनावट होत्या त्यांची इनामे जप्त करावी लागली. पण इंग्रज सरकारला खूष करण्यासाठी गोपाळरावांनी इनामे काढून घेतली अशा आशयाचा आरोप काही असंतुष्ट लोकांनी केला. सार्वजनिक कामकाजात काही लोकांचा गोपाळरावांशी बेबनाव झाला होता. त्यांनीही आरोप केले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीही ‘निबंधमाले’त असाच आरोप करून त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले आहेत. गोपाळरावांचे व्यक्तिगत आणि सार्वजनिक चारित्र्य शुद्ध होते. त्यांना मिळालेले प्रत्येक पद त्यांच्या योग्यतेमुळे मिळाले होते. मुद्दाम खोडसाळपणा करून त्यांनी कोणाची उत्पन्ने बुडवली याला कोणताही आधार नाही. पण निःस्पृह, निष्कलंक व्यक्तीच्या चारित्र्यहननाचे प्रयोग काही लोक करतात. हे दुःखदायक आहे. आपल्या निंदेला गोपाळरावांनी शांतपणे तोंड दिले. इ. स. १८५५ ते १८६१ पर्यंत इनाम कमिशनवर काम करीत असताना त्यांना भिन्न भिन्न स्तरांतले लोक पहायला मिळाले. जहागिरी, वतने, इनामे, सनदा यासंबंधीचे हजारो जुने कागदपत्र त्यांना पाहता आले. मराठेशाहीत सरंजामदारी कशी होती, तिचे स्वरूप आणि पद्धती कोणत्या प्रकारची होती याचीही सखोल माहिती त्यांना झाली. इतिहासविषयक अभ्यासाला आधार मिळाला. कमिशनपुढे आलेल्या साक्षी-पुराव्यांची छाननी करताना इनामदारीवर अधिकार सांगणाऱ्या प्रतिष्ठित लोकांचे अंतरंगदर्शनही त्यांना झाले. पुढे मुंबई उच्च न्यायालयात हिंदू- मुसलमानांच्या धर्मव्यवहारशास्त्राची संहिता तयार करण्यासाठी त्यांना पाचारण करण्यात आले. यावेळी धर्मशास्त्रातील अनेक विरोधांची आणि विसंगतींची त्यांना जाणीव झाली. इ. स. १८६० नंतर त्यांनी धार्मिक व ऐतिहासिक संशोधनपर साहित्य लिहिले त्याचे मूळ या अभ्यासात दिसते. हा अभ्यास त्यांनी कर्तव्यबुद्धीने केला, आवडीनेही केला. धर्मशास्त्रांचे सार समजून घेण्यासाठी प्रत्येक धर्मातील विचार बारकाईने अभ्यासिला पाहिजे. तौलानिक दृष्टी असली पाहिजे. प्रत्येक धर्मात काही बाबतीत मतैक्य असते व पुष्कळशा बाबतीत मतभेदाची स्थळेही आढळतात. त्यांची मीमांसा करण्यासाठी जशी विलक्षण बुद्धी लागते त्याप्रमाणेच अभिनिवेशरहित वृत्तीही लागते. गोपाळरावांना धर्मशास्त्राचे सार तयार करण्याच्या समितीत निवडले गेले याचा त्यांना पुढील सर्व लेखनात उपयोग झाला. कोणताही धर्मग्रंथ माणसानेच लिहिलेला असतो. त्याचा कर्ता ईश्वर नसतो. हे त्यांच्या चित्तात मुरले. म्हणूनच पुढे ते जुनाट बनलेल्या पोथ्या-पुराणांवर टीका करीत राहिले. पुराणांचे वर्चस्व संपवून लोकांनी आधुनिक ज्ञानधारा स्वीकारावी हा आग्रह या अभ्यासातून त्यांच्या मनात उत्पन्न झाला. गोपाळरावांची वैचारिक घडण या पद्धतीने होत गेली. मिळालेल्या प्रत्येक संधीचा लाभ त्यांनी आपल्या बौद्धिक तयारीसाठी करून घेतला आणि मिळवलेले ज्ञान ते लोकांना मुक्त हस्ते देत राहिले.

गोपाळरावांनी जे विस्तृत विविध आणि मार्गदर्शक लेखन सातत्याने केले ते त्यांच्या व्यक्तित्वाइतकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. सार्वजिक जीवनात कार्य करणाऱ्या नेत्याच्या भोवती कित्येक अपसमजांचे आणि अफवांचे वलय निर्माण होते. लोकहितवादी पारतंत्र्याचे पुरस्कर्ते होते; ‘इंग्रजाळलेले’ होते हा आक्षेप तर म. फुले यांच्यावरही विरोधकांनी घेतला होता. त्याचा फार विचार करण्यात स्वारस्य नसते.

## सार्वजनिक जीवन उंचावण्याचा प्रयत्न

लोकहितवादींचे ग्रंथकर्तृत्व महाराष्ट्रातल्या सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या वर्गालाही फारसे माहीत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. काही लोक ‘शतपत्रे’ हेच लोकहितवादींचे साहित्य आहे त्यापलीकडे त्यांनी

काही लेखन केले की नाही याची जाण त्यांना असत नाही. पण या लेखकाचे लहानमोठे मिळून सुमारे चाळीस मराठी ग्रंथ आहेत. गुजराती भाषेतही त्यांचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ते त्यांनीच मूळ गुजरातीतून लिहिले. गुजरातमधल्या वृत्तपत्रांतून त्यांचे कित्येक लेख आलेले आहेत. एकोणिसाव्या शतकातला प्रचंड व्यासंगी ग्रंथकार म्हणून त्यांचा अग्रक्रमाने उल्लेख करता येतो. अहमदाबाद शहरात ते दहा वर्षे न्यायाधीश होते. १८६६ ते १८७७ या कालखंडात गुजरातेतल्या सार्वजनिक जीवनाचा ते एक अविभाज्य घटक बनले होते. त्यांच्याबद्दल ‘स्मरणमुकुर’ या गुजराती पुस्तकात लेखक श्री. नरसिंहराव दिवेटिया यांनी लिहिले आहे :

‘गुजरातमध्ये गोपाळरावांनी चांगली लोकप्रियता संपादन केली होती. ते एक गुजरातीच बनून गेले होते. गुजराती भाषादेखील मातृभाषेप्रमाणे ते सरळपणे बोलत.’ गुजरातमधील एक सुप्रसिद्ध कार्यकर्ते रा. ब. लालशंकर, उमियाशंकर गोपाळरावांच्या स्मारकाबद्दल पुण्यातल्या सभेत म्हणाले,

‘मी अहमदाबादचा राहणारा असून रा. ब. देशमुखांस अहमदाबाद व एकंदर गुजरात या प्रांतात देवतुल्य समजतात व अशी तिकडे सर्वांची समजूत होण्यास त्यांची तशी वृत्ती व वर्तनही कारण झाली आहेत. देशमुख हे अहमदाबादेस आले तेव्हा तेथे कोणत्याही प्रकारच्या सुधारणेचे नावही नव्हते. परंतु देशमुखसाहेब आल्यापासून अहमदाबादेत ह्या काळाला उचित त्या सर्व सुधारणामतांच्या संस्था स्थापन होऊन अहमदाबाद शहराचे युग बदलले. त्यांची नाशकास बढतीवर बदली होऊन तिकडे जाण्यास ते निघाले. तेव्हा एकंदर आबालवृद्धांस अत्यंत दुःख झाले. सर्व शाळांतली मुले एकत्र जमून त्यांनी रा. ब. वर जयजयकारपूर्वक पुष्पवृष्टी केली.’ (निबंधसंग्रह, प्रस्तावना, पृ. २०). गुजरातीमध्ये गोपाळरावांच्या संबंधात कविताही लिहिल्या गेल्या. आणि तेथील वृत्तपत्रांत त्यांच्यासंबंधी गौरवलेख प्रसिद्ध झाले. गोपाळरावांच्या चरित्रातला हा तपशील देण्याचा हेतू इतकाच की ते जेथे जातील तेथे लोकजीवन उंचावण्यासाठी संस्थांची स्थापना करीत असत. ज्ञानप्रसारासाठी आपल्या आयुष्यातला प्रत्येक क्षण देण्याची तयारी असलेल्या या विचारवंताने समाजघडणीचे कार्य प्राधान्याने केले. ‘वरं जनहितं ध्येयम्’ हेच त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. आयुष्याच्या अखेरच्या वर्षात ते रतलाम संस्थानचे दिवाण झाले. तेथे अधिक काळ नव्हते. पण आपला प्रबोधनवादी विचार ते सर्वत्र घेऊन गेले. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची चळवळ उभारण्यासाठी त्यांनी केलेले साहाय्य अविस्मरणीय आहे. समाजस्थितीबद्दल मनात येणारे अनेक विषयांवरचे विचार लिहून ठेवायचे आणि ते वृत्तपत्रांतून व पुस्तकांतून प्रसिद्ध करायचे हे त्यांचे जन्मभर जपलेले एक व्रत होते. लिहिणे आणि विचारांचे प्रबोधन करणे हा त्यांचा धर्म होता. त्यांचे लेखन बहुश्रुतपणाचे आणि नवरचना करण्याच्या हेतूतून निर्माण झालेले आहे. लेखनाचे अनेक उद्देश असतात. पण गोपाळरावांची लेखणी एकाच उद्दिष्टाने लिहीत गेली. लोकविचारांना जाग आणण्याची त्या काळातली प्रमुख गरज त्यांनी लक्षात घेतली. नाना विषयांवर त्यांचे प्रभुत्व होते. कारण हे अनेक विषय त्यांनी जाणीवपूर्वक अभ्यासिलेले होते. समाजकारण, धर्म, इतिहास, अर्थ, कायदा आणि काव्यादी साहित्य अशा विषयांचा त्यांचा अभ्यास खोल होता. पेशवाईतली राज्यव्यवस्था आणि इंग्रजी राज्यातली व्यवस्था यातला विरोध लक्षात घेऊन इंग्रजांनी केलेले कायदे, न्यायव्यवस्था वगैरेंची त्यांनी प्रशंसा केली. इंग्रजी राज्याची शिस्त व कायद्यांपुढे सारे समान ही भूमिका त्यांना अभिनंदनीय वाटली. गोपाळरावांच्या साहित्यात भिन्न भिन्न विषय आलेले आहेत. या पुस्तकात शेवटी त्यांनी लिहिलेल्या सर्व ग्रंथांची यादी दिली आहे. त्यावरून त्यांचे ग्रंथकर्तृत्व कसे व्यापक आहे हे स्पष्ट होईल. गोपाळराव इ. स. १८८० ते ८२ पर्यंत तीन वर्षे मुंबईच्या कायदेकौन्सिलचे सभासद होते. त्यावेळी त्यांनी कौन्सिलात महत्त्वपूर्ण विषयांवर भाषणे केली. एक अभ्यासू, जागरूक आणि

लोकहितदक्ष सदस्य अशी त्यांची ख्याती झाली. ब्रिटिश सरकारने कौन्सिलवर त्यांची नियुक्ती करताना त्यांची विद्वत्ता, अनुभव आणि लोकसेवा हे विशेष गुण लक्षात घेतले होते.

### व्यक्तिगत दुःखाला महत्त्व नाही

समाजातल्या अनिष्ट, निर्बुद्ध परंपरांवर गोपाळरावांनी घणाघाती टीका केली. धार्मिक समजल्या जाणाऱ्या क्रियाकांडावरही त्यांनी आघात केले. कर्मकांडाचे देव्हारे माजवणारा ब्राह्मणवर्ग हा त्यांच्या टीकेचे लक्ष्य होता. अज्ञानजन्य संकेतावर प्रहार करताना त्यांनी कोणाचा मुलाहिजा ठेवला नाही. पण त्यांना भेटायला आलेल्या कोणत्याही ब्राह्मणाचा त्यांनी अनादर केला नाही. ब्राह्मण असो की कोणत्याही जाती-जमातीचा असो प्रत्येक माणसाशी ते स्नेहभावाने वागत. एखादा अविद्वान ब्राह्मण आला तरी त्याचाही ते आपल्या घरी सन्मान करीत. यातून त्यांच्या मनाची उदारता दिसते. बॅरिस्टर झालेला त्यांचा मुलगा अकाली मरण पावला. या घटनेने ते अत्यंत व्यथित झाले. दुसऱ्याच दिवशी सकाळी पंडित सेवकलाल त्यांना सहज भेटण्यासाठी म्हणून गेले. सेवकलाल आपल्या आठवणीत सांगतात,

'मी त्यांचेकडे आर्यसमाजाच्या काही कामासाठी बाहेर जावयाचे होते म्हणून त्यांस बरोबर घेण्यासाठी गेलो. ते बाहेरच बसले होते. मला पाहिल्याबरोबर त्यांनी अंगरखा पागोटे घरातून मागविले व समाजाचे संबंधाने ते मजबरोबर बोलू लागले. तितक्यात घरातून एक मनुष्य मजकडे येऊन मला एकीकडे नेऊन सांगू लागला की त्यांचे प्रिय पुत्र बॅरिस्टर कृष्णराव वारले व त्यांचे प्रेत दहन करून नुकतीच मंडळी घरी आहे. हे ऐकून मला अतिशय वाईट वाटले व मी रावसाहेब यांस 'अशा दुःखाचे प्रसंगी मी आपल्याला बाहेर जावयाचे श्रम देणे अगदी अयोग्य आहे. असे म्हटले, ते म्हणाले, 'ह्या प्रसंगाबद्दल विषाद मानून आर्यसमाजाचे कार्यासाठी आपल्याला जे करावयाचे ते करण्यात उदासीनता दाखविणे हे माझ्या मताने चांगले नाही.' (निबंधसंग्रह, प्रस्तावना, पृष्ठ ६३). मुलाच्या मृत्यूचे दुःख मनात अगदी ताजे असताना आर्यसमाजाच्या कामासाठी ते सेवकरामाबरोबर बाहेर पडले. कर्तव्यासंबंधीची निष्ठा आणि दुःख सहन करण्याची शक्ती या दोन्ही गोष्टींचे हे एक बोलके उदाहरण आहे. याच पंडित सेवकलालने आणखी एका आठवणीचा उल्लेख केला आहे. तिचा सारांश असाः गोपाळराव नाशिकला जॉइंट जज्ज असताना त्यांचा एक नोकर तापाने आजारी पडला. त्याला औषधपाणी देण्याचे काम स्वतः गोपाळगाव करीत होते. दुसरा एक नोकर आजारी माणसाचे पाय दाबीत बसला होता. त्याला गोपाळरावांनी काही कामासाठी बाहेर पाठवले आणि ते स्वतः आजारी माणसाचे पाय चुरीत बसले. त्या आजाऱ्याला अर्धवट शुद्धीत हे कळले नाही. तो शिव्या देत पाय जोरात दाबले पाहिजेत म्हणून रागावून सांगत होता. गोपाळरावांनी शांतपणे त्याची शुश्रूषा व्यवस्थितपणे चालू ठेवली. ही आठवणदेखील गोपाळरावांच्या माणुसकीवर आणि सहिष्णु वृत्तीवर प्रकाश टाकणारी आहे. त्यांनी लोकांना मदत करताना कोणताही भेदभाव मनात ठेवला नव्हता. आपली घोड्याची गाडी चालवणारा नोकर घोड्याला अधिक हरभरे लागतात म्हणून आपल्या घरी हरभरे चोरून नेत असे. बरेच दिवस हा प्रकार चालू होता. गोपाळरावांना तो समजला तेव्हा ते शांतपणे नोकराला म्हणाले, 'तुला हरभरे पाहिजे होते तर घरात मागायचे होते. घोड्याला उपाशी ठेवू नकोस. मुके जनावर त्यामुळे उपाशी मरेल.' असे म्हणून घरातून पायलीभर हरभरे आणून त्यांनी नोकराला दिले. अशा अनेक आठवणी त्यांच्या चरित्राशी निगडित आहेत. संतांचे साहित्य आणि धर्मशास्त्रावरील अनेक पुस्तके वाचून त्यांच्या स्वभावात काही अंशी मृदुता आली असेल पण मुळातच त्यांची वृत्ती प्रेमळ होती. माणसे का दुःखी होतात? आणि त्यांची दुःखे कशी नाना प्रकारांनी वाढत जातात याचे निरीक्षण त्यांनी केले होते. न्यायाधीशासमोर येणारे अनेक खटले दुःख, समस्या आणि माणसाचे दुर्गुण, दुराग्रह यातूनच उद्भवलेले असतात. त्यामुळे

जीवनाची दुःखद बाजू आपोआपच लक्षात येते. गोपाळरावांसारखा चिंतनशील मनुष्य जीवनाच्या या अनुभवामुळे अधिकच अंतर्मुख होतो. सामाजिक सुधारणा व्हावी ही भूमिका सर्व सुधारकांनी आग्रहाने घेतली याचे कारण मानवी जीवन शुद्ध आणि आनंदमय करायचे हे त्यांचे उद्दिष्ट होते.

## ‘गोपालकृष्णच’ भेटला

श्री. कृ. ना. आठल्ये यांनी गोपाळरावांच्या चरित्रातली आणखी एक उल्लेखनीय कथा सांगितली आहे. गोपाळराव त्या काळात अहमदाबादला न्यायाधीश होते. दररोज सकाळी आपल्या मुलांसह ते नदीवर स्नानाला जात असत. नदीकाठावरील देवळात देवाला गंधफूल वाहात असत. सुट्टीच्या दिवशी नदीकाठावरील प्रत्येक देवालयात ते नियमाने जात. एके दिवशी त्यांना एक वृद्ध गुजराती स्त्री भेटली. ती भाविक होती. गोपाळरावांना पाहून तिला वाटले, हा कोणीतरी धार्मिक, वैदिक ब्राह्मण असावा. हात जोडून तिने गोपाळरावांना म्हटले,

‘तुम्हाला शिधा द्यावा अशी माझी इच्छा आहे. तो तुम्ही घ्याल का ?’ ‘मी ब्राह्मणच आहे. शिधा जरूर घेईन’ असे उत्तर देऊन गोपाळरावांनी तिला आपला पत्ता सांगितला. दुसऱ्या दिवशी ती वृद्ध स्त्री शिधा घेऊन त्यांच्या घरी आली. दारावर हत्यारबंद शिपाई उभा होता. त्याने बाई आल्याची वर्दी दिली. गोपाळरावांनी आपुलकीने तिचे स्वागत केले. वस्तुस्थिती कळल्यावर ती अतिशय ओशाळली. ‘आपण एका मोठ्या सरकारी अधिकाऱ्याला भिक्षा म्हणून शिधा घेण्यास सांगितले’ या विचाराने ती अतिशय संकोचली. क्षमा मागू लागली. तेव्हा तिला गोपाळराव म्हणाले, ‘ब्राह्मणांनी शिधा घेण्यास काही हरकत नाही.’ त्यांनी प्रेमाने तो शिधा ठेवून घेतला आणि तिच्यासंबंधी अधिक माहिती विचारली. तिचे नाव जमना पिराणी असे होते. तिची मोठी शेती होती. इस्टेट होती. पण भाऊबंद आणि सावकार यांनी ती सर्व गिळंकृत केली, असे सांगून ती रडू लागली. गोपाळरावांनी सर्व हकीकत ऐकून घेतली. तिचे कागदपत्र पाहिले आणि तिच्यातर्फे कोर्टात काम चालवावे असे एका वकिलाला सांगितले. कोर्टाचा सर्व खर्च गोपाळरावांनीच केला. अखेर तिला न्याय मिळाला. तिच्या जमिनी परत मिळाल्या. आपल्याला ‘गोपाळकृष्ण’च भेटला असे ती बाई म्हणत असे. न्यायनिष्ठुर स्वभाव आणि प्रेमळवृत्ती हे गोपाळरावांचे गुणधर्म इंग्रज सरकारला माहीत होते. त्यामुळे इंग्रज अधिकाऱ्याऐवजी कित्येक महत्त्वाच्या पदांवर त्यांची नियुक्ती योग्यता लक्षात घेऊन केलेली होती.

गोपाळरावांवर इ.स. १८८२ पासून अनेक कौटुंबिक आपत्ती आल्या. मुलामुलींचा मृत्यू त्यांना पाहावा लागला. इ.स. १८८५ मध्ये गणपतराव, १८८९ मध्ये रामचंद्रराव व १८९२ मध्ये कृष्णराव असे त्यांचे तीन कर्ते मुलगे दिवंगत झाले. याआधी पत्नी सौ. गोपिकाबाई यांचा देहान्त झाला. त्यांच्या दोन विवाहित कन्याही याच काळात मरण पावल्या. मृत्यूच्या या प्रचंड वादळात ते आपला तोल सावरण्याचा प्रयत्न करींत होते. दुःख गिळावे आणि आपले अंगीकृत कार्य निष्ठेने करीत राहावे, हा क्रम त्यांनी ठेवला. संसार हा सुखदुःखमय आहे तेव्हा त्याच्याविषयी हर्षविषाद मानण्याचे कारण नाही, असे ते म्हणत असत. पण वृद्धपणी पत्नी, मुले आणि मुली यांच्या वियोगाचा झालेला प्रचंड आघात बाह्यतः त्यांनी सहन केला असला तरी अशा प्रसंगी त्यांचे मन खचून गेले असले तर त्यात आश्चर्य नाही. अखेरच्या काही वर्षांत कौटुंबिक आघातांनी त्यांची जीवनेच्छा कदाचित मंद झाली असावी. आपल्या ‘लोकहितवादी’ मासिकाच्या एका अंकात ते म्हणतात,

अनुक्रमणिका

'हे मासिक पुस्तक सुरू केल्यापासून पुस्तक प्रकाशकास अनेक ऐहिकोपाधीपासून अस्वास्थ्य व अशांती उत्पन्न होण्यासारखे जे कित्येक असह्य व्याप प्राप्त झाले ते सर्वांस विदित आहेतच. पुत्रपौत्रजायादिकांच्या समागम सुखाचा अनुक्रमे अंत होत जाणे ह्यांपरते मानवी प्राण्यास अस्वास्थ्य व अशांती उत्पन्न करणारे दुसरे काय आहे? पण... देशबंधूंची सेवा करणे यासारखे दुसरे समाधानाला व विश्रांतीला कारण व स्थल नाही.' सामाजिक प्रगतीचे चक्र सतत फिरत ठेवण्याचा जन्मभर प्रयत्न करणारा हा लोकहितवादी विचारवंत दिनांक ९ ऑक्टोबर १८९२ रोजी जग सोडून गेला. महाराष्ट्र आणि गुजरातमधून अनेक वृत्तपत्रांनी, विद्यालयांनी, सामाजिक संस्थांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. महाराष्ट्रीय समाजात विचारक्रांतीच्या जळजळीत ठिणग्या टाकून समाजमनात नवविचारांची ज्वाला पेटवण्याचा प्रयत्न लोकहितवादींनी केला. अर्वाचीन महाराष्ट्रातला हा पहिला विचारवंत आहे असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. लो. टिळकांनी 'केसरी'च्या अग्रलेखात त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेऊन म्हटले होते,

'पाश्चिमात्य विद्येचे जे नानाप्रकारचे संस्कार होतात त्या सर्व स्थितीतून गोपाळराव हे गेलेले होते. तेव्हा त्यांच्या इतका अनुभव व जुन्या इतिहासाचे व काळाचे ज्ञान आमच्यापैकी फारच थोडक्यांस होते. असे म्हणण्यास कोणतीच हरकत नाही. पुण्यात ज्या काही चळवळी होत असत त्या सर्वांस रावबहादुर गोपाळरावजींचे साहाय्य व प्रोत्साहन असे.'

***(केसरी ११ ऑक्टोबर १८९२)***

## रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग

गोपाळराव देशमुख-लोकहितवादी-यांच्या चरित्राची आणि व्यक्तित्वाची ही स्थूल रूपरेषा दिली आहे. पिढ्यान्‌पिढ्या झोपी गेलेल्या हिंदू समाजाला जाग आणण्यासाठी या आद्य सुधारकाने केलेले कार्य महत्त्वाचे आणि मूलभूत स्वरूपाचे आहे. महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळी आणि प्रबोधन यांच्या इतिहासाला लोकहितवादींपासून सुरुवात होते. सामाजिक परिवर्तनाचा आरंभबिंदू म्हणजे लोकहितवादींचे साहित्य आणि कार्य होय. कोणत्याही पुराणमतवादी कर्मठ समाजात नव्या विचारांची पेरणी करणाऱ्याला फार कष्ट करावे लागतात. आपल्याच लोकांशी त्याला झगडावे लागते. संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे, 'रात्रीदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य जग आणि मन.' ध्येयवाद्याला या प्रकारचा संग्राम अटळपणे करावा लागतो. समाजसुधारकाला तर फारच चिवटपणाने झुंजावे लागते. समाजाच्या मनात आणि जीवनात निर्माण झालेल्या अनेक प्रकारच्या रोगांवर सुधारकाला शस्त्रक्रिया करावी लागते. रूढी, अंधःश्रद्धा, विषमता आणि अज्ञान हे रोग मलमपट्ट्या लावून कधीच बरे होत नाहीत. जे सडले आहे ते तोडावे लागते. तोडण्याची क्रिया बाहेरून विध्वंसक वाटते, पण आतून ती रचनात्मक असते. रोगट भागावर शस्त्रक्रिया करणारा हात ममत्व आणि वात्सल्य यांचाच असतो. पण हे परंपरेच्या अंधारात शेकडो वर्षे बसून राहिलेल्यांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे संघर्ष सुरू होतो. त्या संघर्षाचे चित्र लोकहितवादींच्या चरित्रात दिसते. ते काळ आणि परिस्थिती यांचे भान ठेवून समजून घेतले पाहिजे.

गोपाळराव यांच्या निधनानंतर 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्राने त्यांच्या अखंड विद्याव्यासंगाचे आणि त्यांनी केलेल्या प्रचंड ग्रंथसंग्रहाचे ११-१०-१८९२ च्या अंकातील अग्रलेखात वर्णन केले आहे. देशमुखांच्या प्रचंड पुस्तकसंग्रहाचा विद्याप्रेमी लोकांना उपयोग व्हावा अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे. या विशाल

अनुक्रमणिका

ग्रंथसंग्रहाचे पुढे काय झाले हे मात्र कळत नाही. लोकमान्य टिळक यांच्या सल्ल्याप्रमाणे तो संग्रह गायकवाड वाड्यात नेण्यात आला. पण थोड्याच अवधीत टिळकांना मंडालेच्या तुरुंगात नेण्यात आले. ग्रंथसंग्रहाची व्यवस्था लावता आली नाही आणि हा संग्रह हळूहळू नाहीसा झाला, अशी हकीकत श्री. अ. का. प्रियोळकर यांनी निबंधसंग्रहाच्या प्रस्तावनेत दिली आहे. गोपाळराव देशमुखांचे नातजावई श्री. अभ्यंकर वकील यांनी गोपाळरावांचा सर्व खासगी पत्रव्यवहार त्यांचे चरित्र लिहावे म्हणून सांगलीला नेला. पण तेही काम झाले नाही. १९२६ पर्यंत हा पत्रव्यवहार सुमारे एकतीस दप्तरांतून शिल्लक होता. पण दुर्दैवाने तो नाहीसा झाला. त्याच्या आधाराने लोकहितवादींच्या चरित्रावर आणि व्यक्तित्वावर अधिक प्रकाश पडला असता. पण अखेर लोकहितवादींचे उपलब्ध असलेले वाङ्मय हेच त्यांचे चरित्रचित्र आहे असे म्हणावे लागते. लोकहितवादी आत्मचरित्र लिहिणार होते. पण ते कामही झालेले दिसत नाही. पण आज तरी त्यांची सुमारे पस्तीस ते चाळीस पुस्तके उपलब्ध आहेत. विचारवंत समाजसुधारकांची आणि राष्ट्रीय नेत्यांची पुस्तके हे राष्टाचे विचारधन असते. या संपत्तीवरच देशातल्या विचारांचा व्यापार, व्यवहार अवलंबून असतो. म्हणूनच अशा ग्रंथांचे वाचन व चिंतन आवश्यक असते. ग्रंथांचे जतन म्हणजे संस्कृतीचे संगोपन.

अनुक्रमणिका

# २. ‘शतपत्रां’तील समाजचिंतन

इंग्रजी सत्ता, संस्कृती आणि ज्ञान-विज्ञान यांच्याशी संबंध आल्यावर भारतीय समाजमनात अनेक विचारांचे तरंग उठले. नवशिक्षितांची मने तळापासून ढवळून निघाली. नवीन जाणिवांचा त्यांना साक्षात्कार होऊ लागला. कठोर आत्मपरीक्षण करण्याची प्रवृत्ती सुशिक्षितांत मूळ धरू लागली. आपली समाजरचना, आपले आचारविचार, धर्मकल्पना, जीवनदृष्टी या साऱ्यांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे असे कित्येकांना वाटू लागले. हा परिणाम इंग्रजी विद्येच्या वाऱ्यामुळे झाला. शेकडो वर्षे ठराविक चाकोरीतून चालत राहिलेल्या समाजात वैचारिक आंदोलन निर्माण झाले. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग यांच्या लेखनात नव्या विचारांचा भाग आहे. पण परिवर्तनवादी विचारांची वेगवान अभिव्यक्ती लोकहितवादींच्या वाङ्‌मयात आणि कार्यात विशेषच जोमदारपणे झाली. अव्वल इंग्रजीच्या काळात आपल्या समाजव्यवस्थेची चिकित्सा केली पाहिजे आणि तिच्यात मुळापासून सुधारणा घडवून आणण्यासाठी झगडत राहिले पाहिजे हा लढाऊ विचार लोकहितवादींच्या लेखनातून व्यक्त होत राहिला. समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीचे नेतृत्व लोकहितवादींकडेच जाते. त्यांच्या पूर्वी परमहंस सभा या नावाच्या संस्थेने सामाजिक सुधारणेच्या दिशेने एक पाऊल टाकण्याचा प्रयास केला होता.

### परमहंस सभा : यश आणि अपयश

या सभेची स्थापना मुंबईला इ. स. १८४९ च्या सुमाराला झाली. दादोबा पांडुरंग हे तिचे एक प्रवर्तक होते. इतर प्रवर्तकांत लक्ष्मणशास्त्री हळवे, आत्माराम पांडुरंग, मोरोबा विनोबा इत्यादी सुधारणावादी मंडळी होती. दादोबा हे या सभेचे सूत्रधार. जातिभेदावर प्रहार करून धार्मिकबाबतीत सुधारणा करायची हे या सभेचे उद्दिष्ट होते. इ. स. १८६० पर्यंत परमहंस सभेचे कार्य चालू होते. पुढे कार्यासंबंधी मतभेद निर्माण झाले. जातिभेद अनिष्ट आहेत म्हणून हे भेद नष्ट केले पाहिजेत असे प्रतिपादन दादोबा पांडुरंग करीत असत. या परमहंस सभेचे सभासद होताना प्रथम एक प्रार्थना वाचायला सांगत असत. जातिभेद मानीत नाही हे पटवून देण्यासाठी किरिस्तावाने तयार केलेल्या पावाचा एक तुकडा सभासदाला सर्वांच्या समोर खावा लागे. कधी सहभोजन होत असे. पण सभासदांची नावे गुप्त ठेवलेली होती. या सभेच्या शाखा पुणे, अहमदनगर, बेळगाव या शहरांतही निघाल्या. परमहंस सभेच्या तत्त्वदृष्टीचे स्पष्टीकरण दादोबा पांडुरंगानी वीस अभंगांतून केले आहे. त्यांतील काही असे :

> जातिभेद सर्व। सोडा अभिमान। द्यावे आलिंगन एकमेकां।
> असो कृष्णगीता। किंवा ख्रिस्तगीता। महंमदाची वार्ता।
> असेना का॥ असो बौद्धाचार्य। किंवा जैनाचार्य।
> शंकर आचार्य। कबीरही॥ तत्त्वज्ञान एक।
> एक त्यांचे जरी। न का ते पदरी। घ्यावे आम्ही।

यात सर्वधर्मसमभाव आहे. भेदांचे विसर्जन करण्याची शिकवण आहे. पण एके दिवशी सभासदांच्या नावांची यादी कोणतरी पळविली. ती प्रसिद्ध झाली तर आपल्याला बहिष्कृत व्हावे लागेल या भीतीने सभासदांनी सभेचा संबंध तोडून टाकला. परमहंस सभेचा शेवट अशा रीतीने झाला. तो काळ सनातन, सोवळ्या विचारांचा होता. ही १८६० मधली गोष्ट. पुढे १८९० मध्ये पंचहौद मिशनच्या समारंभात चहाच्या कपाला नुसत्या बोटांचा स्पर्श केल्याबद्दल न्या. रानड्यांसारख्यांना कशा नाकदुऱ्या काढाव्या लागल्या हे लक्षात

अनुक्रमणिका

घेतले तर लोकमताचा बागुलबुवा त्याकाळी केवढा जबरदस्त होता हे समजून येईल. अशा आशयाचे मत 'दादोबा पांडुरंग' या पुस्तकात श्री. अ. का. प्रियोळकर त्यांनी व्यक्त केले आहे. ते बरोबर आहे. समाजाच्या धार्मिक कल्पना खाण्यापिण्याशीचा प्रामुख्याने निगडित होत्या. पावबिस्किट खाल्ले की धर्म बुडाला. परजातीच्या माणसांकडून पाणी घेतले की धर्म बुडाला. स्पर्शास्पर्शभेद पराकोटीला गेलेले. अस्पृश्यतेची रूढी खोलवर रुजलेली. यात्रा जत्रा, व्रते-वैकल्ये, उपास-तापास, होमहवन, जप-जाप्य यांचे अवडंबर समाजात माजलेले. सोवळे-ओवळे तर विलक्षण होते. न्या. रानडे यांच्याप्रमानेच लो. टिळकांनाही त्रास सहन करावा लागला. अशा वातावरणात परहंस सभा टिकू शकली नाही. यात काहीच आश्चर्य नाही. सामाजिक दडपणाखाली सुधारणावादी कार्य करणे कठीण होते. 'दर्पण', 'ज्ञानोदय', 'प्रभाकर', 'मराठी ज्ञानप्रसारक', दिग्दर्शन वगैरे वृत्तपत्रांतून नवे विचार येत असत. त्यांतून हळूहळू लोकमताला थोडाफार आकार येत होता. इंग्रजी विद्या आणि समाजातील परंपरानिष्ठ वातावरण यांचा संघर्ष वाढत राहिला. लोकहितवादींच्या बंडखोर मनाने त्या परिस्थितीचे सारे विशेष टिपून घेतले. त्यांच्या मनात विचारांचे मंथन सतत चालू होते. समाजाच्या अवस्थेबद्दल आणि लोकांच्या अज्ञानाविषयी त्यांना सदैव तीव्र खेद वाटत असे. नव्या ज्ञानविज्ञानाच्या आधारावर आपला समाज समर्थपणे उभा रहावा हे त्यांचे स्वप्न होते. सामाजिक कुरूपतेवर आणि नाना प्रकारच्या विसंगत कालबाह्य झालेल्या संकेतांवर जोरदार वैचारिक हल्ला चढवला पाहिजे हा विचार त्यांच्या मनात उसळून आला. इंग्रजी विद्या आणि संस्कृती आपल्या जुन्या विद्येपेक्षा व संस्कृतीपेक्षा कितीतरी समर्थ आहे हे ते पाहात होते. अनुभवीत होते. नुसते पाहात राहाण्यामुळे समाज बदलत नाही म्हणून नव्या विचारांची तोफ डागलीच पाहिचे हे त्यांनी ठरवले. विरोधाचा शब्द उच्चारणे म्हणजे जुन्या समाजाचे वैर ओढवून घेणे हे समीकरण त्यांना माहीत होते.

## शतपत्रे : बंडखोर विचार

भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' पत्रात लोकहितवादींनी 'शतपत्रां'तला आपला पहिला लेख (किंवा पहिले पत्र) १९ मार्च १८४८ मध्ये प्रकाशित केला. पण यापूर्वीच म्हणजे इ. स. १८४२ मध्ये वयाच्या एकोणिसाव्या वर्षी ग्लीगच्या पुस्तकाचा अनुवाद 'हिंदुस्थानचा इतिहास-पूर्वार्ध' या नावाने त्यांनी केला होता. प्रत्यक्षात मात्र हे पुस्तक १८७८ मध्ये प्रकाशित झाले. लोकहितवादींचे अखेरचे पुस्तक 'उदेपूरचा इतिहास' १८९२ मध्ये प्रसिद्ध झाले. 'शतपत्रां'च्या लेखनापासून अखेरच्या पुस्तकापर्यंत सुमारे चव्वेचाळीस-पंचेचाळीस वर्षे ते नानाविध विषयांवर सतत लेखन करीत होते. अनेक सामाजिक चळवळींशी या काळात ते एकरूप झाले होते. सुमारे दोन वर्षे 'प्रभाकर'मधून त्यांनी समाजाला उद्देशून जी पत्रे लिहिली. त्यांना 'शतपत्रे' असे त्यांनी म्हटले. वस्तुतः ही पत्रे किंवा लेख एकशे आठ आहेत. अनेक सामाजिक प्रश्नांची अत्यंत परखड भाषेत त्यांनी निःशंकपणे चर्चा केली आहे. हिंदू समाजाच्या अधोगतीची इतकी कठोर, इतकी विदारक चिकित्सा करणारा दुसरा ग्रंथ मराठीत नाही. 'शतपत्रे' हे सामाजिक रोगांवर प्रहार करणारे धारदार शस्त्र आहे. ज्याला लोकहित साधायचे आहे; त्याने गुळमुळीत लिहून वा बोलून उपयोग होत नाही. गुळगुळीत कागद आणि त्यावर लिहिलेले बुळबुळीत शब्द समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने निरुपयोगी असतात. लोकहितवादींची 'शतपत्रे' वाचकांच्या मनावर खोल परिणाम करतात. 'शतपत्रां'तली भाषा प्रबोधन करण्यासाठी अगदी अचूक आहे. एकेक लेख म्हणजे आसुडाचा एकेक फटका आहे. 'शतपत्रे' आणि लोकहितवादी किती परस्परांत मिसळून गेले आहेत याचे दर्शन या लेखनात होते. अशी 'शतपत्रे' लोकहितवादींशिवाय दुसरा एखादा लेखक लिहू शकला नसता. 'शतपत्रे' ही ललितकृती नव्हे. पण नव्या समाजरचनेचे गीत गाणारी ती एक बलोद्धत विचारांची ओजस्वी कविता आहे असे म्हणायला हरकत नाही. एकेका लेखकाची एखादी कृती अजरामर ठरते. त्याप्रमाणे 'शतपत्रे' ही

अनुक्रमणिका

लोकहितवादींची सदैव ताजी राहाणारी आणि वाचकाला विचार करायला लावणारी साहित्यकृती आहे. वयाच्या पंचविशीत लेखकाने हे निबंध लिहिले. त्यामुळेच 'शतपत्रां'तले विचार तरुण, आक्रमक आणि तेजस्वी आहेत. प्रज्ञा-प्रतिभेचा हा ओजस्वी उन्मेष प्रत्येकाने अनुभवला पाहिजे. काही ग्रंथ वाचलेच पाहिजेत. त्यांची यादी करायची झाली तर तिच्यात 'शतपत्रे' या ग्रंथाचा उल्लेख अवश्य करावा लागेल. ज्याने म. फुले यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ वाचला नाही, ज्याने आगरकरांचे 'निबंध' वाचले नाहीत, ज्याने विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'आत्मचरित्र' वाचले नाही, सावरकरांचे 'जात्युच्छेदक निबंध', डॉ. आंबेडकरांचे 'बहिष्कृत भारत'मधील लेख आणि 'जातिनिर्मूलन' हे पुस्तक वाचले नाही त्याला समाजाची स्थिती आणि गती नीट कळणार नाही. 'शतपत्रां'चेही हेच महत्त्व आहे. हे महत्त्व पटले म्हणून इतर नियतकालिकांतूनही शतपत्रे प्रकाशित झाली. डॉ. आंबेडकरांनी आपल्या 'बहिष्कृत भारत' या नियतकालिकातून ही पत्रे पुन्हा प्रसिद्ध केली. 'सुबोधपत्रिका' या आणखी एका नियतकालिकाने त्यांना प्रसिद्धी दिली. याचा अर्थ समाजमनाला वैचारिक धक्के देऊन त्याला जागृत करण्याचे कार्य 'शतपत्रां'नी केले आहे. बाबा पदमनजी या लेखकाने 'अरुणोदय' या आपल्या आत्मचरित्रात 'शतपत्रां'मुळे आपल्या मनातल्या अंधःश्रद्धा ओसरून बुद्धीला जाग आणण्यास मदत झाली असे म्हटले आहे. 'शतपत्रां'तल्या विषयांचे स्वरूप आणि त्यांचा झालेला आविष्कार समजून घेतला पाहिजे. लोकहितवादींच्या व्यक्तित्वातली आणि विचारांतली सर्व सामर्थ्ये या ग्रंथातून प्रकट झाली आहेत. लोकहितवादींनी याशिवाय दुसरे काहीही लिहिले नसते तरी महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणाबादाच्या इतिहासात या पत्रांना स्थान मिळाले असते. कारण 'शतपत्रां'च्या पूर्वीचे मराठीतले वाङ्मय प्रामुख्याने परमार्थवादी विचाराला वाहिलेले आहे. निवृत्ती आणि वैराग्य यांचे स्तोम त्यात माजवलेले दिसते. समाज ज्ञानसंपन्न व्हावा, त्याने पराक्रम करावा, व्यापार-उद्योगधंदे वाढवावेत, नवनवीन यंत्रे निर्माण करावीत असले विचार जुन्या साहित्यात आलेले नाहीत. 'परमेश्वराने आपल्याला ठेवले त्या स्थितीतच समाधानाने राहावे' हे तत्त्वज्ञान स्वीकारल्यावर प्रगती कसली होणार ? सारे काही दैवाधीन आहे म्हणून देव आणि दैव यांच्यावरच अवलंबून राहावे या विचारातून समाजाला नवे चैतन्य कसे प्राप्त होणार ? जुने भाबडे धर्मग्रंथ आणि पोथ्यापुराणे यांचे भक्तिभावाने चर्वित चर्वण करीत बसलेल्या समाजाला नवा इतिहास कसा घडवता येणार ? जुन्या वाङ्मयातले थोडे कवी आणि ग्रंथकार सोडल्यास बाकी साराच अंधार होता. सामाजिक जाणीव फारशी नव्हती. रामायण-महाभारतातल्या गोष्टी पुराणिक आणि कीर्तनकार रंगवून सांगत होते. नवे रामायण घडवण्याची स्फूर्ती ते देऊ शकत नव्हते. मोरोपंतांसारखा श्रेष्ठ पंडित कवी सामाजिक जाणिवेपासून दुरावलेला होता. मोरोपंतांच्या काळात १७६१ मध्ये पानिपतचे युद्ध झाले. मराठ्यांचा-महाराष्ट्राचा दारुण पराभव झाला. महाराष्ट्राची लाख बांगडी पानिपतावर फुटली. हाहाकार माजला. पण या दुर्घटनेचा ओझरताही उल्लेख लाख-सव्वा लाख कविता लिहिणाऱ्या मोरोपंतांच्या काव्यात आढळत नाही. आपल्या काळातील समाजाची जाणीवच नाही. हीच परंपरा चालू होती. पण 'शतपत्रे' म्हणजे सामाजिक जाणिवेचा जिवंत आणि ज्वलंत आविष्कार आहे. इंग्रजी कालखंड सुरू झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणातून आणि संस्कृतीतून ही जाणीव वाढीला लागली. जे विचार करीत होते त्यांच्या जाणिवांचा विकास झाला. इंग्रजी विद्या म्हणजे वाघिणीचे दूध आहे असे विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणत, पण हे दूध लेच्यापेच्या माणसाला पचणे शक्य नव्हते. इंग्रजी शिकून कारकून मात्र अनेक तयार झाले. जे मुळातच वाघ होते त्यांना मात्र या विद्येने पराक्रमाची चालना दिली. पाश्चात्त्य ज्ञानातून लोकहितवादींच्या विचारशक्तीला, व्यक्तित्वाला अधिक बळ आले. नवजीवनाची (Renaissance) चळवळ त्यांनी सुरू केली.

अनुक्रमणिका

## ग्रंथप्रामाण्याला विरोध

'शतपत्रां'तील क्रमांक सत्तर या पत्रात लोकहितवादींनी एक बुद्धिवादी विचार झडझडून सांगितला आहे. ते म्हणतात,

"मनूचे वचन असो; याज्ञवल्क्याचे असो कोणाचेही असो, ब्रह्मदेवाचे का असेना, 'बुद्धिरेव बलीयसी' असे आहे... शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा. विचार करून पहा. घातक वचनावर हरताळ लावा." पुढे ते आणखी तीव्रतेने म्हणतात, "धर्मशास्त्र केवळ कायदा आहे. व्यावहारिक गोष्टी करता त्यातील एका वाक्यास हरताळ लावली म्हणून काय झाले?"

बुद्धिवादाची ही घोषणा लेखकाने आत्मविश्वासाने केली आहे. आपले सगळे शास्त्रीपंडित आणि त्यांच्यामुळे सर्वसाधारण लोक पोथ्या-पुराणांच्या व जुन्या ग्रंथांच्या आहारी गेलेले असतात. काय करावे आणि काय करू नये याचा निर्णय जुन्या झालेल्या पोथ्यापुस्तकांत पाहून करायचा हे अत्यंत अज्ञानाचे लक्षण आहे यात संशय नाही. ग्रहण कशामुळे लागते हे शास्त्रज्ञानाने आता कळले आहे. पण अजूनही ग्रहणकाळात उपासतापास करायचे; राहूकेतूच्या तावडीतून सूर्यचंद्राची सुटका व्हावी म्हणून एखादी भाकड पोथी वाचायची; दान करायचे असले हास्यास्पद प्रकार सुशिक्षितांच्याही घरात पाहायला मिळतात. कारण विचारले तर जुन्या ग्रंथात हा विधी सांगितला आहे, ही आमची परंपरा आहे, हे अमुक आचार्याने म्हटले आहे अशी कारणे देण्यात येतात. जेव्हा शास्त्रीय ज्ञानाच्या उदय झाला नव्हता. तेव्हा कुणातरी, तथाकथित पंडिताने लिहून ठेवले म्हणून त्याचे शब्द प्रमाण मानून त्याला अनुसरून आज शेकडो वर्षांनंतर त्याच्या आज्ञेप्रमाणे वागायचे. ही गोष्ट कोणत्याही अर्थाने शहाणपणाची ठरत नाही. जीर्ण झालेल्या ग्रंथांच्या पानांवर श्रद्धा ठेवणारी माणसे बौद्धिकदृष्ट्या अपंग असतात. जुन्या ग्रंथांच्या कुबड्या काखेत घेतल्याशिवाय त्यांना चालताच येत नाही. अशा लोकांच्या बुद्धीत आणि पायात बळ आले पाहिजे या विचाराने लोकहितवादींनी ग्रंथप्रामाण्याला विरोध केला आहे. मनू, याज्ञवल्क्य आणि मागील काळात होऊन गेलेले स्मृतिकार, ग्रंथकार, आचार्य हे त्या विशिष्ट काळाच्या चौकटीत विद्वान म्हणून गणले गेले असतील. पण काळ धावत असतो. परिस्थिती बदलत असते. नवनवीन वातावरण तयार होत असते. अशा वेळी आचारविचारांतही अपरिहार्यपणे बदल करावे लागतात. जुनाट झालेल्या ग्रंथांचे आधार छातीशी कवटाळून ठेवण्यात कोणते औचित्य आहे? सकाळी सूर्य पूर्वेकडे होता म्हणून छत्री त्या दिशेने मस्तकावर धरली हे योग्य आहे. पण तो पश्चिमेकडे गेल्यानंतर छत्रीचीही दिशा बदलणे आवश्यक असते. पण बहुसंख्य लोक प्राचीन ग्रंथांचे दाखले देत बसतात. याचा अर्थ स्वतंत्रपणे विचार करण्याची बुद्धी त्यांच्यापाशी नसते. ते नेहमी एखाद्या व्यक्तीवर किंवा भूतकाळातल्या ग्रंथांवर अवलंबून राहातात. मनुस्मृतीचा अंमल हिंदू समाजावर कित्येक शतके चालू आहे. तो एक आदरणीय आणि अनुकरणीय ग्रंथ मानला जातो. पण ग्रंथातील कित्येक विचार तर्कदुष्ट आणि समाजातल्या काही स्तरांवर अन्याय करणारे आहेत. तरीही हे ग्रंथ पूज्य मानणारी भोळसट प्रवृत्ती कित्येकांच्या ठायी रुजलेली आहे. शूद्र आणि स्त्री या समाजघटकांवर मनुस्मृतीने विलक्षण अन्याय करून त्यांना उपेक्षित ठरवले. त्यामुळे अनेक विचारवंतांनी या ग्रंथावर टीका करून तो ग्रंथ प्रमाण मानू नये असे सांगितले. डॉ. आंबेडकर यांनी तर या 'स्मृतीची' जाहीरपणे होळी करून आपला निषेध व्यक्त केला. मनूच्या विचारसरणीला अनेक बंधने पडलेली होती. हे उघड झाल्यावरही मनूचे वचन शिरोधार्य मानणाऱ्या लोकांच्या बुद्धीची कीव येते. लोकहितवादींनी तर मनू, याज्ञवल्क्य फार काय ब्रह्मदेवालाही बाजूला सारावे आणि आपल्या बुद्धीचा कौल घ्यावा असे स्पष्टपणे प्रतिपादन केले आहे. जे बुद्धीला पटेल तेच स्वीकारावे आणि जे बुद्धिविरोधी असेल ते पूर्णपणे नाकारावे हा

संदेश ते देतात. बुद्धी हीच बलवती असते. धर्मशास्त्रातले शब्द शाश्वत नसतात. हे लक्षात घेऊन धर्मशास्त्राचे बंधन विचारपूर्वक झुगारून देण्याची भूमिका यात स्पष्ट झाली आहे. बुद्धिवादाची पहिली प्रभावी साद महाराष्ट्राला घालण्याचे हे रचनात्मक कार्य लोकहितवादींनी केले. त्यानंतर आगरकर, म. फुले, सावरकर इत्यादी समाजसुधारकांनी बुद्धिवादाची शिकवण समाजाला दिली.

कोणतेही शास्त्रवचन अंतिम नसते. कारण ते मनुष्यानेच तयार केलेले असते. आमचे धर्मग्रंथ प्रत्यक्ष ईश्वराने तयार केलेले असल्यामुळे ते परिपूर्ण आहेत अशी दृढ श्रद्धा ठेवणारे आज असंख्य लोक आहेत. श्रद्धेला तर्कविचारांचा आधार असला पाहिजे. प्रत्येक धर्मग्रंथ परस्परांशी सुसंवादी असत नाही. त्यात भिन्न भिन्न दृष्टिकोन असतात. ईश्वर असे परस्परांशी विसंवादी असलेले ग्रंथ कसे निर्माण करील ? ईश्वराचे अस्तित्वदेखील कित्येकांनी शंकास्पद मानले आहे. आधुनिक समाजसुधारकांत आगरकर, सावरकर आणि डॉ. आंबेडकर यांनी ईश्वर गृहीत धरलेला नाही. आपले धर्मग्रंथ ईश्वरानेच निर्माण केले हे विधान अंधश्रद्धेच्या पायावर उभे आहे. प्रत्येक ग्रंथाचा कर्ता माणूसच असतो. आपल्या ग्रंथाला महत्त्व यावे म्हणून ईश्वरी आज्ञेचे वलय तो त्याभोवती निर्माण करतो. लोकहितवादी म्हणतात,

‘शब्दप्रमाण कोठे कोठे मानू ? जेथे विचार व युक्ती बसत नाही तेथे मानणार नाही. याप्रमाणेच शास्त्री-पंडितांचे वाद आहेत. भलतेच आकाशाचे टोक पाताळास मेळवितात आणि म्हणतात की ‘आम्ही मोठी कोटी केली’ परंतु विचार केला तर केवळ मूर्खपणा होय. शास्त्र म्हणजे लोकांस सुख होण्याकरिता रीती घातली आहे. त्यातून जर विपरीत काही असेल तर एकीकडे ठेवल्यास चिंता काय ? (शतपत्रे, पत्र. क्र. १०४)

शास्त्र हे कायदे आहेत. ते प्रगतीला प्रतिबंधक ठरू लागले तर ते सोडून दुसरे करण्यास काहीही प्रत्यवाय नाही हा विचार मांडून जुनी शास्त्रे आणि पुराणे यांच्याभोवती असलेले दैवी वलय बुद्धिवादी कठोरतेने लोकहितवादींनी काढून घेतले. ही वैचारिक बंडखोरी समाजमनाच्या नव्या उभारणीसाठी आवश्यकच होती. त्यांनी म्हटले आहे, ‘युगपरत्वेकरून शास्त्रही फिरले असे समजले पाहिजे. चांगली व्यवस्था होईल तो नियम करावा आणि जे पूर्वी शास्त्र लिहिले तेच सर्वकाळ चालले पाहिजे असे म्हणणे मूर्खपणा आहे.’

सामाजिक सुधारणांच्या बाबतीत हिंदुस्थान मागासलेला राहिला याचे कारण स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याची लोकांची शक्ती खुंटून गेलेली होती. शतकानुशतके पोथ्या-पुराणांभोवती प्रदक्षिणा घालण्यातच संतुष्ट राहिलेले लोक नव्या क्षितिजांकडे पाहू शकत नव्हते. पोथ्या-पुराणाबद्दल कोणी अविश्वास दाखवला तर त्याची हेटाळणी होत असे. त्याचा मानसिक छळही केला जात असे. ही प्रवृत्ती केवळ आपल्याच देशात होती असे नव्हे. ती युरोपातही होती ‘सूर्याभोवती पृथ्वी फिरते’ हे शास्त्रीय सत्य सांगणाऱ्या गॅलिलियो, कोपर्निकस वगैरे संशोधकांचा तत्कालीन जनतेने अमानुष छळ केला. ‘बायबल’मध्ये जर ‘सूर्य पृथ्वीभोवती फिरतो’ असे म्हटले असेल तर तेच प्रमाण मानले पाहिले असा दंडक एकेकाळी पाश्चात्त्य जगातही होता. पण पुढे हे शास्त्रप्रामाण्य युरोपाने झुगारून दिले आणि स्वतंत्र संशोधन सुरू केले. त्यामुळे युरोपीयांची सर्वांगीण प्रगती झाली हा इतिहास आहे. बुद्धिवाद आणि प्रयोगशीलता यावर लोकहितवादींनी भर दिला. आगरकरांनीही ग्रंथप्रामाण्यावर टीका करताना म्हटले आहे, ‘आज कित्येक शतके तेल्याच्या बैलाप्रमाणे आम्ही जुन्या शास्त्रांच्या आणि पुराणांच्या घाण्याभोवती घिरट्या घालीत आहोत. हे आमचे परिभ्रमण केव्हा संपेल ते संपो.’

अनुक्रमणिका

एक प्रश्न विचारला जातो. 'भाकरी कशाने करपली? घोडा का अडला ? आणि पाने का सडली ?' या तिन्ही प्रश्नांचे उत्तर 'न फिरवल्यामुळे' हेच आहे. तव्यावरच्या भाकरीला मधून मधून फिरवले तर ती सर्व बाजूंनी शेकली जाते. घोडा एकाच जागी ठाणबंद करून ठेवला तर तो धावू शकत नाही. मधून मधून अडतो. त्याचप्रमाणे खाण्याची पाने दररोज पुसुन ठेवली पाहिजेत. परिवर्तनाच्या मागे हीच विचारसरणी आहे. कोणे एक काळी लिहिल्या गेलेल्या ग्रंथावर पिढ्यान्‌पिढ्या अवलंबून राहाणे यात विचारशून्यता आहे. लोकहितवादींना नवसमाजनिर्मितीसाठी नवे चिंतन, नवी विचारधारा, नवे ग्रंथ निर्माण व्हावेत असे वाटते. जुन्या ग्रंथांची उपयोगिता केव्हाच संपलेली असते. नव्या परिस्थितीत असे ग्रंथ उपद्रवी ठरतात. प्रगतीची वाट त्यांच्यामुळे कुंठित होते. म्हणूनच ग्रंथप्रामाण्यावर त्यांना हल्ला चढवावा लागला. एकोणिसाव्या शतकात आणि पुढेही शब्दप्रामाण्याच्या विरुद्ध मराठी साहित्यात बंडाची एक प्रचंड आरोळी उमटलेली दिसते. केशवसुतांच्या कवितांत, हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत आणि कित्येक निबंधकारांच्या लेखनात ती आढळते. पण तिचे मूळ लोकहितवादींच्या क्रांतदर्शी 'शतपत्रां'त आढळते. बुद्धिवादी विचारांचा मराठी साहित्यातला उद्‌गाता म्हणून लोकहितवादींचा उल्लेख कराव लागतो.

## ज्ञानात नवी भर नाही

इंग्रजी विद्या, इंग्रजी विद्येतून प्रकट होणारी ऐहिक जीवनाची आवड, स्वातंत्र्यप्रेम, राष्ट्रभक्ती इत्यादींविषयी लोकहितवादींनी गौरवाने लिहिले आहे. इंग्रजी ज्ञानविज्ञानाचा सतत पुरस्कार लोकहितवादींनी केला. आपली पारंपारिक संस्कृत विद्या ही आता गतार्थ झाली असे सांगून इंग्रजी विद्येची त्यांनीं स्तुती केली आहे. आपल्या लेखात ते म्हणतात,

'माझे म्हणणे असे नाही की, केवळ इंग्रजी लिहितात आणि बोलतात ते विद्वान असे मी म्हणत नाही. कारण की, जे कुलकर्णी असतात ते लिहितात. त्यांस पंडित कोणी म्हणावे ? तसेच जे केवळ 'रायटर'च आहेत त्यास विद्वान म्हणणे अयोग्य आहे. ज्यांनी विद्येचे रहस्य जाणले आहे व बहुश्रुत आहेत, त्यांचा मात्र पक्ष आम्ही घेतो आणि आम्हांस ठाऊक आहे की, एक इंग्रजीतील विद्वान आणि शंभर संस्कृतातील पंडित आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखे कदाचित होणार नाहीत. ज्याने चार शास्त्रे अध्ययन केली आहेत त्याचीदेखील योग्यता इंग्रजीतील पंडितांशी बरोबर नाही. कारण की, मुळी आधी संस्कृत भाषेत ग्रंथ आहेत किती ? ग्रंथाचे संख्येवरून विद्येची तुलना होते हा नेम आहे. इंग्रजीमध्ये तर कोट्यवधी ग्रंथ आहेत. त्यांत अनेक विद्या आहेत. तितक्या संस्कृतात नाही. इंग्रजी विद्वान पूर्वी हिंदुस्थानात एक असता तर राज्य न जाते. हे भट, कारकून असे मूर्ख जमा झाले म्हणूनच हे राज्य बुडाले. इंग्रजी विद्या वृद्धिंगत झाली म्हणजे हिंदुलोक पूर्व स्थितीवर येण्यास उशीर नाही.' (शतपत्रे पत्र क्र.३१)

इंग्रजी विद्येचा पुरस्कार करताना लोकहितवादींच्या मनात विचार होता की, आपल्या जुन्या विद्या निरुपयोगी झाल्या आहेत आणि कोणीही ज्ञानाच्या क्षेत्रात नवी भर टाकली नाही, नवे संशोधन केले नाही. जीर्ण झालेल्या ग्रंथांचे केवळ देव्हारे माजवले आणि त्यातच जगातले यच्चयावत् ज्ञान ठेचून भरले आहे असा भ्रम बाळगला. त्यामुळे ज्ञानसाधना खुंटली. एकदा ज्ञानाची आराधना थांबली की मग सामाजिक अधःपाताला सुरुवात होते. हिंदू समाजात सहजीवनाला मार्गदर्शक होतील असे ग्रंथ फारसे नव्हते. थोडेफार संस्कृतात होते. ते मूठभर लोकांनादेखील कळत नव्हते. जीवनाला स्पष्ट दिशा दाखवणारे आणि ऐहिक विद्येचा प्रचार करणारे ग्रंथ जवळ जवळ झालेच नाहीत. मध्ययुगात सबंध जीवनभर निवृत्तिवाद आणि परमार्थवाद यांची सावली पडलेली होती. यंत्रविद्या, तंत्रज्ञान, शेती आणि व्यापार यासंबंधीचे लेखन,

संशोधन झालेच नाही. ‘चतुर्वर्ग चिंतांमणी’सारखा ग्रंथ महत्‌त्वाचा मानला गेला. पण त्या ग्रंथात काय आहे? एका वर्षांत दोन हजार व्रते आणि वैकल्ये करण्याचा ‘धार्मिक’ उपदेश केला आहे. कर्मकांडाचे स्तोम माजवले आहे. वर्षाचे दिवस तीनशे पासष्ट आणि व्रते मात्र दोन हजार! या व्रतांचे पालन करताना शेती, उद्योग आणि व्यापार, शिक्षण यांकडे लक्ष जाणेसुद्धा कठीण. धार्मिक विचारांच्या सावटाखाली समाजजीवन करपून गेलेले होते. जो पुराण वाचतो आणि सांगतो तो विद्वान. जो पोकळ प्रवचन करतो तो पंडित. असे समीकरण बनलेले होते. पेशव्यांच्या दरबारात भटभिक्षुकांचे स्तोम अतोनात वाढले होते. मराठी रियासतीतूनच श्री. पाध्ये आणि टिकेकर यांनी उद्‌धृत केलेले अवतरण या संदर्भात पुरेसे आहे. श्रावणमासाच्या दक्षिणेसंबंधीचे हे वर्णन आहे.

“प्रथम दिवशी तीस हजार ब्राह्मण आले. दुसरे दिवशी छत्तीस हजार शिधा पावले. यंदा साठ हजारपर्यंत ब्राह्मण येईल अशी बोलवा आहे. गावातून रस्त्यात ब्राह्मणच ब्राह्मण दिसतात. गेल्या वर्षी दीड लक्ष दक्षणा होती. ती यंदा दुप्पट झाली. श्रीमंतांनी आपल्या हाते दोनशे, चारशे, बाराशे, चौदाशे, दोन हजारपर्यंत दक्षणा दिली. श्रीमंतांनी बसून मोहरा, होन, पुतळ्या, रुपये, मोती वगैरे मिळून खिचडी करून वाटली.” याचा अर्थ मुलुखगिरी करून मराठ्यांनी जी संपत्ती मिळवली होती ती बहुतांश ब्राह्मणांना दक्षिणा देण्यात दुसऱ्या बाजीरावाने खर्च केली. नाचगाण्यावरही त्याने द्रव उधळले. भटाभिक्षुकांचे लाड करणारे हे राज्य इंग्रजांनी जिंकले याबद्दल सर्वसामान्य माणसांना आनंदच वाटला होता. पण महत्त्वाचा मुद्दा असा की कोणतेही नवीन ज्ञान नसणाऱ्या कीर्तनकार आणि पुराणिकांना पंडित गणले जात होते. लोकहितवादींच्या या गोष्टीवर तीव्र आपेक्ष आहे. विद्वत्‌तेसंबंधीचा त्यांचा विचार जितका व्यापक तितकाच तर्कशुद्ध आहे. ब्राह्मणांच्या ठराविक कोत्या माहितीवर आधारलेल्या आकलनाला ते ज्ञान म्हणत नाहीत. दोन संस्कृत पुस्तके वाचली आणि चार शब्दांच्या विभक्ती सांगितल्या म्हणजे त्या काळात अशा ब्राह्मणाला महाविद्वान म्हटले जायचे. ‘विद्वान कोणास म्हणावे?’ या लेखात लोकहितवादींनी फार मार्मिक विचार व्यक्त केला आहे. ते म्हणतात,

‘आम्हास असे वाटते की, ज्यांची मने फार विस्तीर्ण झाली आहेत, ज्यांचे मनात अनेक कल्पनांचा संग्रह झाला आहे, ज्यांचे मनास संस्कार होऊन सर्व विषयांची थोडीफार माहिती झाली आहे. त्यासच विद्वान म्हणावे... केवळ इंग्रजी शाळेत जाऊन नक्कल करण्यास शिकला तर तो विद्वान नव्हे... या दृष्टीने पाहिले म्हणजे घोकणारे भट व लिहिणारे कारकून यांस कोठे स्थळ राहात नाही. सामान्यतः फक्त लिहिणे-वाचणे ही विद्या मुळीच नव्हे. हे केवळ कसब आहे. विद्येत हे मुळीच येत नाही. विद्या म्हणजे जेणेकरून मन मोठे होते, वाईट गुण जातात. शांती, निर्लोभ, साधुता इत्यादी गुण प्राप्त होतात. बारीकसारिक द्वेष, दुर्बुद्धी, लोभ व क्रोध हे जातात. जगाचा विस्तीर्ण व्यवहार व कारभार ज्यास समजतो तेच विद्वानात गणले पाहिजेत.’ (निबंधसंग्रह, पृ. ३९५)

इंग्रजी विद्येमुळे लोकहितवादी दिपून गेले आणि त्यामुळे त्यांनी आपल्या संस्कृत विद्येवर आणि पोथ्या-पुराणांतील माहितीवर प्रतिकूल टीका केली, असा एक आक्षेप घेतला जातो. येथे दिपून जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. इंग्रजी राज्यामुळे नवे विचार आणि नवी जीवनदृष्टी यांचा लाभ देशाला झाला हे लोकहितवादींचे म्हणणे वस्तुस्थितीवर आधारलेले आहे. इंग्रजी आणि संस्कृत विद्या यांची त्यांनी केलेली तुलना व त्यातून काढलेला निष्कर्ष बरोबर आहे. इंग्रजी विद्याच नव्हे तर इंग्रजी लोक कोठून आले? त्यांचा देश कोणता? याचीही माहिती बहुसंख्य लोकांना नव्हती. जुन्या पुराणातून लिहिलेल्या भाकडकथा माहीत असणे हेच ज्ञान होय. या भ्रांतीत हे लोक होते, ‘ब्राह्मणांना अजूनही वाटते की पृथ्वी शेषावर आहे. ग्रहणात

राहू चंद्रास ग्रासतो. हिंदुस्थानाएवढीच पृथ्वी. पलीकडे गतीच नाही. वेदांचा अर्थ करू नये. (पत्र क्रमांक ६२). अर्थात ही दीडशे वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. बुद्धिमान समजल्या जाणाऱ्या ब्राह्मणांच्या अज्ञानावर लोकहितवादी टीका करीत आहेत. आजही सुशिक्षित समजले जाणारे कित्येक लोक अंधश्रद्धेच्या वातावरणातच राहात असतात. त्यावेळची परिस्थिती अधिक अंधारलेली होती. ज्ञान म्हणजे काय हे लोकांना माहीत नाही याची उदाहरणे देताना त्यांनी इंग्लंडातील थोरली सनद पार्लमेंट फराशीस यांची राज्यक्रांती, रूसचे राज्याचा नाश, अमेरिका खंडात युरोपियन लोकांची वस्ती, लोकसत्तात्मक राज्य या शब्दांचा अर्थही बहुत हिंदू मनुष्यास ठाऊक नसेल असे त्यांनी नमूद केले आहे. लोकहितवादींच्या नाट्यपूर्ण शब्दांत सांगायचे तर 'पुराणिक एक पोथी सोडून बसला म्हणजे सर्व आनंदाने डोलतात व रावणास दहा डोकी, सहस्रार्जुनास हजार हात, दुधाचा समुद्र, दह्याचा समुद्र इत्यादी गोष्टी ऐकल्या की बायका फार खूष होतात व पुरुष म्हणतात, आम्ही आज फार मोठे ज्ञान संपादन केले. हे पहिले जुने लोक आहेत ते शुद्ध बैल आहेत. त्यांस खाण्यापिण्याचे मात्र ज्ञान आहे व ते जनावरांसारखे कर्म करतात.'

'सांप्रतचे पंडितांचे ज्ञान' या 'शतपत्रां'तील लेखात तथाकथित ज्ञानी पंडितांवर लोकहितवादींनी कठोर टीकास्त्र सोडले आहे. त्यांच्या मते सध्याच्या पंडितांचे ज्ञान कोणत्याही अर्थाने उपयुक्त नाही. केवळ वादविवाद करावा आणि लोकांना तमाशा दाखवावा एवढाच त्यांचा उपयोग आहे. बारा-पंधरा वर्षे व्याकरणाचे किंवा न्यायाचे अध्ययन करणे यातच त्यांचा पंडितपणा दिसतो. पण या विद्येचा प्रपंचाला किंवा शरीराला अथवा जीवनाला काहीही उपयोग नाही. यावर शेरा मारताना आपल्या उपहासप्रचुर शैलीत ते म्हणतात,

'मला हे पंडित बहुरूपी, सोंगाडी व चित्रकथी याहून बरे दिसत नाहीत... बाजीराव पेशव्याने पुण्यात ब्राह्मणांचे मनोरथाप्रमाणे दाने केली व बहुत शास्त्रीपंडित जवळ बाळगले. परंतु त्यांनी त्यांस सत्कर्मास किंवा आपले राज्य रक्षिण्यास किंवा नीतीने चालविण्यास समजूत दिली नाही... यास्तव हे पंडित जरी पुष्कळ पढलेले असले तरी ते मूर्ख समजावेत. कारण की लोकहितकारक ज्ञान त्यांस नाही. त्यांचे ज्ञान भाटांचे व तमासगिरांचे बोलण्याप्रमाणे आहे.'

ही टीका अत्यंत परखड आणि फटकळपणाची असली तरी ती वस्तुस्थितीला धरून आहे. जे ज्ञान समाजजीवनाला दिशा देऊ शकत नाही. त्या ज्ञानाला केवळ निरर्थक समजणेच योग्य आहे. ज्ञान असे असावे की त्याने समाजाच्या समस्यांची सोडवणूक करावी. ते प्रगतीला कारण व्हावे. व्याकरणासारखे शास्त्र वर्षानुवर्षे शिकायचे किंवा वेदांचे पठनपाठन करण्यात आयुष्य घालवायचे याने काय साधणार ? हा लोकहितवादींचा प्रश्न महत्त्वाचा आहे. ज्ञान आणि जीवन यांचा संबंध तुटला तर त्या ज्ञानाला काहीही मोल उरत नाही. पाठांतरालाच विद्या समजण्याची घोडचूक आपल्याकडे पिढ्यान्‌पिढ्या झालेली आहे. मंत्रपठण करणाऱ्याला मंत्राचा अर्थ माहीत नसतो. वेदविद्यापारंगत पंडिताला ऋचा पाठ असतात पण त्यांचा अर्थ विचारला तर 'वेदांचा अर्थ विचारू नये. वेद जिभेवर असणे हेच ज्ञानाचे लक्षण आहे' असे तो म्हणतो. या अर्थशून्य पाठांतर करण्याच्या पद्धतीला लोकहितवादींनी विरोध केला आहे. ज्ञान मिळवण्याच्या क्रियेमधला पाठांतर हा एक गौण भाग असतो. शास्त्राचा किंवा कोणत्याही विद्येचा अर्थ पूर्णपणे जाणल्याशिवाय ज्ञानाचे ग्रहण होऊच शकत नाही. जुन्या संस्कृत विद्येवर लोकहितवादींनी टीका केली याची ही सबळ कारणे आहेत.

अनुक्रमणिका

शास्त्री-पंडितांवर आणि भट-ब्राह्मणांवर टीका करण्यात लोकहितवादींचा एक हेतू होता. स्वतःला ज्ञानमार्गी म्हणवून घेणारा हा वर्ग पोथ्या-पुराणांतला नीरस चोथा अनेक शतके चघळत बसला. मात्र त्यातून कसलीही रसनिष्पत्ती होऊ शकत नाही हे त्यांच्या ध्यानातच आले नाही. ज्ञानाचा स्पर्श अग्नीसारखा दाहक असतो. अज्ञानाला भस्मसात करून बुद्धीला उज्ज्वलता देण्याचा धर्म ज्ञानात असतो. अनेक प्रकारचे भ्रममूलक अपसमज पोथ्या-पुराणांनी लोकांच्या डोक्यात भरवून दिले. या पोथ्यांच्या पानांपलीकडे ज्ञान नाही ही समजूत दृढमूल झाली. त्यामुळेच आपल्या देशात शास्त्रांची वाढ होऊ शकली नाही. या बाबतीत पाश्चात्त्य देशांनी वेगाने प्रगती केली. अनेक प्रकारचे शास्त्रीय शोध पाश्चात्त्यांनी लावले. याचे कारण ‘बुद्धिरेव बलीयसी’ हे तत्त्व त्यांनी आत्मसात केले. पंधराव्या शतकापासूनच युरोपमध्ये वैचारिक क्रांतीला सुरूवात झाली होती. जुन्या धर्मकल्पनांचा प्रभाव ओसरून गेला आणि मग उद्योग, व्यापार, यंत्रोत्पादन वगैरे क्षेत्रात नवी भर पडू लागली. दुचाकीपासून विमानापर्यंतचे सर्व शोध पाश्चात्त्यांनी लावले. आपल्याकडे मात्र प्राचीन काळापासून बैलगाडी होती ती कायम राहिली. नवनवीन संशोधन करण्याची प्रवृत्ती हीच ज्ञानाची जननी असते. पण हे युरोपात घडले. भारतातला स्वतःला ज्ञानाचा ठेकेदार समजणारा जो वर्ग होत तो ‘एष धर्मः सनातनः’ असे म्हणून निवांतपणे घोरत होता. एखादा देश सुमारे पंधरा-वीस शतके अज्ञानाची झोप घेत पडावा हे दृश्य केवळ हिंदुस्थानातच दिसले. युरोपातल्या प्रत्येक देशाने नवजीवनाच्या चळवळीत हिरिरीने उडी घेतली होती. जपानसारखा चिमुकला देश कितीतरी पुढे गेला. इंग्लंड तर भारताच्या तुलनेत फारच लहानसे राष्ट्र आहे पण याच इंग्लंडच्या लोकांनी आपला अवाढव्य देश ज्ञानाच्या बळावर जिंकून घेतला. आणि त्यावर दीडशे वर्षे राज्य केले. विज्ञानशास्त्राची उपासना आपल्याकडे झालीच नाही. याची कारणे शोधताना येथील लोकांच्या मनावर दैववाद आणि निवृत्तिवाद यांचा सखोल प्रभाव होता. आज एकविसाव्या शतकातही तो जाणवत राहावा इतका प्रबल आहे. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात लोकहितवादींना हिंदी जनतेच्या जीवनाचे जे चित्र दिसले ते त्यांनी स्पष्टपणे आणि विदारकपणे ‘शतपत्रां’तून मांडले आहे. जसे चित्र होते तसे त्यांनी रेखाटले. कुठेही आपल्या मनाचे काल्पनिक रंग त्यांनी वापरले नाहीत. एखाद्या छायाचित्रकाराने व्यक्तीचे किंवा दृश्याचे समीप-चित्र (Close-up) घ्यावे त्याप्रमाणे ‘शतपत्रे’ हे ‘वास्तवदर्शन’ आहे. अधोगतीला गेलेल्या, अज्ञानाच्या खाचखळग्यांत राहिलेल्या, जात आणि वर्ण, श्रेष्ठ-कनिष्ठ भाव असल्या भ्रांतीत राहाणाऱ्या एका देशाचे हे केविलवाणे चित्र आहे. ते पाहाताना कोणाही वाचकाला दुःख होते. चीड येते. मनाची प्रक्षुब्धता जाणवते. हेच ‘शतपत्रां’चे बळ आहे. यश आहे. लोकहितवादींच्या विचारांचा प्रमुख भर ज्ञानोपासनेवर आहे. ‘शतपत्रां’त ‘ज्ञान हाच पराक्रम’ या शीर्षकाचा एक लेख आहे आणि प्रत्येक लेखात ज्ञानाच्या महतीचे वर्णन आहे. ज्ञानातूनच क्रांती होते. हे त्यांनी पाहिलेले आहे. फ्रान्समध्ये झालेल्या राज्यक्रांतीच्या मुळाशी नवीन विचारांचे जबरदस्त सामर्थ्य कसे उभे होते त्यांनी अभ्यासिले. रुसो, व्हॉल्टेअर इत्यादी विचारवंतांनी अन्यायाच्या विरुद्ध लढण्याची जी ज्ञानात्मक प्रेरणा दिली त्यातून फ्रान्समध्ये क्रांतिपर्व सुरू झाले. सर्व क्रांतींच्या मुळाशी विचारशक्ती असते. विचारांची निपज ज्ञानातून होते. लोकहितवादींनी पाश्चात्त्य विद्या आणि जीवनदृष्टी यातून घेतलेले विचार समाजात पेरण्याचा फार मोठा प्रयत्न केला. पेरण्यासाठी प्रथम जमीन चांगली उपजाऊ असली पाहिजे. तीच नसल्यामुळे ही जमीन त्यांना प्रथम मेहनतीने समपातळीवर आणावी लागली. अज्ञान, अहंकार, आळस, विकृत धर्मकल्पना यांचे तण जमिनीत माजलेले होते. ते आपल्या बलिष्ठ लेखणीच्या नांगराने उपटून काढावे लागले. नांगरणी झाल्यावर वैचारिक पेरणी करावी लागते. महाराष्ट्रातल्या सर्वच समाजसुधारकांनी हे काम केले. भारतातल्या इतर प्रांतांच्या तुलनेत महाराष्ट्र वैचारिकदृष्ट्या प्रगत झालेला दिसतो. याचे कारण हे सर्व समाजमनाची शेती करणारे प्रयत्नवादी शेतकरी आहेत. लोकहितवादींनी परमार्थवादी विचारांकडून ऐहिकवादी विचारांकडे महाराष्ट्राचे लक्ष

अनुक्रमणिका

प्रथमच वळवण्याचा जो प्रयास केला त्याची साक्ष या 'शतपत्रां'तून पटते. त्यांनी केलेली फटकळ टीका समर्थनीय आहे. ते म्हणतात,

'ब्राह्मण लोक व मराठे लोक यांनी शंभर-दीडशे वर्षे राज्य केले. त्याकाळी इंग्रज व मुसलमान हे लोक हिंदुस्थानात होते. परंतु त्यांजविषयी कोणी शोध किंवा पुस्तक केले नाही. ब्राह्मण लोकांनी फक्त जेवणाचे पदार्थ नवे काय काय होतील व रेशमी व भरगच्ची पोषाख अंगावर कुत्री भोकावयाजोगे काय काय तयार होतील यांचा विचार करण्यात मात्र वेळ घालविला. काही विद्येपासून हित, मनाची सुधारणा व राज्याचा बंदोबस्त केला नाही हे उघड आहे.' त्या ब्राह्मणांचा हा मूर्खपणा आहे. (शतपत्रे, पत्र क्र. १७.)

प्रस्तुत उताऱ्यात लेखकाच्या अस्वस्थ मनाचे कढ प्रकट झाले आहेत. हे लेखन ज्या कालखंडात झाले तो काळ परिस्थिती आणि लोकांची उदासीनता, ब्राह्मणांचे अज्ञान व बढाई या सर्व गोष्टींशी लोकहितवादींचा जवळून संबंध आला होता. ते स्वतः ब्राह्मण होते आणि त्यांचे वडील पेशव्यांचे सरदार होते. त्यामुळेच पेशवाइतील भोंगळ राज्यकारभार, ख्यालीखुशाली, बेजबाबदारपणा आणि जातीय अहंकार व सत्तेचा मस्तवालपणा या सर्व गोष्टींची त्यांना जाण होती. म्हणूनच ब्राह्मणांवर केलेली त्यांची टीका कडवट आहे. तिचे मूळ ज्ञाननिष्ठ प्रवृत्तीतच आहे. जे घडायला हवे होते ते पेशवाईत 'नालायक' राज्यकर्त्यांमुळे घडले नाही याचा रोष लोकहितवादींच्या मनात होता.

'शतपत्रे' या वैशिष्ट्यसंपन्न ग्रंथाचे कित्येक चांगले पैलू आहेत. पण दुर्दैवाने 'शतपत्रे' आणि त्यांचे लेखक लोकहितवादी यांची महाराष्ट्रात दीर्घकाळ उपेक्षा झाली. प्रा. गं. बा. सरदार यांनी 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' हे पुस्तक लिहिले आहे. त्यात लोकहितवादीसंबंधी त्यांचा लेख आहे. लोकहितवादींची उपेक्षा का झाली याच्या कारणांची मीमांसा या पुस्तकात येणारच आहे. पण त्यांच्या कालखंडात वाचकवर्ग हा प्राधान्याने मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजातला होता. त्यांत अधिकांशाने ब्राह्मणच होते. आपल्या वर्गावर प्रखर टीका करणारा हा ग्रंथ त्यांनी बाजूला सारला. ज्या 'प्रभाकर' पत्रातून 'शतपत्रे' प्रसिद्ध झाली ते पत्र मुंबईत प्रकाशित व्हायचे. पुण्यात त्याचा प्रसार अल्प प्रमाणात होता. त्यातून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आणि पुण्यातील ब्राह्मणांनी लोकहितवादींवर निंदा-नालस्ती, निषेध यांचे प्रहार केले. पण 'शतपत्रां'चे सामर्थ्य लपून राहाणे शक्य नव्हते. काही वर्षे ही पत्रे अंधारात राहिली. पण पुढे मात्र या लेखनाने महाराष्ट्रात अभूतपूर्व खळबळ उडवून दिली. आज दीड शतकांनंतरही लोकहितवादींवर तुटून पडणारा एक वर्ग आहे. या ग्रंथातून सडलेल्या आणि किडलेल्या हिंदू समाजाच्या मानसिकतेचे व त्याच्या अन्याय्य, अज्ञानी प्रवृत्तींचे झगझगीत दर्शन घडते. 'शतपत्रे' हा हिंदू समाजासमोर धरलेला एक आरसा आहे. संस्कृतीचे विद्रूप प्रतिबिंब या आरशात पाहायला मिळते. आपल्या विरूपतेचे सत्यदर्शन आणि कथन कोणी केले तर ते आपल्याला अप्रिय आणि अवास्तव वाटावे हे स्वाभाविकच आहे.

### स्त्रीवर होणाऱ्या अन्यायावर प्रहार

सामाजिक सुधारणा व स्त्रीविषयक प्रश्न यांचा संबंध अत्यंत जवळचा आहे. अनेक प्रकारच्या अनिष्ट, जाचक रूढींच्या साखळदंडात भारतीय स्त्री शतकानुशतके अडकून पडली होती. आजही तिची त्यातून पूर्णांशाने सुटका झाली आहे, असे विधान करता येत नाही. आपल्या धर्मकल्पनांनी अस्पृश्यांना ज्याप्रमाणे कित्येक शतके मानवी अधिकारापासून वंचित करण्यात आले होते तशीच अवस्था स्त्रीच्या संदर्भात झाली होती. लोकहितवादी यांनी स्त्रीवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांना आपल्या लेखनातून प्रथम

तोंड फोडले. स्त्री प्रश्नाकडे त्यांनी केवळ सहानुभूतीने पाहिलेले नाही. दयाबुद्धीने या प्रश्नांचा त्यांनी विचार केलेला नाही. भूतदया आणि अनुकंपा यामुळे सामाजिक प्रश्न सुटत नसतात. न्यायाच्या बुद्धीने लोकहितवादींनी स्त्रीच्या जीवनातल्या अनेक गुंतागुंतीने समस्या स्पष्ट करून त्या सोडवण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही अर्थाने स्त्रीला त्यांनी समाजाचा दुय्यम घटक मानलेले नाही. स्त्री आणि पुरूष दोघांनाही एकाच न्यायाच्या तराजूत तोलले पाहिजे कारण ते दोघेही समान भूमिकेवर उभे आहेत हे मत त्यांनी मांडले आहे. म. फुले, आगरकर यांनीही हीच न्याय्य भूमिका स्वीकारून स्त्रीजीवनाला स्वतंत्रतेच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला. ज्या समाजात स्त्रीला स्वातंत्र्य नसते; स्त्री अवमानिली जाते ते समाज संस्कृतीच्या खालच्या पायरीवर उभा आहे असेच म्हटले पाहिजे. एखाद्या देशाच्या प्रगतीची मोजणी करताना त्या देशात स्त्रीची अवस्था काय आहे; ती स्वतंत्रपणाने जगू शकते का; दैनंदिन व्यवहारात तिला सामाजिक प्रतिष्ठा आहे काय ? हेच निकष प्रामुख्याने डोळ्यांसमोर असतात. जिथे स्त्रीला घराच्या चार भिंतीतच कुचंबून राहावे लागते तिथे तिच्या बौद्धिक वाढीला आणि स्वातंत्र्य भावनेला फारसा अवसर नसतो. कालिदासाच्या 'रघुवंशा'त स्त्रीला गृहिणी, सचिव, सखी, प्रिय शिष्या इत्यादी कित्येक विशेषणे अज राजाने दिली आहेत. पण हे वर्णन काल्पनिक वाटावे अशीच परिस्थिती भारतात होती आणि आजही बऱ्याच प्रमाणात आहे. स्त्री-स्वातंत्र्याचा व स्त्री-गौरवाचा कालखंड एकेकाळी आपल्या देशात होता, असे सांगितले जाते. पण गेल्या काही शतकांचा इतिहास चाळून पाहिला तर त्यात भिन्न भिन्न क्षेत्रांत किती कर्तबगार स्त्रिया निर्माण झाल्या याची मोजदाद करताना हाताची बोटेदेखील संपणार नाहीत असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. सर्व प्रकारच्या अडवणुकीतूनही काही मोजक्या स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले ही अभिमानाची गोष्ट आहे. एकोणिसाव्या शतकात सावित्रीबाई फुले यांचा उल्लेख करता येतो. त्याबरोबरच पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, लक्ष्मीबाई टिळक इत्यादी काही नावे समोर येतात. पण त्या शतकात आणि त्यापूर्वीच्या काळात स्त्री हा उपेक्षेचा एक विषय इतकेच तिला मूल्य होते, हे सत्य मान्य केलेच पाहिजे.

## स्त्री : देवता? नव्हे माणूस!

लोकहितवादींच्या पूर्वी न्यायदृष्टीने स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार करून स्त्रीची दुःखे वेशीवर मांडणारा दुसरा लेखक आणि समाजसुधारक मराठी साहित्यात झाला नाही. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाची स्त्रीच्या बाबतीत सर्वार्थाने गळचेपी झाली. मराठी कादंबरीतून बाबा पदमनजी यांनी स्त्रीच्या दुः खाचे आणि पारतंत्र्याचे 'प्रथम' चित्र रेखाटले. त्यांनीच आपल्या आत्मचरित्रात लोकहितवादींच्या 'शतपत्रा'चा आपल्यावर परिणाम झाल्याचा उल्लेख केला आहे. त्यानंतर हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरीत स्त्रीच्या दुःखाचे यथार्थ दर्शन घडले. त्यांच्या 'पण लक्ष्यात कोण घेतो?' या कादंबरीची नायिका म्हणते,

'आम्ही म्हणजे गोठ्यात बांधलेली मुकी जनावरे.' फुले आणि आगरकर यांच्याही साहित्यात स्त्रीवर होणाऱ्या अमानुष अन्यायाने वर्णन आहे. स्त्री आणि पुरुष मिळून समाज घडतो. पण समाजातल्या पन्नास टक्के व्यक्तींना मानवी अधिकार नसणे ही समाजाचीच शोकांतिका आहे. 'मनुस्मृती' हा ग्रंथ एकेकाळी वंदनीय आणि आदर्श मानला जात होता. त्यात स्त्री आणि शूद्र यांना गुलामगिरीत ठेवावे असे समर्थन केले आहे. विषमतेची उघड उघड बाजू घेणारा आणि समता नाकारणारा मनू नावाचा ग्रंथकार विद्वान कसा मानायचा ? जी विद्वत्ता एकाला स्वातंत्र्य देते आणि दुसऱ्याला गुलामगिरीत ढकलून देते ती विद्वत्ता कलंकभूतच म्हणावी लागेल. 'मनुस्मृती'चे पुरस्कर्ते मनूने स्त्रीला देवतेच्या पातळीवर बसविले आहे असे सांगून स्मृतीतल्या एका वचनाचा उल्लेख करतात. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।' पण हा श्लोक फसवा आहे. देवतेने मंदिरातून बाहेर पडायचे नसते. त्यामुळे तिचे पावित्र्य नष्ट होईल. मंदिरातच तिने

बंदिस्त राहावे अशी ही व्यवस्था आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' स्त्री ही स्वातंत्र्याला योग्य नाही, असे याच आचार्यांने म्हटले आहे. रामायण-महाभारतातही स्त्रीच्या पारतंत्र्याचा विचार आलेला आहे. एखादा धर्मराज द्यूत खेळताना आपली पत्नी पणाला लावू शकतो. याचा अर्थ स्त्री ही पतीची खाजगी मलामत्ता असते. रामायणातही आपल्या पावित्र्याची ग्वाही देण्यासाठी स्त्रीला अग्निदिव्य करावे लागते, हा प्रसंग आहे. भारतीय संस्कृतील स्त्रीचे स्थान उच्च प्रतीचे होते या विधानाला फारसे पुरावे देता येत नाहीत. प्रश्न १९ व्या शतकातल्या स्त्रीचा आहे. तिच्या दुर्दशेचे वर्णन आणि विश्लेषण लोकहितवादींनी सहृदयतेने पण तीव्र तळमळीने आणि जळजळीत शब्दांनी केले आहे.

सती जाण्याची अत्यंत दुष्ट आणि हीन प्रतीची रूढी एकेकाळी भारतात-हिंदुधर्मात आणि विशेषतः ब्राह्मणवर्गात-रुजली होती. 'शतपत्रे' लिहिताना ही निर्दय रूढी पुष्कळच ओसरून गेली होती. पण तिचे अस्तित्व कोठे कोठे जाणवत होते. या चालीवर त्यांनी प्रखर हल्ला चढवला. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय व ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी या अमानवी प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रात या प्रश्नावर आंतरिक तळमळीने लोकहितवादी लिहीत आणि बोलत होते. पतीचा मृत्यू झाल्यावर त्याच्या पत्नीने स्वतःला त्याच्या चितेवर जिवंत जाळून घ्यायचे आणि मरण पत्करायचे ही घटना मती गुंग करणारी आहे. तर्कशून्य, राक्षसी, माणुसकीची विटंबना करणारी इतकी अधम प्रतीची ही रूढी धर्माच्या नावाखाली चालू होती आणि हा धर्माचा न्याय समाजाने मुकाट्याने स्वीकारला होता. कुठल्यातरी निर्बुद्धपणाने लिहिलेल्या एखादा 'धार्मिक' समजल्या जाणाऱ्या चोपड्यात सती जाण्याचे समर्थन केलेले असेलही. पण ते हिंदू समाजाने 'धर्माज्ञा' म्हणून प्रमाण मानावे हे बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण नव्हे काय? काही वर्षांपूर्वी राजस्थानात रूपकुँवर नावाच्या एका सोळा-सतरा वर्षांच्या कोवळ्या पोरीला सती जावे लागले किंवा सती जाण्यासाठी तिला भाग पाडले गेले. याविरुद्ध गहजब झाला तेव्हा काही 'सनातनी आत्म्यांनी सती जाणे हे धर्मकृत्य आहे' असा मूर्खपणाचा युक्तिवाद केला होता. लोकही मेंढरासारखेच असतात. सतीचे देऊळ त्यांनी भक्तिभावाने बांधले आणि एका अर्थाने या दुष्ट, लाजिरवाण्या चालीचे उदात्तीकरण केले.

सती जाण्याच्या प्रथेला प्रतिष्ठा प्राप्त झाल्यामुळे ही अज्ञानी रूढी विशेष बळावली. या रूढीची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सक्ती स्त्रियांवर होत होती. घरातील लोकच विधवा झालेल्या स्त्रीला-मग ती कन्या असो, बहीण असो-तिने सती गेले पाहिजे असे मानीत असत. या सक्तीमुळेही स्त्रियांना पेटत्या चितेत प्रवेश करावा लागे आणि जमलेले लोक तिच्या नावाचा जयजयकार करीत असत. जिवंत निरपराध स्त्रीला या पद्धतीने जाळून टाकण्याची ही अमानुष चाल 'धर्म' म्हणून प्रतिष्ठित व्हावी आणि हे अज्ञान राज्यकर्त्यांनी, शास्त्री-पंडित इत्यादी ज्ञानी लोकांनी खपवून घ्यावे ही अन्यायाची परमावधी आहे. पेशवाईत ही चाल सर्रास सुरू असावी असे दिसते. माधवराव पेशव्यांची पत्नी माधवरावांच्या मृत्यूनंतर सती गेली. आपल्या मागे आपल्या पत्नीने सती जावे अशी इच्छा खुद्द पेशव्यांनीच व्यक्त केली होती. अहिल्याबाई होळकर यांनी पतिनिधनानंतर सती जाण्याची तयारी केली होती. पण सासरे मल्हारराव होळकर यांनी आर्जवे करून प्रतिबंध केला. त्यामुळे अहिल्याबाई सती गेल्या नाहीत असा उल्लेख इतिहासात आहे. इ. स. १८४० मध्ये रणजितसिंगाचा मृत्यू झाल्यावर त्याच्या चार राण्यांनी व सात कलावंतिणींनी सती जाण्याचे ठरवले व त्याप्रमाणे त्या सती गेल्या. असे लोकहितवादींनीच 'ऐतिहासिक गोष्टी' या आपल्या पुस्तकात म्हटले आहे. वस्तुतः इ. स. १८३३ मध्ये लॉर्ड बेंटिंकने सताबंदीचा कायदा केला होता. हा कायदा इंग्रजांनी काहीशा उशिराने केला. कारण 'सती जाणे' ही क्रिया आपल्या धर्माचा भाग आहे असे 'धार्मिक' लोकांचे म्हणणे होते. कोणाच्याही धर्मात हात घालायचा नाही ही इंग्रजांची नीती होती. प्रत्यक्षात या रूढीला सुरुवात कशी झाली हे सांगणे कठीण आहे. पेशवाईप्रमाणेच शिवकालातही ही प्रथा होती. महाराष्ट्रापेक्षा बंगालमध्ये ही रूढी

अनुक्रमणिका

अधिक रुजली होती, असे दिसते. इ. स. १८१७ ते १८२७ या दहा वर्षांच्या काळात दरवर्षी सरासरीने सहाशे बायका बंगालमध्ये सती गेल्या अशी माहिती ‘अर्वाचीन महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना’ या पुस्तकात डॉ.वाळिंबे यांनी दिली आहे. या दुष्ट रूढीसंबंधी पाश्चात्य लेखकांनीही अत्यंत प्रतिकूल मत व्यक्त केले आहे. ॲबे डुबाइस या प्रसिद्ध फ्रेंच अभ्यासकाने म्हटले आहे,

‘गाईसंबंधी सहानुभूती आणि भक्ती ठेवणाऱ्या धार्मिक ब्राह्मणांना कोवळ्या कोवळ्या निष्पाप मुली आगीत जळत असताना मात्र शांतपणे पहावेसे वाटत होते. त्यांचे रक्त हा देखावा पाहताना थंड राहायचे.’ सती जाण्याच्या क्रियेतली क्रूरता आणि भयानकपणा पाहून हा पाश्चात्त्य अभ्यासक हादरून गेला होता.

लोकहितवादींनी या भीषण प्रथेवर कळवळून आणि चिडून लिहिले आहे. त्यांनी हिंदू लोकांना खाटीक म्हटले आहे. हे विशेषणदेखील सौम्य वाटते. कारण खाटीक फक्त कोकराचा जीव घेतो. पण स्वतःला धार्मिक समजणारे हे लोक मात्र आपल्या लेकरांचा जीव घेत होते. निरपराध स्त्रीला जिवंत जाळणे याहून दुसरे अधमपणाचे कृत्य असू शकणार नाही. आश्चर्य म्हणजे लोक याला धर्म समजत होते. धर्माचा इतका अधार्मिक अर्थ आणि विपर्यास दुसरीकडे कोठे सापडेल असे वाटत नाही. न्याय आणि माणुसकी दोन्ही पातळ्यांवरून हा अत्याचार पूर्णपणे लाजिरवाणा होता असेच म्हणावे लागेल. आता सती जाण्याचा ‘धर्म’ इतिहासजमा झाला याचा आनंद वाटतो. क्वचित केव्हातरी अजूनही सती जाण्याची घटना वृत्तपत्रांत प्रसिद्ध होते तेव्हा प्रत्येकाचेच मन विषण्ण होते. इंग्रजांनी कायदा करून ही राक्षसी रूढी जशी संपुष्टात आणली त्याप्रमाणे लोकहितवादी, आगरकर आणि इतर समाजसुधारक यांनी सतत समाजप्रबोधन करून या सुधारणेला चालना दिली. कारण केवळ कायदे करून समाज बदलत नाही. समाजाची मानसिकताच मुळापासून बदलावी लागते.

‘शतपत्रां’त लोकहितवादींनी आंतरिक तळमळीने म्हटले आहे, ‘या हिंदुस्थानात दोन दोन वर्षांची मुले टाकून व लोकांच्या स्वाधीन करून स्त्रियांनी आपले जीव जाळून घेतले आणि याच कर्मास लोक धन्य मानीत गेले. या गोष्टीचे आश्चर्य हल्लीच इंग्रज वगैरे परकी लोकांस वाटले आहे असे नाही. सिकंदराबरोबर दोन हजार वर्षांपूर्वी जे यवन आले होते. त्यांनी जे लेख लिहून ठेविले ते पाहता त्यांसही हे मोठे आश्चर्य वाटले असे दिसून येते. तेव्हा ब्राह्मणांनी जे निर्दय लेख व विधाने लिहून ठेवली आहेत, त्यांस अनुसरून लोक वागू लागल्याने आपले लोकांस किती नीचपणा आला आहे याचे गणित होणे मुश्किल आहे. पहा जिवंत मनुष्याने प्रेताच्या चितेवर बसणे, आपले हाताने अग्नि लावून घेणे आणि हाय न म्हणता जळून जाणे हे सामान्य नव्हे. काय हे! येणे करून किती जीव व्यर्थ गेले! व अजूनही जात आहेत.’ (निबंधसंग्रह, शतपत्रे, पत्र. क्र. १०४)

स्त्रीच्या दुःखाविषयी लोकहितवादींनी विलक्षण सहानुभूतीने लिहिले आहे. पण ही पोकळ सहानुभूती नव्हती. तिच्यामागे क्रियाशीलता होती. स्त्रीवर अन्याय होतो याचे कारण तिला ज्ञान मिळवण्याची संधीच समाजात उपलब्ध नाही. तिला जाणूनबुजून अज्ञानात डांबून ठेवले आहे आणि तिच्याभोवती वेडगळ रूढींचे कुंपण पक्के बांधले आहे. आपण आपल्या कुंपणातच राहिले पाहिजे अशी स्त्रीची धारणा करून देणारी शास्त्रेही रचली गेली. ही लोकहितवादींची भूमिका आहे. प्राचीन काळापासून स्त्री ही कनिष्ठ प्रतीची असे सांगणारी काही शास्त्रे लिहिली गेली. ही कुणी लिहिली ? ती पुरुषांनीच लिहिली. पुरुषरचित शास्त्रांत स्त्रीला न्याय मिळू नये हे स्वाभाविकच आहे. आजच्या समाजातदेखील मूल्यमापन करताना दुहेरी मानदंड वापरण्यात येतो. ‘दुटप्पी’ हा शब्दही चालू शकेल. स्त्री-संदर्भात विचार करताना

अनुक्रमणिका

‘धारवाडी काटा’ वापरणारा समाज पुरुषाच्या बाबतीत मात्र ‘दीड दांडीचा तराजू’ हातात घेतो. शतकानुशतके स्त्री हा अज्ञानाचा, अन्यायाचा, छळाचा आणि घटकाभर मनोरंजनाचा विषय समजला गेला. संतांच्या काव्यातदेखील स्त्रीला न्याय मिळू शकला नाही. विठ्ठलाला माउली म्हणणारे संत स्त्रीमधली माउली पाहू शकत नाहीत. हे दुःखकारक आहे. सुदैवाने लोकहितवादी, फुले, आगरकर यांसारखे निष्णात वकील आणि न्यायाधीश एकोणिसाव्या शतकात स्त्रीला भेटले. म्हणून आज तिच्या बुद्धीच्या आणि व्यक्तित्वाचा विकास होत असल्याचे दृश्य दिसत आहे. पण येथेच हेही लक्षात घेतले पाहिजे की समाजातल्या सर्व स्तरांतल्या स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. ग्रामीण भागातली स्त्री मागे राहाता कामा नये. शेतकरी, कामकरी, आदिवासी आणि अन्य मागासवर्गीय स्त्रियांनाही शिक्षणाचा लाभ होईल अशा योजना प्रामाणिकपणे राबवल्या पाहिजेत. अजूनही स्त्रीवर्ग मोठ्या प्रमाणात शिक्षणापासून वंचित आहे. त्यामुळेच स्त्रियांमध्ये रूढींचे दडपण मानण्याची प्रवृत्ती अधिक आहे.

‘आमच्या बायका अंधारात. त्यांस जसे सांगितले तसे वर्ततात. त्याजमुळे सती जाण्याचा पाठ पडला. जर बायका शहाण्या असत्या व त्यांस विद्या वगैरे शिकविण्याची चाल असती तर ज्यांनी त्यांस प्रथम सती जाण्यास सांगितले त्यांच्या त्यांनी शेंड्या उपटून टाकल्या असत्या. अजूनही जर स्त्रियांस विद्या शिकविल्या तर त्या आपल्या पुनर्विवाह करतील आणि शास्त्री वगैरे जे आडवे येतील त्यास पुसतील की, पुरुषांनी पाहिजे तितकी लग्ने करावी मग स्त्रीने दुसरा नवरा करू नये ? आणि आपणच शास्त्रार्थ देऊन चालू करतील.’ (शतपत्रे, पत्र क्र. ५५)

हे स्वप्न आज काही अंशी साकार झाले आहे असे म्हणता येईल. पण त्यासाठी घराच्या चार भिंतीतच बांधून ठेवलेल्या स्त्रीला शिक्षणाच्या क्षेत्रात आणण्यासाठी समाजसुधारकांना फार प्रयास करावा लागला. १८४८ मध्ये लोकहितवादींनी स्त्री-शिक्षणाची जोरदार शिफारस करून समाजाची मानसिक तयारी चालवली. त्यानंतर दोन-तीन वर्षांतच म. फुले यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा स्थापन केली. या शाळेत चारपाच मुली धीर करून कशाबशा जात असत. आश्चर्याची गोष्ट अशी की सुशिक्षित ब्राह्मण समाजातल्या अनेकांनी स्त्री-शिक्षणाला विरोध केला. शाळेत जाणाऱ्या गरीब मुलींवर चिखलफेक, शेणमारा करण्याची ‘शूर कृत्ये’ त्यांनी केली. शिक्षण घेतले की स्त्रिया बिघडतील आणि संस्कृती लयाला जाईल अशी कोल्हेकुई या लोकांनी सतत चालू ठेवली. लोकहितवादींनी शिक्षण घेतल्यावर पुरुषांच्या शेंड्या उपटून टाकण्याची क्षमता स्त्रियांत येईल असा बंडखोर विचार मांडलेला होता. लोकहितवादी आणि फुले हे स्त्री-शिक्षणाचे महाराष्ट्रातले ‘आद्य पुरस्कर्ते’ आहेत. त्यांना अभिप्रेत असलेली सुविद्य बंडखोर स्त्री आज भारताच्या सर्व क्षेत्रांत निर्माण होत आहे. जी बोलू शकत नव्हती ती एकेकाळची दीनवाणी अबला प्रबला बनून देशाच्या राजकारणात, समाजकारणात आणि विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवीत आहे. सामाजिक परिवर्तनाची चळवळ या बाबतीत यशस्वी झाली असे विधान करता येईल.

स्त्रीचे जीवन नाना प्रकारच्या समस्यांनी वेढलेले आहे. पूर्वीचे काही प्रश्न समाजसुधारकांनी सोडविले असले तरी अजूनही स्त्रीकडे पाहाण्याचा सामाजिक दृष्टिकोन फारसा उदार झालेला नाही. आता या एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातच हुंड्याचा प्रश्न पूर्वीइतकाच किंबहुना अधिक गुंतागुंतीचा बनलेला आहे. वधूपित्याने भरपूर हुंडा द्यावा या इच्छेने वधूच्या आईबापांचे शोषण करणारे लोक पावलोपावली आढळतात. सुनेने घरून संपत्ती आणावी म्हणून तिचा छळ करणारी अनेक कुटुंबे आहेत. सुनेकडून पैसा नाही म्हणून तिच्या अंगावर रॉकेल ओतून तिला पेटवून देणारे सासू-सासरे कमी नाहीत. हे भयानक प्रकार सुशिक्षितांच्या घरात पुष्कळ घडतात. लग्न हा स्त्रीच्या जीवनातला एक दुःसह शाप ठरावा

याचा अर्थ आपली समाजव्यवस्था स्त्रियांच्या संदर्भात किती पक्षपाती बनलेली आहे हेच त्यातून सिद्ध होते. हुंडाबंदीचा कायदा असूनही हे अनर्थ घडतात. लोकहितवादींनी हुंड्याच्या प्रथेचाही आपल्या लेखनातून उल्लेख केला आहे. हादेखील एक सनातन प्रश्न आहे. एकेकाळी जरठ- बालविवाहाची पद्धती होती. चौदा-पंधरा वर्षांची मुलगी आणि पंचाहत्तरीच्या घरातला वृद्ध नवरदेव असे अत्यंत विषम विवाहदेखील समाजात मान्य होत होते. यावर उपाय म्हणून लोकहितवादींनी मुली वीस वर्षांच्या झाल्याशिवाय आणि त्यांना अवश्य तितके शिक्षण दिल्याशिवाय त्यांचा विवाह करू नये; त्यांच्या संमतीनेच तो करावा असा विचार स्पष्टपणे मांडला आहे. सुप्रसिद्ध ‘शारदा’ नाटक हे बाला-वृद्धविवाहावर आधारलेले आहे. मराठीतल्या एका विशेष लोकप्रिय नाटकांत त्याची गणना केली जाते. प्रबोधनवादी साहित्यातून समाज कितपत सुधारतो असा प्रश्न काही वेळा विचारला जातो. पण सुधारणावादी विचारांचा प्रभावी आविष्कार साहित्यातून झाला तर त्याचा परिणाम समाजावर होऊ शकतो. लोकमनाची घडण करण्यासाठी कथा, कादंबरी, नाटक आणि निबंध यांतून लोकशिक्षणाचं कार्य होऊ शकते. ‘शतपत्रां’नी हे कार्य परिणामकारक पद्धतीने केले. ‘शतपत्रे’ वाचून जुन्या आचारविचारांचे लोक चिडून उठले. हादेखील एक इष्ट परिणाम आहे. सनातनी लोक प्रथम रागावले. पण नंतर हळूहळू ‘शतपत्रां’तल्या विचारांचा मनाशी विचार करू लागले. समाज असा हळूहळू बदलावा लागतो. तो बदलण्यासाठी लेखणी, वाणी, वृत्तपत्रे, शिक्षण आणि चळवळी यांची जरूर असते. लोकहितवादींनी ही सर्व साधने यशस्वीपणे वापरली. प्रत्यक्ष चळवळ उभी करण्याला प्रथम लोकमत पाठीशी उभे करावे लागते. पण तो काळ सुधारणावादी विचारांच्या प्रारंभाचा होता. एकदम मोठी चळवळ हाती घेण्याइतकी लोकजागृती झाली नव्हती. जागृतीचा हा सुरुवातीचा कालखंड आहे हे जाणून त्यांनी लेखन, भाषण आणि वाचनालये व वृत्तपत्रे यांच्यावर अधिक भर दिला. लोकहितवादींनी छ. शाहूमहाराजांच्या प्रमाणे आंदोलन का उभे केले नाही ? असा प्रश्न एकदा एका महाविद्यालयीन युवकाने विचारला होता. लोकहितवादींचे कार्य कृतीच्या दृष्टीने कमी प्रतीचे होते असे त्याला सुचवायचे होते. त्याचे उत्तर इतकेच की, लोकहितवादी हे केवळ विचारवंत होते. राजर्षी शाहूमहाराज हे सत्ताधीश असल्यामुळे त्यांना आपल्या विचारातून चळवळीला आकार देता आला. लोकहितवादी, आगरकर वगैरे विचारवंतांच्या चळवळीचे स्वरूप प्रामुख्याने वैचारिक पातळीवरचेच होते. प्रत्येक समाजसुधारकाला आपल्या काळाला आणि परिस्थितीला अनुसरून प्रबोधनकार्य करावे लागते. प्रत्येकाच्या सामर्थ्याला अर्थ असतो त्याप्रमाणे मर्यादाही असतात. सुधारणावादी चळवळदेखील अनेक अंगांनी घडत असते, हे लक्षात घेतले तर लोकहितवादींनी सुधारणावादी चळवळीचा पाया घालण्याचा व्यापक प्रयत्न केला, असे निश्चित म्हणता येईल. ब्राह्मणवर्गाच्याच पुनरुत्थानाची स्वप्ने त्यांच्या साहित्याने रंगवली अशी अलीकडे त्यांच्यावर होणारी टीका निराधार आहे, ब्राह्मणवर्गावरच त्यांनी विशेषत्वाने टीकेचे प्रहार केले, याचे कारण या वर्गाच्या हातातच बौद्धिक आणि धार्मिक सत्ता एकवटली होती. पेशवाईत तर राजकीय सत्ताही या वर्गाला मिळाली होती. बाकीचा समाज जवळ जवळ अशिक्षित होता. ब्राह्मणांचे प्रबोधन व्हावे म्हणजे इतर वर्गही त्यांचे अनुकरण करील, ही कल्पना लोकहितवादींची होती. त्यांना केवळ ब्राह्मणवर्ग सुधारावा असेच वाटले असते तर डॉ. आंबेडकरांनी ‘शतपत्रे’ पुन्हा ‘बहिष्कृत भारता’तून प्रसिद्ध केली नसती. ‘महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी’ या पुस्तकात प्रा. गं. बा. सरदार यांनी म्हटले आहे,

‘लोकजागृतीचे दुष्कर कार्य हाती घेण्यापूर्वी लोकहितवादींनी सभोवतालच्या परिस्थितीची सूक्ष्मपणे छाननी केली व तदनुसार आपले धोरण निश्चित केले. त्यांची दृष्टी अत्यंत शुद्ध व व्यापक होती. आपल्या विशिष्ट वर्गाच्याच हिताहितांशी व सुखदुःखाशी समरस होण्याइतका त्यांचा देशाभिमान संकुचित नव्हता. ज्यामध्ये ब्राह्मण, महार, रामोशी, कैकाडी, कोमटी वगैरे सर्व वर्गांतील लोक एकमेकांशी सहोदर बंधूप्रमाणे वागतील, अशा तऱ्हेचा आदर्श समाज त्यांना अस्तित्वात आणायचा होता.’

अनुक्रमणिका

## केशवपनाची बीभत्स रूढी

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रियांच्या जीवनात उद्‌भवणाऱ्या अनेक समस्यांवर सहानुभूतीने पण अत्यंत स्पष्टपणे विचार मांडणारा लोकहितवादींसारखा बुद्धिवादी विचारवंत महाराष्ट्राला लाभला ही सुदैवाची घटना आहे. त्यांच्या काळात बालविवाह, सक्तीचे वैधव्य, केशवपन आणि स्त्रीला अज्ञानात व गुलामगिरीत ठेवणे असे कठीण प्रश्न होते. स्त्रीला पुनर्विवाह करण्याचा अधिकार नव्हता. सतीची चाल बंद झाली असली तरी ब्राह्मण समाजात पतीच्या मरणानंतर स्त्रीला अनेक हाल-अपेष्टांतून जावे लागे. केशवपनाची बीभत्स रूढी या समाजात होती. वैधव्य आल्यावर कोवळ्या मुलीपासून ते वृद्ध स्त्रीपर्यंत सर्वांना केशवपन करून घेणे बंधनकारक होते. अशा स्त्रीचा हेटाळणीदर्शक उल्लेख 'बोडकी' असा केला जायचा. त्या काळात प्रत्येक घरात केशवपनाला बळी पडलेल्या स्त्रिया असायच्या. त्यांच्या आयुष्यात अंधार आणि उपेक्षा याशिवाय दुसरे काहीही नसायचे. पती मृत झाल्यानंतर स्त्रीने अशा अपमानित अवस्थेत सारा जन्म एखाद्या अंधेऱ्या खोलीत काढायचा आणि फाटकी-तुटकी वस्त्रे नेसून व कदन्न खाऊन त्यावरच समाधान मानायचे. ही स्थिती होती. अशा स्त्रीला दुसरे लग्न करण्याचा अधिकार नव्हता. त्यातून तिला कायमची विद्रूप केल्यावर तो प्रश्न निकालात निघायचा. इतिहासात उल्लेख आहे की, नाना फडणीस मरण पावले तेव्हा त्यांची धाकटी पत्नी केवळ नऊ वर्षांची होती. याचा अर्थ या बालिकेने आपले संपूर्ण आयुष्य दुःखदैन्यातच पिचत काढायचे. या प्रकारच्या रूढी म्हणजे धर्म ही अज्ञानी लोकांची समजूत होऊन बसली होती. वैधव्य आलेल्या स्त्रीच्या दुरवस्थेचे वर्णन लोकहितवादी करतात,

'सासू-सासरे म्हणतात ही करंटी अवदसा नवऱ्यास मारून आम्हांस तोंड कशास दाखवते ? माहेरी भाऊ-बहिणी म्हणतात, आमचे घरी तुझे काय काम आहे ? येथे कशास येतेस ? बरे, रस्त्यांत फिरले तर लोक म्हणतात, 'बोडकी पुढे आली. आता पुढे पाऊल कसे टाकावे ? बरे, कोणाचा आश्रय करावा तर तेथे टीका होते की रंडकी-मुंडकीस तूप दही कशास हवे ? गादी निजावयास कशास हवी ? तेव्हा तिला वैराग्यासारखे संसारात राहून दिवस काढावे लागतात. याप्रमाणे खाटकाचे घरी मेंढराचीही दुर्दशा होत नाही. तो त्यास एक वेळ सुरी लावतो त्या वेळेस मात्र काय दुःख होत असेल तेवढेच!' (शतपत्रे, पत्र क्र. ९०)

पुनर्विवाहाचा अधिकार स्त्रीला नाकारणाऱ्या शास्त्रांनी पुरुषांना मात्र तो पूर्णपणे देऊन टाकला आहे. पुरुष कितीही लग्ने करू शकतो. मृत पत्नीला स्मशानात अग्नी दिल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून पुरुष विवाहाचा विचार करू लागतो. याला धर्म म्हणणे ही धर्माची कुचेष्टा आहे. पण ही शास्त्रे पुरुषांनी रचल्यामुळे समाजव्यवस्था पुरुषप्रधान बनली. शास्त्रलेखनाचा अधिकार स्त्रीकडे असता तर असे चित्र दिसले नसते. लोकहितवादींनी मुलामुलींना विवाहाचे स्वातंत्र्य द्यावे असे सुचवले आहे. लग्ने उशिराने-प्रौढपणी-करावीत, असे सांगून मुलांनी आपली लग्ने आपणच करावीत, असाही विचार त्यांनी मांडला. आगरकरांनीही पुढे पन्नास वर्षांनी याच प्रकारचा विचार व्यक्त केला आहे. स्त्रियांना शिक्षण द्यावे, स्वातंत्र्य द्यावे, त्यांचेही अधिकार पुरुषांइतकेच आहेत हे मान्य करावे. असा स्त्री-पुरुष समतेचा सिद्धान्त त्यांनी दीडशे वर्षांपूर्वी आवेशाने मांडला आहे. आजच्या स्त्रीला स्वातंत्र्याचे वातावरण थोडेफार मिळते. पण याचे श्रेय समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणणाऱ्या ज्या विचारवंतांकडे जाते त्यात लोकहितवादींचा वाटा महत्त्वाचा आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. विचारवंत आणि कृतिवंत हे दोन्ही घटक सामाजिक प्रगतीसाठी आवश्यक असतात. पण विचारवंतांची भूमिका ही अधिक महत्त्वपूर्ण मानली पाहिजे. कारण ते नवीन रस्ता तयार करतात. जुन्या कालबाह्य झालेल्या वाटा बुजवून टाकतात. नवनिर्मिती हे द्रष्ट्या विचारवंताचे

लक्षण असते. कार्लाइलने जिनियस म्हणजे द्रष्टा याची व्याख्या केली आहे. तो म्हणतो, 'Genius is he, who has immence capacity to take pains' प्रचंड परिश्रम करण्याची शक्ती द्रष्ट्या व्यक्तीजवळ असते. पण त्याबरोबरच त्याला नवनिर्माणशील प्रतिभेचेही वरदान लाभलेले असते. लोकहितवादींनी जन्मभर ज्ञानाची आराधना केली. नवनवीन विचार समाजाला दिले. आपल्या काळातील बहुतेक महत्त्वाचे ग्रंथ परिश्रमपूर्वक अभ्यासिले. इंग्रजी राज्याचे निरीक्षण केले. पूर्वीचे राज्य का आणि कसे बुडाले याच्या कारणांचा शोध केला. समाजव्यवस्थेत स्त्रीच्या पदरात पडलेली अनेक दुःखे कशी नाहीशी करावीत, याचा विचार केला. याच प्रकारची कामे ते आमरण करीत राहिले. म्हणूनच त्यांना 'द्रष्टा समाजसुधारक' म्हणण्यास हरकत नाही. महाराष्ट्रातले बहुतेक नामवंत समाजसुधारक याच विशेषणाला पात्र ठरतील, अशी त्यांची योग्यता आहे. आता 'शतपत्रां'तून आलेल्या आणखी काही महत्त्वाच्या विचारांचा परामर्श घेऊ. राजकारण, पारतंत्र्य, स्वदेशीचा पुरस्कार, नव्या उद्योगधंद्यांचा आणि व्यापारवृद्धीचा विचार इत्यादी अनेक विषायांवर लोकहितवादींचे चिंतन मूलगामी स्वरूपाचे आहे. 'शतपत्रे' या ग्रंथाला विचारभांडार असे निःशंकपणे म्हणता येईल. दीडशे वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या या ग्रंथाला अद्यापि ताजेपणाचा सुवास आहे. नवसमाजनिर्मितीचा आराखडा लोकहितवादींनी आपल्या ऐन तारुण्यात-पंचविशीत-तयार केला आहे.

## इंग्रजी राज्याचे समर्थन

इंग्रजी राज्याचे लोकहितवादी यांनी समर्थन केले होते. इंग्रजी राज्यापासून आपल्याला पुष्कळसा लाभ झालेला आहे आणि म्हणून इंग्रजांच्या हातात सत्ता आहे, ही एका अर्थाने समाधानाची गोष्ट आहे. असे त्यांचे मत होते. ते म्हणतात,

'सांप्रत किती एक लोक असे म्हणतात की, इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानातून जाईल तर चांगले. परंतु आम्हांस वाटते की, इंग्रजांचे राज्यापासून बहुत लाभ आहेत. हिंदु लोकांमध्ये मूर्खपणा वाढला तो दूर होण्याकरिताच हे गुरु दूर देशातून इतके ईश्वराने पाठविले आहेत.'

या मतामुळे लोकहितवादींवर त्यांच्या विरोधकांनी टीकेचे प्रहार केले. कारण हे उघड उघड पारतंत्र्याचे समर्थन आहे. कोणताही देशभक्त आपल्या देशावर परकीयांचे राज्य असावे असे म्हणणार नाही. पण 'इंग्रजी राज्यापासून बहुत लाभ आहेत' हे सांगून या राज्याची भलावण करावी हे अनेकांना रुचले नाही. परकीयांच्या राज्याला समंती आणि त्याची प्रशस्ती करणे हा अपराध राष्ट्रवादी लोकांना सहन होण्यासारखा नव्हता. इंग्रजी राज्यापासून नेमके कोणते लाभ झाले? या प्रश्नाचे उत्तर लोकहितवादींनी जे दिले ते विचार करण्यासारखे आहे. त्यांच्यामते पूर्वीचे सरकार वाईट आणि मूर्ख होते. राज्यात सर्वत्र अन्याय होता. ज्ञानाची वाढ करून विविध क्षेत्रांत सुधारणा व्हावी यासाठी पूर्वीच्या राज्यात कसलाही प्रयत्न झाला नाही. भट-ब्राह्मणांचे व मूर्ख लोकांचे रक्षण आणि पोषण होत होते. पेंढारी, रामोशी, ठग इत्यादी लोक देशात लुटालूट करीत असत. सध्या आपल्याला स्वातंत्र्य मिळाले तर तीच स्थिती पुन्हा उत्पन्न होईल. कितीही काळ ब्राह्मणी राज्य चालले तरी सतीबंदी झाली नसती. बालहत्त्या टळली नसती. शिक्षणाचा विकास झाला नसता. शिंदे-होळकरांनी पन्नास हजार पेंढारी लुटालूट करण्याच्या कामावर ठेवले होते. ते शहरे लुटत होते. जे राजे चोरांचे रक्षण करतात ते राज्य चांगले ठरणार नाही. लोकहितवादींनी इंग्रजपूर्व काळातील मराठी राज्याचे केलेले हे वर्णन पूर्णपणे वास्तव्य आहे. इंग्रजी राज्य आल्यापासून लोकजीवनात सुधारणा होऊ लागली. लोकमनात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. काठीला सोने बांधावे आणि खुशाल काशीयात्रेला जावे, इतकी सुरक्षितता इंग्रजांनी देशात निर्माण केली.

यात अतिशयोक्ती नाही. भोळ्याभाबड्या समजुती आणि अन्यायकारक, निर्बुद्ध रूढींच्या वेढ्यात सापडलेला समाज इंग्रजी विद्येमुळे बाहेर येऊ लागला. ही क्रांतिकारक घटना पेशवाईत मुळीच घडली नसती. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी इंग्रजी विद्येमुळे समूळ बदलली, हा सर्वात मोठा लाभ इंग्रजी राज्यामुळेच झाला. त्यामुळे लोकहितवादींनी या राज्याचे समर्थन केले आहे. हे पारतंत्र्याचे समर्थन नव्हे. जीवनपद्धतीचे, बुद्धिनिष्ठ वृत्तीचे समर्थन आहे. इंग्रजांनी ताबडतोब हा देश सोडून दिला असता तर पुन्हा पेंढारशाही आली असती. भट-भिक्षुकांचे प्रस्थ वाढून ऐहिक जीवनाचा विचार पाठीमागे पडला असता. उद्योग-व्यवसायांची वाढ झाली नसती. हे मुद्दे लोकहितवादींनी लक्षात घेतले होते. 'त्यांनी इंग्रजांची भाटगिरी केली' हा आरोप मात्र मूर्खपणाचा, खोडसाळपणाचा आहे. इंग्रजी राज्य कायम रहावे, आचंद्रसूर्य इंग्रजच येथे रहावेत, अशा अर्थाचे एकही विधान त्यांच्या कोणत्याही ग्रंथात आलेले नाही. लोकहितवादींप्रमाणेच न्या. रानडे, म. फुले यांनाही या राज्याचे समर्थन केले आहे. पण हे तिघेही विचारवंत, समाजसुधारक, राष्ट्रभक्त होते. पारतंत्र्याचे पोवाडे गाऊन स्वार्थ साधणारे समाजद्रोही नव्हते. हे त्यांच्यावर टीका करणाऱ्या अप्रबुद्ध विकृत टीकाकारांना समजत नव्हते, हे त्या टीकाखोरांचे दुर्दैव आहे. इंग्रजी राज्यशासन हे पूर्वीच्या शासनापेक्षा हजारपटीने अधिक न्यायी आणि शिस्तबद्ध होते हे इतिहासाच्या आधाराने सिद्ध झाले आहे. आज आपण लोकशाही पद्धतीने चाललेल्या स्वतंत्र देशाचे नागरिक म्हणून नांदत आहोत. पण नाना प्रकारच्या भ्रष्टाचारांनी आणि अव्यवस्थेने गांजलेले लोक 'इंग्रजांचेच राज्य बरे होते' असे वैतागाचे उद्‌गार काढतात. त्याचा अर्थ ते पारतंत्र्याचे समर्थन नसून उत्तम स्वच्छ शासनाची त्यांची अपेक्षा व्यक्त करीत असतात.

'शतपत्रां'तल्या एका लेखात नाना फडणीसासंबंधी काही विचार मांडले आहेत. त्यात सुरुवातीलाच पुढील विधान आहे,

'सांप्रत मराठे लोकांत अशी म्हण आहे की, 'नाना फडणीसांसारखा कोणी शहाणा नाही.' परंतु मला वाटते की, आता इंग्रजांमध्ये सहस्त्रशः नानापेक्षा शहाणे आहेत. नाना फडणीसाचे शहाणपण वर्णन करण्याजोगे सर्वोत्कृष्ट नव्हते.' नानाची योग्यता आणि बुद्धिमत्ता कमी होती हे स्पष्ट करताना त्याला शिखांचे आणि नेपाळचे राज्य कोठे होते याची माहिती नव्हती. टपालाची व्यवस्था नव्हती. इंग्रज कोण? आणि कोठून येतात ? याची माहितगिरी नानाला नव्हती. पण त्याचवेळी इंग्रजांनी मराठी राज्याची सर्व माहिती मिळविलेली होती. पेशवाईतल्या मूर्खपणावर प्रकाश टाकणारा हा लेख महत्त्वाचा आहे. नाना फडणीसावर केलेली टीका अतिशयोक्त स्वरूपाची नाही. नानांच्या ज्ञानाचा आणि चातुर्याचा गवगवा अधिक झालेला होता. पण लोकहितवादींच्या दृष्टीने 'नीती, सुधारणा किंवा विद्येची वृद्धी त्याने केली नाही व कलाकौशल्येही वाढविली नाहीत. सर्वांना एक कायदा लावून देऊन सर्वांना एकत्र जमवण्याचा प्रयत्न त्याने कधीच केला नाही. आपले घरापर्यंत व आपले राज्यापर्यंत मात्र नजर ठेविली. लोकांच्या सुधारणेचा प्रयत्न केला नाही.' पेशवाईतल्या सर्वात चतुर आणि मुत्सद्दी माणसाच्या या अनेक मर्यादा दाखवून त्या पार्श्वभूमीवर इंग्रजांचा मुत्सद्दीपणा, सर्वांना समान न्याय देणारी पद्धती, लोकशिक्षणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, व्यापार-उद्योगांना त्यांनी दिलेली चालना यांचा विचार करून गेलेल्या राज्यापेक्षा आलेल्या पारतंत्र्यात सामाजिक प्रगतीला अधिक अनुकूलता आली आहे, असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. इंग्लिश राज्य कसे लाभदायक आहे हे स्पष्ट करताना त्यांनी कोणताही अतिरेक केलेला नाही. इंग्रजांची स्तुतिस्तोत्रे गाण्यासाठी त्यांचे लेखन नव्हते. इंग्रजी विद्येच्या माध्यमातून हिंदी समाजाने आपला चौफेर उत्कर्ष साधावा, पुरुषार्थ करावा, ज्ञानमार्गी व्हावे, नव्या जाणीवा घेऊन वाटचाल करावी याच विधायक हेतूने इंग्रजी राज्य आणि विद्या यांची त्यांनी प्रशंसा केली आहे. या प्रशंसेमुळे आणि समर्थनामुळे आपल्या

अनुक्रमणिका

समाजाचा तेजोभंग झाला अशी टीका करण्यात आली. तेजोभंग करण्यापेक्षा पराक्रमाची प्रेरणा उत्पन्न व्हावी आणि त्याबरोबरच कठोर आत्मपरीक्षणही व्हावे हा लोकहितवादींचा मुख्य हेतू आहे. इंग्रज सरकारने या देशात विद्या वाढवून लोकांना शहाणे करावे आणि जेव्हा स्वदेशाचे राज्य करण्याचे व्यावहारिक ज्ञान यास येईल तेव्हा हे राज्य त्यांनी त्यांच्या हवाली करावे, हीच इंग्रजी राज्याच्या समर्थनामागील त्यांची विचारधारा आहे. हे आकलन ज्यांना नीटसे होत नाही त्यांनी लोकहितवादींना इंग्रजांचे केवळ स्तुतिपाठक ठरवले आहे. अव्वल इंग्रजीतल्या पहिल्या पिढीतल्या सुधारणावादी विचारवंतांवर अशीच विपर्यस्त टीका झालेली आहे. लोकहितवादी हे तर सरकारी नोकर होते. त्यामुळे त्यांनी इंग्रजांची तळी उचलावी हे साहजिकच आहे, असाही गैरसमज त्यांच्याविषयी करून देण्यात आला होता. पण ज्याने 'शतपत्रे' अभ्यासिली आणि लोकहितवादींचे इतर साहित्यही मनःपूर्वक वाचले त्याला लोकहितवादींची राष्ट्रवादी भूमिका स्पष्टपणे जाणवेल. इंग्रजी शासनावर आणि इंग्रजांनी चालवलेल्या अन्याय्य शोषणावर लोकहितवादी कित्येक ठिकाणी तुटून पडले आहेत. ते स्वांतत्र्याचेच समर्थन होते, अशी साक्ष देणारे त्यांचे अनेक लेख दाखवता येतील. इंग्रजी राज्यातले दोषही त्यांनी दाखवले आहेत. पण त्याबरोबरच गुणांचीही मीमांसा त्यांनी यथातथ्य रीतीने केली आहे. इंग्रजी राज्याच्या मुळाशी जी विशिष्ट उदारमतवादी धारा आहे तिचे स्वागत करणे आवश्यकच होते. लोकजागृतीला इंग्रजांचे उदारमतवादी विचार कारणीभूत होत आहे, हे पाहूनच त्यांनी त्या शासनाची उज्ज्वल बाजू दाखविली आहे. इंग्रजी राज्य आणि आधुनिक शास्त्रीय सुधारणा यांचा अटळ संबंध लोकहितवादींनी पाहिला. आधुनिक सुधारणेची तत्त्वे या भूमीत रुजविण्यासाठी मागासलेली पेशवाई मुळीच उपयोगी पडली नसती. मराठी राज्यात 'राष्ट्रीयत्वाची जाणीव' लोकांना कधी झालीच नव्हती. 'नॅशनॅलिझम' ही कल्पना आपल्याकडे इंग्रजी राज्य येईपर्यंत जवळ जवळ नव्हती. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आपले एक राष्ट्र आहे हा शुद्ध राष्ट्रवादी विचार इंग्रजी विद्येतून आणि राज्यातून भारतीयांच्या मनात निर्माण झाला. म्हणूनच हे राज्य आणखी शंभर वर्षे टिकावे असा विचार त्यांनी मांडला. आणि त्यानंतर बरोबर शंभर वर्षांनी इंग्रजांना हा देश सोडून जाणे भाग पडले. पण या एक शतकाच्या अवधीत प्रशासन व्यवस्था, कायदा, शिक्षण आणि व्यापार-उद्योग यांची प्रगती, विज्ञाननिष्ठा इत्यादी सर्व गोष्टींना पोषक वातावरण इंग्रजांनी निर्माण केले.

## हिंदुस्थानला पार्लमेंट हवे

लोकहितवादींनी 'हिंदी लोकांना शिकवण्यासाठी परमेश्वराने हे इंग्रज गुरु म्हणून पाठवले आहेत' असे विधान केले आहे. हे विधान केवळ आलंकारिक अर्थाने केले असेल तर आमचा काही आक्षेप नाही. पण हे विधान गंभीरपणे केलेले दिसते. यात ईश्वरी योगायोग आहे असे मानणे बुद्धिवादी माणसाला शक्य होणार नाही. इंग्रजांनी हिदुस्थानात यावे हा ईश्वराने घडवून आणलेला योग आहे, हे निदान लोकहितवादींसारख्या 'बुद्धिरेव बलीयसी' असे म्हणणाऱ्या विचारवंताला साजेसे नाही. काहीशा आलंकारिक भाषेत हे वाक्य त्यांनी लिहिले असेल. काही घडले म्हणजे आपण ईश्वरी इच्छेचा हवाला देतो. त्यापैकीच हे वचन असावे. पेशव्यांचे राज्य मोडकळीलाच आले होते. सबंध भारतातच अराजकाचे वातावरण होते. लोकांत एकोपा नव्हता. अंधःश्रद्धांच्या सावटाखाली देशातले व्यवहार चालत होते. विषमता पराकोटीला गेलेली. हे पाहिल्यावर धूर्त इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकून घेतला. आता त्यामागे ईश्वरी योजना होती असे म्हणता येणार नाही. पण न्या. रानडे यांनीही 'ईश्वरी योगायोग' असेच शब्द योजलेले आहेत. आज त्याबद्दल विचार करताना याप्रकारचे विधान करून लोकहितवादींनी टीकाकारांना एक संधी दिली असे वाटते.

अनुक्रमणिका

'शतपत्रां'तून नवी सामाजिक जाणीव प्रकट झालेली दिसते. त्याप्रमाणेच राजकीय जागृतीचा प्रथमच आविष्कार या निबंधांतून झालेला आढळतो. आपल्या देशाची राज्यसंस्था प्रगत व्हावी आणि तिने व्यापक लोककल्याण साधावे या इच्छेतूनच 'शतपत्रां'तले राजकीय लेख लिहिले गेले आहेत. विशेष म्हणजे हिंदुस्थानाला एक 'पार्लमेंट' असावे आणि त्यात सर्व जातीजमातींच्या बुद्धिमान माणासांना स्थान असावे असा प्रगल्भ विचार १८४८ साली लोकहितवादींनी मांडला. ते राजेशाहीचे कडवे विरोधक होते. कारण राजेशाहीतले अनर्थ त्यांनी पाहिले होते. म्हणून 'सांसदीय लोकशाही' आपल्या देशात उदयाला यावी हे उदार आणि भव्य स्वप्न त्यांनी आपल्या लेखनातून रंगवले आहे. लोकहितवादींच्या पूर्वी अशा लोकशाही राज्याचा पुरस्कार फारच थोड्या विचारवंतांनी केला असेल. ते स्पष्टपणे म्हणतात,

"आजपासून सर्व गरिबांनी व श्रीमंतांनी एकत्र येऊन विलायतेतील राणीसाहेबांस तपशीलवार एक अर्ज करावा की हल्ली, राज्यपद्धती आहे तीपासून आमचा फायदा नाही व आमचे राज्यासंबंधी हक्क चालत नाहीत व हिंदू लोक जसे, तसेच इंग्रज लोक मनुष्ये आहेत, याजकरिता इन्साफ बरोबर होण्याकरिता सर्व इंग्रज व नेटीव लोक यांमध्ये सांप्रत मोठा भेद आहे. तो मोडून एकसारखे होण्याकरिता हिंदुस्थानचे देशात पार्लमेंट ठेवावे व ही मोठी सभा मुंबईस भरवावी आणि तेथे दरएक शहरातून, दरएक जिल्ह्यातून दोन-दोन असामी घेऊन त्या सर्वांस, कौंसलात बसवून गवरनराने त्यात मुख्य असावे व जे लोक दर जिल्ह्यातून आणावयाचे ते सर्व जातींतील सारखे असावे. दर जिल्ह्याचे मॅजिस्ट्रेट साहेबांकडून दवंडी पिटवावी की, राज्याचा विचार चांगले रीतीने होण्याकरिता संपूर्ण लोकांनी विचार करून दोन शहाणे मुख्यत्यार नेमावे व त्याप्रमाणे नेमिलेले सर्व लोकांनी हजर व्हावे. हे लोक बोलणारे चतुर व मुच्छदगिरी केलेले असावे. कारण हे राज्याचे हिस्सेदार आहेत. केवळ शिरस्तेदार, मुनसफ व मामलेदार नव्हेत व या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादी जे शहाणे दिसतील, ते नेमावे व त्यांनी राज्य चालवावे. म्हणजे लोकांचा फार फायदा होईल.'

लोकशाहीत असलेल्या सर्व कल्पनांचा समावेश यात आढळतो. आज आपण जातिधर्मनिरपेक्ष, संप्रदायमुक्त आणि कोणत्याही भेदांपलीकडे असणारी उदार लोकसत्ता अस्तित्वात असावी असे म्हणतो तेच विचार दीडशे वर्षांपूर्वी या विचारवंताने मांडलेले आहेत. पुढे आणखी त्यांनी म्हटले आहे, 'राज्य करण्यास गरीब व मातबर, नीच जातीचे व उच्च जातीचे लोक समान मानावेत हे सर्वांस कळू लागले. अशा सभेत जातीविषयक निवड नको. हे वर सांगितलेच आहे. जे फार विद्वान व चांगले चालीचे लोक आहेत तेच नेमले पाहिजेत. मग त्यांची जात कोणतीही असो.' ('शतपत्रे', पत्र क्र. २५)

आज आपल्या देशात लोकशाही आहे. लोकसभा आहे. भिन्नभिन्न जातिधर्मांचे लोकप्रतिनिधी या सभेत आपले विचार मांडतात. एका अर्थाने लोकहितवादी यांचे स्वप्न साकार झाले, असे म्हणता येईल. पण हे सर्वस्वी खरे नाही. जातधर्मनिरपेक्ष, संप्रदायमुक्त हे अत्यंत महत्त्वाचे शब्द त्यांनी योजले आहेत. लोकशाही स्वातंत्र्याचा आत्माच जणू या शब्दांतून प्रकट होतो. स्वातंत्र्य मिळून आता पंचावन्न वर्षे उलटून गेली. पण जात, धर्म, संप्रदाय यांना कोणत्याही अर्थाने ओहोटी लागलेली नाही. भरती मात्र आली आहे. सत्ता मिळविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या पक्षांच्या हातात 'जात' हा एक हुकमाचा एक्का असतो. जातीयतेला फुंकर घालून आग पेटवायची आणि तिच्यावर आपल्या स्वार्थाची पोळी भाजून घ्यायची. हा मार्ग प्रत्येक पक्षाने स्वीकारलेला दिसतो. धर्मनिरपेक्षता हा शब्द निवडणुकीच्या जाहीरनाम्यात आणि प्रचारसभेच्या व्यासपीठावर फक्त प्रकट होतो. जातीयतेच्या बळावरच सत्तेची स्थाने मिळतात किंवा ते बळ नसेल तर मिळत नाहीत, ही आजची परिस्थिती आहे. प्रत्येक समाजसुधारकाने जातीय आणि सांप्रदायिक वृत्तीला

अनुक्रमणिका

कडवेपणाने विरोध केला. पण जातीच्या हरळीचे मूळ समाजमनाच्या भूमीतून कितीही बलिष्ठ हातांनी उपटण्याचा प्रयत्न केला तरी त्याला हजार हत्तींचे बळ लाभले आहे. अशा परिस्थितीत लोकहितवादींचे स्वप्न खरे झाले असे म्हणता येईल काय ? पण ज्या वेळेला इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्याची चळवळदेखील नीटपणे उभी राहत नव्हती त्या काळात म्हणजे दीड शतकांपूर्वी लोकसभेचे चित्र इतक्या तपशीलाने लोकहितवादी रंगवू शकले हेच त्यांच्या व्यापक दृष्टीने उदाहरण आहे. द्रष्टा विचारवंत वर्तमानकाळाच्या पडद्यामागे उभ्या असलेल्या भविष्यकाळाचे कसे दर्शन घेऊ शकतो याचा हा एक सुंदर नमुना आहे. लोकहितवादींच्या दृष्टीने, 'आजच्या काळी यथास्थित उत्तम राज्य अमेरिकेतील युनायटेड स्टेट्स येथे आहे. त्याचेखाली विलायतेतील मिश्रराज्य व त्याचेखाली इतर राज्ये. आशिया खंडातील राज्ये तर फारचे दुष्ट. तेथे लोकांस पीडा फार.'

## स्वदेशीचा पुरस्कार

'शतपत्रे' आणि 'निबंधसंग्रह' हे ग्रंथ वैचारिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. असे ग्रंथ अव्वल इंग्रजी कालखंडात निर्माण झाले. याचे कारण लेखकाच्या मनःपिंडावर इंग्रजी ज्ञानविज्ञान आणि इंग्रजी शासनातली तत्त्वे यांचा संस्कार झाला. आपल्या समाजानेही इंग्रजांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली पाहिजे हा ध्यास लेखकाला लागलेला होता. लोकहितवादी हे राष्ट्राचा अभिमान बाळगणारे असे विचारवंत होते. त्यामुळेच त्यांच्या लेखनात जुन्या विचारांचे खंडन आणि नवविचारांचे आवेशपूर्ण समर्थन येते. जुन्या विचारांची जुनाट झालेली वस्त्रे फेकून देण्याचा उपदेश यासाठीच त्यांनी केला. त्यांच्या राजकीय विचारांचे समीक्षण करताना त्यांनी निर्भेळ लोकशाही आणि स्वातंत्र्य यांचा पुरस्कार केल्याचे आपण पाहिले. पण त्याबरोबरच या देशाच्या उन्नतीसाठी त्यांनी स्वदेशीचा उत्कट पुरस्कार केला. हे अधिक महत्त्वाचे आहे. स्वदेशी वस्तू वापरण्यात आणि परदेशी वस्तूवर बहिष्कार टाकावा हे विचार लो. टिळक आणि म. गांधी यांनी पुढे मांडले. पण त्यांच्या पूर्वी कितीतरी वर्षे आधी म्हणजे इ.स. १८४८ मध्ये लोकहितवादींनी स्वदेशीसंबंधीची आपली भूमिका सुसूत्रपणे स्पष्ट केली आहे. ते म्हणतात,

'सांप्रत हिंदू लोक भिकारी होत चालले आहेत. त्यांस रोजगार धंदा नाही. याचे कारण मला असे दिसते की या लोकांचा व्यापार अगदी बुडाला. इंग्रज व दुसरे देशचे लोक फार शहाणे होऊन या लोकांस सर्व जिनसा पुरवितात आणि हे मुकाट्याने स्वस्ताईमुळे खरीदी करतात. यास्तव या लोकांनी एकत्र होऊन जर असा कट केला की, आपले देशात दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाही. आपले देशात पिकेल तेवढाच माल घ्यावा. आपले लोक कापडे जाडी, वाईट करितात. परंतु तीच नेसावीत. इकडे छत्र्या करितात. त्याच घ्याव्यात... आमचे कपडे, आमची छत्री, आमची चाकू-कात्री, आमचे घड्याळ, आमची गाडी, आमची बुके सर्व परदेशातील आहेत. यामुळे सर्व व्यापार बुडाला. जे आपल्या देशात पिकेल तेच नेसू तेच वापरू. कसेही असो आणि तितक्यात चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास विद्या शिकू ?' ('शतपत्रे', पत्र क्र. ५७)

या विचारातली मौलिकता विवरून सांगण्याचे वस्तुतः कारण नाही. लो. टिळकांच्या अगोदर पन्नास-साठ वर्षे हा महत्त्वाचा संदेश लोकहितवादींनी दिला. आपल्या देशाच्या आर्थिक व राजकीय स्थितीची इतकी मूलगामी चिकित्सा त्या काळात दुसऱ्या विचारवंताने क्वचितच केली असेल. हा राष्ट्रीय अभ्युदयाचा मार्ग त्यांनी दाखवला आहे. आपल्या देशात होणारे उत्पादन आपणच दैनंदिन जीवनासाठी वापरले पाहिजे. लोकहितवादींचा हा निर्धार आर्थिक, राजकीय आणि सामाजिक अशा तिन्ही दृष्टींनी

उपयुक्त आहे. याच विचाराचा प्रसार टिळक आणि गांधी यांनी केला. परदेशातून येणारे पदार्थ आपल्या देशात होणाऱ्या उत्पादनापेक्षा अधिक चांगल्या प्रतीचे असले तरी आपण आपले जाडे-भरडे पदार्थच विकत घ्यावेत या विचारात उत्कट देशभक्ती आहे. आपल्याच देशातील कामगारांच्या पदरात त्यामुळे चार पैसे पडतात. स्वदेशातले उद्योगधंदे भरभक्कम पायावर उभे करण्यासाठी स्वदेशीचा हा निर्णय सर्वस्वी उपकारक आहे. आपल्या गरजा भागवणारे वेगवेगळे पदार्थ या देशातच आपण आपल्या श्रमातून व कल्पकतेतून उत्पन्न केले पाहिजेत. प्रखर राष्ट्रवादी भावनेने ओथंबलेला हा विधायक विचार लोकहितवादींनी दिला. त्यामुळे त्यांचे लोकहितवादित्व सिद्ध होते. जपानसारखे लहानसे राष्ट्र स्वदेशी वस्तू वापरण्याच्या क्रियेतून पुढे गेले. शाळेत शिकणाऱ्या दोन मुलींनी टोकिओतल्या एका दुकानात पेन्सिलींची मागणी केली. दुकानदाराने त्यांच्यापुढे अमेरिकन पेन्सिली ठेवल्या. त्या सुबक व दर्जेदार होत्या पण आपल्याला आपल्याच देशात तयार झालेल्या पेन्सिली पाहिजेत असे त्या मुलींनी आग्रहपूर्वक सांगितले. दुकानदार म्हणाला दोन दिवसांनी तो 'स्वदेशी' माल येईल. 'आम्ही दोन दिवसांनी पेन्सिली घेऊ! आपल्या देशातला पैसा परदेशात जायला नको.' ही एक सत्यकथा आहे. ज्यांची राष्ट्रीय जाणीव उत्कट असते त्यांनाच या प्रसंगातले मर्म समजू शकेल. आपल्या गरीब देशाला स्वदेशीचा विचार देऊन लोकहितवादी स्वावलंबी आणि श्रीमंत करू इच्छित होते. आजची परिस्थिती लोकहितवादींनी पाहिली तर ते भारतीय लोकांना आपल्या खास फटकळ भाषेत दोन शेलकी विशेषणे देतील. परदेशी वस्तूसंबंधीचे विलक्षण वेड आपल्या लोकांना लागलेले आहे. पायातल्या बुटापासून डोक्यावरच्या हॅटपर्यंत वापरल्या जाणाऱ्या सर्व वस्तू 'इम्पोर्टेड' असतात आणि त्याबद्दल गर्व वाटत असतो. जे जे भारतीय ते ते टाकाऊ दर्जाचे आणि जे परदेशातून आले ते मात्र दर्जेदार अशा भ्रांतिष्ट समजुतीत कोट्यवधी भारतीय आहेत. त्याची त्यांना खंतही वाटत नाही. ही एक प्रकारची लाजिरवाणी गुलामगिरी आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळाले पण मानसिक गुलामगिरीतून आपला देश अजूनही बाहेर पडत नाही ही या देशाची शोकांतिका आहे.

स्वदेशी वस्तू वापरण्याची प्रतिज्ञा भारतीय जनतेने घेतली तर तिचे आर्थिक आणि औद्योगिक प्रश्न सहज सुटू शकतील. हा देश स्वावलंबी बनेल. आज मात्र परिस्थिती विपरीत आहे. खाण्यापिण्याचे पदार्थदेखील परदेशातून येतात. तेच प्राधान्याने वापरले जातात. स्वदेशी उत्पादने मात्र बाजूला सारली जातात. लोकहितवादींनी दिलेला 'स्वदेशीचा मंत्र' जितका त्या काळात आवश्यक होता त्यापेक्षाही कितीतरी पटीने आज त्याची जरूर आहे. 'शतपत्रां'त हिंदू समाजाला आणि विशेषतः ब्राह्मणवर्गाला शिव्या दिल्या आहेत, असा विपर्यस्त आरोप करणाऱ्यांना या ग्रंथाची वैचारिक उंची कळली नाही. इतकेच उत्तर टीकाकारांना पुरेसे होईल असे वाटते.

## देश ही मातोश्री

इंग्रजी राज्याचे समर्थन करणारे लोकहितवादी प्रखर देशभक्त होते. त्यांनी म्हटले आहे,

'स्वदेशास जे हितावह ते करावे. जसे आपण मातोश्रीस वंद्य मानतो व तिच्या पोटी जे आले ते सर्व बंधुप्रीतीने वागतात, तद्वत या जमिनीवर जे आपण आहोत व हा देश आपणा सर्वांची मातोश्री आहे याजकरिता कोणी सुखी व द्रव्यवान असतील त्यांनी बहुत लोक उपाशी मरतात व दरिद्री आहेत त्यांचे रक्षण होण्याचा प्रयत्न करावा. आपण सर्वांनी आज दोन हजार वर्षेपर्यंत यथेच्छ सुखाने झोप घेतली व काही उद्योग केला नाही म्हणून आतातरी जागृत होऊन काय आहे ते पाहू व बुद्धीचा उपयोग करू.'

देश ही माता आहे आणि आपण सर्वजण तिची लेकरे आहोत हे भावनाशील वृत्तीने त्यांनी सांगितले आहे. इंग्रजांचा व्यापार आणि उद्योग आपल्या देशात जितका कमी होईल तितके चांगले, असेही त्यांनी म्हटले आहे. इंग्रजी राज्यामुळे आपल्या देशाचे प्रचंड आर्थिक शोषण होत आहे म्हणून त्यांनी इंग्रजांवर आधार देऊन कठोर टीका केली होती. इंग्रजांच्या द्रव्यलोभावर, सत्तालोभावर आणि अहंगंडावर त्यांनी अनेक स्थळी स्पष्टपणे टीका केली आहे. मर्यादित अर्थाने ते राजनिष्ठ होते. पण त्यांच्या ठायी न्यायबुद्धी, समाजप्रेम, आणि राष्ट्रभक्ती असल्यामुळे त्यांनी कधीही इंग्रज अधिकाऱ्यांची अथवा राज्याची अवास्तव स्तुती केली नाही. त्यांच्या टीकाप्रहारातून इंग्रज सरकारही सुटले नाही. याचा अर्थ ते निर्भय विचारांचे समाजसुधारक आणि देशभक्त होते. त्यांच्या निःस्पृहतेची शासनाला जाण असल्यामुळेच 'मुंबई कौन्सिलचे सदस्य' म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पण समकालीन टीकाकारांना जवळच्या माणसाची योग्यता बहुतेक कळत नाही. आज लोकहितवादींच्या कर्तृत्वाची आणि विचारांची श्रेष्ठता बहुतांशी सर्वसामान्य झाली असली तरी त्या काळात त्यांच्यावर प्रतिकूल टीकेचा वर्षाव झालेला आहे. पण हा एक संकेतच दिसतो. साधुसंतांनाही टीकेचे आघात सतत सहन करावे लागले. तेथे समाजाच्या निष्क्रियतेवर, अज्ञानावर कोरडे ओढणाऱ्या लोकहितवादींना टीकेचे भक्ष्य बनावे लागले यात आश्चर्य कसले?

लोकहितवादींच्या लेखनात काही ठिकाणी अनिश्चितपणाही आलेला आहे. 'हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याचा विचार' या लेखात त्यांनी पुन्हा ईश्वरी योगायोगाचा विचार मांडला आहे. 'इंग्रजांच्या अंमलाखाली हिंदुस्थानला पाचशे वर्षे राहावे लागेल' असे विधान केले आहे. दुसऱ्या एका लेखात दोनशे वर्षांचा उल्लेख आहे. एका ठिकाणी शंभर वर्षांचा निर्देश केला आहे. हा अंदाजाचा भाग झाला. पण शंभर वर्षातच जनता स्वातंत्र्याची मागणी करील आणि त्यावेळी इंग्रजांना देश सोडावा लागेल. नाहीतर रेव्होल्यूशन होईल. असे म्हटले आहे. अखेर स्वातंत्र्यासाठी दीर्घकाळ संघर्ष करावा लागला. त्यामुळेच स्वराज्याची प्राप्ती झाली. पण हे सर्व घडण्यासाठी इंग्रजी शिक्षणातून म्हणजेच विद्येतून जे 'वाघिणीचे दूध' जनतेला मिळाले त्यातून निर्माण झालेल्या शक्तीने स्वातंत्र्याची प्राप्ती होऊ शकली. याबाबतीत लोकहितवादींनी म्हटले आहे की,

'हे लोक (भारतीय) आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजास सांगतील की तुम्ही आपले देशास जावे. आता देशाचा कारभार आम्हांस चांगला करता येतो. तुमचे गुरूत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरते इकडे येत जा. आमचे प्रजेचे जसे आम्ही रक्षण करितो, तद्वत तुमचेही करू. परंतु तुमचे वर्चस्व नको. याप्रमाणे या देशाची गती होईल. आणि नवीन राज्यस्थिती चांगले रीतीची होईल. पहिले अज्ञान अगदी नाहीसे होईल. यास दोनशे वर्षे तरी पाहिजेत. परंतु असे होईल यात संशय नाही. (शतपत्रे, पत्र क्र. ५४)

हा लेख १ एप्रिल १८४९ रोजी लोकहितवादींनी लिहिला आणि शंभर वर्षांच्या अवधीतच इंग्रजांशी अखंड झगडून हिंदी लोकांनी स्वातंत्र्य हस्तगत केले. अर्थात स्वातंत्र्य मिळविण्यासाठी फार मोठी राजकीय जागृती जनतेत निर्माण करण्याचे कार्य राजकीय क्रांतिकारकांना आणि नेत्यांना करावे लागले. पण हे श्रेय केवळ राजकीय पुढाऱ्यांचे नाही. समाजाच्या मनात देशभक्ती, ज्ञाननिष्ठा, जीवनमूल्यांविषयीचे प्रेम, अंधश्रद्धा झुगारून देण्याची विचारशक्ती, व्यापारवृद्धी, इत्यादी अत्यंत महत्त्वाच्या प्रवृत्तींचे बीजारोपण करण्याची अवघड भूमिका सतत शंभर वर्षे समाजसुधारकांनी वेगवेगळ्या माध्यमांतून पार पाडली. समाजमन एखाद्या कठीण पाषाणासारखे असते. त्यातून चांगली प्रतिमा तयार करण्यासाठी प्रतिभा आणि परिश्रम यांची जरूर असते. नवनवीन पुरोगामी विचार घेऊन हा पाषाण घडवावा लागतो. हे रचनात्मक कार्य लोकहितवादींपासून डॉ. आंबेडकर यांच्यापर्यंत थोर सुधारकांनी अहर्निश केले. सामाजिक आणि

राजकीय कार्य एकाच कालखंडात एकमेकांना पोषक अशा पद्धतीने होत गेले. आधी सामाजिक की आधी राजकीय? असा वाद मधून मधून उद्‌भवत राहिला. पण दोन्ही बाजूंची प्रगती देशाला आवश्यक असते. आपला देश ही 'मातोश्री' आहे असे मानणाऱ्या लोकहितवादींच्या 'शतपत्रां'तून व्यक्त झालेल्या जीवनविषयक विचारांचे हे रसग्रहण आहे. ते परिपूर्ण नाही. पण जे महत्त्वाचे प्रश्न त्यांनी आपल्या विशिष्ट, सुबोध शैलीत मांडले त्यांचा थोडक्यात परामर्श घेतला आहे.

## जातीविषयी विचार

लोकहितवादींनी वर्णव्यवस्था आणि जातीय विषमता याबद्दल व्यक्त केलेले विचार प्रगतिवादी आहेत. ते स्वतः उच्चवर्णीय समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण वर्गाचे घटक होते. पण हा वर्ग त्यांनी आपल्या टीकेच्या जात्यात भरडून काढला. जात आणि वर्ण यामुळे समाजात अनेक भेद पडले. सामाजिक शक्ती त्यामुळे व्यर्थ ठरली. पेशवाईत तर ही विषमता पराकोटीला गेली होती. याचाच परिणाम पुढे स्वातंत्र्यनाशात झाला. हे मत त्यांनी मांडले आहे. त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे,

'जात म्हणजे कर्मावरून योग्यता... जातीची काही वेगळी खाण नाही. जातीचा अभिमान मानणारे मूर्ख आहेत. आणि जाती व्यवहारावरून आणि कर्मावरून झाल्या आहेत यात संशय नाही.' (शतपत्रे, पत्र क्र. ३९)

'बापाच्या वर्णाप्रमाणे पुत्राचा वर्ण धरितात. मग त्याचे कर्म कसेही असो. या योगाने काय काय अनवस्था झाली ही सर्वांस विदित आहेच. व्यवहाराच्या दृष्टीने जरी पाहिले तरी वर्णव्यवस्था, रीती अयोग्य आहे. बाप सुभेदार असला म्हणजे त्याचा मुलगाही सुभेदारच व्हा किंवा बाप शास्त्री असला म्हणजे त्याचा मुलगाही शास्त्रीच असतो असा नियम नाही. प्रत्येकाने आपल्या बापाच्या नावावर विकण्यापेक्षा स्वात्मविख्यात असणे ही उत्तम कोटी धरिली आहे.' (आश्वलायन गृह्यसूत्र या ग्रंथाच्या प्रस्तावनेत लोकहितवादींनी हे विचार मांडले आहेत). त्यांची ही प्रस्तावना दीर्घ आहे. वर्णव्यवस्था ईश्वराने केली हे मत त्यांनी पूर्णपणे नाकारले आहे. या प्राचीन व्यवस्थेत बदल केलाच पाहिजे अशी आग्रही भूमिका त्यांनी घेतली आहे. आपल्या मताला बळकटी देण्यासाठी स्मृतीतील वचने आणि तुकारामांच्या अभंगांचा आधारही घेतला आहे. प्राचीन धर्मग्रंथांचे अनेक दृष्टांत देऊन जाती कर्मावरूनच ठरत होत्या त्याचा जन्माशी संबंध नाही. जातिभेदामुळेच हिंदूसमाज दुर्दैवी ठरला आणि त्याचा अधःपात झाला, हा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. प्रत्येक समाजसुधारकाने जातीय विषमतेवर प्रहार केले. लोकहितवादींनीही ते केले. जातीपातींच्या बुजबुजाटातून समाज आपली एकात्मता हरवून बसला. तो अनेक ठिकाणी भेगाळला. त्याचे तुकडे तुकडे झाले. शेकडो तुकड्यांत विभागला गेलेला हा समाज कोणताही पराक्रम करू शकला नाही. बाहेरून येणाऱ्या आक्रमकांशी त्याला लढता आले नाही. हिंदुस्थानचे लचके तोडणाऱ्या शत्रूंशी एक होऊन लढले पाहिजे इतकेही भान त्याला उरले नाही हा इतिहास आहे. लोकहितवादींनी समाज जोडण्याचा विचार मांडलेला आहे. ते म्हणतात,

'या देशाचे उर्जित होण्यास ज्या अडचणी आहेत त्यातील लोकांच्या हातून निघण्याजोग्या ज्या आहेत त्यातही मुख्य पाहिल्यानंतर तीन दिसतात. एक जात, दोन स्त्रियांची स्थिती आणि लहानपणी लग्न.'

या तीन कारणांचा उल्लेख करून त्यांनी जातीच्या कारणाला अग्रस्थान दिले आहे. हिंदू समाजाच्या अधःपाताचा संबंध विषमतेवर आधारलेल्या जातिसंस्थेशी त्यांनी जोडला आहे. हे बरोबरच आहे. त्यांची मते विसाव्या शतकातील विचारवंतांच्या मताशी सुसंगत आहेत. जातीय विषमतेचा धिक्कार करून जुने ग्रंथ आणि निरुपयोगी शास्त्रे याबाबतीत प्रमाण मानू नयेत असेही त्यांनी आवर्जून सांगितले. पण या प्रश्नावर त्यांनी हलकल्लोळ उडवून दिला नाही. स्त्रीवरील अन्यायाबाबत किंवा ब्राह्मणांच्या अज्ञानाबद्दल अत्यंत तीव्रतेने त्यांनी लिहिले. पण जातीय विषमतेवर लिहिताना तितकी आवेगपूर्ण तीव्रता आढळत नाही. त्यांचे लक्ष स्त्रियांची स्थिती सुधारावी. त्या शिक्षित व्हाव्यात आणि सर्व समाजाने आधुनिक ज्ञान-विज्ञानाची उपासना करावी यावर प्रामुख्याने केंद्रित झाले होते. ‘जातिभेद’ या नावाचे त्यांचे एक पुस्तक आहे. पण त्यातही आपली भूमिका विशेष अभिनिवेशाने मांडलेली नाही. जातिभेद, अस्पृश्यता, विषमता या विषयावर विलक्षण आवेशाने तुटून पडणारा पहिला विचारवंत नेता म्हणजे म. जोतीबा फुले हेच आहेत. सामाजिक समतेसाठी त्यांनी आकाशपाताळ एक केले. प्रचंड चळवळ उभारली. लोकहितवादी हेही बंडखोर होते. पण म. फुले यांच्याप्रमाणे कृतीच्या पातळीवर उतरून सामाजिक स्वरूपाचे लढे त्यांनी उभारले नाहीत. कदाचित आपल्या न्याय खात्यातल्या सरकारी नोकरीमुळे त्यांना अशा प्रकारच्या चळवळी बांधणे शक्य झाले नसेल. पण जातिव्यवस्था ईश्वराने निर्माण केली नाही. ती माणसानेच उत्पन्न केली आणि या व्यवस्थेमुळेच देशाचा अधःपात झाला असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

‘जातिभेद’ हे पुस्तक ऑक्टोबर १८७७ मध्ये प्रसिद्ध झाले. या विषयावर लोकहितवादींनी मुंबईच्या आर्यसमाजात २६ ऑगस्ट १८७७ रोजी जे व्याख्यान दिले त्याचे हे टिपण आहे. जातिसंस्थेचा इतिहास हा पुस्तकात त्यांनी सांगितला आहे. वेदात चार जातींचे वर्णन सापडते, असे ते म्हणतात. ‘ब्राह्मण हे मुखस्थानी, क्षत्रिय हे बाहुस्थानी, वैश्य जानूचे ठिकाणी आणि शूद्र पायांचे ठिकाणी याप्रमाणे लाक्षणिक वर्णन आहे.’ श्लोक देऊन त्याचा अर्थ लेखकाने दिला आहे. वेदात हा उल्लेख आहे याचा अर्थ वेदांनी जातिव्यवस्था मानलेली होती असा करता येईल. पुरुषसूक्ताच्या दहाव्या मंडलात अशाच अर्थाचा एक श्लोक आलेला आहे. तो असा,

> ब्राह्मणोऽस्य मुखमासीत बाहू राजन्यः कृतः।
> उरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत॥

ब्राह्मण हा ईश्वराचे मुख किंवा ईश्वरमुखापासून तो उत्पन्न झाला. ईश्वराच्या बाहूपासून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य आणि शूद्र हे पायापासून निर्माण झाले. हे वर्णन बाह्यतः आलंकारिक वाटते. पण त्यात वरिष्ठ-कनिष्ठ असा क्रम लावलेला आहे. ब्राह्मणाला सर्वोच्च स्थान आणि शूद्राला सर्वांत कनिष्ठ स्थान दिले आहे. याचा अर्थ उच्च-नीच भावाची ही जातिव्यवस्था प्राचीन काळापासून रूढ झालेली आहे. या चार जातींतून किंवा वर्णातून शेकडो-हजारो जाती का निर्माण झाल्या? या प्रश्नाचे उत्तर लोकहितवादी देतात, ‘काही देशांतराने झाले. काही भक्ष्यभेदाने झाले, काही अभिमानाने व काही भाषाभेदाने असे अनेक कारणांनी झाले असे दिसते.’ गावोगाव व हे ज्ञातींचे तंटे फार माजतात. लोक मुख्य गोष्ट व कर्तव्य काय ते हेच, असे समजतात. यामुळे दुष्टपणा व द्वेष इतका दृढ झाला आहे की तो वंशपरंपरा चालत जात असतो. हे दुरभिमान ऐक्यतेचे नाशक होत. ह्या दुरभिमानाने ब्राह्मण बुडाले... क्षत्रिय-रजपूत वगैरे लोकांमध्ये अफू खाण्याची चाल पडली. तेव्हापासून त्यांचे क्षात्र जाऊन ते अतिनिंद्य स्थितीत आले व परस्वाधीन झाले. वैश्य हे असत्याने बुडाले. अशी त्रिवर्णांच्या सद्गुणांची हानी झाली.’

अनुक्रमणिका

जातिभेदामुळे माणसे विभक्त झाली. प्रत्येकाचे बळ कमी झाले आणि परकीयांना आक्रमणाची संधी मिळाली. जातीय एकतेची देशाला आवश्यकता असताना शेकडो वर्षांपासून भेद वाढत गेले आणि त्यात सर्वच जातींचे अधःपतन झाले. हा विचार पुस्तिकेत लोकहितवादींनी मांडलेला आहे. ‘ते जातिभेदाच्या विरोध नव्हते’ अशा आशयाची टीका चुकीची आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार मांडणारे लोकहितवादी जातिवादाचे समर्थक होते असे म्हणत येत नाही. म. फुले यांच्यासारखी अत्यंत कठोर भूमिका त्यांनी घेतली नसली तरी जातींचे व विषमतेचे त्यांनी कुठेही समर्थन केलेले नाही. ‘जातिभेद’ या पुस्तिकेत आणि ‘शतपत्रां’तून मांडलेल्या विचारांतून हे जाणवते की जातिभेद हे राष्ट्रविघातक ठरले असेच त्यांनी सांगितले आहे. ‘लक्ष्मीज्ञान’ या पुस्तकात त्यांनी म्हटले आहे,

‘हिंदू लोक प्राचीन काळी विद्या व ज्ञानाचे शौकी होते. परंतु तो काळ गेलेला. तीन हजार वर्षे सुमारी जाहली. या तीन हजार वर्षांत यांनी काही केले नाही. विद्यावृद्धीचा भाग मूर्खभट खाऊ लागले व इतर लोक अडाणी राहिले. याजमुळे इतके वर्षांत त्यांची स्थिती सारखी राहिली आणि आता चाली बदलल्याशिवाय ही स्थिती बदलेल अशी आशा नाही. भटांनी विद्यावृद्धी व ज्ञानवृद्धीचे काम केले पाहिजे नाहीतर काही दुसरा धंदा केला पाहिजे. हिंदू लोकांचे शहर म्हणजे आळशी लोकांचा समुदाय असतो. त्यांनी गरीब लोकांस पिळून अन्न घ्यावे आणि रिकामे बसून खावे. परंतु हीच शहरे जर उद्योगी लोकांची होतील तर लक्ष्मी वाढेल.’

लोकस्थिती सुधारण्यासाठी उद्योग-व्यापार वाढवला पाहिजे हे सांगून ‘जातिभेद’ पुस्तकात भेदांमुळे लोकांची हानी कशी झाली याचाही स्पष्ट उल्लेख केला आहे. लोकहितवादी हे स्वामी दयानंद यांचे भक्त होते. त्यामुळेही जात आणि वर्ण यांच्या विषमतेला त्यांनी कधीही मान्यता दिली नाही. एक संशोधक या नात्याने जुन्या ग्रंथांत वर्णजातींविषयी कोणते उल्लेख आले आहेत ते त्यांनी आपल्या लेखनात नमूद केले. जातिभेदासारख्या समाजाच्या एकात्मतेला विरोध करणाऱ्या प्रथेला त्यांनी कधीही मान्यता दिली नाही.

### भाषा शैलीची वैशिष्ट्ये

लोकहितवादींच्या लेखनशैलीचा आता येथे विचार करायचा आहे. या लेखकाच्या लेखनपद्धतीवर अनेकांनी आक्षेप घेतले आहेत. नापसंती व्यक्त केली आहे. ‘शतपत्रां’तली भाषा काही ठिकाणी ग्राम्य व शिवराळ आहे. तिच्यात जी प्रौढता आणि सभ्यता पाहिजे ती नाही. त्यामुळे लोकहितवादींचे लेखन सुसंस्कृतपणाचे नाही असा निष्कर्ष त्यांच्या टीकाकारांनी काढला आहे. ज्यांना त्यांच्या विचारातील स्पष्टता आणि तर्कपद्धती आवडली नाही त्यांनी घेतलेले हे पोकळ आक्षेप आहेत. श्री. के. क्षीरसागर, गं. बा. सरदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादी समीक्षकांनी मात्र लोकहितवादींच्या लेखनाचा व शैलीचा यथोचित गौरव केला आहे. त्यांच्या मते लोकहितवादींचे शब्द ‘सहज’ म्हणजे ‘उत्स्फूर्त’ आणि ‘अकृत्रिम’ आहेत. असे शब्दच वाचकाच्या मनावर परिणाम करतात.

‘वाङ्मयामागे जो प्रशस्त व प्रौढ हेतू असायला हवा तो हेतू धरून लिहिलेले गद्य लोकहितवादींनीच अर्वाचीन काळात प्रथम लिहिले. म्हणून लोकहितवादी हे अर्वाचीन मराठी गद्याचे व मराठी निबंधाचे जनक होत.’ हा निष्कर्ष श्री. के. क्षीरसागरांनी काढला आहे. मराठीतला पहिला निबंधकार हा मान लोकहितवादींनाच दिला पाहिजे. त्यांच्यापूर्वी इतके सुबद्ध आणि विचारप्रवर्तक गद्यलेखन मराठीत

अनुक्रमणिका

होत नव्हते, असे म्हणायला हरकत नाही. शिवकाळात आणि पेशवेकाळात काही बखरी आणि पत्रव्यवहार यातून गद्य लिहिले गेले. त्यापूर्वी महानुभावी लेखकांचे गद्यलेखन थोडे फार आहे. इ. स. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांचे ‘दर्पण’ पत्र निघाले. इतरही नियतकालिके प्रसिद्ध होऊ लागली. त्यातून निबंधासारखे लेखन होऊ लागले. दादोबा पांडुरंग, हरि केशवजी व बाबा पदमनजी यांनी काही प्रमाणात निबंधासारखे लेखन केले असले तरी निबंधाचे सर्व घटक त्यांच्या लेखनात आढळत नाहीत. ‘आद्य निबंधकार’ आणि ‘मराठी गद्यशैलीचे प्रवर्तक’ म्हणून लोकहितवादींचाच यथार्थपणे उल्लेख करता येते. मराठी निबंधाला त्यांच्यामुळे आकार आला; सामर्थ्य आले आणि प्रतिपादनाची एक पद्धतीही स्पष्ट झाली. लोकहितवादी हे केवळ निबंधकार नव्हते. ग्रंथकार म्हणूनही ते वाचकांपुढे उभे आहेत. मराठी गद्यशैलीच्या विकासाला लोकहितवादींचा समर्थ हात लागला यात शंका नाही. एखाद्या विषयाचे सुसूत्र, सुबद्ध विवेचन करणे आणि प्रतिपादनात एक विशिष्ट विचार ठाशीवपणे बांधणे; त्याचा प्रमाणबद्ध विस्तार करणे हे निबंधाचे स्वरूप असते. लोकहितवादींच्या निबंधात भरीव विचारप्रतिपादन आहे. विचारामागे लेखकाची तळमळ आहे. ध्येयवाद आहे. समाजाला कसदार विचारांचे खाद्य पुरविण्याची ऊर्मी आहे. त्यामुळे त्यांचा निबंध वाचकाला अस्वस्थ करतो आणि अंतर्मुखही करतो. केवळ मनोरंजनासाठी किंवा वाचकाच्या सामान्य आनंदासाठी हे निबंध आणि ग्रंथ लिहिले गेले नाहीत. विचार हा निबंधाचा केंद्रबिंदू असतो. या कसोटीवर लोकहितवादींचा प्रत्येक लेख घासून पाहता येतो. विविध आणि विपुल व त्याबरोबर अर्थपूर्ण निबंधलेखन करणारे लोकहितवादी हे ‘मराठी गद्याचे जनक’ आहेत यात संदेह नाही. इ. स. १८४८ पासून ते निबंध रचना करीत होते. इ. स. १८६६ मध्ये ‘निबंधसंग्रह’ प्रकाशित झाला. त्यानंतर त्यांनी ग्रंथरूपाने व निबंधरूपाने आपले लेखन चालूच ठेवले.

एक मत असे आहे की, विष्णुशास्त्री चिपळूणकर हेच ‘मराठी निबंधाचे जनक’ आहेत. वस्तुतः १८७४ मध्ये ‘निबंधमाला’ उदयाला आली. लोकहितवादींचे लेखन त्यापूर्वी पंचवीस-सव्वीस वर्षे सुरू होते. चिपळूणकर अधिक लोकप्रिय झाले हे मान्य करूनही मराठी निबंधाला आकार, स्थैर्य आणि प्रतिष्ठा देण्यात लोकहितवादीच प्रामुख्याने कारणीभूत झाले. केवळ लोकप्रियता हा निकष उपयोगी पडत नाही. चिपळूणकरी शैली अधिक लालित्यपूर्ण आहे. तिच्यात उपरोध, उपहास, कोटिक्रम अधिक आहे. पण पहिले निबंधकार म्हणून लोकहितवादींचीच गणना करावी लागते. ‘शतपत्रे’ म्हणजे महाराष्ट्र जीवनातील नव्या प्रागतिक विचारांची एक उच्च ललकारी आहे. पुरोगामित्वाचा तो बुलंद आवाज आहे. येथून एका वैचारिक युगाला आरंभ होतो. ‘शतपत्रां’तले लेख म्हणजे समाजाला उद्देशून लिहिलेली पत्रे आहेत. पत्रातील भाषा ज्याप्रमाणे मनमोकळी असते किंवा असावी त्याप्रमाणे समाजाशी केलेला हा एक आत्मपरीक्षणात्मक मोकळा ‘संवाद’ आहे. तो कुठेही पांडित्याच्या भाराने दबलेला नाही. त्यात पांडित्य भरपूर आहे पण त्याचा अवजडपणा कुठेही जाणवत नाही. म्हणूनच ‘शतपत्रां’तल्या स्पष्ट, फटकळ पण प्रामाणिक भाषेचा वाचकांवर परिणाम होतो. एखाद्या उनाड पोराची बापाने आपल्या पत्रातून तीव्रतेने कानउघाडणी करावी आणि त्याची कर्तव्ये त्याला ठसठशीत शब्दांत, एखाद्या ठिकाणी रागाने शिवी देऊनही पटवून द्यावीत तसे या पत्रात्मक निबंधाचे स्वरूप आहे. मनातले भाव जेव्हा उचंबळून येतात तेव्हा भाषेला आलंकारिकपणाची जरूर नसते. भावनाच स्पष्ट बोलत असते. उदाहरणार्थ भाषेचा हा एक नमुना पहावा.

‘एकास लाथ मारली की दुसरा ‘कां’ म्हणावयाचा नाही. इतके तर हे भित्रे, रांड्ये व निर्बल आहेत. यांचेमध्ये साहस, धैर्य आणि खरेपणा ही प्रायशः नाहीत. जनावरांसारखे हे मूर्ख आहेत. जशा शेतात पुष्कळ चिमण्या खावयास जमतात व त्यांस एक काठी उगारली म्हणजे त्या भर्रकन् उडून जातात. तसे हे ब्राह्मण लोक आहेत. यांची पंगत करावयास मात्र चांगली. परंतु दुसरा उपयोग नाही.’

अनुक्रमणिका

या लहानशा परिच्छेदात भित्रे, रांड्ये, निर्बल, जनावरे, मूर्ख असे शब्द आले आहेत. ते कठोर आहेत. शिवीवाचक शब्दांऐवजी सौम्य आणि सभ्य शब्द योजता आले असते. पण परिणामकारकता मात्र कमी झाली असती. 'पिता' आणि 'बाप' हे दोन्ही शब्द समान अर्थाचे असले तरी मनातला राग व्यक्त करण्यासाठी आपण 'बाप' हा शब्द निवडतो. 'मी अमुक अमुक केले तर त्यात तुझ्या बापाचे काय गेले? असे म्हणतो. शब्दांनी इष्ट तो परिणाम साधला पाहिजे. लोकहितवादींचे शब्द रंजवण्यासाठी नाहीत ते रागावण्यासाठी, शिकवण्यासाठी आणि अस्वस्थ करण्यासाठी आहेत. त्या दृष्टीने 'शतपत्रां'तली भाषा काही ठिकाणी शिष्टाचाराची मर्यादा ओलांडणारी वाटली तरी तिच्यात आवेश आणि सामर्थ्य आहे. विचार पेटवण्यासाठी असे जळजळीत शब्द योजावेच लागतात. केशवसुतांनी 'गोफण' या कवितेत, 'कठिण शब्द या धोंड्यांनी करितो हाणाहाण' असे म्हटले आहे किंवा कवितेत सहसा न येणारा शब्दही ते बिनदिक्कत योजतात, उदाहरणार्थ,

'रडोत रडतिल रांडापोरे' पण अशा शब्दांना जो बोचक स्पर्श आणि अर्थ असतो, तो मानसिक परिणाम करण्यासाठी आवश्यक असतो. 'शतपत्रा'तला विचार अगदी मवाळ आणि बुळबुळीत शब्दांतूनदेखील सांगता येणे शक्य आहे. पण त्याने काय परिणाम साधणार? लेखन आणि भाषण हे वाचक-श्रोत्यांच्या मनावर ठसविण्यासाठी असते. लोकहितवादींच्या शब्दात जी जळजळ आहे ती त्यांच्या मनातली तळमळ घेऊन प्रकट झाली आहे. 'शतपत्रे' हा ग्रंथ जितका त्यातल्या प्रगतिवादी विचारांनी गाजला तितकाच तो त्यातल्या कमालीच्या स्वच्छ आणि फटकळ भाषेनेही गाजला. जेव्हा आशयात तीव्रता असते तेव्हा अभिव्यक्तीदेखील तीव्रच होते. हजार वर्षे झोप घेत पडलेल्या निष्क्रिय समाजाला जागे करण्यासाठी, त्याला गदगदा हालवून आणि आरडाओरडा करून उठवणे आवश्यक ठरते. अंगाईगीत गाऊन काहीच उपयोग नाही. वर दिलेल्या उताऱ्यात 'भित्रे, रांड्ये व निर्बल' ही तीन विशेषणे चढत्याक्रमाने आणि वाढत्या आवेशाने आल्यामुळे लेखकाच्या मानसिक आवेगाचे दर्शन घडते. 'शतपत्रां'ची भाषा ही दैनंदिन व्यवहारातली आहे. ती उच्चप्रतीची असती तर समाजाला कळलीच नसती. अज्ञानी बनलेल्या लोकांच्या विचारात स्थित्यंतर घडवण्यासाठी त्यांना कळेल त्या भाषेतच लिहिले पाहिजे. लोकहितवादी आपल्याशी अंतःकरणापासून बोलत आहेत हा अनुभव 'शतपत्रां'तून येतो. साहित्याचे हेच महत्त्वाचे यश असते. भाव प्रकट करणे हे भाषेचे कार्य आहे. जी भाषा भावनेचा स्पर्श देत नाही तिला व्याकरण असले तरी अंतःकरण नसते. दुसरे असे की 'शतपत्रां'त लेखकाच्या मनातली चीड, राग वगैरे भावना जशा दिसतात त्याप्रमाणेच हा समाज सुखी व्हावा; उद्योग-व्यापारातून संपन्न व्हावा; त्याने अनिष्ट रूढी बाजूला सारून प्रगती साधावी हा शुद्ध आपुलकीचा भावही त्यातून प्रकट झाला आहे. 'शतपत्रे' हे मराठी गद्य वाङ्मयातले सुंदर स्थळ आहे, असे विधान करतो. आणखी एकच अवतरण देतो. लोकहितवादींचे व्याकुळ अंतःकरण त्यातून व्यक्त होते.

'अरे अरे! फुकट हे ब्राह्मण लोक गर्वाने जळतात! मागील गोष्टी मनात कशास आणतात? मी तुम्हांस पुसतो की, जेव्हा तुम्ही आपले जावयाचे मरणाची खबर ऐकता आणि तुमची तर कन्या लहान! तिचे आणि जावयाचे अजून दर्शन झाले नाही, असे असता त्या लहान अर्भक बालकाविषयी तुम्ही आपले मनात निष्ठुरपणा का आणिला? आणि आपले कन्यास तुमचे तुम्हीच खाटीक का होता बरे? अरे परकी लोक यांनी जर तुमच्या कन्या रस्त्यांतून जाताना पाहिल्या तर त्यांची अवस्था पाहून अंतःकरण चरचरा भाजते आणि दया उत्पन्न होते. परंतु तुम्ही आई-बाप, भाऊबंद, शहाणे व विचार करणारे व बरे-वाईट जाणणारे असे असून एवढा तुमच्या घरातील अनर्थ तुमच्याने दूर कसा होत नाही? तुम्ही आपल्या स्त्रिया व कन्या

मूर्खपणाचे अवस्थेत जन्मापासून बाळगिल्या आहेत. म्हणूनच हा तुमचा जुलुम त्याजवर चालतो व त्या सोसतात.'

मनाचा ठाव घेणारा हा सहजसुंदर जिवंत उतारा मराठी निबंधात खरोखर दुर्मिळ आहे. स्त्रीविषयक सहानुभूती आणि करुणा याबरोबरच राग आणि द्वेष यांचाही प्रत्यय देणारा हा परिच्छेद लेखकाच्या अंतरंगातील भावकल्लोळाचे दर्शन घडवतो. लोकहितवादी पुढे म्हणतात,

'आता पुरे करा. आजपर्यंत विधवा जाळिल्या तितक्या पुरे करा. तुम्ही म्हणाल की इंग्रज लोकांनी जशी सती बंद केली तसेच हेही करावे. परंतु विधवांची लग्ने करावयास इंग्रज इकडे आले नाहीत. तुमची तुम्हास खबर नाही मग त्यांस कशास असावी? ते दूरचे लोक. तुम्ही मेलेत तर त्यांस सुतक येणार नाही हे ध्यानात धरा.'

या शब्दांतली परिणामकारकता आणि वक्तृत्व यावर भाष्य करण्याचे कारण नाही. ही जातिवंत बोलभाषा आहे. तिच्यातल्या अकृत्रिम जिव्हाळा हे 'शतपत्रां'चे वैशिष्ट्य आहे. समाजाला उद्देशून लिहायचे असल्यामुळे या लेखनात तत्त्वजडता किंवा पांडित्याचा वरचष्मा जाणवत नाही. 'शतपत्रां'त बुद्धिवादी विचार आहे पण तो रुक्षपणाने प्रकट होत नाही. भावनेने भिजलेला विचार हृदयाला केवळ स्पर्श करीत नाही तर तो हृदयाला व्यापून टाकतो. लोकहितवादींनी रूढीवाद्यांना, पोथ्या-पुराणांतच राहिलेल्या पंडितांना 'टोणपे', 'मूर्ख', 'बैल' असल्या शब्दांनी 'गौरविले'. त्यांच्या भाषेत आक्रमक आवेग आहे. म्हणून ही भाषा योग्य नव्हे. हा केवळ शिवराळपणा झाला. यातून समाजाचा तेजोभंग होतो. याप्रकारची भाषा सुधारणेला अनुकूल ठरू शकत नाही. प्रबोधनाचे मूळ उद्दिष्टच अशिष्ट शब्दांनी सफल होऊ शकत नाही. अशी टीका कित्येकांनी केली आहे. पण रूढींच्या घाण्याभोवती पिढ्यान्‌पिढ्या फिरत राहिलेल्या बैलबुद्धी समाजाचा मनोभंग करण्याची आवश्यकता होती. ओवीप्रमाणेच कधी कधी शिवीदेखील उच्चारावी लागते. जो समाज केवळ परंपरा म्हणून अंधपणाने आपल्याच कन्याभगिनींना सती जायला भाग पाडतो. केशवपनाची सक्ती करतो; निष्पाप स्त्रियांचा छळ करतो त्याला टोणपे म्हणण्यात किंवा शिव्या देण्यात काय गैर आहे? या बाबतीत लोकहितवादींची भाषा समर्थ शैलीने अर्थपूर्ण बनली आहे. ते चिडून म्हणातात,

स्पष्ट विचार, निर्भय प्रतिपादन आणि काळजाला भिडणारी जिवंत बोलभाषा यातून लोकहितवादींच्या शैलीचे वैशिष्ट्य जाणवते. या भाषेत तेज आहे. ओज आहे. ठसठशीतपणा आहे. त्यामुळेच 'शतपत्रां'नी महाराष्ट्राच्या समाजमनात खळबळ उडवून दिली. इतकी की लोकहितवादी म्हणजे 'शतपत्रे' आणि 'शतपत्रे' म्हणजेच लोकहितवादी अशी एकरूपता मराठी साहित्यात तयार झाली. म. फुले यांच्या भाषाशैलीवरही टीककारांनी असेच आक्षेप घेतले. फुल्यांच्या भाषेतही आवेग आणि आक्रमकता आहे. ज्याचे अंतःकरण सामाजिक अन्यायाने जळत असते. त्यांच्या भाषेत दाहकता येणारच! तो गुण आहे दोष नव्हे.

'शतपत्रां'च्या लेखनानंतर लोकहितवादींनी पुढे अनेक ग्रंथ लिहिले. पण पुढील ग्रंथांतील त्यांची भाषाशैली बदलेली दिसते. शैलीत बदल होण्याचे कारण विषयात आणि आशयातही असते. वय हेदेखील कारण असते. त्यांच्या पुढील ग्रंथातल्या शब्दकळेचे नमुने येथे देत नाही पण त्यांचे विविधस्वरूपी साहित्य हे जितके वाचनीय त्यापेक्षा अधिक ते चिंतनीय आहे. लोकहितवादींच्या अन्य ग्रंथांची शैली 'शतपत्रां'हून वेगळी आहे. लोकहितवादी हे विद्यापीठपूर्व युगाचे प्रतिनिधी लेखक आहेत. १८७० पर्यंतच्या काळातली

लेखनशैली साधी, सुबोध अशी होती. पण पुढे मात्र विद्यापीठाची स्थापना झाल्यावर मराठी शैलीवर संस्कृत आणि इंग्रजी भाषेची अधिक छाप पडू लागली. लोकहितवादींच्या शैलीवर हा प्रभाव नाही. पण त्यांची भाषा पूर्वीइतकी सुबोध राहू शकली नाही. स्फुट निबंध आणि ग्रंथ यांच्या भाषापद्धतीत फरक पडणे स्वाभाविक आहे. एक मात्र खरे की लोकहितवादींचे लेखन आत्मप्रदर्शनासाठी नव्हते. विशिष्ट विचारांचे समर्थन रोखठोकपणे त्यांना करायचे होते. 'मराठी गद्यलेखनशैलीचे आद्यप्रवर्तक' म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो तो यथोचित आहे. त्यांच्या शैलीचे कित्येक गुणविशेष त्यांच्या इतर पुस्तकांच्या आधाराने दाखविता येतील. पण केवळ शैलीचाच विचार करणे येथे अभिप्रेत नाही. लोकहितवादींच्या साहित्याचा प्रधान गुणधर्म लोकांना प्रबोधन युगाकडे घेऊन जाणे हाच होता. ज्ञानप्रसार आणि प्रगतिकारक विचारांचे वितरण ही महत्त्वाची उद्दिष्टे त्यांनी दृष्टीसमोर ठेवली होती. मराठीच्या नगरीत नवयुगाची द्वाही फिरविण्यासाठी त्यांनी विपुल लेखन केले. 'प्रबोधनयुगाचा अग्रदूत' अशी पदवी त्यांना देणे उचित होईल. 'शतपत्रे' लिहिल्यानंतर पुढे आणखी चाळीस वर्षे त्यांनी आपला व्यासंग वाढवला. सामाजिक चळवळी केल्या. सभा-संमेलने घेतली. नियतकालिके चालवली. सारे आयुष्यच परिवर्तनवादी विचार देण्यात व्यतीत केले. अनुभवाला वेगवेगळे कंगोरे मिळाले यातून त्यांच्या भाषेलाही नवी सामर्थ्ये प्राप्त झाली.

अनुक्रमणिका

## ३. आर्थिक आणि राजकीय विचार

### स्वातंत्र्य कसे गेले?

आपला हा खंडतुल्य भारतदेश मूठभर इंग्रजांच्या हातात कसा पडला? इंग्रजांनी हा देश सहजपणे जिंकून घ्यावा इतका तो खिळखिळा कसा झाला? या प्रश्नांची उत्तरे अनेक विचारवंतांनी अनेक प्रकारांनी दिली आहेत. लोकहितवादींनी स्वातंत्र्यनाशाची कारणमीमांसा केलेली आहे. 'हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे' या 'शतपत्रां'तील लेखांतून त्यांनी या प्रश्नाचा विस्तृत परामर्श घेतला आहे. आळस, उदासीनता, अज्ञान, प्रारब्धवादी निवृत्तीपर वृत्ती, राष्ट्रीय जाणीव नसणे आणि एकतेचा अभाव इत्यादी कारणे देऊन त्यांनी चर्चा केली आहे. एखादा देश पारतंत्र्यात पडतो याची बहुधा हीच कारणे असतात. त्यातही 'राष्ट्रीय जाणीव' नसणे हे विशेष सबळ कारण आहे. आपण सर्वजण एका राष्ट्राचे अविभाज्य घटक आहोत याची जाण हिंदी लोक हरवून बसले होते. व्यापार-उद्योगाच्या निमित्ताने आलेल्या धूर्त इंग्रजांनी हिंदुस्थानातले प्रत्येक राज्य दुबळे झाले आहे हे ओळखले. लोकहितवादींनी केलेली ही कारणमीमांसा बरोबर वाटते. पण विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केलेली कारणमीमांसा बालिशपणाची वाटते असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांनी चक्रनेमिक्रमवादी विचार मांडला आहे. आपला विचार स्पष्ट करताना चिपळूणकर रहाटगाडग्याचा दृष्टान्त घेतात. फिरणारे रहाटगाडगे कधी वर तर कधी खाली येते. त्याची गती चालू राहाते. चक्र फिरताना वरची बाजू खाली व पुन्हा वर जाते. त्याप्रमाणे हिंदुस्थान पारतंत्र्यात गेला. सद्दी फिरली, नशीब फिरले की असे घडते. पण पुन्हा या देशाला स्वातंत्र्याची प्राप्ती होऊ शकते. असे चिपळूणकरांचे विचार आहेत. खरे तर एक विचारवंत लेखक या प्रकारचा केवळ दैववादी सिद्धान्त मांडतो आणि सारी जबाबदारी नशिबावर टाकतो याचे आश्चर्य वाटते. 'आमच्या देशाची स्थिती' या नावाने एक दीर्घ निबंध त्यांनी 'निबंधमाले'तून लिहिला आहे. त्यात त्यांनी काढलेला निष्कर्ष असा आहे :

'आमच्या देशास काही एक झालेले नाही. त्याची नाडी साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा काही एक विकार नाही. यास्तव आमच्या अर्वाचीन पंडित मंडळीने डाक्तरी पद्धतीस अनुसरून एकावर एक जालिम दवे सुरू करून व शस्त्रक्रियेचे तीव्र प्रयोग करून त्याची जी हलाखी मांडली आहे व विनाकारण विटंबना आरंभली आहे ती सर्व सोडून देऊन साधारण पौष्टिकाचे उपचार त्याजवर सुरु झाले असता तो लवकरच पुन्हा पहिल्यासारखा सशक्त व तेजस्वी होईल. याविषयी आम्हांस बिल्कुल संशय नाही.' ही विचारसरणी हास्यास्पद आहे. 'आमच्या देशास काही एक झाले नाही' हे विधान ऐन पारतंत्र्याच्या काळात चिपळूणकर करतात. याचा अर्थ त्यांना सत्य दिसत नव्हते किंवा त्या सत्याला सामोरे जाण्याचे धैर्य त्यांच्यामध्ये नव्हते. चिपळूणकरांच्या पूर्वी पंचवीस-तीस वर्षे लिहिल्या गेलेल्या लोकहितवादींच्या निबंधात मात्र देशाच्या पराधीनतेची तर्कशुद्ध चर्चा त्यांनी केली आहे. पण स्वतःला 'मराठी भाषेचा शिवाजी' म्हणवून घेणारे इतिहासाचे अभ्यासक चिपळूणकर दैवगतीकडे बोट दाखवतात. 'स्वातंत्र्य का लयाला गेले?' दैवगती. सद्दी फिरली. खाली गेलेले रहाटगाडगे पुन्हा वर येईलच. या प्रकारची सोपी, बाळबोध मीमांसा तर एखादा सामान्य अशिक्षित मनुष्यदेखील करणार नाही. लोकहितवादी, न्या. रानडे, स्वामी दयानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर इत्यादी विचारवंतांनी देशाच्या दुःस्थितीची चिकित्सा अधिक व्यापक आणि संशोधक वृत्तीने केली आहे. चिपळूणकर केवळ पूर्वजांचा गौरव करतात. सांस्कृतिक परंपरांचे गुणगान करतात. भावनेच्या पातळीवर जातात. वस्तुनिष्ठ छाननी मात्र करू शकत नाहीत. 'मराठी व इंग्रज' या न. चिं. केळकरांच्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत इतिहासाचे अभ्यासक वासुदेवशास्त्री खरे यांनी केलेली मीमांसा अधिक मार्मिक आहे. ते म्हणतात.

अनुक्रमणिका

'देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हाव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय इत्यादी दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगी जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्राशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही. हिंदुस्थान जर इंग्रजांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतलेच असते. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता त्यातले कोणते फुटावयाचे, मातीचे की लोखंडाचे हे ठरलेलेच आहे.' वासुदेवशास्त्री खरे यांनी ही कारण चिकित्सा १९१८ साली केली आहे. अगदी याच आशयाची चर्चा लोकहितवादांनी त्यांच्या आधी सत्तर वर्षे केली आहे. इतिहासाचे चिंतन आणि समीक्षण त्यांनी वस्तुनिष्ठ दृष्टीने केले हे यावरून स्पष्ट होते. इतिहास हा त्यांच्या नित्य अध्ययनाचा विषय होता. यातूनच त्यांनी इतिहास सांगणारी काही पुस्तके लिहिली.

## इंग्रजांनी चालविलेले आर्थिक शोषण

हिंदुस्थान देश दरिद्री होत चालला याच्या कारणांचा शोध लोकहितवादींनी घेतला. त्यांनी जो प्रबंध लिहिला त्याचे शीर्षक 'हिंदुस्थानास दरिद्र येण्याची कारणे आणि त्याचा परिहार व व्यापाराविषयी विचार' असे आहे. सन १८७६ मधले हे पुस्तक. भारतातील इंग्रजी अंमलाचे लोकहितवादींनी अनेक स्थळी समर्थन केलेले आहे. त्यामुळे ते इंग्रजांचे एक पक्षपाती चाहते आहेत अशी त्यांच्यावर कित्येकांनी टीका केली होती. ब्रिटिश राजवटीमुळे हिंदुस्थानचे फार मोठ्या प्रमाणात सतत आर्थिक शोषण होत आहे त्यामुळे देश उत्तरोत्तर कंगाल होत चाललेला आहे असा ठाम सिद्धान्त या पुस्तकातून त्यांनी अनेक उदाहरणे घेऊन आणि आकडेवारी देऊन मांडला आहे. या पुस्तकाला दादाभाई नवरोजी यांच्या 'Poverty and un British rule in India' या पुस्तकाचा आधार आहे. पण 'शतपत्रां'तूनही इंग्रजांनी चालवलेल्या आर्थिक शोषणाबद्दल त्यांनी लिहिले होते. ते इंग्रजी राज्याचे समर्थक होते. पण अंधभक्त नव्हते. समर्थनामागे डोळस विवेक होता. आणि विरोधामागेही तर्ककठोर चिकित्सा आहे. इंग्रजी राज्याच्या अर्थनीतीवर कडक टीका करून या अर्थनीतीचे नागडे-उघडे दर्शन घडवण्यासाठी त्यांनी 'इन्दुप्रकाश' पत्रातून आठ लेखांक लिहिले. इंग्रजपूजक ही लोकहितवादींची काही जणांनी चितारलेली प्रतिमा कशी निखालस चुकीची आहे हे या पुस्तकावरून सिद्ध होते. निरीक्षणातून आणि चिंतनातून जे निष्कर्ष मिळतात ते प्रामाणिकपणे सांगणे हेच अभ्यासकाचे काम असते. काही निष्कर्ष अनुकूल तर काही प्रतिकूलही असतात. इंग्रजांची अर्थनीती समूळ उघडी करून तिचा फसवेपणा त्यांनी दाखवला आहे 'ग्रामरचना', 'लक्ष्मीज्ञान' या दोन्ही पुस्तकांत शेती आणि व्यापार या क्षेत्रांत देश कसा खालावत चालला हे त्यांनी सोदाहरण दाखवले आहे. इंग्रजी राज्यात रयत भिकारी होत चालली. रुपयाचे चार आणेसुद्धा येत नाहीत आणि रोजगार फक्त साहेब लोकांना मिळतो. इथल्या लोकांकडे सरकारचे लक्ष जात नाही. तो कर्तबगार असला पदवीधर असला, तरी एखाद्या गोऱ्या साहेबाची मात्र वर्णी लागते. लष्करी खात्यात, रेव्हेन्यूत, इंजिनियरिंगमध्ये नेटिव लोक काम करीत असले तरी अधिकाराच्या जागा मात्र त्यांना देण्यात येत नाहीत. राज्यात नेटिवांना न्याय मिळत नाही अशी निःसंदिग्ध टीका त्यांनी केली आहे. 'इंग्रज सरकारचे कर्तव्य एवढेच आहे की हा देश धनवान झाला पाहिजे. या देशात पार्लमेंट स्थापन झाले पाहिजे. देशातील लक्ष्मीचे शोधन झाले पाहिजे आणि मोठाले अधिकार प्रजेस मिळाले पाहिजेत.' ही स्पष्ट मागणी त्यांनी केली आहे. जुन्या काळातली सरकारे आर्थिक शोषण करणारीच होती. पण प्रजेचा पैसा या देशातच राहात होता. राजेरजवाड्यांनी उधळलेला पैसा पुन्हा प्रजेकडे परत येत होता. पण इंग्रजांचे आर्थिक शोषण याहून भयंकर आहे. प्रत्येक वर्षी या देशाला दहा कोटींची खंडणी भरावी लागते. जे द्रव्य गेले ते गेलेच. त्याची वाट काय? असा निरुत्तर

करणारा प्रश्नही त्यांनी विचारला आहे. आपल्या येथील देशी कागदांचे सर्व कारखाने ओसाड पडले. लोखंडाचे कारखाने रद्द झाले. सर्व उद्योग बुडाला. जमीन नांगरण्याची मात्र राहिली. या प्रकारचे वास्तव चित्र लोकहितवादींनी काढले आहे. इंग्रजी राज्यामुळे काही लाभ झाले हे मान्य करूनही आर्थिक आणि औद्योगिकदृष्ट्या देश अधिकाधिक दारिद्र्याच्या खोल खड्ड्यात ओढला जात आहे यावर त्यांनी बोट ठेवले आहे. भिकाऱ्यांची वाढती संख्या, वस्त्रप्रावरणांचा अभाव, उपासमार, कष्टांना योग्य मोबदला मिळत नाही याचे कारण हिंदुस्थानची संपत्ती इंग्रजांनी चालवलेल्या शोषणामुळे परदेशात चालली आहे असा आरोप लोकिहतवादी करतात. त्यांनी एक उदाहरण दिले आहे. युरोपिअन लोक या देशात नोकरी करतात. त्यांना आठ कोटी रुपये वेतन द्यावे लागते. यापैकी एकचर्तुथांश रक्कम ते येथे खर्च करतात. बाकीचा पैसा परदेशी जातो. ब्रिटिशांच्या अर्थनीतीची लक्तरे लोंबवताना लोकहिवादींनी ठिकठिकाणी आकडे आणि उदाहरणे यांचा आधार घेतला आहे. इंग्लीश राज्यकर्त्यांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी १८७६ मध्ये कशी बदलली होती याचे येथे प्रत्यंतर येते.

## इंग्रज देवांना वीस कोटींचा नैवेद्य

हिंदुस्थानच्या दुरवस्थेबद्दल लिहिताना आर्थिक आणि विशेषतः राजकीयदृष्ट्या एका महत्त्वाच्या कारणावर त्यांनी बोट ठेवले आहे. हिंदू लोकांना कौंसिलात जाता येत नाही. अधिकाराच्या क्षेत्रात त्यांना प्रवेश मिळत नाही. कर बसवताना रयतेचा विचार न करता हे इंग्रज अधिकारी खुषाल नवे कर बसवतात. भाड्याच्या उंटावर जबरदस्त ओझी लादावीत तशी जनतेची अवस्था झाली आहे. आर्थिक आणि राजकीय शोषणाबद्दल लोकहितवादींनी उठवलेला हा विरोधी आवाज लक्षात घेता लोकहितवादी इंग्रजनिष्ठ होते ही टीका केवळ वेडेपणाची वाटते. न्यायदानाचे काम त्यांनी अनेक ठिकाणी केले होते. त्यामुळेच जे इष्ट असेल त्याचे समर्थन आणि जे अनिष्ट असेल त्याला विरोध ते करीत असत. नेटिव लोक आणि इंग्रज अधिकारी यांच्या परस्परसंबंधावरही त्यांनी खरपूस टीका केली आहे. इंग्रज अधिकाऱ्यांना आपल्या जेतेपणाची घमेंड असल्यामुळे ते येथील जनतेशी संपर्क ठेवीत नाहीत. त्यांना या देशातील लोक तुच्छ वाटतात. या देशाचे कोट्यवधी रुपये दरवर्षी इंग्रजांनी बळकावयाचे आणि लोकांना मात्र दूर ठेवायचे ही चीड त्यांच्या लेखनातून स्पष्ट दिसते. हा आरोप अनुभवावर आधारलेला आहे. कारण लोकहितवादींइतके कार्यक्षम, न्यायी आणि ज्ञानी अधिकारी इंग्रजांमध्ये क्वचितच असतील. पण हिंदी लोकांना ज्या पद्धतीची वागणूक मिळत होती तिचे शल्य त्यांच्या मनात खूपत होते. त्यांनी आपली भावना तीव्र शब्दांत व्यक्त केली आहे. ते म्हणतात,

‘साहेब लोकांमध्ये जात्यभिमान आहे. त्यांचा मत्सर इतका दीर्घ आहे की, ब्राह्मण जेवावयास मात्र निषेध धरितो; परंतु बाकी व्यवहारात तो सारखेपणा राखतो, परंतु इंग्रजांचा नियम असा आहे की, नोटिव लोकांशी कोणताही व्यवहार ठेविला की, त्यास वाळीत पडेल इकते जज्ज, कलेक्टर व असिस्टंट वगैरे आहेत. परंतु कोणत्याही नेटिव लोकांस ते आपणाबरोबर मानीत नाहीत व कोणाचे घरी जात नाहीत. आता जिल्ह्यात त्यांचे बरोबरीचे कोणीच नाहीत काय? परंतु नेटिवाशी व्यवहार ठेवणे हे अति नीच काम आहे असा त्यांचा निर्बंध आहे. तो ते तोडीत नाहीत. कोणी राजे असले तर त्यांस मात्र ते आपल्या बरोबरीचे समजतात, बाकी कोणास समजत नाहीत. हिंदुस्थानचे सांप्रतकाळी हे देवच आहेत, परंतु पूर्वीचे देवांची तृप्ती तूप, तांदूळ फार झाले तर दोन-चार बकरी दिली तर होत होती. या देवांस वीस कोट रुपयांचा हविर्भाग दिला तरी प्रसन्नता नाहीच असा हा धनमेध हल्ली चालविला आहे. आता या मानाने नेटिव लोकांची भक्ती उडत चालली.’ (हिंदुस्थानला दरिद्रता येण्याची कारणे)

इंग्रजांची चालवलेल्या आर्थिक शोषणाबद्दल ते केवळ आपला संताप आणि विरोध व्यक्त करीत नाहीत तर देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी मार्गही सुचवतात. यंत्रज्ञान आणि तंत्रज्ञान यात आपली प्रगती झाली पाहिजे खाणीतून कोळसे काढले पाहिजेत; धांतूच्या खाणीचे शोध केले पाहिजेत; काच तयार करणे; कापड विणणे; लहान लहान उद्योगधंदे काढण्यासाठी माहिती मिळवणे; स्वावलंबी होण्याचा निश्चय करणे; परदेशी उत्पादनावर बहिष्कार टाकणे; असे कितीतरी उपाय त्यांनी सुचवले आहेत. स्वतंत्र देशाचे स्वन्प त्यांच्या दृष्टीसमोर अस्पष्टपणे का होईना पण तरळत होते. एका अर्थाने लोकहितवादींच्या साहित्यात नव्या हिंदुस्थानची रुपरेषा पाहायला मिळते. त्यांच्या विचारातील काही अंश पुढीलप्रमाणे आहेत :

१. देशात जी काही संपत्ती राहिली आहे तिचा योग्य विनियोग करून संपत्तीत भर टाकण्याच्या योजना आखाव्यात.

२. आपल्याला दरिद्री करणाऱ्या सर्व चाली सोडून द्याव्यात. दोन रुपयांत मुंज, पाच रुपयांत लग्नेही करावीत, पण द्रव्य रक्षावे.

३. यंत्रांची सिद्धी करावी. ती अशी की ज्यामुळे हजारो माणसांच्या मेहनतीला आधार मिळेल. परिश्रमांतून उद्योग वाढेल.

४. परदेशाचा माल वापरण्याची खोड अगदी सोडून द्यावी. म्हणजे अर्थात् देशात द्रव्य राहील व येथील लोकांस उत्तेजन मिळेल.

५. मुत्सद्दीपणा, वैद्यगिरी, इंजनेरी काम या सरकारचे रीतीप्रमाणे शिकून, सरकारी चाकरीत जितका अधिक प्रवेश होईल तितका करावा.

इंग्रजांचे व्यापार आणि रोजगार इकडे कमी व्हावेत आणि आपला व्यापार-रोजगार वाढावा असा विचार त्यांनी स्पष्टपणे सांगितला आहे. 'शतपत्रां'त ही हेच विचार आहेत. त्यांचे अधिक विस्तृत आणि साधार स्पष्टीकरण या ग्रंथात केले आहे. 'हिंदुस्थानला दरिद्रता येण्याची कारणे' हा प्रबंध लोकहितवादींच्या आर्थिक विचारातली मौलिकता व सूक्ष्मता जशी दाखवतो तशीच त्यांच्या राष्ट्रभक्तीचेही दर्शन घडवतो. इंग्रजी राज्यकर्त्यांवर जशी त्यांनी कारणांसाठी पूर्वी स्तुतीची फुले उधळली होती तशीच त्यांच्यावर कठोर टीकेचे मर्मभेदक प्रहार करायलाही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. आपल्या देशाला दारिद्याकडे घेऊन जाणारी इंग्रजी राज्याची अर्थनीती हे त्यांच्या टीकेचे 'लक्ष्य' बनलेले आहे. लोकहितवादी हे इंग्रजांचे वकील नव्हते, त्यांचा न्याय करणारे न्यायाधीश होते. हेच खरे आहे.

हा विचारवंत उच्च मध्यमवर्गीय असला आणि प्रामुख्याने तो शहरी भागात वावरला असला तरी न्यायखात्यातल्या नोकरीमुळे आपल्या देशातले भिन्नभिन्न सामाजिक स्तर त्यांनी पाहिले होते. खेड्यापाड्यांतल्या सामान्य माणसांच्या प्रश्नांची त्यांना जाण होती. सुशिक्षित ब्राह्मणवर्ग त्या काळात ग्रामीण जीवनापासून अलिप्त असायचा. पण शेतकरी, कामकरी, विणकर, मजूर आणि ग्रामीण भागातील हलाखीचे जीवन या गोष्टी त्यांना परिचित होत्या. न्यायाधीश या नात्याने अनेक प्रकारचे नागर आणि ग्रामीण जीवनातले प्रश्न त्यांच्यासमोर येत असत. ते केवळ 'कुटुंब सुधारक' नव्हते. शहरी मध्यमवर्गीयांच्या समस्यांतच त्यांना रस होता असा गैरसमज कोणीही करून घेऊ नये. शेती, वारंवार पडणारे दुष्काळ आणि

मोलमजुरी करणारा वर्ग यांचेही अवलोकन त्यांनी केले होते. 'महाराष्ट्र देशातील कामगार लोकांशी संभाषण' हे त्यांच्या एका पुस्तकाचे शीर्षक आहे. 'ग्रामरचना' हा त्यांचा ग्रामव्यवस्थेसंबांधीचा ग्रंथ त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणावर प्रकाश टाकणारा आहे. इ.स. १८५० ते १८८० या काळात खेड्यांतला शेतकरी वर्ग गरिबीमुळे कसा गांजलेला आणि खंगलेला होता याचे चित्र त्यांनी तपशिलासह उभे केले आहे. जिवापाड मेहनत करूनही सरकार आणि सावकार यांच्या कात्रीत सापडलेला शेतकरी किती हीन-दीन झाला आहे आणि शासनाने तिकडे कसे दुर्लक्ष केले आहे हेही लेखक स्पष्ट करतो.

'हल्ली शेतकरी गरीब, अन्नाला महाग आणि संसार हाकण्यास असमर्थ झालेले असतात. सरकारचे कर, सारे व धारे अतिशय जबर असून ते भरण्याचे दीन कुळंब्यांना मोठे संकट पडते. गरिबांची सर्व प्रकारे अनास्था आणि दुर्दशा आहे. काय करतील बिचारे! दूरगावी झोपड्यांत आपली पोरे टाकून लाकडांचे, गवताचे व पानांचे भारे नेऊन विकणाऱ्या लेकुरवाळ्या बायांकडे पाहून कोणा पाषाणहृदयास द्रव येणार नाही? पण करावयाचे काय? हा प्रकार केवळ अयोग्य कारभाराचा आणि प्रजाहिताविषयी असणाऱ्या औदासीन्याचा होय. जमिनीपासून उत्पन्न होणारा एक रुपया, सरकार घेणार आठ आणे, या सरकारी धाऱ्यांशिवाय शेतकऱ्यास लोकल फंड, स्टँप, रजिस्टर्ड वगैरे संबंधाने पुष्कळ खर्च सोसावा लागतो. सारांश, शेतीच्या कामात त्यांस बरकत म्हणून राहिली नाही. (ग्रामरचना, पृष्ठ ५१)

शेतकऱ्यांची दुरवस्था अन्याय्य शेतसाऱ्यामुळे झालेली आहे, असे मत व्यक्त करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे मान लक्षात घेऊन सारे ठरवणे आवश्यक होते. पण ही प्राथमिक दक्षताही शासनाने घेतली नाही. अशी टीका त्यांनी केली आहे. एका बाजूला सरकार आणि दुसऱ्या बाजूला सावकार दोघेही शेतकऱ्याचे शोषण करीत होते. शेतकरी आणि कामकरी यांच्या प्रश्नात लोकहितवादींनी केवळ सहानुभूतीने लक्ष घातले नाही तर आपल्या देशाचे हे महत्त्वाचे घटक असून त्यांच्यावर आपला आर्थिक अभ्युदय अवलंबून आहे हे गृहीत धरून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला त्यांनी वाचा फोडली आहे. महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांनी खेड्यापाड्यांतील लोकांच्या व्यथावेदना ओळखल्या होत्या याचे हे उदाहरण आहे. लोकहितवादींनी 'ग्रामरचना' हा ग्रंथ लिहिला. म. फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ लिहिला. कर्मवीर शिंदे, राजर्षी शाहूमहाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर या सर्वांनीच शेतकरी आणि कष्टकरी यांच्या दुःखाबद्दल आणि शोषणाबद्दल पोटतिडिकेने लिहिले आहे. मूठभर सुशिक्षितांचे प्रश्न सुटले म्हणजे देश सुधारत नाही. श्रमाला देव मानणारे, घाम गाळणारे वेगवेगळ्या स्तरांतले लोक यांच्याही जीवनक्रमात प्रगतिकारक बदल झाले पाहिजेत. हे भान लोकहितवादींना होते आणि पुढील काळातील सुधारकांनी शेतकरीवर्ग हा आपल्या कार्याचा एक महत्त्वाचा बिंदू मानला. त्यामुळेच सामाजिक सुधारणेची चळवळ व्यापक बनली.

## ऐहिक जीवन समृद्ध व्हावे

'लक्ष्मीज्ञान', 'हिंदुस्थानला दरिद्र येण्याची कारणे', 'ग्रामरचना' या तीन महत्त्वाच्या पुस्तकांतून आपल्या देशाची आर्थिक व्यवस्था कशी बिघडत गेली आहे आणि ती सुधारण्यासाठी कोणकोणते उपाय योजले पाहिजेत याचे मार्गदर्शन लोकहितवादींनी केले आहे. देशातला सामान्य मनुष्य म्हणजे शेतकरी, कष्टकरी आणि लहानसहान नोकऱ्या करणारा नोकरवर्ग याचेही शोषण इंग्रजी राज्यात कसे चालते हे त्यांनी दाखवून दिले. राष्ट्रीय दृष्टीकोनातून त्यांनी आर्थिक विचार मांडला आहे. 'ग्रामरचना' या पुस्तकात ग्रामीण प्रशासनाचा विचार केलेला आहे. या पुस्तकात लिहिलेल्या प्रस्तावनेत पारमार्थिक विद्या आणि

जीवन यांच्यापेक्षा ऐहिक जीवनाला उपयोगी पडणारी विद्या मिळवली पाहिजे असे ते आग्रहाने सांगतात. आपले लक्षावधी लोक तीर्थयात्रा करतात. वाऱ्या करतात. व्रते-कैकल्ये यात गुरफटलेले असतात. ते कापसाच्या वातींनी आणि कापराच्या आरत्यांनी देवाला ओवाळतात. पण कापूस कोठून येतो, त्याची शुद्धी कशी होते, कापसाचा आणखी काय उपयोग होऊ शकतो याची माहिती त्यांना नसते. लोखंड कोठून येते, काच कशी आणि कोठे होते याचा कोणी शोध करीत नाही. कर्मकांडातच या लोकांचा धर्म सामावलेला होता. आता हे सर्व बाजूला ठेवून आर्थिक आणि औद्योगिक उन्नतीकडे लक्ष दिले पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी या ग्रंथात केले आहे. शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र पेढ्या काढाव्यात. त्यातून त्यांना कर्ज मिळावे. शासनाने उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी प्रोत्साहन द्यावे आणि या देशातील लोकांना मोठ्या पगाराचे रोजगार द्यावेत. ही मते त्यांनी व्यक्त केली आहेत.

लोकहितवादींचा जीवनविचार प्रामुख्याने लौकिक जीवनासंबंधीचा आहे. परमार्थवादी विचार त्यांनी आपल्या साहित्यातून केलेला नाही. परमार्थवादी दृष्टीने सावट दीर्घकाळपर्यंत भारतीय जीवनावर पडलेले होते. त्यामुळेच ऐहिक जीवनाचा विचार खुरटून गेला. लोकांचा प्रवास तीर्थयात्रेच्या निमित्ताने कसा तरी होत असे. इहजीवनाला उपयुक्त असे ज्ञान मिळवण्याचा हेतू नसल्यामुळे देवदेवता, तीर्थयात्रा यांचे प्रस्थ वाढत गेले. लोकहितवादींनी मात्र लोकांना प्रवृत्ती मार्गाकडं वळवण्याचा प्रयत्न केला. दैववाद आणि निवृत्तीवाद यांच्या कात्रीत सापडलेला आपला समाज सोडवण्याचा अनेकांगी विचार हेच लोकहितवादींच्या जीवनकार्याचे उद्दिष्ट होते. त्यांनी अत्यंत खेदाने 'ग्रामरचना' पुस्तकात म्हटले आहे,

'लोक अशक्त व निरुत्साह होऊन देशस्थिती बिघडत चालली आहे. याचे बीजही प्रस्तुतच्या राज्यव्यवस्थेत आहे असे म्हणतात ते खोटे आहे असे म्हणवत नाही. या देशातील श्रेष्ठ लोकांचा वर्ग नाही सारखा झाला असून व्यापार, उदीम, कारखाने वगैरे ठिकाणच्या ठिकाणी बसले आहेत. कोष्टी, साळी, कागद करणारे, तेली, धावड, लोहार वगैरे नाहीसे होऊन तत्संबंधीचे सर्व व्यापार व उद्योग परदेशीय लोकांनी आटोपिले आहेत व त्यामुळे द्रव्याची वहाण सर्व पश्चिमेकडे चालली आहे.' (ग्रामरचना)

लोकहितवादींच्या राजकीय विचारांचाही संक्षेपाने परामर्श घेतला आहे. त्यांचे विचार लोकशाहीवादी आणि समतावादी आहेत. सामाजिक समता त्यांना आवश्यक वाटते. आर्थिक विषमतेला ते विरोध करतात. व्यक्तिवाद आणि उदारमतवाद यांचा प्रवाह त्यांच्या राजकीय विचारधारेवर पडला आहे. सरकारसंबंधी त्यांनी व्यक्त केलेले एक मत विशेषच उल्लेखनीय वाटते. ते म्हणतात,

'सरकार चालविण्यामध्ये मुख्य मर्म असे आहे की, सरकार जितके घटत जाईल तितके बरे आहे व लोकांची सत्ता जितकी वाढत जाईल तितकी चांगली आहे. अगदी सरकारची गरज नाही अशी स्थिती असावी असे मनात येते. पण अशी स्थिती लोकांस प्रत्यक्ष कधी येईल असे तर दिसत नाही. पण जितकी सरकारची गरज कमी होऊन लोकांचे हाती कारभार येईल तितके चांगले आहे.' सरकार घटत जाणे आणि लोकशक्ती वाढत जाणे हा एक प्रगत आणि प्रगल्भ विचार आहे. लोकशाहीची सफलता सरकार घटण्यातच असते. पण हुकुमशाही असली म्हणजे लोक हा घटक दुबळा असतो. नगण्या असतो. सर्व अधिकार तेथे मूठभर व्यक्तींच्या हातात एकवटलेले असतात. लोकांचा विचारच त्यात फारसा होत नाही. लोकहितवादींनी पुढे आणखी सुबोध व परिणामकारक भाषेत सरकारबद्दल म्हटले आहे, 'एक चांगले सुभाषित म्हणूनही त्यांच्या विधानांचा विचार करता येईल.' त्यांचे शब्द असे,

अनुक्रमणिका

'केवळ अडाणी देशात सरकार मायबाप असते किंवा सरकार चोर असते. मध्यम सुधारलेल्या देशात सरकार मित्र असते व फार सुधारलेल्या देशात सरकार, चाकर आहे असे मानून सरकारशी लोक वागतात.' (निबंधसंग्रह, पृ. ४०१)

लोक आणि सरकार यांच्यासंबंधाची नाट्यपूर्ण शब्दांत येथे चर्चा केली आहे. अज्ञानी देशात सरकारला लोकांशी विचारविनिमय करण्याची आवश्यकताच वाटत नाही. तेथे सरकार हाच पहिला आणि अखेरचा शब्द असतो. लोकही त्याचा उल्लेख 'मायबाप' असाच करतात. म्हणूनच 'पावसाने झोडपले आणि आईबापांनी मारले व सरकारने अडवले तर काय करणार?' अशा अर्थाची म्हण प्रचारात आली आहे. 'अस्मानी-सुलतानी' असाही एक शब्दप्रयोग आहे त्यातही हाच अर्थ आहे. मागासलेल्या अडाणी देशातले सरकार जनतेला चोर, दरोडेखोराप्रमाणे लुटत असते. पण जेथे मध्यम सुधारणा झाली त्या देशात जनता आणि सरकार यांचे संबंध मित्रांसारखे असतात. देश अधिकच सुधारला तर लोक सरकारला आपला चाकर मानतात आणि सरकारही तेथे लोकांची सेवा करीत असते. अगदी थोडक्यांत पण अन्वर्थक शब्दांत लोकहितवादींनी लोकशाही आणि हुकुमशाही राज्याचे स्वरूप येथे स्पष्ट केले आहे. इंग्रजी राज्यदेखील आरंभी हिंदी जनतेशी आपुलकीने आणि काहीशा मित्रभावाने वागत होते. पण पुढे हे सरकार चढत, वाढत गेले आणि हिंदी जनतेचे अनेक प्रकारे शोषण करू लागले. सत्तेचा दुरुपयोग करू लागले. त्यामुळेच इंग्रजांच्या राजनीतीवर आणि अर्थनीतीवर लोकहितवादींना कठोर आघात करावे लागले. या लेखकाची राजकीय जाण किती दृढ आणि लोकहिताशी जोडली गेलेली होती याची जाणीव होते. दीडशे वर्षांपूर्वीच्या काळात 'सांसदीय लोकशाही'चे स्वप्न पाहाणे केवळ दूरदृष्टीच्या विचारवंतालाच शक्य होते. इंग्रजी राज्याबद्दल लोकहितवादींनी नीर-क्षीर विवेक केला. म्हणूनच त्यांनी गुणग्रहणही केले आणि दोषांवर तीव्र प्रहारही केले. मात्र ईश्वराच्या आज्ञेवरून ते परत जातील ही त्यांनी मांडलेली कल्पना मात्र हास्यास्पद आहे. ईश्वरी योगायोगाचे हे तत्त्वज्ञान नाकारताना लोकहितवादींचेच शब्द आठवतात. 'मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, ब्रह्मदेवाचे का असेना, 'बुद्धिरेव बलीयसी' असे आहे.

अनुक्रमणिका

# ४. इतिहास कशासाठी ?

इतिहास हा लोकहितवादींच्या अत्यंत आवडीचा आणि विशेष अभ्यासाचा विषय होता. भारतीय धर्म आणि संस्कृती यांच्या इतिहासाचे त्यांनी चिंतन केले होते. इतिहासाच्या अध्ययनामुळे बुद्धीचा विकास होतो. दृष्टिकोन विस्तारतो. लोकहितवादींना इतिहासाचे यामुळेच आकर्षण होते. इंग्रजीतले अनेक इतिहास ग्रंथ त्यांनी वाचून काढले. काही ग्रंथांचा अनुवादही केला. मराठीत इतिहास लिहिला गेला नाही. याची त्यांना खंत वाटत असे. भारतासारख्या एकेकाळी प्रगत झालेल्या देशात इतिहासाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळेच लोक अज्ञानी राहिले हा त्यांचा निष्कर्ष आहे. काय असेल ते असो, हिंदी जनतेने इतिहास-लेखनाची आणि वाचनाची उपेक्षाच केली. 'हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास का नाही?' या लेखात त्यांनी या प्रश्नाची मीमांसा केली आहे. 'मूळ वेदांपासून प्राकृत कवितेपर्यंत हजारो ग्रंथ आहेत. परंतु इतिहासाचा ग्रंथ त्यात नाही. तसेच खरी काळगणना, खरा भूगोल, खरा इतिहास यांची व हिंदू लोकांची मुळीच ओळख नाही. आपल्याकडे पुराणांनाच इतिहास मानण्याची प्रथा होती. पण यातल्या घटना निराधार, अतार्किक व विसंगत आहेत. शंभर गोष्टी खोट्या असतील तर त्यात एखादी गोष्ट खोटी असण्याची शक्यता असते असे' म्हणून लोकहितवादींनी पुराणे इतिहासापासून कितीतरी दूर आहेत हे स्पष्ट केले. या देशात आणि यातील अनेक प्रांतांत पूर्वी राजे कोण होते. त्यांनी काय केले याची संगतवार माहिती कोणीही लिहून ठेवली नाही. राजांचे ताम्रपट सापडतात. त्यांनी बांधलेले किल्ले आणि देवळे यांचे अवशेष आहेत. त्यांच्या राजधान्या आणि शहरे पडक्या अवस्थेत दिसतात. पण इतिहास त्यांची नोंद नाही. कारण इतिहास लिहिला गेला नाही.

## इतिहासाची उपेक्षा : कारणे

लोकहितवादींनी याची काही कारणे दिली आहेत. इतिहासाचा उपयोग आहे ही गोष्ट भारतीयांना कळलीच नाही. निवृत्तिवादी दृष्टिकोनामुळे देशात घडणाऱ्या निरनिराळ्या घडामोडींकडे हे लोक उदासीन वृत्तीने पाहात होते. लिहिणे आणि वाचणे या गोष्टी ब्राह्मणवर्गाच्या हातात होत्या. हा वर्ग राजाश्रयावर जगत असल्यामुळे राजेरजवाड्यांची स्तुतिस्तोत्रे गाणारे साहित्य तेवढे त्यांनी लिहिले. त्यांना इतिहासदृष्टी नव्हती. अद्‌भुतकथा आणि पुराणे यांची वाढ समाजात झाली. आणखी एक कारण ते सांगतात. घडत असलेल्या घटनांचे आकलन करून घेण्याची दृष्टी लोकांत नव्हती. नवीन ग्रंथ लिहावेत त्यांत लोकजीवनाचा विचार करावा असा दृष्टिकोनच नव्हता. ही दिलेली सर्व कारणे सारखीच महत्त्वाची नसली तरी प्रत्येक कारणात तथ्य आहे. इतिहास लिहिण्यासाठी निरीक्षण, बुद्धिवादी विचार आणि राज्यातील महत्त्वाच्या घटनांचा कार्यकारणभाव समजून घेण्याची शक्ती असावी लागते. याऐवजी परमेश्वर ठेवील तसे राहावे. जगवील तेवढे जगावे यातच संतोष मानणारी प्रवृत्ती इतिहासाकडे वळणे शक्य नसते. आपल्या देशात काय चालले आहे हेही हिंदुस्थानच्या लोकांस माहीत नसते. त्यांना बाहेरच्या देशात काय घडते हे कसे कळणार असा प्रश्न विचारून लोकहितवादींनी म्हटले आहे, 'हे विद्येचे व ज्ञानाचे वैरी लोक आहेत म्हणून यांची अशी दशा आहे.'

आपल्या देशाचा इतिहास काय आहे हे परदेशी लोकांनी लिहिलेल्या ग्रंथांवरून कळते. टॉड्, फॉरबस्, ग्रँट डफ्, एल्फिन्स्टन, मालकम् यांनी परिश्रमपूर्वक इतिहास लिहिले आहेत. आपल्या धर्मासंबंधी संस्कृतातील माहिती संगतवार मिळवून मॅक्समुल्लर, विल्सन, मॉनियर या पंडितांचे ग्रंथ पाहावे लागतात. आमच्या देशाचा इतिहास परदेशी विद्वानांनी आम्हाला सांगावा याचा लोकहितवादींनी खेद व्यक्त केला.

अनुक्रमणिका

त्यांनी ज्ञान हेच ऐश्वर्याचे मूळ आहे असे सांगून इतिहासाचा अभ्यास हा ज्ञानसंपादनासाठी करायचा हे स्पष्ट केले आहे.

ज्याला स्वतःच्या देशाचा, संस्कृतीचा आणि समाजाचा इतिहास माहीत नाही; तो एका अर्थाने मनुष्यरूपाने वावरणारा पशूच म्हणावा लागेल. इतिहासविषयक औदासीन्याने आपल्या राष्ट्राचा घात झाला आहे. इतिहास याचा अर्थ केवळ घडून गेलेली गोष्ट नव्हे. ती घटना प्रेरणा देते. माणसाला जागृत करते. त्याच्या ज्ञानाला सामर्थ्य देते. वर्तमानकाळात कसे वागावे हे गतकाळचा इतिहास समजावून सांगतो आणि भविष्याच्या घडणीला तो स्फुरण देतो. म्हणूनच लोकहितवादींनी लोकांना आपल्या देशाचा इतिहास समजावून सांगण्यासाठी इतिहासाची अनेक पुस्तके लिहिली.

'भरतखंडपर्व', 'पानिपतची लढाई', 'हिंदुस्थानचा इतिहास (पूर्वार्ध)', 'ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती' (एकूण तीन भाग), 'दिल्लीचे शेवटचे क्षत्रिय राजे पृथ्वीराज चव्हाण', 'गुजराथचा इतिहास', 'लंकेचा इतिहास', 'राजस्थानचा इतिहास', 'सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास.'

हे इतिहासग्रंथ परिश्रमपूर्वक लिहिताना (काही अनुवादित व आधारित आहेत.) मराठी वाचकांना सबंध हिंदुस्थानच्या इतिहासाची जाणीव करून द्यावी हा त्यांचा आग्रह होता. अव्वल इंग्रजीतला हा पहिला इतिहासचिंतक आणि लेखक आहे यात शंका नाही. पृथ्वीराज चव्हाण याचा इतिहास अनुवादित आहे. मूळ गुजराथी ग्रंथावरून त्याचा अनुवाद त्यांनी केला. गुजराथी लेखक श्री. द्विवेदी यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे हे भाषांतर एखाद्या कादंबरीसारखे सुरस आणि चमत्कृतिपूर्ण आहे. 'चंद वरदायी' या कवीने 'पृथ्वीराज रासा' हा ग्रंथ लिहिला. इतिहासाचे काटेकोर निकष लावून पृथ्वीराज चव्हाणाच्या इतिहासाचे परीक्षण करता येणार नाही. पण राजपूतांच्या इतिहासाकडे सर्वसाधारण वाचकांचे लक्ष वेधले जावे हा हेतू मात्र यातून सफल होतो. गुजराथ देशाचा इतिहास सांगत असताना देशी संस्थाने आणि इंग्रजी राज्य यांची माहितीपूर्ण तुलना त्यांनी केली आहे. ही राज्य तुलना अत्यंत उद्बोधक असल्यामुळे तिचा येथे उल्लेख थोडक्यात केला पाहिजे. सुमारे पस्तीस मुद्दे मांडून स्वदेशातील राज्ये म्हणजे संस्थाने आणि इंग्रजी राज्य यांची केलेली ही तुलना मौलिक आणि मार्मिक आहे. गुजराथ देशाचा इतिहास सांगताना या प्रकारच्या तुलनेची येथे तादृश आवश्यकता नव्हती. पण काहीसा विषयांतराचा धोका पत्करूनही लोकहितवादींनी ही तुलना विस्ताराने करून संस्थानी राज्ये कशी आणि किती मागासलेली होती याची वस्तुनिष्ठ चिकित्सा केली आहे. लोकहितवादींच्या सूक्ष्म इतिहासदृष्टीची त्यातून कल्पना येते.

लोकहितवादींच्या इतिहासलेखनाचा या प्रकरणात परामर्श घ्यायचा नाही पण इतिहासाच्या अध्ययनामध्ये हा ज्ञानोपासक रमलेला होता आणि इतिहासलेखनाला त्याने चालना देण्याचा प्रयत्न केला हेच प्रामुख्याने येथे नमूद करावयाचे आहे. लोकहितवादींना इतिहासकार अशी संज्ञा मात्र देता येणार नाही. कारण त्यांनी स्वतंत्रपणे इतिहासग्रंथ लिहिलेले नाहीत. पण ते अव्वल इंग्रजी कालखंडाचे पहिले इतिहासदृष्टी असलेले अभ्यासक आणि लेखक आहेत हे महत्त्वाचे आहे.

आजच्या महाराष्ट्रातही इतिहासविषयक अनास्था पुष्कळ प्रमाणात आहे. या विषयाचा चांगले सुशिक्षित लोकही उपहासाने उल्लेख करून म्हणतात, 'भूतकाळातली मढी उकरून काढायची आणि त्यांच्यासंबंधीची माहिती मिळवायची याचा आज काय उपयोग आहे?' हे उद्गार अज्ञानाचे द्योतक आहेत. आपल्या देशाला किंबहुना जगातल्या साऱ्याच प्रदेशाला त्याचा स्वतःचा इतिहास असतो. हा इतिहास

आपोआप घडत नाही. तो मानवी प्रयत्नांतूनच घडतो. कल्पनाशक्ती, बुद्धिमत्ता, कर्तृत्व आणि नवनिर्माणशक्ती यातून इतिहासाला आकार मिळतो. आजच्या आपल्या जीवनप्रक्रियेत इतिहासाचे धागेदोरे काही अंशी मिसळलेले असतात. आपल्या परंपरा, आपले साहित्य आणि कला, आपले उत्सव आणि यात्रा या सर्वांशी इतिहास निगडित असतो. तो समजून घेण्याने काळ आणि परिस्थिती यांना आकार देण्याची प्रेरणा मिळू शकतो. 'राजा कालस्य कारणम्' असे महाभारतात म्हटले आहे. राजा याचा अर्थ 'समर्थ माणूस' असाच केला पाहिजे. ज्याच्या बाहूत शक्ती, मस्तकात बुद्धी आणि दृष्टीत स्वप्ने असतात तो नवनिर्मिती करू शकतो. इतिहास दैवाने घडत नाही. तो प्रज्ञेने आणि पराक्रमाने घडत जातो. लोकहितवादींनी इतिहासाच्या अभ्यासातून चेतना घेतली आणि सामाजिक जागृतीचा एक नवा ऐतिहासिक अध्याय त्यांनी आपल्या लेखनातून लिहिला. भारतातील सर्व प्रदेशाचा इतिहास त्यांनी प्रयत्नपूर्वक अभ्यासला. समाजात नव्या जाणिवा पेरण्यासाठी इतिहासाची गती आणि स्थिती समजून घ्यावी लागते. त्यांनी इतिहासग्रंथांना लिहिलेल्या वेगवेगळ्या प्रस्तावना वाचल्या म्हणजे ज्ञानाची आणि नवनिर्मितीची त्यांना लागलेली तहान कशी बलवत्तर होती हे लक्षात येते. सामाजिक प्रगतीचे एक प्रभावी साधन म्हणून ते इतिहासाकडे पाहतात. 'सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात,

'हल्ली इंग्रज लोकांचे सहवासाने लोकांचे काहीसे डोळे उघडून उद्योग कसा करावा, व्यापार कसा करावा, राज्यरीती कशी असावी. प्राचीन काळी हा देश कसा होता. एकंदर पृथ्वीवर कोणकोणत्या धर्मांचे व जातीचे लोक राहतात इत्यादी गोष्टींचे अंशतः प्रत्यक्ष दर्शन व तर्काचा साक्षात्कार होऊन त्यांच्यात काहीशी हालचाल व चळवळ सुरू झाली आहे. आता ही चळवळ व हालचाल या भरतखंडास कोणत्या योग्यतेला नेऊन पोचवील हे आताच निश्चयाने सांगवत नाही हे खरे; परंतु हल्ली सुरू असलेली चळवळ चढत्या प्रमाणावर अशीच अखंड चालू राहील तर निश्चयाने 'घटीयंत्र' या न्यायाने रिते मडके भरल्यावाचून राहाणार नाही.'

वरील उतारा पुरेसा बोलका आहे. त्यावर भाष्य करण्याचे काही कारण नाही.

## ऐतिहासिक गोष्टी

या गोष्टींचे तीन भाग १८७७ ते १८८० पर्यंत लोकहितवादींनी प्रकाशित केले. ते पुष्कळच लोकप्रिय झाले. इतिहासातल्या काही रंजक आणि उद्‌बोधक घटना गोष्टींच्या रूपाने मांडून व त्यासंबंधी काही ऐतिहासिक माहिती देऊन इतिहासाकडे सर्वसाधारण वाचकांना आकृष्ट करण्याचा हा प्रयत्न होता. आपला हेतू लेखकाने सांगितला आहे.

'मोगलाई व मराठे कारकिर्दीतील गोष्टी लोकांस प्रसिद्ध आहेत. त्यांचे टिपण करून ठेवले होते. त्याजवरून हा ग्रंथ छापला आहे. प्राचीन कालच्या गोष्टीपासून त्याकालचे स्थितीचे स्मरण राहाते व हल्लीचे व त्याकालचे अनुमान करता येते. सत्पुरुषांचे उदाहरणांवरून दुराचाराचा तिरस्कार होते. याकरिता या गोष्टी सांगितल्या आहेत.' दुर्मीळ आणि वैशिष्ट्यपूर्ण माहिती त्यात आहे. अनेक विषय त्यात आले आहेत. उदा. मराठ्यांचा भगवा झेंडा, निरनिराळ्या लोकांच्या नमस्कार करण्याच्या पद्धती, पुराणे, तीर्थक्षेत्रे, वेगवेगळ्या धर्मांच्या उपासनापद्धती, नद्या इत्यादी शेकडो विषयांवर त्यांनी माहिती लिहून काढली आहे. ऐतिहासिक गोष्टींचे हे तीन भाग वाचताना लोकहितवादींनी किती कष्टाने ही नानाप्रकारची माहिती गोळा केली असेल हे लक्षात येते. फुलाफुलांतून मधमाशीने मधुबिंदू मिळवावेत आणि मधाचे पोळे तयार व्हावे

अनुक्रमणिका

त्याप्रमाणे हा संग्रह आहे. लेखकाचा बहुश्रुतपणा आणि मर्मज्ञता यांचेही दर्शन यात घडते. ऐतिहासिक गोष्टीच्या पहिल्या भागात दुसऱ्या बाजीरावाच्या आगळ्या 'कर्तृत्वावर' लोकहितवादींनी इतिहासाच्या आधाराने प्रकाश टाकला आहे. पेशवाईतल्या अनेक गोष्टींवर लोकहितवादींनी कठोर टीका का केली याचे मर्म त्यांनी दिलेल्या या गोष्टीत सापडेल. म्हणून बाजीराव पेशव्याची दिनचर्या सांगणारी ही गोष्ट उद्धृत केली आहे.

'वाड्यात दोन-तीनशे बायका नित्य न्हावयास येत असत. त्यांनी सकाळी न्हावयाचा समारंभ करावा तो प्रहरदिवस पर्यंत चाले. नंतर जेवावयाची तयारी झाल्यावर इच्छेस येईल त्या वाड्यात बाजीरावाची स्वारी जात असे. पंक्तीभोजनाचे समयी सर्वकाळ बायका जवळ बसलेल्या असावयाच्या. आश्रित लोकांनी चार-पाच, पाच-पाच लग्ने करून घरी एक बायको ठेवावी आणि याजकरिता अन्याबा राहतेकर यांनी जास्ती लग्ने केली होती. जो गृहस्थ वाड्यात बायको पाठवणार नाही त्याजवर श्रीमंतांची इतराजी व्हावयाची. यामुळे अब्रुदार गृहस्थांनी वाड्यात जाण्याचे सोडिले. इतकेच नाही तर पुणेदेखील सोडिले. सर्व अब्रुदार तितके या कृत्यास नाराजी होते आणि गैरअब्रुदार तितके या कृत्यात सामील होते. बायकांनी सर्व कारभार करावा व उलटा नवऱ्यावरच त्यांचा हुकूम असे. त्यांनी आपल्या नवऱ्यांकरिता श्रीमंतांस सांगून त्यांस मामलती, कमाविशी वगैरे द्याव्या. त्यांजवर नवऱ्यांचा हुकूम इतकाच की वाड्यात राहा आणि सरकारची मर्जी खुष करा. बयाबाई दातारीण, शिताशेंडी, काशी दिक्षीतीण, उमा फडकीण, ताई पेठीण या प्रकारच्या सुमारे दोन-चारशे उनाड बायकांचा थवा नेहमी वाड्यात भरलेला असे. तितक्यांचे शृंगार, दागिने आणि सोंगट्या वगैरे गोंधळ चालून श्रीमंतांनी काळ काढावा! शिध्ये-पाणक्ये वगैरेंशी व्याभिचाराची त्यास सदर परवानगी असे. त्यात किती एक स्त्रिया बहुत देखण्या, रूपवान, ज्वान, थट्टेखोर, बोलक्या असत. त्याप्रमाणे रावबाजीच्या कारकीर्दीत बहुत गृहस्थांची घरे खराब झाली... जेवून उठले म्हणजे पर्वतीस वगैरे दर्शनास आल्यावर शास्त्री, पंडित व भट यांची कचेरी होत असे. त्यांपैकी कोणी म्हणावे 'बाजी हा कृष्ण अवतार आहे! कोणी म्हणावे, 'शिवाचा अवतार प्रगटला आहे'. वर्षांतून सहा महिने असे जावयाचे.'

राज्यकर्त्यांच्या दिनचर्येचा हा एक अजब नमुना या गोष्टीत सादर झाला आहे. बाजीरावाचे राज्य इंग्रजांनी अगदी सहजगत्या कसे घेतले असेल यावर येथे प्रकाश पडतो. ही पेशवाई बुडाली म्हणून लोकांनी आनंदोत्सव केला असाही इतिहासात उल्लेख आहे. वस्तुस्थितीचे दर्शन घडवून प्रबोधन करणे हे कार्य इतिहास करीत असतो. ऐतिहासिक गोष्टींच्या तीन भागांत निरनिराळ्या गोष्टींची आणि माहितीची रेलचेल आहे. इतिहासाची आवड निर्माण व्हावी म्हणून लोकहितवादींनी केलेले हे परिश्रम जितके उल्लेखनीय तितकेच अनुकरणीय आहेत. पुढे मराठीतही इतिहासाचे संशोधन-लेखन करणारे अभ्यासक उदयाला आले. इतिहासावर आधारलेली नाटके आणि कादंबऱ्या प्रकाशित होऊ लागल्या. इतिहासाने समाजमनाला स्फुरण येऊ लागले. याचे श्रेय दीडशे वर्षांपूर्वी लोकहितवादींनी घेतलेल्या परिश्रमाला आहे.

इतिहासाला समाज आणि राष्ट्र यांच्या जीवनात महत्त्व असते. जो समाज आपला इतिहास विरसतो किंवा त्याची उपेक्षा करतो त्याचे भवितव्य अंधुक होते. सारा जुना इतिहास पुसून टाकू. त्याचा कोणताही अवशेष मनात ठेवायचा नाही, असा आततायी विचार काही लोक बोलून दाखवतात. पण इतिहासात काही प्रकाशकिरणे असलेली उज्ज्वल स्थळे आहेत. त्यांचे स्मरण हा आपल्या अभिमानाचा विषय असतो. छत्रपती शिवाजीमहाराजांना आपण विसरू शकतो काय? आणि विसरलो तर एक चिरंतन प्रेरणास्थान हरवून बसलो असा त्याचा अर्थ होईल. जुनी मंदिरे, राजप्रासाद, जुनी शस्त्रास्त्रे, प्राचीन

अनुक्रमणिका

काळच्या कलाकृती आणि साहित्य, यात आपला अभिमानास्पद इतिहास दडलेला आहे. इतिहास बुद्धिचे पोषण करतो आणि मनाला आनंद व अभिमान देतो. लोकहितवादींची हीच भूमिका आहे. स्वतः लोकहितवादी आता इतिहासाचा एक भाग बनले आहेत. म. फुले, छ. शाहूमहाराज हेही आपल्या इतिहासात स्थान मिळवून आपल्याला नवी शक्ती देत आहेत. ज्यांनी इतिहास घडवला त्यांना विसरणे हा कृतघ्नपणा ठरेल.

अनुक्रमणिका

## ५. धर्माचा हेतू आत्मविकास

सामाजिक सुधारणेच्या कक्षेत धर्म हा विषय प्रामुख्याने येतो. धर्माचा प्रभाव लोकजीवनावर अत्यंत दृढपणाने फार पूर्वीपासून पडलेला आहे. आता अलीकडे तो काही अंशांनी कमी होत चाललेला दिसतो. शास्त्रीय विचारांच्या वाढीबरोबर धर्म, संप्रदाय आणि धर्माच्या नावाखाली रूढ झालेली आचारकांडे यांच्यात घट होत असते. धर्माचा साधक-बाधक विचार सामाजिक सुधारणेला आवश्यक असतो. एकोणिसाव्या शतकात दादोबा पांडुरंगांनी परमहंस सभेच्या माध्यमातून धर्माला एक विशिष्ट वळण लावण्याचा प्रयत्न केला. न्या. रानडे, म. फुले, आगरकर यांनीही समाजधारणेच्या संदर्भात धर्मविषयक विचार स्पष्ट केले आहेत. जीवनाला धर्मविचारांचा बळकट पाया असावा असे मत सर्वच समाजसुधारकांनी मांडले आहे. धर्महीन जीवनाला त्यांनी मान्यता दिली नाही. मात्र धर्माचा अर्थ अज्ञानामुळे माणसांनी अत्यंत आकुंचित करून ठेवला आणि त्यातून नाना प्रकारचे अनर्थ उत्पन्न झाले. धर्म जीवनाला उदात्ताची बैठक देतो; आत्मिक क्षमतेचा विकास साधतो. पण धर्मासंबंधीच्या चुकीच्या आणि विकृत कल्पना प्रगतीला प्रतिबंध करतात. इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर आपल्या प्राचीन धर्मकल्पनेला आव्हाने मिळू लागली. त्यापूर्वी जवळ जवळ दोन हजार वर्षांत प्राचीन धर्मव्यवस्थेला आणि धर्मग्रंथांना अशी आव्हाने मिळाली नव्हती. लोकहितवादींसारखा ज्ञाननिष्ठ सुधारक धर्माची जागरूकपणे चिकित्सा करू लागला. धर्म हा परमार्थासाठी नसून तो ऐहिक जीवनाच्या सुखशांतीसाठी आहे हा महत्त्वाचा विचार त्यांनी सांगितला. 'शतपत्रां'त धर्माचे स्वरूप सांगणारे काही लेख आहेत. पुढे 'वृत्तवैभव', 'इन्दुप्रकाश' इत्यादी नियतकालिकांतूनही त्यांनी धर्मावर बरेच लिहिले. 'गीतातत्त्व', 'आश्वलायन गृह्यसूत्र', 'स्वाध्याय' 'आगमप्रकाश' या ग्रंथांतूनही त्यांनी धर्मचर्चा केली.

इ.स. १८६१ मध्ये मुंबई हायकोर्टाच्या वतीने 'हिंदु धर्मशास्त्राचे सार' तयार करण्यासाठी त्यांची नियुक्ती झाली होती. प्रार्थना समाजाच्या कार्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. पुढे स्वामी दयानंदांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. याचा अर्थ त्यांचे धर्मचिंतन सतत चालू होते.

नव्या काळाचे संदर्भ लक्षात घेऊन हिंदू धर्माला आलेली अवकळा नाहीशी केली पाहिजे ही भूमिका त्यांनी घेतली. धर्म हा अपरिवर्तनीय असतो ही सनातन कल्पना त्यांनी उखडून टाकली. धर्म हा समाजासाठी आहे. समाज बळकट आणि एकसंध करताना जुनाट धर्मकल्पना सोडून दिल्या पाहिजेत, असे ठाम मत ते व्यक्त करीत होते. त्यांनी म्हटले आहे,

'सांप्रतकाळचे लोक इतके मूर्ख आहेत की त्यांस चाल म्हणजे काय? असे कोणी पुसले तर ते म्हणतात, 'अरे, चाल म्हणजे धर्म.' कर्मकांडाने आणि निरर्थक चालीरीतींनी वेढला गेलेला धर्मविचार हास्यास्पद बनला आहे. सोवळे-ओवळे, पुरुषांचे सोवळे, बायकांचे सोवळे, खरकटे, शिळे, उष्टे याविषयी हजारो नेम आहेत. पन्नास ठिकाणी पाणी शिंपतात, दोनशे ठिकाणी हात धुतात, तीनशे ठिकाणी पाय व जागोजाग देवपूजा आणि सोवळे मनस्वी करतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत असे ढोंग करतात.' हे सर्व ब्राह्मणांच्याच घरात होत होते असे नव्हे. इतर समाजातही नानाप्रकारची क्रियाकांडे होतीच आणि आजही आहेत. यामुळे धर्माची मूळ प्रेरणा क्षीण होत गेली. कित्येक क्रियाकांड बाष्कळ आणि अनैतिक स्वरूपाचे असते. पण पुराणात लिहिले म्हणून ते रूढ झाले. सामाजिक जीवन आणि नीती यांच्या क्षेत्रात धर्माचा हस्तक्षेप होऊ नये हा बुद्धिवादी विचार लोकहितवादींनी सांगितला आहे. त्यांच्या एका बहुचर्चित ग्रंथासंबंधी येथे माहिती देणे आवश्यक वाटते.

'आगमप्रकाश' आणि 'निगमप्रकाश' असे दोन ग्रंथ त्यांनी गुजरातीतून लिहिले. त्यांचा अनुवाद मराठीत इ. स. १८८४ मध्ये प्रसिद्ध झाला. या ग्रंथात तंत्रमार्गावर झगझगीत आणि विदारक प्रकाशझोत टाकला आहे. धर्माला बीभत्स, घृणास्पद अनैतिक स्वरूप काही पुराणांनी आणि ग्रंथांनी कसे दिले याचे दर्शन 'आगमप्रकाशात' घडवले आहे. शाक्तपंथ किंवा तंत्रमार्ग म्हणजे मद्य, मांस आणि मैथुन या गोष्टी सर्रासपणे करणे म्हणजेच धर्म ही समजूत दृढ होत चालली होती. महाराष्ट्रातही हा शाक्तपंथ बराच जोर धरीत होता. त्यामुळेच लोकहितवादींनी या पंथाचे घाणेरडे स्वरूप उघडे करून त्यावर प्रचंड प्रहार केला आहे. घाणरेड्या आचारविचारांचे समर्थन करण्यासाठी अनेक आचार्य आणि पंडित यांनी शेकडो ग्रंथ लिहिले. त्यातली काही नावे लोकहितवादींनी दिली आहेत. 'बालाविलासतंत्र', 'लिंगतंत्र', 'लिंगागम', 'कौलचंदिका', 'श्यामारहस्य' इत्यादी नानाप्रकारचे ग्रंथ निर्माण झाले. या सर्व ग्रंथात भरपूर मद्य पिण्याचा आणि यथेच्छ मांसभक्षणाच्या स्वैर उपभोगाचा व अनेक अनैतिक गोष्टींचा निर्लज्जपणे व्यवहार केला म्हणजे ईश्वर प्रसन्न होतो असे अजब समर्थन केले आहे. किळसवाण्या अनैतिक क्रियांना धर्म समजून त्यांचा आचार करणाऱ्या मूर्ख लोकांच्या प्रवृत्तीवर लोकहितवादींनी अत्यंत प्रखर हल्ला चढवून या शाक्तपंथाचे महाराष्ट्रातून त्यांनी उच्चाटन केले. व्यभिचार करणे हा धर्म आणि तो धर्म ज्यात लिहिला ते पवित्र ग्रंथ असे मानणे ही विकृतीची परमावधी आहे. हे अनेक ग्रंथ लोकहितवादींनी वाचून त्यावर साधार टीका केली. ते म्हणतात, 'कित्येक वचनांचा अर्थ समजून घेणे हे अत्यंत निर्लज्जतेचे काम आहे.' धर्मविचारावर उत्पन्न झालेली असली विषारी बांडगुळे कापून काढण्याचे काम 'आगमप्रकाश' या ग्रंथाच्या द्वारे लोकहितवादींनी केले. खरे तर शाक्तपंथ हा धर्मपंथ नसून तो घाणेरड्या व्याभिचारांकडे घेऊन जाणारा काटेरी मार्ग आहे. या ग्रंथांचे समर्थन काही शास्त्री-पंडितही करीत असत. लोकहितवादींसारखा एक श्रेष्ठ विचारवंत या विकृत पंथाची मुळे उपटून टाकतो हेच खरे 'धर्मकार्य' आहे.

धर्म म्हणजे निर्बुद्ध आचारांचा, घाणेरड्या क्रियाकर्मांचा आणि विकृत विचारांचा खेळ नव्हे. जे शास्त्रीयदृष्ट्या चुकीचे आहे व ज्याचा धर्माशी तिळमात्रही संबंध नाही, जे भ्रष्ट विचारातून उत्पन्न झाले ते पूर्णपणे उद्ध्वस्त करणे आणि नैतिकतेची घडी बसवणे हाच खरा धर्मविचार आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांनी हेच काम आपापल्या पद्धतीने केले. तुकोबा तर म्हणतात, 'झाडू संतांचे मारग। आडरानी भरले जग।' आडरानात फसलेल्या जगाला स्वच्छ आणि प्रशस्त मार्गावर आणायची भूमिका संतांनी घेतली होती. तीच भूमिका लोकहितवादींनी, फुले आणि आंबेडकरांनी घेतली. धर्म हा सोवळ्या-ओवळ्यात किंवा कर्मकांडात नसतो. तो मनातल्या सुविचारात आणि सर्वांच्या सुखासाठी सेवाबुद्धीने काम करण्यात असतो. लोककल्याणासाठी भोळ्या-भाबड्या बायकांना आणि अडाणी लोकांना निष्फळ कर्मकांडात अडकावून त्यांच्याकडून दानदक्षिणा उपटण्यासाठी काहीतरी मूर्ख विधिनियम तयार करणे हा कधीही 'धर्म' असू शकत नाही. स्वार्थी पुरोहितांनी धर्मात अनेक गोष्टी घुसडून त्याचा प्रवाह दूषित केला. आजही भ्रांतिष्ट धर्मविचारात लक्षावधी, कोट्यवधी माणसे आकंठ बुडाली आहेत. तीर्थाच्या ठिकाणी हजारो लोक घाणेरड्या पाण्यात बुचकळ्या मारतात. रोगाची साथ घेऊन घरी येतात. यज्ञात धान्य जाळतात. देवदेवतांच्या समोर पशूंचा बळी देतात. एखाद्या फकिराच्या किंवा बाबाच्या नादी लागून गंडेदोरे-ताईत घेतात. असल्या वेड्या आचारविचारांवर समाजसेवकांनी हल्ले चढवून योग्य धर्माची शिकवण दिली पाहिजे. समतेत आणि ममतेत खरा देव आणि खरा धर्म असतो.

लोकहितवादींनी धार्मिक आचारविचारांचे विश्लेषण करणारे जे ग्रंथ लिहिले ती त्यांची धर्मसेवा आहे. त्यांचा दृष्टिकोन लोककल्याणाचा आहे. आपल्या लेखनातून त्यांनी कर्मकांडांचा आणि भट-भिक्षुकांचा जो कठोर उपहास केला तो सयुक्तिकच वाटतो. ते म्हणतात,

'आता जो धर्म चालला आहे हा धर्म नव्हे. हा बेबंद गोंधळ आहे. यात काही नाही. नीती नाहीशी झाली व धर्म बुडाला. मला तर धर्म कोठे दिसत नाही. म्हणून धर्माची स्थापना करण्याचा माझा यत्न आहे. जे गैररीतीने चालतील तेच भ्रष्ट म्हणावेत. आचार हे केवळ सोंग आहे. नीतीचे ज्ञान व्हावे म्हणून आचार सांगितला आहे.' परमार्थाभोवतीच पिंगा घालत बसलेल्या धर्मकल्पना निरुपयोगी आहेत असे मत त्यांनी मांडले आहे. पोथ्या-पुराणांचा धाक न बाळगता 'युगपरत्वे शास्त्रही फिरवले पाहिजे' हा खणखणीत विचार त्यांनी स्पष्ट केला. 'आगमप्रकाश' लिहिताना धर्माचा तर्कशुद्ध उपदेशही त्यांनी केला. धर्मभावनेने मानवी जीवन सुंदर आणि निकोप व्हावे. हा हेतू हेच धर्माचे सामर्थ्य असते.

आज एकविसाव्या शतकात आपण येऊन पोहोचलो. पण अजूनही पोथ्या-पुराणे सुटली नाहीत. आता तर धर्माचे नाव घेऊन माणसे जाळपोळ करतात हिंसा करतात. म्हणजेच धर्म या शब्दाचा उच्चार करीत अधर्म आणि अनीती यांचा बेदरकार व्यवहार करतात. अजूनही या जगाला खऱ्या धर्माची दिशा दाखवणारे संत आणि सुधारक यांची आवश्यकता आहे. इतकेच या बाबतीत म्हणता येईल.

अनुक्रमणिका

# ६. आणखी काही वैशिष्ट्यपूर्ण पुस्तके

सामाजिक जाणीव असलेला लेखक आणि सुधारक आपले प्रबोधनाचे कार्य सतत करीत असतो. लोकहितवादी यांचे लेखनाचे व चिंतनाचे विषय पाहिले की आश्चर्य वाटते. नानाविध विषयांवर ते माहिती मिळवायचे, तिचे टिपण करून ठेवायचे आणि नंतर त्यावर लेखन करायचे. समाज, राज्य, इतिहास, धर्म, अनेक जातीजमाती व त्यातले आचारविचार, जुने पंथ, साधुसंत व लढवय्ये वगैरे असंख्य गोष्टीसंबंधी जागरूकपणाने त्यांनी लिहिले आहे. मुंबईमध्ये १८५७ मध्ये विद्यापीठाची स्थापना झाली. पण लोकहितवादी हे विद्यापीठपूर्व युगाचे प्रतिनिधी असलेले विचारवंत आणि लेखक आहेत. न्यायखात्यातल्या या वरिष्ठ अधिकाऱ्याने ज्ञान आणि माहिती यांचे कणन्‌कण प्रयासाने गोळा केले. हा केवळ छंद नव्हता. स्वतःच्या आनंदासाठी लिहायचे ही त्यांची भूमिका नव्हती. एखादा कलावंत आपल्या कलेच्या उपासनेत स्वतःला पूर्णपणे बुडवून टाकतो आणि माझा कलाविष्कार हा 'स्वान्तःसुखाय' आहे असे म्हणतो. लोकहितवादी हे कलावंत नव्हते. ते ज्ञानोपासक होते आणि त्यापेक्षाही अधिक ते समाजपरिवर्तनाच्या कार्यात गढलेले सुधारक होते. म्हणूनच मिळवलेली सर्व माहिती ते आपल्या लेखनातून समाजाला देत राहिले. पुस्तक प्रसिद्ध करायची आणि जिज्ञासू लोकांना ती फुकट वाटायाची या मागे ज्ञानप्रसाराचा हेतु होता. 'लोकहितवादी' या नियतकालिकात त्यांनी जाहीर केले होते की, 'ज्यांना आपली पुस्तके पाहिजे आहेत त्या परगावाच्या वाचकांनी केवळ टपालखर्च पाठवावा. पुस्तके मोफत मिळतील.' एका अर्थाने लोकहितवादींनी जीवनभर 'ज्ञानयज्ञ' केला. ही समाजसमर्पित वृत्ती हेच त्यांचे वैभव होते. त्यांच्या सर्वच लेखनासंबंधी येथे विचार व्यक्त करता येणार नाहीत पण काही महत्त्वाच्या विषयावरील त्यांच्या विचारांचा परामर्श घ्यायचा आहे.

## महाराष्ट्र देशातील कामदारांनी संभाषण

हे पुस्तक इ. स. १८५३ मध्ये प्रकाशित झाले. या लहानशा पुस्तकाचा विषय 'लाच खाण्याचे दुष्परिणाम' असा आहे. कामदारांसमोर झालेले व्याख्यान त्यांनी पुस्तकरूपाने पुढे ठेवले आहे. 'शतपत्रां'तूनही 'लाच' आणि 'लाचेचा गुन्हा' या लेखातून हा विषय त्यांनी मांडलेला होता. सरकारी नोकरीचा दीर्घ अनुभव आणि समाजाचे निरीक्षण यावर आधारलेले त्यांचे विचार अधिकृत मानावेत असेच आहेत. लाच घेण्याची प्रवृत्ती ही एखाद्या असाध्य रोगासारखी आहे. हा रोगही सांसर्गिक आहे. लाच घेणे आणि देणे यामुळे सार्वजनिक जीवन रोगट बनत जाते. सामाजिक नीतीच्या चौकटीत लाच देण्याघेण्याला स्थान नाही. म्हणून कामदारांना अनूलक्षून ते म्हणतात,

'तुम्हांस मी आणखी सांगतो की लाच खाणे चोरीपेक्षाही नीच आहे.' कामदारांना मिळणारे वेतन म्हणजे रयतेचे काम केल्याचा मोबदला असतो. 'कारण की, जे तुम्ही खाता पिता ते सर्व रयतेचे उधार घेता. त्यांची फेड काम बरोबर केल्याशिवाय व्हावयाची नाही.' ही भूमिका अधिक तर्कशुद्ध आहे. पाप, पुण्य व ईश्वराची भीती इत्यादी विचारांपेक्षा आपण जनतेचे देणे लागत आहोत. ते देणे प्रामाणिकपणे देऊन टाकले पाहिजे हीच खरी नीती आहे. पण पूर्वीपासून सामान्य कामगार असो किंवा मोठा अधिकारी असो यांना लाच खाण्याची आणि श्रम न करता श्रीमंत होण्याची सवय लागलेली आहे. लाचलुचपतीच्या विरुद्ध कडक कायदे असले कायद्याने लोकमन वळवता येत नाही. त्यासाठी पुन्हा पुन्हा विचारातून प्रबोधन केले पाहिजे.

अनुक्रमणिका

‘हिंदू लोक लाच खातात याचा संशय नाही. कंपनीसरकारचे चाकरात हजारात लाच न खाणारा व ईश्वरास भिऊन चालणारा क्वचित असतो. बाकी सर्व शिपायांपासून प्रिन्सिपॉल सदर अमीनपर्यंत शपथेचा व्यभिचार करतात. याचे कारण असे की या लोकांस ज्ञान आणि धर्म नाही हे एक आणि दुसरे इंग्रज लोकांस हिंदु लोकांची परीक्षा करिता येत नाही... जरी इंग्रजांनी भगीरथ प्रयत्न केला तरी हे अडून अडून लाच खातात हे जगप्रसिद्ध आहे आणि वास्तविक पाहिले तर तो मनुष्य मुन्सफाचे काम करितो. तो वेतनाइतका किंबहुना जास्तीत खर्च करून सालात पाच हजार रुपये जवळ करतात. तसाच नाझरही सालाचे पाच हजार रुपये मिळवतो. सामान्य कारकूनही दहा वर्षे करतो तर तो दोन हजार रुपये जवळ करतो. तसेच चपराशी पगाराच्या दुप्पट मिळवतात. फौजदार व मामलेदारही याचप्रमाणे जर बारीक शोध केला तर ही सर्व बातमी लागते.’

लाच खाण्याच्या दुष्ट सवयीमुळे जनता लुबाडली जाते. सरकारचीही फसवणूक होते. लोकहितवादींनी या प्रवृत्तीवर टीका करताना सामाजिक हिताचा विचार अधिकांशाने करून कामदारांनी लाचलुचपतीपासून अलिप्त राहावे असा परिणामकारक उपदेश केला आहे. लेखकाने सरकारी नोकरीत अनेक वर्षे काढली असल्यामुळे लाच खाण्याची रोगट प्रवृत्ती कशी खालपासून वरपर्यंत गेली आहे याची त्यांना माहिती होती. आज या पुस्तकाला दीड शतक उलटून गेले. लाच घेण्यादेण्याची सवय कोणत्याही अर्थाने कमी झालेली दिसत नाही. लाच घेणे ही पूर्वी विकृती होती. आता ती प्रकृती बनली आहे. ‘आपण एकदाही कोणाकडून लाच घेतली नाही.’ असे सांगणारा एकही प्रामामिक अधिकारी किंवा कामदार सापडणे कठीण आहे. भ्रष्टाचाराने आणि स्वार्थाने जीवनाची सर्वच क्षेत्रे बरबटून निघाली आहेत. याबद्दल खंत वाटावी अशीसुद्धा परिस्थिती उरली नाही. शाळेत विद्यार्थ्याला प्रवेश देताना शाळेच्या संचालकालाही हजारो रुपयांची लाच आज दिली जाते. शिक्षणाचा क्षेत्रातही भ्रष्टाचाराने हातपाय पसरले आहेत. विद्यार्थ्याच्या मनावर शाळेत प्रवेश करतानाच होणारे हे संस्कार पाहिले म्हणजे चिंता वाटते. भ्रष्टाचाराच्या बाबतीत जगात भारताचा क्रम बराच वरचा आहे हे ऐकल्यावर हाच का तो रामाचा देश? हाच का हरिश्चंद्राचा देश? लोकहितवादींनी या सामाजिक व्यंगावर नेमके बोट ठेवून कामदारांना विचारले आहे,

‘वास्तविक पाहिले तर गरीब लोकांस लंगोटी आणि कोंड्याची भाकर पुरती मिळत नाही. आणि तुम्ही उंच उंच वस्त्रे नेसता, बरे, तुम्ही कधी मागावर वस्त्रे स्वहस्ते काढिली आहेत? तुम्ही सोन्याचे दागिने घालता, बरे, तुम्ही मोळ्या डोक्यावर कधी आणल्या आहेत? तुम्ही सुंदर भाज्या खातां बरे, तुम्ही कधी मळ्याला पाणी घालण्याकरिता मोट हाकिली? गरीब लोकांच्या मेहनतीपुढे तुमची मेहनत काही नाही. तरी तुमच्या घरी रुपयांच्या थैल्या, दाण्याच्या ढिक्या आणि कापडाचे गठ्ठे येऊन पडतात. तेव्हा तुमच्या मनात असा विवेक यावा की ही संपत्ती आमच्या घरी कोठून आली? ही कोणी आणिली?’

या उताऱ्यात व्याख्याते लोकहितवादी यांच्या मनातली तळमळ व्यक्त झाली आहे. वक्तृत्वगुणाने नटलेली ही शैली श्रोत्यांना आणि वाचकांना भारून टाकणारी आहे. कामदारांपुढे हे भाषण लेखकाने दीड शतकांपूर्वी केले. पण लाचलुचपत हा विषय दीर्घकाळापासून गंभीर बनलेला विषय आहे. आपल्या देशात आजही हा एक ज्वलंत विषय होऊन बसलेला आहे. लाच खाण्याचे मूळ अनावर धनलोभ हेच आहे. कोणतेही परिश्रम न करता केवळ हातातल्या लहानमोठ्या सत्तेचा उपयोग करून श्रीमंत होण्याचा एक साधा सोपा मार्ग म्हणून बहुसंख्य कामदार या लोभाला बळी पडतात. लाचेच्या दोषांची तीन कारणे लोकहितवादींनी सांगितली आहेत. ‘प्रथम लोकांचा मूर्खपणा हेच कामदारांस चटक लावितात. ते लाच देणे हा गुन्हा समजत नाहीत. दुसरे दुराचारी, दुर्जन व मूर्ख कामदार लाच घेतात. तिसरे साहेब लोक वगैरे

अनुक्रमणिका

अज्ञान असतात. त्यांस कोणाला अधिकारावर नेमावे कळत नाही.' सुमारे बारा पानांची ही पुस्तिका आजही वाचताना त्यातील विचार जसेच्या तसे स्वीकारावेत इतके महत्त्वाचे वाटतात. या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या निघाल्या. तत्कालीन वृत्तपत्रांनी यावर उत्तम अभिप्राय दिल्याची नोंद आहे. पुस्तकाचे नाव जरी 'महाराष्ट्र देशातील कामदारांशी संभाषण' असे असले तरी हे संभाषण भारतीय कामदारांशी आहे. काळ उलटून गेला तरी जे प्रश्न अधिकाधिक उग्र बनत चालले आहेत त्यातला हा लाचलुचपतीचा एक प्रमुख प्रश्न आहे. 'सत्यमेव जयते' हे बिरुद अभिमानाने मिरवणाऱ्या देशात लाचलुचपतीची पाळेमुळे खोलवर गेलेली आहेत. ती नष्ट करण्यासाठी कायद्याबरोबरच लोकमनात सत्यवचन आणि सदाचार यांची बीजे पुन्हा पुन्हा पेरली पाहिजेत. लाचलुचपतींवर श्रीमंत झालेले अधिकारी तीर्थयात्रा करतात. सत्यनारायण करतात. मंदिरमशिदीत जातात. पण त्यामुळे त्यांच्या भ्रष्ट मनाचे शुद्धीकरण कसे होणार?

**बोधपत्र**

हे छोटेखानी पुस्तक इ. स. १८७८ मध्ये लोकहितवादींनी प्रकाशित केले. 'बोधपत्र' या शीर्षकावरून पुस्तकाचा विषय आणि आशय लक्षात येतो. एखाद्या व्याख्यानासारखेच याचे स्वरूप आहे. भाषेतली सुबोधता आणि लेखकाच्या मनातली लोकांविषयीची आपुलकी याचा प्रत्यय या संपूर्ण लेखनातून येतो. सुरुवातीलाच 'स्वदेश बांधव-दादा, बाबा, भाऊ व ताई या सर्वांस प्रेमपूर्वक विनंती' असे संबोधून तुम्हास चार गोष्टी सांगावयाच्या आहेत. असे म्हटले आहे. जीवन कसे जगावे, ते सुखकर आणि सुंदर कसे करावे याचे मार्गदर्शन आपल्या अनुभवातून त्यांनी केले. एका ज्ञानवंताने सुखी जीवनाचा केलेला बोध हेच या पुस्तकाचे स्वरूप आहे. या बोधाचे स्वरूप सांकेतिकच आहे. पण तरीही मनःपूर्वक उच्चारलेले किंवा लिहिलेले उपदेशपर शब्द मनाचा ठाव निश्चित घेतात. या प्रकारचा उपदेश खरे तर त्यांच्या प्रत्येक ग्रंथातून सापडतो. त्यांचे स्वतःचे जीवन हेच मुळात एक 'बोधपत्र' होते आणि त्यामुळे इतरांना उपदेश करण्याचा त्यांना अधिकार होता. आपल्या आयुष्यात नैतिक तत्त्वांचे निष्ठेने पालन केले पाहिजे. कदाचित आज हा सारा उपदेश पंतोजीछाप वाटून तो निरुपयोगी किंवा निरर्थक आहे, अशी टीका भोगवादी प्रवृत्तीचे लोक करू शकतील. जे व्यसनांच्या व वासनांच्या जाळ्यात अडकलेले असतात ते नैतिकता, धार्मिकता वगैरे मूल्यांची टर उडवू शकतील. बेफामपणाने प्रत्येक गोष्टीची लंपटवृत्तीने चव घेण्याची चटक लागलेल्या माणसानेसुद्धा हे 'बोधपत्र' एकवेळ वाचले पाहिजे. उदाहरणार्थ, एका ठिकाणी लोकहितवादी म्हणतात,

'पुरुषार्थ करण्याचे प्रयत्नी असावे. पहिला पुरुषार्थ विद्या. दुसरा पुरुषार्थ धर्म. तिसरा पुरुषार्थ द्रव्य आणि चवथा पुरुषार्थ परोपकार व सत्कीर्ती.' हे चार पुरुषार्थ जीवन यशस्वी करण्यासाठी आवश्यकच आहेत. आजही हे पुरुषार्थ कुणीतरी विद्वान अधिकारी माणसाने झडझडून सांगितले पाहिजेत. कारण विकार आणि वासना यांच्या प्रवाहाबरोबर वाहात चाललेल्या असंख्य माणसांच्या आयुष्याची वाट चुकली आहे. आपली वाट चुकली हेही त्यांना कळत नाही. प्रत्येक क्षण भोगला पाहिजे.' इंद्रियाची तृप्ती हेच परमसुख. या भ्रमिष्ट विचारात भोवंडणाऱ्या लोकांना विद्या, धर्म, द्रव्य आणि परोपकार यांची महती कुणीतरी विवरून सांगितली पाहिजे. लोकहितवादींनी ते कार्य केले आहे. हे पुस्तक वाचताना कोणी संत जीवन जगण्याची वास्तविक रीती समजावून सांगत आहे असेच वाटेल. नाहीतरी 'लोकहितवादी' हे नाव धारण करणारा मनुष्य संत प्रकृतीचाच असू शकतो.

'सत्याचा शोध करावा. मंत्र-तंत्र, नवस, किमया, भूत, मुहूर्त, प्रश्न, शकुन ह्या सर्व भ्रांती आहेत. विद्याभ्यास पूर्ण झाल्याखेरीज मुलाचे लग्न करू नये. ग्रंथ वाचवण्याची सवय होईल तितकी करावी.' या

शब्दांतील सत्यावर भाष्य करण्याचे कारण नाही. मंत्र, नवस, किमया, मुहूर्त यावर सव्वाशे वर्षांपूर्वी 'भ्रांती' म्हणून शिक्का मारणारे लोकहितवादी बुद्धिवादी आहेत. आजही म्हणजे एकविसाव्या शतकात उच्चविद्याविभूषित लोक शकुन पाहतात. नवस करतात. मंत्र, तंत्र आणि होमहवन याला महत्त्व देतात. गंडेदोऱ्यांच्या आहारी जातात. पण इ.स. १८४८ साली 'बुद्धी हीच बलवान मानली पाहिजे' ही घोषणा लोकहितवादींनी केली होती. आज बुद्धिमानांचीच बुद्धीवरची श्रद्धा विचलित झाली आहे. पुस्तकाचा शेवट करताना लोकहितवादींनी म्हटले आहे,

'संसार तीन प्रकारचे आहेत. अल्प, मध्यम आणि उत्तम. अल्पसंसारी स्वार्थ मात्र करितात व आपले पोट भरून पोरेबाळे पोसितात. यापलीकडे त्यांस काही दिसत नाही. मध्यम संसारी हे कीर्तीवर लक्ष्य देतात आणि उत्तम संसारी हे परोपकारी निमग्न असतात. यावस्त उत्तम संसाराकडे वळवेल तितके यथासामर्थ्य वळावे.'

तीन प्रकारची संसारी माणसे त्यांनी सांगितली. अल्पसंसारी केवळ स्वतःच्या सामान्य वर्तुळात फिरत असतो. त्याच्यासमोर उच्चतर ध्येय नसते. पोट भरावे आणि पोराबाळांना जगवावे, असला क्षुद्र संसार तर कावळे आणि चिमण्यादेखील करतात. मध्यम संसारी हा कीर्तीचा पाठलाग करतो. आपल्याभोवती प्रसिद्धीच्या झगमगाटाचे वलय कसे निर्माण होईल, याच चिंतेत तो असतो. तो कीर्तीलाच सर्वस्व मानतो. पण उत्तम संसारी मात्र सर्वांशी सहकंप पावतो. समाज सुखी व्हावा म्हणून आपल्या सुखाचाही त्याग करतो. येथे संत तुकारामांच्या प्रसिद्ध अभंगाची आठवण होते.

'जे का रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले।
साधु तोचि ओळखावा। देव तेथेचि जाणावा॥'

साधुत्वाची आणि देवत्वाची उत्कृष्ट व्याख्या तुकोबांनी सुबोध शब्दांतून केली आहे. अशाच सुबोध शब्दांतले हे 'बोधपत्र' लहान असले तरी ते माणसाला एका अर्थपूर्ण जीवनाची वाट दाखवू शकते. लोकहितवादींनी मोठे ग्रंथ लिहिले त्याप्रमाणे लहान पुस्तिकाही लिहिल्या. जमेल त्या माध्यमातून त्यांनी लोकांशी 'संवाद' केला. 'बोधपत्र' हे त्याचेच एक उदाहरण. त्यांची शैली संभाषणासारखी आहे. सोपी, सुटसुटीत वाक्ये, पण जिव्हाळ्याने भरलेली. सानेगुरुजींच्या शैलीची आठवण व्हावी अशी याची भाषा आहे. ग्रंथाची भाषा आणि सभेला किंवा निवडक लोकांना संबोधित करण्याची भाषा यात फरक असतो.

'कलियुग' आणि 'भिक्षुक' अशी आणखी दोन उल्लेखनीय लहान पुस्तके आहेत. मुंबईच्या आर्यसमाजात लोकहितवादींनी 'कलियुग' या विषयावर एक व्याख्यान दिले होते. त्याचे सार या पुस्तकात आहे. 'कलियुगा'मध्ये परागती होत जाते. दुःखांची वाढ होते. अशा प्रकारच्या काही कल्पना आहेत. या भ्रममूलक कल्पना नाहीशा करून माणसाची प्रगती आणि अधोगती ही त्याच्यावरच अवलंबून असते. म्हणून निराशावाद सोडून दिला पाहिजे हे यातल्या विवेचनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. अपकर्ष हा कलियुगाचा धर्मच आहे, ही समजूत हिंदू समाजाच्या हाडीमाशी खिळून बसली आहे. तिचे खंडन करून नव्या विचारांची कास मनुष्याने धरली पाहिजे. पुरुषार्थी विचारांचा पाठपुरावा केला पाहिजे, हा विचार या व्याख्यानातून त्यांनी ठासून मांडला आहे. लोक समजतात की 'कलियुगा'त ज्ञान, धर्म, संस्कृती या सर्व गोष्टींचा ऱ्हास होत जाणार, पण ही कल्पना पूर्णपणे लोकहितवादींनी खोडून टाकली आहे. मागील युगापेक्षा या कलियुगात मनुष्य अनेक कारणांनी दुःखी होईल, कारण हे 'कलियुग' आहे. असल्या चुकीच्या कल्पना शास्त्रपुराणांनी

आपल्या डोक्यात कोंबल्या आहेत. ज्ञानाचा आणि पुरुषार्थाचा मार्ग सोडून केवळ परंपरेच्या ढोलीतच आंधळेपणाने बसून राहण्याची वृत्ती वाढल्यामुळे आपली परागती होत आहे. लेखक म्हणतात,

'आपण सर्वांनी असे लक्षात धरले पाहिजे की, असत्य, अधर्म, ढोंगीपणा, विद्याहीनता, बुद्धिहीनता, बलहीनता ही सर्व हटण्याजोगी आहेत. आपली भ्रांती आपण टाकून जागृत होऊ तर दुसऱ्यास जागृत करू आणि सत्याची व विद्येची वृद्धी करता येईल आणि सत्ययुग म्हणजे आपली चांगली स्थिती आपणास पुनरपि ईश्वरकृपेने प्राप्त करून घेता येईल, अशी उमेद धरावी. आणि प्रयत्नास मागे पडू नये.'

हताश झालेल्या लोकांना प्रयत्नवाद शिकवण्याची गरज होती. पुराणिक, कीर्तनकार वगैरे लोक भूतकाल तेवढा चांगला होता, वर्तमानकाळात काही नाही. आपले ऋषीमुनी चांगले होते. आता या कलियुगात काहीच चांगले होणार नाही, अशी विफलतावादी विचारसरणी मांडत होते. लोकांच्या मानसिक आणि बौद्धिक शक्तीला चेतना देण्याचे कार्य समाजातल्या विचारवंतांनी केले पाहिजे. हीच भूमिका घेऊन लोकहितवादींनी आपले हे व्याख्यान पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. समाजजीवनात निराश विचारांच्या लाटा मधून मधून उचंबळत असतात. ती लाट पुन्हा येऊ नये आणि समाजाचे धैर्य गळून जाऊ नये यासाठी रसरशीत कर्मवाद शिकवावा लागतो. प्रत्येकाच्या मनात आणि बुद्धीत कर्तृत्वाची ठिणगी असते. तिच्यावर वेळीच फुंकर घातली नाही तर ती विझून जाते. समाज आणि राष्ट्र वर्षानुवर्षे, शतकानुशतके निराशेच्या अंधारात खितपत पडतात. त्यांना उत्साहाचा आणि धैर्याचा प्रकाश देणारी विचारधारा मिळाली पाहिजे. समाजनिष्ठ विचारवंतांचे हे काम असते.

## भिक्षान्नावर जगणारा उपयोगशून्य वर्ग

'भिक्षुक' या पुस्तकातून भिक्षेवर जगणारा आणि स्वतःला त्यागी समजणारा जो रिकामटेकडा वर्ग आहे त्याच्यावर लोकहितवादींनी टीका केली आहे. ते म्हणतात,

'साधु काही पिकवीत नाहीत. दुसऱ्याने पिकवावे तेव्हा त्यांनी खावे. परंतु पिकवणारे हे हलके पदवीचे आणि आपण त्यागी म्हणून श्रेष्ठ पदवीचे व मेहनत करणाऱ्या लोकांनी आपणास फुकट पाळावे अशी त्यांनी लोकांची समजूत घालून दिली आहे.' अनेक प्रकारचे भिक्षुक असतात. क्षेत्र, उपाध्ये, तीर्थवासी, पुजारी, कावडे, सोमयागी, चोबे, बडवे, दासरी संन्यासी, ब्रह्मचारी, मंत्रशास्त्री अशा निरनिराळ्या नावांनी या पोटभरू लोकांनी समाजाचे शोषण चालवले आहे. दांभिक संन्यासी आणि भिक्षुक यांचा समाजात सुळसुळाट झाला आहे. आपल्याठायी काहीतरी दैवी आणि आध्यात्मिक सामर्थ्य आहे असे भासवून जनतेचा बुद्धिभेद करणारा हा वर्ग लोकहितवादींनी आपल्या टीकेने थोपटून काढला आहे. हे बहुसंख्य भिक्षुक दुर्गुणी, व्यसनी असतात. अघोरपंथी, शाक्त, गोसावी इत्यादींनी केलेल्या अनाचारांची माहिती त्यांनी सांगितली आहे. पंचाक्षरे, भुताळे, डाकिणी, गुरव, कौल लावणारे, देवस्की करणारे या सर्वांवर अचूक प्रहार केले आहेत. अज्ञान आणि धर्मभोळेपणा यांचा प्रसार करून समाजाच्या बुद्धीला ग्रासणारा हा वर्ग आहे. तो देशाच्या संपत्तीत कोणतीही भर घालीत नाही. हिंदू धर्मातल्या भिक्षुकांप्रमाणेच बौद्ध, जैन, शैव, मुसलमान इत्यादी भिन्न भिन्न धर्म आणि संप्रदाय यांतील साधुसंन्याशांची माहिती दिली आहे. समाजानेही आपल्या दानधर्माच्या कल्पनेत काही मूलभूत बदल करावेत असे सांगितले आहे. 'भिक्षुक' या पुस्तकातल्यासारखाच अधिक विस्तृत आणि व्यापक विचार 'आगमप्रकाश' या ग्रंथात केलेला आहे.

‘भिक्षुका’वर टीका केल्यामुळे भिक्षुकवर्ग आणि समाजातला भोळाभाबडा वर्ग दुखावला गेला. लोकहितवादींवर अर्वाच्य टीका करणाऱ्यांत हा वर्ग सामील झाला असला तर त्यात आश्चर्य नाही. समाजसुधारक हा समाजाने दिलेल्या शिव्यांवरच जगतो, असे म्हणण्याइतपत सुधारकांची निंदा झाली आहे.

सुप्रसिद्ध फारसी कवी सादी यांच्या ‘गुलिस्तान’ या ग्रंथाच्या आठव्या अध्यायाचे भाषांतर करून ते ‘पुष्पवन’ या नावाने इ.स. १८५१ मध्ये लोकहितवादींनी प्रकाशित केले. फारसी भाषा त्यांना उत्तम अवगत होती. खूप वाचावे आणि चांगले आढळेल ते मराठीत आणावे, ही त्यांची धडपड साहित्यवाढीला पोषक होती. हा अनुवाद अतिशय सहज आणि मराठीच्या प्रकृतीला अनुसरून त्यांनी केला आहे. हे भाषांतर कोठेही कृत्रिम किंवा अवजड झालेले नाही. विचार आणि भाषा या दोन्ही दृष्टींनी रसपूर्ण अशी अनेक स्थळे ‘पुष्पवना’त आढळतात. सादीच्या प्रतिभेला न्याय देणारे हे भाषांतर लोकहितवादींनी केले. त्यांच्यात ही प्रतिभेची लक्षणीय चमक होती. पुढील विचार पहावेत.

‘ज्याला कान नाही तो काय ऐकेल आणि ज्यावर फास टाकला तो काय पळून जाईल?’, ‘जर सर्व रात्री चांदण्यांच्या झाल्या तर चांदण्यांस पुसतो कोण?’, ‘कसबीण म्हातारी झाली म्हणजे मी पाप करणार नाही’, अशी शपथ वाहते व पश्चाताप करते. फौजदार कामावरून हाकून दिला म्हणजे ‘मी कोणास इजा देणार नाही’ म्हणतो. पण सामर्थ्य गेल्यावर या बोलण्याचा काय उपयोग?’

‘वैद्य आहेत ते थोडे खातात. गृहस्थ बेताने. तपस्वी-संन्यासी किंचित, तरणे सरेतो पावेतो व म्हातारे जिरेतो पावेतो व भट्ट दम लागेतो खातात. आणि पोटात रिकामी जागा ठेवित नाहीत. पोटावर लक्ष देणारा आहे. त्यांस दोन दिवस झोप येत नाही. एक दिवस फार खाल्ले म्हणून दुसरे दिवशी काहीच नाही म्हणून.’

‘सापाची फडी शत्रूच्या हाताने ठेच म्हणजे दोहोतून एक तरी लाभ होईल. सर्प तरी मरेल नाहीतर शत्रू तरी मरेल.’

‘चांगल्ये चालीचा भिकारी बरा पण वाईट चालीचा राजा वाईट.’

ही रसपूर्ण वाक्ये अनुवादित आहेत असे वाटत नाही. अनुवादाचे कौशल्य लोकहितवादींत पुरेपूर होते. सुगंधी विचारांचे हे ‘पुष्पवन’ वाचताना मन प्रसन्न होते. लोकहितवादींनी ललित लेखन केले नाही पण ‘पुष्पवन’ ही अनुवादित ललितकृती आणि ‘सुभाषित’ अथवा ‘बोधवचने’ ही पुस्तके त्यांच्या ललितलेखनाची ग्वाही देतात.

‘एक मेंढक्याचा मुलगा आपले बापास पुसता झाला, म्हाताऱ्या, तू फार पाहिले आहेस तर मला एक चांगली बुद्धी सांग. हे ऐकून सांगता झाला. बाबा, भलेपणा इतका कामाचा नाही की लांडगे धीट होऊन उपद्रव करतील.’

‘पुष्पवन’ या पुस्तकाचे वाचन जेवढे रंजक तेवढेच उद्बोधक आहे.

अनुक्रमणिका

## सुभाषिते अथवा सुबोध वचने

हे आणखी एक पुस्तक इ.स. १८७८ मध्ये प्रकाशित झाले. पुढे त्याचीही दुसरी आवृत्ती निघाली. या पुस्तकाबद्दल लोकहितवादी म्हणतात, 'सन १८४३ पासून अनेक ग्रंथ वाचनक्रमात जेथे जेथे नीतिबोधक, चमत्कारिक, शहाणपणाची, सभाचातुर्याची, साहित्योपयोगी आणि व्यवहारात व परमार्थात सन्मानदर्शक अशी वाक्ये आढळली ती वेळोवेळी व ठिकठिकाणी टिपणे करून ठेवली होती.' या निवडलेल्या टिपणातूनच हे पुस्तक निर्माण झाले. त्याचा हेतू सांगताना त्यांनी म्हटले आहे, 'लोकांस ज्ञान, बोध, चातुर्य व साहित्य यांच्या प्राप्तीकरिता.' लेखकाच्या मते ज्ञान मिळविण्याची जी अनेक साधने आहेत, त्यांत 'सुभाषित' हेही एक साधन आहे. या पुस्तकात एकूण शंभर प्रकरणे आहेत. सुवचनांचा हा एक कोश आहे. बहुविध विषयांवरील ही सुभाषिते वाचकाला आनंद देतात आणि त्याच्या विचाराला चालनाही देतात. केवळ सवंग करमणूक हा मात्र या लेखनाचा मुळीच हेतू नाही. तशा प्रकारच्या साहित्यात लोकहितवादींसारखा विचारवंत कधीही रमणे शक्य नाही. प्रत्येक सुभाषितात किंवा प्रकरणात जीवनाचा महत्त्वपूर्ण विचार आलेला आहे. सुभाषितात विचारसौंदर्य आणि अर्थचमत्कृती आढळते. भावनेच्या स्पर्शाने त्यात काव्यत्वही निर्माण होते. एक संस्कृत सुभाषित असे आहे, 'सुभाषितातल्या मधुरतेमुळे अमृत लज्जित होऊन स्वर्गात निघून गेले. द्राक्षे सुकून गेली, साखर पाषाणरूप बनली. इतकी रसवत्ता सुवचनांत असते.' एका कवीने तर 'सुंदर युवतींच्या लीलांपेक्षा सुभाषितांतील सौंदर्य अधिक आकर्षक असते असे म्हटले आहे.' लोकहितवादींच्या नित्य वाचनात विविध रसात्मक गोष्टी येत असत. एखादे लक्षणीय वचन आढळले की ते तत्परतेने लिहून ठेवीत. त्यांची अशी टिपणे म्हणजे 'विविधज्ञानविस्तार' असायचा. लोकहितवादींच्या मृत्यूनंतर त्यांचे बरेचसे हस्तलिखित वाङ्मय नाहीसे झाले त्यात त्यांच्या आत्मचरित्राचाही समावेश होता असे म्हणतात. ही निवडक सुभाषिते मात्र त्यांनी रसिक वाचकांसाठी सादर केली आहेत. विषण्ण मनाला उत्साह देण्याची शक्ती या प्रकारच्या वाङ्मयात असते. ते कोठूनही वाचावे त्यात क्रम लावण्याचेही कारण नाही. मनाला आलेली जडता आणि कटुता सुभाषित रसाने नाहीशी होते. या पुस्तकात शेकडो विषय आले आहेत. सज्जन, दुर्जन, स्तुती आणि निंदा, सुख व दुःख, प्रारब्ध, दारिद्र्य, काळ, प्रीती, स्त्री, पुत्र, म्हातारपण नानाप्रकारच्या विषयांवर सुंदर आणि प्रभावी विचार व्यक्त करणारी ही सुभाषिते पुन्हा पुन्हा वाचावीत अशी आहेत. 'प्रश्न' या शीर्षकाच्या सुवचनात म्हटले आहे.

'दिवा गेल्यावर समयीत तेल घालून काय उपयोग? आणि चोर चोरी करून गेल्यावर 'सावध रे सावध' असे म्हणून काय होणार? मूर्ख लोकांच्या सहवासापेक्षा दुःख ते कोणते? आपली इंद्रिये स्वाधीन ठेवणाऱ्याहून दुसरा शूर कोण आहे? एखाद्या बकाली शहरात गेले तर द्रव्यप्राप्ती कोठून होणार? वाईट पुत्राकडून वृद्ध पित्याची शुश्रूषा ती काय राहणार? आणि मूर्ख शिष्यांस शिकवून यश कसे मिळणार?

'भाषण' या विषयावर म्हटले आहे. 'प्रिय भाषणाने सर्वांसच संतोष वाटतो. मग तसे बोलण्याविषयी दरिद्र का असावे? कोकिळ काय कोणास देतो? आणि गाढव काय कुणाचे नुकसान करतो? पण त्यांचे सुस्वर आणि कर्कश शब्द अनुक्रमे कारण आहेत. मनुष्यांस गुणावरून द्रव्य मिळत नाही. पण बहुधा भाषणावरून मिळते. तसेच द्रव्य गमावणे हेही बहुधा दुर्गुणाने होत नाही पण भाषणानेच होते. पंडितांचे भाषणाची शोभा चांगल्या श्रोत्यांवर आहे.'

म्हातारपणाविषयी लिहिलेले हे बोधवचन लक्षणीय आहे. 'वाघासारखे म्हातारपण पुढे उभे राहून थरथर कापविते आहे. शत्रूसारखे रोग शरीरावर टोले मारीत आहेत. फुटलेल्या मडक्यातील पाण्यासारखा

अनुक्रमणिका

आयुष्याचा एकसारखा पाझर चाललाच आहे. तरी लोक ईश्वराकडे लक्ष न देता क्षणिक सुखास लुब्ध होऊन अनेक दुष्कर्मे करतात, हे आश्चर्य नव्हे काय? कोणत्याही कृत्यात वृद्धांची मसलत श्रेयस्कर असते कारण ते जे काही सांगतात ते त्यांच्या फार दिवसांच्या अनुभवांवरून दुसऱ्यास हितप्रद असेच नेहमी सांगतात. राज्यकारभारात विद्वान, विचारी आणि वृद्ध असेच मुत्सद्दी असावे.' प्रस्तुत पुस्तक अनेक चांगल्या विचारांनी भरलेले आहे. उत्कृष्ट विचारांचा उत्तम संग्रह असे याचे रूप आहे, अशी पुस्तके काळाच्या ओघात जुनी होत नाहीत. काळ कोणताही असला तरी ज्या विचारात शाश्वत सामर्थ्य असते आणि जो विचार जीवनाला व मनाला प्रेरक असतो तो शिळा होत नाही, लोकहितवादींनी संग्रहित केलेली ही सुवचने वाचकाला चिंतनशील बनवितात. हे या पुस्तकाचे श्रेय आहे.

## स्वामी दयानंद चरित्र

आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचे चरित्र लिहून ते 'लोकहितवादी' या नियतकालिकातून इ.स. १८८१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. स्वामी दयानंदांच्या विचारांचा लोकहितवादींवर पुष्कळ प्रभाव पडलेला होता. आर्यसमाजाच्या कार्याशी सुरुवातीपासून त्यांचा संबंध आलेला होता. मुंबईला समाजात त्यांची अनेक व्याख्याने होत असत. आर्यसमाजाचे ते एक विश्वस्तही होते. स्वामी दयानंद चरित्र म्हणजे लोकहितवादी स्वामीजींकडे कसे सर्वार्थाने, भक्तिभावाने आकृष्ट झाले होते याचे दर्शन घडवते. विभूतिपूजेचे हे एक उदाहरण मानावे लागेल. वस्तुतः लोकहितवादी बुद्धिवारी विचारवंत होते, एखाद्या भगव्या संन्याशाची त्यांनी भावपूर्ण वृत्तीने स्तुतिस्तोत्रे गावीत, हे असंभवनीय वाटते. पण स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वावर, वक्तृत्वावर आणि त्यांच्या वेदाभ्यासावर लोकहितवादी पराकोटीचे संतुष्ट झाले होते, असा पुरावा या चरित्रातून मिळतो. स्वामी दयानंद हे थोर धर्मचिंतक होते, या शंका नाही. भारतीय संस्कृती ते आपल्या प्रयत्नाने उज्ज्वल बनवीत आहेत, असा त्यांना विश्वास वाटत होता. दयानंद चरित्र लिहिण्यात श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वाचे लोकांना सदैव स्मरण राहावे हाच लेखकाचा हेतू आहे. त्यांनी म्हटले आहे,

'दयानंद स्वामींसारखी मनुष्ये या देशाचे दुर्भाग्याने फारच थोडी होतात व त्यांच्यासारखी जी कोणी विरल मनुष्यरत्ने जन्मतात त्यास आयुर्मर्यादा फारच थोडी होते, हे आपल्या देशाचे अत्यंत दुर्दैव होय... शूरवीर, वक्ते, पंडित, ज्ञाते, तत्त्वज्ञ, कुशल कारागीर, शिल्पज्ञ, देशैकनिष्ठ, उद्योगी, कष्टाळू, श्रमसाईक, धार्मिक, उदार, सदाचारी, निराभिलाषी, निगर्वी आणि प्रसंगानुरोधी अशी मनुष्ये या देशात पाहिजेत तितकी असल्यावर मग देशाचा भाग्योदय दुसरा कोणता? स्वामी दयानंदजींमध्ये वरील कित्येक गुणांचे एकसमयावच्छेदेकरून वास्तव्य असल्यामुळे तो पुरुष अद्वितीय होता असे म्हणावे लागते.'

या चरित्रात आत्यंतिक गुणगौरव आहे. भावनेचा प्रभाव अधिक आहे. त्यामुळे व्यक्तिपूजनाचे स्वरूप आलेले हे चरित्र स्वामींच्या कार्याची यथार्थ माहिती देऊ शकत नाही. ज्या काळात हे चरित्र लिहिले गेले त्या काळात चरित्राकडे पाहण्याची लेखकांची आणि वाचकांची दृष्टी आजच्याइतकी उत्क्रांत झालेली नव्हती. चरित्रलेखन हे एक शास्त्र आहे. या लेखनाला एकांगीपणा येऊ नये किंवा त्यात अतिशयोक्त गुणगानही होऊ नये ही जाण १८८३ मध्ये दिसत नाही. लोकहितवादींची इतर पुस्तके जितकी वस्तुनिष्ठ आहेत तितकी वास्तवनिष्ठ दृष्टी या पुस्तकात त्यांना ठेवता आली नाही. एका भारावलेल्या भक्ताने लिहावे त्याप्रमाणे हे चरित्रलेखन झाले आहे. या मर्यादेचा उल्लेख करणे आवश्यकच आहे. लोकहितवादी आणि न्या. रानडे यांनी पुढाकार घेऊन स्वामी दयानंदांची व्याख्याने पुण्यात घडवून आणली होती. दयानंदांच्या

मिरवणुकीवर विरोधकांनी चिखलफेक करून ती उधळण्याचा प्रयत्न केला होता. स्वामीजींच्या असा अवमान व्हावा हे लोकहितवादींना धक्कादायक कृत्य वाटले. स्वामीजींच्या कार्याचे भरघोसपणे गुणगान करावे, त्यांची महती पटवून द्यावी, यासाठी हे चरित्र त्यांनी लिहिले. दुसरे असे की, स्वामीजींच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत हे चरित्र लिहिले गेले. स्वामीजींच्या व्यक्तित्वावर आणि कार्यावर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी अशिष्ट टीका केली होती. त्या टीकेचा राग आणि दुःख लोकहितवादींच्या मनात निश्चितच होते. ज्या विद्वानाने वेदवेदांग अभ्यासिले, धर्म आणि संस्कृतीला आलेली ग्लानी आर्यसमाजाच्या माध्यमातून निरसून टाकली, अशा विभूतीवर चिपळूणकरांनी अविचारी टीका केली यामुळेही ते अस्वस्थ होते. प्रस्तुत चरित्रात चिपळूणकरांच्या टिकेवर लेखकाने प्रतिटीका केली आहे. ते म्हणतात,

‘स्वामीजींच्या गुणावगुणाचे किंवा मतभेदाचे पृथक्करण करण्याचे ‘माला’कारांस सामर्थ्य नव्हते. अथवा तसे करणे त्यास शिष्ट वाटले नसावे. कारण तसे केले असते तर कदाचित त्यांचे अंगावरच मसलत आली असती. ज्या विद्‌वान पुरुषाची येथे सव्वा डझनावर व्याख्याने झाली ती सर्व ऐकून त्या व्याख्यानांमध्ये ‘माला’कारांस दुधाची चरवी रिचवण्यापेक्षा काहीच गुण दिसला नाही. ही किती सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. अथवा त्यात आश्चर्य ते कसले? मत्सर आणि पोक्त विचारांचा अभाव या दोन दुष्ट गुणांनी तरुण ‘माला’कारांचे न्यायदृष्टीवर झडप घालून त्यांच्या गुणावगुण विवेचन बुद्धीस अत्यंत मांद्य आणिले होते. त्यामुळे स्वामी दयानंदजींमध्ये गुणलेशसुद्धा आढळला नाही. ‘माला’कारांस स्वामीजींच्या मनावर आणि त्यांनी केलेल्या ग्रंथांवर शांतपणे विचार करण्यास अवकाश झाला नाही व त्यांनी स्वामीजींविषयी आपला अभिप्राय देण्याची फार घाई केली. त्यामुळे त्यांच्या हातून दयानंदजींविषयी निंदापर लेख लिहिला जाऊन तोच काय तो त्यांच्यामध्ये कायम राहिल, ह्याबद्दल वाईट वाटते.’

चिपळूणकरांनी केलेली टीका खोडसाळपणाची आहे यात शंका नाही. पण त्या पार्श्वभूमीवर लोकहितवादींनी स्वामी दयानंदांच्या व्यक्तित्वाचे केलेले वर्णन म्हणजे गुणांचे गायन आहे. खरे तर लोकहितवादींची लेखणी विभूतिपूजनाच्या वाटेने सहसा जात नाही. पण दयानंदांच्या प्रभावाखाली मात्र ते आले होते. त्यांच्या संकीर्ण लेखनात हे ‘दयानंद चरित्र’ उल्लेखनीय आहे. या पुस्तकाची शैली संस्कृतप्रचुर आहे. पण तरीही ती प्रवाही व आवेशयुक्त अशी आहे. क्लिष्टता किंवा जडता कुठेही आली नाही. ‘शतपत्रां’तली शैली आणि ‘दयानंद चरित्रा’तली शब्दकळा या दोहोत पुष्कळच अंतर आहे. वय, व्यासंग आणि अभिरुची यांच्याबरोबर लेखकाच्या शैलीतही बदल होत जातो. लोकहितवादीही त्याला अपवाद नाहीत, असेच म्हटले पाहिजे.

वेगवेगळ्या विषयांबद्दल लोकहितवादींच्या लेखनाचा येथे स्थूल आढावा घेतला आहे. त्यांच्या काही पुस्तकांच्या संदर्भातच संक्षेपाने विवेचन केले आहे. आणखी अनेक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. पण त्यांच्या समग्र वाङ्मयाचे मूल्यमापन या पुस्तकात होणे शक्य नाही. या लेखकाच्या मनःपिंडाची आणि वैचारिकतेची, समाजदृष्टीची ओळख व्हावी, या हेतूनेच या पुस्तकाची रचना झाली आहे. एक समाजसुधारणावादी विचारवंत सामाजिक प्रबोधनाचे कार्य कसे विविधस्वरूपी लेखनांतून १९ व्या शतकात करीत होता याचा परिचय देणे इतकाच हेतू आहे. लोकहितवादींनी ज्ञानविज्ञानाचे जे जे कण हाती लागतील ते ते त्यांनी समाजाला अर्पण केले आहेत.

अनुक्रमणिका

# ७. लोकहितवादींचे टीकाकार

जुनी वाट सोडून नव्या वाटेचा शोध घेत चाललेले प्रगतिवादी समाजसुधारक व लेखक समाजात वादग्रस्त ठरतात. सामान्य माणसाला आणि सनातनी विचारसरणीच्या शास्त्री-पंडितांना कोणी नव्या वाटेने जात आहे किंवा परंपरेची वाट सोडून लोकांना नवी दिशा दाखवीत आहे हे रुचत नाही. नव्या विचारावर आणि त्यांच्या पुरस्कर्त्यांवर प्रतिकूल टीकेचे मोहोळ उठते. पण ज्याला सामाजिक प्रगतीचे चित्र रेखाटायचे असते तो सुधारक कितीही टीका झाली तरी आपल्या नव्या मार्गापासून ढळत नाही.

'नवा शिपाई' ही केशवसुतांची कविता अशा सुधारणावाद्यांच्या बंडखोर मनाचे दर्शन घडवू शकते. लोकहितवादींवर तत्कालीन, ब्राह्मणवर्गाने यथेच्छ टीका करून त्यांना 'स्वजनद्रोही', 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ', 'पारतंत्र्याचा उद्‌गायक', 'इंग्रजांचा स्तुतिपाठक' वगैरे विशेषणांनी झोडपून काढले. कारण लोकहितवादींनी या वर्गावर आपल्या कठोर टीकेची धार धरली होती. जुन्या परंपरेवर त्यांनी आघात केले होते, ब्राह्मण भिक्षुकांच्या वर्ग त्यामुळे दुखावला गेला होता. प्रस्थापित समाजव्यवस्थेत त्यांचे हितसंबंध गुंतले होते आणि तीच व्यवस्था उखडून टाकण्याचा प्रचार आपल्या प्रभावी लेखणी-वाणीने लोकहितवादी करीत होते. त्यांच्यानंतर आलेल्या सर्व समाजसुधारकांना टीकेचे प्रहार सहन करावे लागले आहेत.

लोकहितवादी यांच्यावर प्रखर आणि प्रदीर्घ टीका विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी केली. निबंधमालेचा प्रत्येक अंक टीकेने भरलेला असायचा. सुमारे वर्षभर हे टीकासत्र चालू राहिले. त्या काळात चिपळूणकरांची 'निबंधमाला' सुशिक्षित मध्यमवर्गीयांत विशेष प्रिय होती. हा मध्यमवर्ग 'निबंधमाले'च्या पलीकडे अधिक वाचन करीत नव्हता. त्यामुळे शास्त्रीबुवांनी ज्याच्यावर लेखणीचे शस्त्र उगारले तो लोकहितवादी खरोखरच संस्कृतीचा आणि स्वकीयांचा शत्रू व इंग्रजांचा स्तुतिपाठक असला पाहिजे, हे त्याने गृहीत धरले. मुळातून लोकहितवादी वाचण्याचे श्रम बहुसंख्य लोकांनी घेतले नव्हते. चिपळूणकरांचे शब्द त्यांना सर्वार्थाने खरे वाटत होते. लोकहितवादी रावबहादूर होते. न्यायखात्यात उच्च अधिकारपदावर होते. त्यामुळेच इंग्रजांची बाजू घेऊन ते हिंदू समाजाला आणि विशेषतः ब्राह्मणांना विरोध करीत होते, अशी लोकांची समजूत झाली. ही समजूत दृढ करण्याचे काम चिपळूणकरांच्या लेखणीने केले होते. चिपळूणकर हे राष्ट्रवादी वृत्तीचे पत्रकार असले तरी त्यांच्या राष्ट्रीय जाणिवा परंपरेच्या अभिमानाने पोसलेल्या होत्या. आपली प्राचीन संस्कृती हीच केवळ श्रेष्ठ, असा अंध अहंकार त्यांच्या ठायी असल्यामुळे कोणत्याही सुधारणावादी विचाराला ते कडकडून विरोध करीत असत, धर्मसुधारणा, समाजसुधारणा या विचारांचे मूळ नेमके कशात आहे. या प्रश्नाचा त्यांनी कधीही विचार केलेला आढळत नाही. म्हणूनच चिपळूणकरांना गुरू मानणारे त्यांचे एक लेखक शिष्य ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'चिपळूणकर काही बाबतीत दुराग्रही आणि स्थूलबुद्धी होते. म्हणूनच भांडारकर, रानडे, सार्वजनिक काका, दयानंद सरस्वती, ज्योतीराव फुले वगैरे थोर कार्यकर्त्यांच्या कार्याचे मर्म आणि महत्त्व त्यांच्या बुद्धीला कळले नाही.' अशा आशयाचा अभिप्राय व्यक्त केला आहे. (चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व, पृष्ठ १२५). चिपळूणकरांची वादपद्धती काहीशी उद्धट आणि बेमुर्वतखोर आहे. प्रतिपक्षाला सतत चिमटे घेत व त्याच्या कुचाळक्या करीत ते लिहीत असत. विचार खोडून काढण्यापेक्षा व्यक्तीलाच मोडून काढण्यात त्यांना रस होता. मराठीत खोडसाळ आणि व्यक्तीनिंदापर अशिष्ट टीका सुरू करण्याचे श्रेय त्यांनाच दिले पाहिजे. मराठी भाषेचा हा शिवाजी अनेक चांगल्या व्यक्तींवर आणि विचारांवर अविचाराचे आपली समशेर चालवीत होता. चुरचुरीत आणि तिरकस अशी निंदानालस्ती टीकेच्या नावाखाली केली की ती महाराष्ट्रात फार लवकर लोकप्रिय होते. म्हणूनच चिपळूणकर हे मराठीत निंदाव्यंजक टीकेचे कुलगुरू ठरले. त्यांनी लोकहितवादींवर सुमारे दीडशे पृष्ठांची

अनुक्रमणिका

दीर्घ टीका केली आहे. 'निबंधमाले'च्या ६४व्या अंकापासून ७६व्या अंकापर्यंत प्रत्येक अंकात 'लोकहितवादी' हा एकच विषय होता. त्यांचे आक्षेप काय होते ते थोडक्यात पाहिले पाहिजेत.

१) लोकहितवादींचे लेखन जुने व कालबाह्य ठरलेले आहे. त्यात नावीन्य नाही. प्रेरणा नाही. विचार देण्याची लेखनात कुवत नाही.

२) कोणताही नवा विचार आढळत नाही. किंवा जुना विचार नवीन पद्धतीने प्रकट झालेला नाही.

३) हे लेखन निरुपयोगी आहे. त्याचा विचार करण्याचीही आवश्यकता नाही.

'विचार करण्याचीही आवश्यकता नाही' असे विचारपूर्वक म्हणणारे चिपळूणकर एक वर्षभर 'निबंधमाले'तून सतत टीका करीत राहिले हे आश्चर्यच नव्हे काय? दुसरे असे की लोकहितवादींचे विचार व त्याचे वेगवेगळे पैलू मुळीच लक्षात न घेता ते मनःपूत लिहीत राहिले. त्या लेखनात उपहास, उपरोध, विपर्यास ही चिपळूणकरी हत्यारे आहेत. फक्त कोणताही अर्थपूर्ण मुद्दा त्यात आढळत नाही. 'लोकहितवादींचे लेखन जुने आणि कालबाह्य झाले' हा आक्षेप तर अगदीच हास्यास्पद आहे. स्त्रीशिक्षण, स्त्री-पुरुष समानता, पुनर्विवाह, आधुनिक ज्ञानविज्ञानाची उपासना, धार्मिक समजल्या जाणाऱ्या रूढी आणि कर्मकांड यांना विरोध, स्वदेशीचा पुरस्कार, लोकसत्तात्मक राज्याची मागणी, नव्या ग्रंथाची निर्मिती व्हावी ही इच्छा इत्यादी अनेक महत्त्वाचे विषय 'शतपत्रां'त, 'निबंधसंग्रहा'त आणि इतर पुस्तकांत आलेले आहेत. आज एकविसाव्या शतकातही हे विषय महत्त्वपूर्ण आहेत.

लोकहितवादींचे ग्रंथलेखन केवळ विस्तृत नाही तर सामाजिक आणि राजकीय विचारधारेला नवीन वळण लावणारे आहे. या लेखनाचा वैचारिक कस उच्च दर्जाचा आहे. बुद्धिवादाकडे लोकांना ओढून नेणारा पहिला, विपुल लेखन करणारा ग्रंथकार म्हणून लोकहितवादींचाच उल्लेख अटळ आहे. जे विचार जुने होतात त्यांचा उल्लेखही कोणी पुढे करीत नाही. पण 'शतपत्रां'चे पुनर्मुद्रण डॉ. आंबेडकरांनी आपल्या पत्रात केले तेव्हा 'शतपत्रां'ची निर्मिती होऊन ८० वर्षे उलटली होती. आंबेडकरांना जे विचार आधुनिक युगाच्या उभारणीसाठी आवश्यक वाटतात ते विचार चिपळूणकरांना केवळ पंचवीस-तीस वर्षांतच जुने आणि कालबाह्य वाटू लागले हा काय चमत्कार आहे! 'शतपत्रे' या ग्रंथाने नवयुगाची पहाट महाराष्ट्रात उदयाला आली, त्यांच्या इतर ग्रंथातही बंडखोर विचारांचे ओज आहे. शेतकऱ्यांच्या दुःस्थितीवर उपाय; देशात झपाट्याने नवी यंत्रतंत्रे निर्माण व्हावीत; कारखाने व उद्योगधंदे वाढावेत; देश आर्थिक अभ्युदयाकडे चालत राहावा; भिक्षुकशाही आणि पुरोहितशाही संपुष्टात येऊन ब्राह्मणवर्गाने नव्या ज्ञानाची कास धरावी; समाजातले सर्व वर्ग प्रगत व्हावेत हेच विचार लोकहितवादींनी सुमारे ४० वर्षे आपल्या साहित्यात पुन्हा पुन्हा मांडले आहेत. आता हे विचार आणखी कित्येक शतके जुने होण्याची शक्यता नाही. विचारशक्तीला सतत खाद्य पुरवणारा एक ग्रंथकार म्हणजे लोकहितवादी! 'प्रभाकर' पत्रातून दोन वर्षांत लिहिल्या गेलेल्या 'शतपत्रां'चा जरी विचार केला तरी सर्वांगीण समाजबांधणीचा एक अभिनव पुरोगामी विचार त्यातून पुढे आला, असाच निष्कर्ष बहुतेक अभ्यासकांनी काढला. चिपळूणकरांनी टीका निराधार आणि अर्थशून्य आहे. त्यात थोडे जरी तथ्य असते तरी स्वतः लोकहितवादींनी त्याचे स्वागत केले असते. खरे तर या विचारहीन टीकेला लोकहितवादींनी उत्तर दिले असते. पण चिपळूणकरांचा अत्यंत तरुण वयात मृत्यू झाला. त्यामुळे त्यांच्या टीकेला आपण खोडून काढले पाहिजे असा आवेश त्यांच्या लेखणीत राहिला नाही. कारण

चिपळूणकरांच्या निधनानंतर उत्तर देण्यात औचित्य नव्हते. विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या 'आमच्या देशाची स्थिती' हा निबंध विशेष गाजला आहे. पण देशस्थितीची वस्तुनिष्ठ मीमांसा मात्र त्यांनी केली नाही. उलट त्यांच्या चिकित्सेत भाबडा आशावाद मात्र आहे. देशाला झालेल्या रोगाचे निदानच त्यांना होऊ शकले नाही. पुन्हा पुन्हा ते प्राचीन भारत हा किती विकास पावलेला देश होता आणि त्या काळात इंग्रज लोक आपल्या कातडीला रंग लावून रानावनांत भटकते होते हीच कहाणी सांगत राहिले. एकेकाळी आमचे वाडवडील कोट्यधीश होते. त्यांच्यापाशी गडगंज संपत्ती होती असे एखाद्या भिकाऱ्याने पूर्वजांच्या ऐश्वर्याची आठवण करावी. पण ते ऐश्वर्य नष्ट का झाले याचा मात्र विचार करू नये, तशी अवस्था चिपळूणकरांची झाली आहे. लोकहितवादींवर चिपळूणकरांनी एक कुत्सित आक्षेप घेतला आहे. ते म्हणतात,

'ज्या माउलीच्या प्रसादाने त्यास आजपर्यंत भाकरी मिळत गेली व ते आज इतक्या योग्यतेला चढले, त्या राजनिष्ठेला वरील मतपरंपरा अत्यंत अनुकूल पडला म्हणून तिची त्यांस दुस्त्यज्यता वाटते.' (निबंधमाला, पृष्ठ १११५).

हा आक्षेप लोकहितवादींच्या चारित्र्यावरच घेतला आहे. इंग्रज माउलीच्या प्रसादाने भाकरी मिळते म्हणून लोकहितवादी इंग्रजांना अनुकूल लिहितात अशा आशयाचीही निंदा त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका घेणारी आहे. ही व्यक्तिगत स्वरूपाची नालस्ती करणे विष्णुशास्त्र्यांना शोभणारे नव्हते पण प्रतिवाद करायला जागाच नसल्यामुळे चिपळूणकरांचाही निरुपाय झाला असावा. असले खालच्या पातळीवरचे आरोप आपण एका ज्येष्ठ विचारवंतावर करीत आहोत याचे भान त्यांना राहिले नाही. निदान त्यांनी एवढे लक्षात ठेवणे आवश्यक होते की इंग्रजांनी चालवलेल्या आर्थिक शोषणावर आणि त्यांच्या पक्षपाती, अन्यायी वृत्तीवर लोकहितवादींनी कडक टीकेचे फटकारे आपल्या ग्रंथांतून मारलेले आहेत. 'शतपत्रां'तदेखील-म्हणजे अगदी सुरुवातीच्या लेखनातही-त्यांनी निःपक्षपातीपणे इंग्रजांवर टीका केली आहे. ज्याला भाकरीचा लोभ असतो तो चाकर आपल्या मालकावर कधीच टीका-टिप्पणी करीत नाही. लोकहितवादींचा प्रामाणिकपणा चिपळूणकरांना माहीत होता. पण आपल्या हातात लेखणीचे शस्त्र आहे; आपण कुणालाही घायाळ करू शकतो या उद्दाम समजुतीने ही अश्लाघ्य टीका चिपळूणकरांनी केली. वैचारिक मुद्देच नव्हते. तेव्हा चारित्र्यावर हल्ला करणे हा भिन्ना उपाय त्यांनी अवलंबिला इतकेच या संबंधात म्हणता येईल.

चिपळूणकरांनी केवळ लोकहितवादींवरच अन्यायी टीका केली असे नव्हे तर अशीच अभिरुचीहीन, निंदाव्यंजक शेरेबाजी स्वामी दयानंद आणि म. जोतिबा फुले यांच्याबाबतीतही केली आहे. दयानंदांचे विचार का पसंत नाहीत हे सांगण्याऐवजी ते दररोज चरवी भरून दूध कसे पितात आणि त्यांचे शरीर कसे धष्टपुष्ट आहे यावरच चिपळूणकरांनी लक्ष केंद्रित केले आहे. म. फुले यांच्या लेखनातले किरकोळ व्याकरण दोष काढून त्यांना शुद्ध मराठी कसे लिहिता येत नाही हे त्यांनी सांगितले आहे. स्त्री-शिक्षण, शेतकऱ्यांची उन्नती, समताविचारांसाठी त्यांनी केलेला संघर्ष, अस्पृश्य जनतेसाठी त्यांनी केलेले महनीय कार्य या किरकोळ गोष्टी चिपळूणकरांना दिसल्या नाहीत. त्यांना फक्त अशुद्ध लेखन दिसले.

'ज्ञानभांडाराच्या किल्ल्या आम्हा ब्राह्मणांच्याच कमरेला आहेत. त्या मिळवण्यासाठी आमच्यासमोर तुम्हाला वाकावे लागेल' अशा अहंगंडाचे प्रदर्शन मात्र त्यांनी केले. किल्ल्या त्यांच्याच कमरेला राहिल्या. कुलुप फोडून ज्ञानभांडारात बहुजन समाजाने प्रवेश केला. हे श्रेय फुल्यांचेच आहे. असो. यापेक्षा चिपळूणकरी टीकेचा अधिक विचार करण्याचे कारण नाही. स्वतः लोकहितवादींनी आपल्यावरील टीकेंचा उल्लेख करून 'आपण उत्तर लिहिण्यास समर्थ आहोत. पण विचारी आणि विद्वान लोकांनी आपल्या व

चिपळूणकरांच्या लेखनातील सत्यासत्य पारखून घ्यावे' असे म्हटले आहे. ('लोकहितवादी नियतकालिक जाने-फे. १८८३).

'लोकहितवादींच्या विचारांचे स्वागत करणारे एक थोर समीक्षक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी 'शतपत्रां'च्या शब्दशैलीवर आक्षेप घेतले आहेत. ते म्हणतात,

'शतपत्रातील भाषा लोकांना चीड येण्यास कारणीभूत झाली. मूर्ख, टोणपे, बैल, जनावरे, पोळ अशा शिव्या त्यांनी ब्राह्मणांना व एकंदर हिंदू समाजाला प्रत्येक पत्रात दिल्या आहेत... प्रखर भाषेने लोकांना चेतना मिळण्याऐवजी त्यांचा तेजोभंग मात्र झाला आणि आधीच पराभूत झालेल्या समाजाचा तेजोभंग करणे हे फार मोठे पाप होय.' डॉ. सहस्रबुद्धे यांचा कटाक्ष त्यांच्या शिवराळ वाटणाऱ्या भाषेवर आहे. या आपेक्षात काही अंशी सत्य आहे. 'शतपत्रां'तली भाषा कित्येक स्थळी अधिकच कडवट झाली आहे. पण या भाषेमागे विधायक हेतू आहे. शिवराळपणाच्या मुळाशी समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे उत्कृष्ट उद्दिष्ट आहे. शतकानुशतके हिंदी समाज कर्मकांड उगाळीत बसलेला आहे. यात्रा-जत्रा, होम-हवन आणि जप-जाप्य या पलीकडे भौतिक उत्कर्षाकडे, ज्ञानसाधनेकडे त्याने कधी पाहिलेच नाही. ही चीड लोकहितवादींच्या भाषेतून व्यक्त झाली आहे. मृदुमृदुल, आर्जवी शब्दप्रयोगाने सामाजिक जागृती खरोखरच होऊ शकली असती काय हा प्रश्न आहे. कधी कधी अत्यंत स्पष्ट आणि कठोर शब्द उच्चारण्याची जरूर असते. लोकहितवादींनी हे काम 'शतपत्रां'त केले. त्यांच्या अन्य साहित्यात आक्रमक भाषा आढळत नाही. म. फुले यांच्याही भाषेवर टीकाकारांनी असेच आक्षेप घेतले आहेत. संत तुकारामांची भाषादेखील आक्रमक व क्वचित ग्राम्य आहे. पण समाजाची आकलनशक्ती आणि काळवेळ लक्षात घेऊन त्यांनी आपली शाषा योजली आहे. भाषेतला फटकळपणा काहीवेळा अपरिहार्य असतो. इतके लक्षात घ्यावे लागते. समाजाचा तेजोभंग करण्याचा हेतू ठेवून कोणी समाजसुधारक लिहीत नाही. लोकप्रबोधन हाच त्याच्या लेखनातला मध्यवर्ती हेतू असतो.

अनुक्रमणिका

# ८. आजच्या संदर्भात लोकहितवादी

लोकहितवादींचे चरित्र त्यांच्या साहित्यातून दिसते. या चरित्रात फार नाट्यपूर्ण संघर्ष नाही. पण तरीही समाजतल्या प्रतिगामी वृत्तींशी आणि सनातन विचारांशी त्यांनी ज्या लढाया केल्या त्याचे चित्र या साहित्यात उमटले आहे. ज्या काळाच्या आणि वातावरणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कार्य केले ते विशेष महत्त्वाचे आहे हे लक्षात येईल. आज त्या वेळच्या परिस्थितीची उग्रता नीटशी समजणार नाही. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार आज झाल्याने थोड्या फार अंशाने सहिष्णुता, समजूतदारपणा वाढीला लागला आहे. पण एकोणिसाव्या शतकात अंधश्रद्धा आणि अज्ञान यांचे कठीण खडक लोकहितवादींना व इतर सुधारकांना फोडावे लागले. प्रबोधन आणि परिवर्तन यांची नवी वाट सुधारकांच्या घामाने व अश्रूंनी भिजली आहे. आजूबाजूच्या काळोखावर प्रकाशाची अक्षरे लिहिण्यासाठी त्यांना बुद्धिवादाची लेखणी हातात घ्यावी लागली. समाजमनाला परंपरा सोडून नवे काही स्वीकारावे असे वाटत नाही. त्यामुळे परंपरा आणि नवीनता यांच्यात संघर्ष सुरू होतो. परंपरेचे ढोल वाजत असताना परिवर्तनाचा सूर फार थोड्या लोकांच्या कानांवर जातो. त्याहूनही थोड्या लोकांच्या मनात तो प्रवेश करतो. त्यामुळेच सामाजिक परिवर्तनची चळवळ फार मंदगतीने चालली आहे. काही वेळा तर ती दोन पाऊले पुढे जाते आणि चार पाऊले मागे येते. ही चळवळ बलिष्ठ करण्यासाठी लोकहितवादी आणि त्यांच्याबरोबर व नंतर अनेक विचारवंत, क्रांतिकारक कार्य करीत राहिले. एकोणिसाव्या शतकातले चित्र आता दीड शतकांनंतर बदलत चालले आहे. हे यशसुद्धा थोडके नाही. समाज बदलता येतो, माणूस नव्या विचारांकडे वळवता येतो, हे यातून सिद्ध होते. लोकहितवादी आणि आगरकर, फुले आणि आंबेडकर यांच्या विचारांतून व चळवळीतून नव्या जीवनाची दिशा सापडू शकते. परिवर्तनाची चळवळ फसली आहे असा निराशावादी निष्कर्ष काढण्याचे काही कारण नाही. अंधाराला आव्हान देणारे तेजस्वी आणि ओजस्वी विचार प्रकाशाची वाट दाखवू शकतात यात संशय नाही.

सामाजिक सुधारणांचा इतिहास दीडशे वर्षांचा आहे. ज्या स्वातंत्र्याचे स्वप्न 'शतपत्रां'त १८४८ मध्ये रेखाटले होते ते १९४७ साली साकार झाले. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरुद्ध महात्म्यापासून सामान्य माणसांपर्यंत सर्वांनीच एक दीर्घ लढाई केली. स्त्री-शिक्षणाला वेग आला. समाजातल्या खालच्या स्तरांतही शिक्षणाचा प्रवाह पोहोचला. खेड्यापाड्यांत बदल झाले. मूठभर विशिष्ट जातीच्या हाती असलेले राजकीय आणि सामाजिक नेतृत्व आता उरले नाही. सर्व जाती-जमातींना समानता आणि समान अधिकार यांचा लाभ झाला. हे केवळ राजकीय सत्तेमुळे घडले नाही, तर सामाजिक विचारात सुधारकांनी जी संक्रमणे घडवून आणली त्यामुळेच जीवनाच्या अनेक क्षेत्रांत परिवर्तनाचे पडसाद उमटू लागले. बालविवाह संपले. असंमत वैधव्याचा अन्याय नाहीसा झाला. धर्मविचारात प्रगती झाली. आता अस्पृश्यतेचे आणि जातिव्यवस्थेचे कुणीही समर्थन करीत नाही. पण समतेचा प्रश्न अजून ठामपणाने उभा आहे. तरीही परिस्थितीच्या रेट्याने हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, जैन, बौद्ध आणि शीख इत्यादी समाज परस्परांच्या जवळ सरकत चालले आहेत.

आता एकविसाव्या शतकात लोकहितवादींची आठवण कशासाठी करायची? लोकहितवादींचे साहित्य या काळात कोणती प्रेरणा देणार आहे? लोकहितवादी आता इतिहासजमा झालेले विचारवंत आहेत. आता पाठीमागे वळून पाहाण्याचे कारण नाही, असेही कुणी म्हणेल. त्याला असे उत्तर देता येईल की, ज्या विचारवंताच्या विचारात भविष्यकाळाकडे पाहण्याची दृष्टी असते त्या साहित्यिक, क्रांतिकारक आणि सुधारक यांना विसरणे हा आपला अपराध ठरेल. लोकहितवादी, फुले प्रभृती वैचारिक नेते आणि

समाज घडवणारे विचारवंत जुने होत नाहीत. त्यांच्यापासून ज्ञान आणि नवनिर्मितीची ऊर्जा मिळत असते. इतकेच की, त्यांचे केवळ पूजन करू नये. कारण ते पूजेचे विषय नाहीत. अशा नेत्यांच्या पाऊलखुणांच्या मागोवा घेत चालायचे असते. काळ आणि परिस्थिती बदलली तरी त्यांच्या विचारातला ताजेपणा ओसरत नाही. उदाहरणार्थ, 'ग्रंथप्रामाण्य झुगारून द्या आणि बुद्धीला पटेल तेच स्वीकारा.' हा त्यांचा संदेश आणखी कितीही शतके चेतना देऊ शकतो. धर्माच्या नावाखाली रूढ झालेल्या कित्येक अंधश्रद्धा नष्ट करण्याचा विचार लेकहितवादींप्रमाणेच सर्व समाजचिंतकांनी पुन्हा पुन्हा सांगितला आहे. तोही अखंड उपयोगी पडेल. परंपरेला कवटाळण्यापेक्षा प्रगतीच्या दिशेने चालावे, स्त्री-पुरुष समान समजावेत वगैरे विचार कोणत्याही काळात माणसाला स्वीकारावेच लागतील. आपल्याकडे शास्त्र आले पण शास्त्रीय दृष्टी आली नाही. शास्त्राबरोबरच शास्त्रसंपन्न दृष्टिकोन येणे आवश्यक आहे, असे अनेकविध विचार नित्य नवीन आहेत. लोकहितवादींनी केवळ हिंदू समाजाचीच चिकित्सा केली हा गैरसमज होऊ नये. हिंदू हा शब्द त्यांनी जात किंवा धर्म या अर्थाने योजलेला नाही. तो देशवाचक शब्द आहे. हिंदुस्थानातील समाज. असा त्याचा अर्थ घ्यावा लागतो. जात आणि धर्म, पंथ आणि संप्रदाय यांना महत्त्व न देता आपली लोकशाही आणि स्वातंत्र्य यांना मजबुती द्यावी हा आशय स्वातंत्र्यपूर्व कालखंडात लोकहितवादींच्या विचारातून व्यक्त होतो. पुरोगामी मूल्यांच्या स्वीकाराची प्रक्रिया सुरू करावी आणि नवजीवनाची चळवळ यशस्वी करावी, हाच अर्थ लोकहितवादींच्या जीवनातून आणि साहित्यातून मिळतो.

## निरोप

'शतपत्रां'चा इत्यर्थ सांगताना ते आपल्या नेहमीच्या उत्कट, भावपूर्ण भाषेत सांगतात,

'आज दोन वर्षे मी लोकांस त्यांची स्थिती, रीती कशी आहे ती अगदी भीड न धरिता उघड करून सुचविली. त्यात एखादे अक्षर अधिक-उणे, शुद्ध-अशुद्ध, कोणास वाटले तर त्यांनी क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे की जो कोणी या पत्राचे अवलोकन करील आणि विचार करून पाहील, त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असे वाटले. लोकहितवादीने कोणाची मजुरी पत्करली नाही; कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरली नाही. कोणाचे सांगण्यावरून किंवा शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केले नाही. लाभावर किंवा द्रव्यावर नजर ठेवून कीर्ती व्हावी या हेतूने लिहिले नाही. इतके श्रम जे केले ते लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी; त्यांनी सुधारावे; त्यास इहलोकी सुखवृद्धी व्हावी; परलोकाचे साधन घडावे व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत त्यांपैकी काही अविचाराने व काही मूर्खपणाने जडलेले आहेत ते कमी व्हावे; किंवा नाहीसे व्हावे; इतक्याच हेतूने मी यथामतीने व स्वइच्छेने वेतनावांचून श्रम केले आहेत. व जितके लिहिले आहे तितके अक्षरशः खरे खरे निवडून, विचार करून काळजीने लिहिले आहे. हे सर्व लोकास नजर आहे... माझे मागणे सर्व लोकांस आहे की मी जे लिहिले आहे त्याचा विचार करून पहा. तुमच्या चांगल्यावाचून त्या लिहिण्याचा हेतू नाही. तुमचे कल्याण व्हावे म्हणून मी झटतो व तुमच्या चुक्या वगैरे उघड करून दाखविण्यात तुम्हास रागरोष येईल हे मी मनात आणले नाही. कारण की, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे फार आहे. माझे अंतःकरण सर्व तिकडे आहे... तुमची सेवा एकनिष्ठेने व निष्कपटपणाने केली त्याजवर तुमची इतराजी नसावी... सर्वांनी कृपालोभ असो द्यावा हे विनंती.'

इ.स. १८५० मध्ये वाचकांना उद्देशून लिहिलेले हे पत्र. यातला प्रांजळपणा आणि अंतरीची तळमळ दोन्ही स्वच्छपणे प्रकट झाली आहेत. पुढे ते आणखी चाळीस वर्षे लिहीत राहिले. लिहिण्याचा हेतू एकच

होता लोकांनी विचार करावा. लोकांचे कल्याण व्हावे. मराठीतला हा आद्य निबंधकार आणि प्रबंधकार. 'उद्‌बोधन' हेच त्यांच्या लेखनाचे एकमेव प्रयोजन. लिहावे, छापावे आणि पुस्तके लोकांना फुकट वाटावीत, हे व्रत त्यांनी कित्येक वर्षे पाळले. सगळ्यात कठीण गोष्ट कोणती? या प्रश्नाला 'विचार करणे' असे उत्तर आइन्स्टाइनने दिले आहे. आपण विचार करून समाजाला विचार करायला लावणे हे कार्य लोकहितवादींनी सतत केले. परंपरेला डावलणारे बंडखोर विचार मांडत राहिल्यामुळे लोकहितवादींना अपमान आणि छळ सहन करावा लागला. पण अशा अपमानाच्या व उपेक्षेच्या वावटळी येत राहिल्या तरी आपल्या अंतरीचा विचारदीप त्यांनी विझू दिला नाही. सुखाची आणि मानाची सरकारी नोकरी व रावबहादूर ही उपाधी या प्रतिष्ठेच्या आणि सत्तेच्या वलयात आरामशीरपणे जगण्याचे सोडून हा न्यायाधीश समाजाला त्याच्या हिताच्या काही गोष्टी जन्मभर सांगत राहिला. त्यातूनच सुधारणावादी विचारांना बळ येत गेले. यशापेक्षा अपयश कदाचित या माणसाच्या पदरात अधिक पडले. पण अपयशाची वाट तुडवीत समजाला एका चांगल्या वाटेने नेत राहाण्याची प्रवृत्ती या माणसात होती. त्या प्रवृत्तीने नाव 'लोकहितवादी' हे आहे.

अनुक्रमणिका

# ९. लोकहितवादींचे प्रकाशित साहित्य

## धार्मिक व नैतिक

१. खोटी साक्ष व खोटी शपथ यांचा निषेध, पुणे, १८५१
२. गीतातत्व, नाशिक, १८७८
३. सुभाषित अथवा सुबोध वचने (संस्कृत ग्रंथातील सुभाषितांचे भाषांतर) ठाणे, १८७८
४. स्वाध्यायः (स्वतंत्र) प्राचीन आर्यविद्यांचा क्रम, विचार आणि परीक्षण, नाशिक १८८०
५. आश्वलायन गृह्यसूत्र (अनुवाद) मुंबई, १८८०
६. आगमप्रकाश, मूळ ग्रंथ गुजराती, मराठी भाषांतरः कै. रघुनाथजी, मुंबई, १८८४

## चरित्रे

१. पृथ्वीराज चव्हाण याचा इतिहास (चंद वरदाई यांच्या पृथ्वीराज रासो या काव्याच्या आधाराने लिहिलेला) पुणे, १८८३
२. पंडित स्वामी श्रीमद्दयानंद सरस्वती, 'लोकहितवादी' अंक, वर्ष जानेवारी-फेब्रुवारी १८८३

## इतिहास

१. भरतखंडपर्व (हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास) पुणे, १८५१
२. पाणिपतची लढाई (काशीराज पंडित याच्या फारसी ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतराचा तर्जुमा) ठाणे, १८७७
३. ऐतिहासिक गोष्टी, भाग १ ला, ठाणे १८७७
४. ऐतिहासिक गोष्टी, भाग २ रा, नाशिक, १८७८
५. हिंदुस्थानचा इतिहास, पूर्वाध (ग्लीगच्या 'The History of the British Empire in India' या ग्रंथाच अनुवाद) ठाणे, १८७८
६. ऐतिहासिक गोष्टी, भाग ३ रा, नाशिक, १८८०
७. गुजराथ देशाचा इतिहास, पुणे १८८५
८. लंकेचा इतिहास, पुणे १८८८
९. सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास (गुजरातीवरून अनुवादित) पुणे, १८९९
१०. उदेपूरचा इतिहास (कर्नल टॉडच्या Amgls of Rajsthan चे भाषांतर) पुणे, १८९१

## राज्यशास्त्र व अर्थशास्त्र

१. लक्ष्मीज्ञान (क्लीफ्टच्या 'Treaties on Politial Economy' या पुस्तकावरून रूपांतरित), पुणे १८४९
२. हिंदुस्थानात दरिद्रता येण्याची कारणे आणि त्याचा परिहार व व्यापारविषयी विचार (दादाभाई नवरोजी यांच्या 'Poverty in India' या निबंधाच्या आधाराने), मुबई, १८७६
३. स्थानिक स्वराज्य व्यवस्खा, पुणे, १८८३
४. ग्रामरचना, त्यातील व्यवस्था आणि त्यांची हल्लीची स्थिती, पुणे, १८८३
५. स्वदेशीय राज्ये व संस्थाने, 'लोकहितवादी' मासिक वर्ष २ रे, ऑक्टोबर १८८३

## समाजचिंतन

१. जातिभेद, ठाणे, १८७७
२. भिक्षुक (मुंबई आर्यसमाजात दिलेले व्याख्यान) ठाणे, १८७७
३. प्राचीन आर्यविद्या व रीती, अलिबाग, १८७७
४. कलियुग (मुंबई आर्यसमाजात दिलेले व्याख्यान) मुंबई, १८७७
५. निबंधसंग्रह(शतपत्रे व इतर निबंध) अहमदनगर, १९६६

## संकीर्ण

१. होळीविषयी उपदेश, मुंबई, १८४७
२. महाराष्ट्र देशातील कामगार लोकांशी संभाषण, पुणे, १८४८
३. सरकारचे चाकर आणि सुखवस्तू हिंदुस्थानातील साहेबलोकांशी संभाषण, पुणे, १८५०
४. यंत्रज्ञान Indroduction to Physical Sciences' या पुस्तकाचा अनुवाद, पुणे, १८५०
५. पदनामा, फारसी पुस्तकाचा अनुवाद, पुणे, १८५०
६. पुष्पवन, सादीच्या गुलिस्तातील आठव्या अध्यायाचा अनुवाद, पुणे, १८५१
७. शब्दालंकार, पुणे, १८५१
८. बोधपत्र, ठाणे, १८७८

याशिवाय १) विचारलहरी २) एका दिवसात लिहिलेले पुस्तक, ३) हिंदुस्थानातील बालविवाह या पुस्तकांचा उल्लेख श्री. कृ. ना. आठल्ये यांनी केला आहे. पण ही पुस्तके उपलब्ध नाहीत. कदाचित ही हस्तलिखिते असावीत. लोकहितवादींनी आत्मचरित्र लिहिल्याची एक नोंद 'ज्ञानप्रकाश'च्या ३० नोव्हेंबर १८९२ च्या अंकात सापडते. पण हे आत्मचरित्र प्रकाशित झालेले नाही. हस्तलिखित स्वरूपातच नष्ट झाले असावे.

अनुक्रमणिका

**न मिळालेली पुस्तके**

१. पदनामा, १८५०
२. होळीचे दुराचार निषेध निबंध, १८६३
३. वेदाविषयी, १८८३
४. ब्राह्मण कन्याविवाह विचार, १८६४
५. पुरुषसूक्तव्याख्या, १८६४
६. कलियुग, १८७७
७. विद्यालहरी
८. एक दिवसात लिहिलेले पुस्तक
९. हिंदुस्थानातील बालविवाह
१०. सौभाग्यरत्न
११. समाधान

**संदर्भ ग्रंथ**


१. महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, प्रा. गं. बा. सरदार
२. लोकहितवादी समग्र वाङ्मय खंड १ व २, संपादक/गोवर्धन पारीख/इन्दुमती पारीख, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९९८-१९९०
३. लोकहितवादीकृत निबंधसंग्रह प्रथमांश, संपादक/अनंत काकबा प्रियोळकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७
४. लोकहितवादी : काल आणि कर्तुत्व, लेखन डॉ. निर्‌मलकुमार फडकुले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७३
५. निवडक लोकहितवादी, संपादक/डॉ, निर्मलकुमार फडकुले/डॉ. ल. रा. नसिराबादकर/फडके बुक सेलर्स, कोल्हापुर, १९८९
६. सामाजिक परिवर्तनाची चळवळ : काल आणि आज, लेखक : डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्रकाशक : मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९९६

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र (खंड पहिला भाग-१) | शां. भा. देव | रु. १२७/- |
| २) | महाराष्ट्राचा इतिहास (मध्ययुगीन कालखंड भाग-१) | संपादक : गो. त्र्यं. कुलकर्णी | रु. १४५/- |
| ३) | मध्ययुगीन महाराष्ट्र (सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन). | प्रा. म. श्री. माटे | रु. ७५/- |
| ४) | समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह (भाग पहिला) | अनुवादक : हेमकांत बळकुंदी | रु. २९५/- |
| ५) | प्रासाद मंडन | डॉ. र. पु. कुलकर्णी | रु. ११४/- |
| ६) | शिल्पप्रकाश | डॉ. र. पु. कुलकर्णी | रु. १६७/- |
| ७) | एक होता गंधर्व | डॉ. राम म्हैसाळकर | रु. ९३/- |
| ८) | गजाआडच्या कविता | श्री. उत्तम कांबळे | रु. ३०/- |
| ९) | पं. जवाहरलाल नेहरू व्यक्ती आणि कार्य | संपादक : बा. ह. कल्याणकर | रु. १४०/- |
| १०) | भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा. ना. कुबेर | रु. १०९/- |
| ११) | मराठी वाङ्मयकोश खंड-४ | समन्वय संपादक डॉ. विजया राजाध्यक्ष | रु. ३२०/- |
| १२) | दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| १३) | भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| १४) | खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सूर्यवंशी | रु. ६०/- |
| १५) | चरियापिटक | डॉ. शेषराव मेश्राम | रु. ३३/- |
| १६) | चिरकालीन सिरॅमिक्स | डॉ. प्रकाश दळवी | रु. ४५/- |
| १७) | छत्रपती शिवाजी महाराज | श्री. प्र. न. देशपांडे | रु. ४८/- |
| १८) | सर्वज्ञ चक्रधर | प्रा.पुरुषोत्तम नागपुरे | रु. ३७/- |
| १९) | संत जनाबाई | डॉ. सुहासिनी इर्लेकर | रु. ५०/- |
| २०) | मराठ्यांची प्रशासन व्यवस्था | सौ. विजया कुलकर्णी | रु. १४५/- |
| २१) | लैंगिक नीती आणि समाज | श्रीमती शकुंदला क्षीरसागर | रु. १४५/- |
| २२) | मराठी वाङ्मयकोश खंड २, भाग १ | डॉ. गो. म. कुलकर्णी | रु. १३०/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे अधिक माहिती/चौकशीसाठी***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५

अनुक्रमणिका

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेअंतर्गत चरित्रग्रंथ
## मलिकेतील चरित्रग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) | साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) | दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) | क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) | डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) | शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) | मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) | तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) | यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |
| १५) | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | व्ही. डी. मेश्राम | रु. ३५/- |
| १६) | स्वामी रामानंद तीर्थ | प्रकाश मेदकर | रु. ४५/- |
| १७) | पठ्ठे बापूराव | चंद्रकुमार नलगे | रु. ४५/- |
| १८) | भाई उद्धवराव पाटील | व. न. इंगळे | रु. ५५/- |
| १९) | धोंडो केशव कर्वे | डॉ. न. म. जोशी | रु. ४०/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे अधिक माहिती/चौकशीसाठी***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५

अनुक्रमणिका

डॉ. निर्मलकुमार फडकुले हे महाराष्ट्रातील एक लेखक, समीक्षक आणि वक्ते म्हणून प्रसिद्ध. सोलापूरच्या संगमेश्वर महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक म्हणून तीस वर्षे अध्यापन. मराठवाडा, कर्नाटक, उस्मानिया आणि विक्रम या विद्यापीठांच्या मराठी अभ्यासमंडळांवर सदस्य म्हणून सहकार्य केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी मंडळाचे सहा वर्षे अध्यक्ष व सोळा वर्षे सदस्य. विधिसभा, विद्वत् परिषद, आणि कार्यकारी मंडळ यावर अनेक वर्षे सदस्य

ललित, वैचरिक आणि समीक्षणात्मक सत्तावीस पुस्तके प्रकाशित झाली. त्यांतील काही पुस्तकांची नावे : साहित्यवेध, संतकवी तुकाराम : एक चिंतन, काही रंग काही रेषा, हिरव्या वाटा, जगायचं कशासाठी? आनंदाची डहाळी, मन पाखरू पाखरू, साहित्यातील प्रकाशधारा, चिंतनाच्या वाटा, परिवर्तनाची चळवळ काल आणि आज याशिवाय संपादित पुस्तके, काही पुस्तकांना शासकीय आणि अन्य पुरस्कार प्राप्त झाले.

अस्मितादर्श साहित्य मेळावा, राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन, परिवर्तन साहित्य संमेलन, प्रतिभासंगम, जैन मराठी साहित्य संमेलन. सोलापूर जिल्हा साहित्य संमेलन इत्यादी संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले.

महाराष्ट्र राज्याच्या साहित्य संस्कृती मंडळाचे गेली बारा वर्षे सदस्य. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ. साहित्यसमीक्षा परिभाषा कोश इत्यादी मंडळांवर काही वर्षे कार्य आकाशवाणीच्या पुरुषोत्तम मंगेश लाड व्याख्यानमालेत ‘संतकवी चोखामेळा व समकालीन संतांच्या रचना’ यावर तीन व्याख्याने.

शैक्षणिक आणि वाङ्मयीन क्षेत्रात अनेक वर्षांपासून कार्यरत.

दिल्लीच्या त्रिलोक अुच्चस्तरीय अध्ययन संस्थेने नुकताच ‘चारित्र चक्रवर्ती’ पुरस्कार देऊन गौरविले.

अनुक्रमणिका